नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका

युगवाणी

विदर्भ साहित्य संघाचे वाङ्मयीन नियतकालिक
जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर २०१२

'ग्रेस' विशेषांक...



ये कावळ्या इथे ये आहेस तू उपाशी
माझी खुडून खा ना प्राणातली उदासी

सही,
ग्रेस

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघाचे वाङ्मयीन नियतकालिक

युगवाणी

जुलै - ऑगस्ट - सप्टेंबर २०१२

संपादक
प्रा. अजय देशपांडे

मुखपृष्ठ व आतील चित्रे :
शुभा गोखले
'इच्छापूर्ती' ७९, अनंत पाटील रोड (उत्तर), दादर (पश्चिम), मुंबई ४०० ०२८

आतील रंगीत छायाचित्रे :
कुमार गोखले
फ्लॅट नं. ८, सुधन्वा सोसायटी, ८४, रामबाग कॉलनी (स्वामी समर्थ मठाजवळ)
पौंड रोड, पुणे ४११ ०३८. भ्रमणभाष : ९७६३७२९६९०

रेखाटने :
प्राचार्य सदानंद बोरकर
श्री ज्ञानेश चित्रकला महाविद्यालय, नवरगाव जि. चंद्रपूर

मुखपृष्ठावरील ग्रेस यांच्या कवितेचे सुलेखन - प्रा. अभिजीत आवारी, वणी,जि.यवतमाळ

मांडणी, सजावट, अक्षरजुळवणी व मुद्रण :
ॲक्टिव्ह कॉम्प्युटर,वणी,जि.यवतमाळ

मूल्य : शंभर रूपये
(कृष्णधवल १६० व रंगीत २० अशा एकूण १८० पृष्ठांच्या या विशेषांकाचे निव्वळ निर्मिती मूल्य १०० रूपये आहे.)

वार्षिक वर्गणी : १५० रूपये


प्रकाशक
सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ,
सांस्कृतिक संकुल, झाशी राणी चौक,
नागपूर - ४४००१२
दूरध्वनी : ०७१२-२५२३९२९, २५५३७६७

वर्गणी व अंकासंबंधी चौकशीकरिता दूरध्वनी : ०७१२-२५४००१४

संपादकीय पत्रव्यवहार
प्रा.अजय देशपांडे
वामनघाट मार्ग, हनुमान नगर,वणी ४४५३०४, जि. यवतमाळ
भ्रमणध्वनी : ९८५०५९३०३०
ई-मेल : srushti_ajay@rediffmail.com, yugwanivss@rediffmail.com

युगवाणी

अनुक्रमणिका




अनुक्रमणिका

जुलै - ऑगस्ट - सप्टेंबर २०१२

युगवाणी

।। ग्रेस विशेषांक ।।

या व्याकुळ संध्यासमयी
शब्दांचा जीव वितळतो
डोळ्यात कुणाच्या क्षितिजे
मी अपुले हात उजळतो.




छायाचित्र : सुरेश पारळकर, नागपूर

श्री. हृदयनाथ मंगेशकर आणि ग्रेस

अनुक्रमणिका

अ नु क्र म

युगवाणी



छायाचित्र डॉ माधवी ग्रेस

तसे उठले आभाळ
मोर नाचाया लागले
आणि एवढ्याच साठी
माझ्या डोळां पाणी आले.

अनुक्रमणिका

संपादकीय

■

अप्राप्य प्रतिभेचे धनी असणाऱ्या ग्रेस यांनी कविता आणि ललितबंधांचे एक अपूर्व दालन मराठी साहित्यात निर्माण केले. त्यांच्या संपूर्ण लेखनातील अनुभवचिंतन, विचार आणि आशयाला दुःख आणि एकांताचा कॅनव्हास लाभला आहे. त्यांच्या ललितबंधात आणि कवितेतही सांस्कृतिक संपन्नता, वैश्विकता, देश्यभाव व भाषेची श्रीमंती आहे. हे लेखन वेगळे आणि वैशिष्ट्यपूर्ण आहे. ग्रेस यांची कविता, ललितबंध, त्यांचे वक्तृत्व आणि व्यक्तिमत्त्व सारेच दुर्बोध आहे असे म्हटले जाते. मराठी समीक्षाव्यवहाराने दुर्बोधतेचा शिक्का मारल्यानंतरही ग्रेस यांच्या विषयी लोकांना विलक्षण क्रेझ होती. समीक्षेने ग्रेस यांच्या लेखनाविषयी भाष्य करताना अनेकदा नाक मुरडले, बरेचदा हे लेखन अतार्किक, असंबद्ध आहे, असेही म्हटले गेले, पण त्यामुळे ग्रेस यांच्या चाहत्यांवर काहीच फरक पडला नाही; त्यांची कविता, त्यांचे ललितबंध एवढेच नव्हे तर त्यांचे वक्तृत्व आणि व्यक्तिमत्त्वही लोकांना आवडायचे. 'ग्रेस स्टाईल'ची ही क्रेझ होती. ग्रेस यांच्या साहित्यावर उत्कट प्रेम करणाऱ्या लोकांनी त्यांच्या विषयीचे वाद, वादळे, त्यांचे खासगी आयुष्य याकडे फारसे लक्ष दिले नाही. दुर्बोध म्हटल्या जाणाऱ्या या प्रतिभावंताचे साहित्य सुबोध व्हावे म्हणून लोक कधी समीक्षेकडे फार आकृष्ट झाले, असेही नाही. एखाद् दुसरा अपवाद वगळता ग्रेस विषयीच्या समीक्षेने आकलन, आस्वाद, मूल्यमापनाच्या नव्या वाटा दाखविल्या असेही झाले नाही. उलट ग्रेस विषयीच्या समीक्षेने त्यांचे आकलनसुलभ असणारे बरेचसे लेखन अकारण दुर्बोधतेच्या दरीत लोटले. ग्रेस यांच्या साहित्याविषयी सकस, दर्जेदार अभ्यासपूर्ण समीक्षा अल्पस्वल्प स्वरूपात लिहिल्या गेली आहे, हे नाकारता येत नाही. तथापि एखाद्या महत्त्वाच्या साहित्यिकाबाबत समीक्षा व्यवहार उदासीन असण्याचा प्रकार ग्रेस यांच्याच संदर्भात घडला आणि पहिल्यांदाच घडला असेही नाही; अशी स्वतंत्र परंपराच आहे. ग्रेस यांच्या संदर्भात आणखी एक वेगळा प्रकारही आहे. ग्रेस जिवंत असताना काही मंडळींच्या लेखण्या अनेक वर्षे अक्षरशः मौन बाळगून होत्या, त्यांच्या मृत्यूनंतर मात्र काही लोक त्यांच्याविषयी त्यांच्या साहित्याविषयी आवर्जुन आणि भरपूर लिहीत आहेत. जिवंतपणी उपेक्षा आणि मृत्यूनंतर फुलांचे हार अर्पण करायचे, असे का? पण असे काहीही आणि कितीही असले तरी त्याकडे ग्रेस यांच्या लेखनावर उत्कट प्रेम करणाऱ्या सर्वसामान्य माणसांनी लक्षच दिले नाही. अर्थ न समजताही ग्रेस यांच्या कवितेला, ललितबंधांना लोकांनी पसंती दिली, ही वस्तुस्थिती आहे. ग्रेस यांचे साहित्य लोकांना का आवडायचे? या प्रश्नाची धातुरमातूर उत्तरे समीक्षा देत राहिली. अनवट शैली

अनुक्रमणिका

असतानाही ग्रेस यांचे लेखन रसिकांच्या मनाला भूरळ घालीत राहिले. ग्रेस यांच्या लेखनाने समीक्षेची मोजमापे फारच तकलादू ठरविली. समीक्षा साहित्याच्या लोकप्रियतेचे मोजमाप करूच शकत नाही आणि कलाकृतीचे भाकीतही ठरवू शकत नाही, कलाकृतीचे भाकीत सांस्कृतिक भान असणारा समाज ठरवतो, तिथे समीक्षेचे निकष उपयोगी ठरत नाही, ग्रेस यांच्या लेखनासंदर्भात तरी असे म्हणता येते.

डॉ. जयंत परांजपे, डॉ. त्र्यं. वि. सरदेशमुख, डॉ. अक्षयकुमार काळे, डॉ. नंदकुमार मुलमुले या आणि इतर काही समीक्षकांनी ग्रेस यांच्या विषयीचे दीर्घ स्वरूपाचे चिकित्सक लेखन केले आहे. याशिवाय डॉ. द. भि. कुलकर्णी, डॉ. बाळकृष्ण कवठेकर, वीणा आलासे, डॉ. एस. एस. भोसले, वामन इंगळे, ल. ग. जोग, डॉ. मधुकर वाकोडे, प्रा. म. सु. पाटील, डॉ. आशा सावदेकर वगैरे अनेकांनी त्यांच्या कविता व ललितबंधांची चिकित्सा करणारे लेखन केले आहे, तथापि ग्रेस यांच्या संदर्भात अजूनही नांगरल्याविन भूईचा प्रदेश असल्याचीच परिस्थिती आहे, त्यांच्या कविता आणि ललितबंधलेखनाचे सामर्थ्य व उणिवा सप्रमाण व पुराव्यासह दाखवून देण्याची गरज आहे, त्यांच्या एकूणच लेखनाचा चिकित्सक वेध फारसा घेतला गेलेलाच नाही. मराठी समीक्षेने ग्रेस यांच्या लेखनावर अन्याय केला का ते देखील तपासून पाहण्याची गरज आहे. ग्रेस यांच्या कवितेच्या भाषेचा अभ्यास करण्याचीही गरज आहे. एवढेच नव्हे तर संगीत, चित्र, नृत्य, नाट्य, शिल्प, चित्रपट, विविध भाषांमधील साहित्य यांचे ग्रेस यांच्या लेखनाशी जुळलेले अनुबंध चिकित्सकपणे शोधण्याची आवश्यकता आहे यासाठी ग्रेस यांच्या साहित्याविषयी भरपूर लिहिले गेले पाहिजे, केवळ दुर्बोध हा एक निष्कर्ष काढून या लेखनाकडे पाठ फिरवता येणार नाही. ही भूमिका घेऊन 'युगवाणी'चा हा अंक प्रकशित करीत आहोत. ग्रेस यांच्या व्यक्तिमत्त्वाविषयी, त्यांच्या कविता व ललितबंधांविषयीचे भरपूर लेखन या अंकात समाविष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. एखाद् दुसरा अपवाद वगळता या अंकातील सर्व लेखन मुद्दाम 'युगवाणी' साठी लिहिलेले आहे. ज्यांचे व्यक्तिमत्त्वही दुर्बोध ठरविल्या गेले ते ग्रेस - वडील, मित्र, माणूस, कलावंत, शिक्षक, संपादक म्हणून कसे होते, ते डॉ. माधवी ग्रेस, रामदास भटकळ, शुभा गोखले, प्रा. वसंतराव पुरके, डॉ. माधवी वैद्य, हेमंत कर्णिक, मनोज कुलकर्णी गो. ना. मुनघाटे, डॉ. तीर्थराज कापगते यांच्या लेखनातून कळते. ग्रेस यांच्या ललितबंधांचा साक्षेपी वेध डॉ. प्रभा गणोरकर यांनी घेतला आहे. डॉ. आशा सावदेकर व डॉ. विमल भालेराव यांनी ललितबंधांचा आस्वाद घेतला आहे. ग्रेस यांच्या कवितेचे नीरक्षीर न्यायाने मूल्यमापन करण्याचा प्रयत्न डॉ. माधवी देसाई यांच्या लेखात आहे. डॉ. द. भि. कुलकर्णी, डॉ. निशिकांत मिरजकर, डॉ. मनोज तायडे यांचे आस्वादात्मक लेखन ग्रेस यांच्या संदर्भात आकलनाच्या नव्या वाटा दाखविणारे आहे. वीणा आलासे, प्रा. नारायण कुलकर्णी कवठेकर यांचे लेखन ग्रेस यांचे व्यक्तिमत्त्व व कविता यांची गुंफण सोडवित काही नवी निरीक्षणे नोंदविणारे आहे. डॉ. शुभांगी पातुरकर यांनी ग्रेस यांच्या एका कवितेचे छंदशास्त्रीय विश्लेषण केले आहे. शशिकांत सावंत यांनी दृश्यकलेशी ग्रेस यांच्या कवितेच्या अनुबंधांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे. डॉ. सतीश बडवे, प्रा. देवानंद सोनटक्के, स्मिता लाळे यांचेही लेखन वेगळे आकलन मांडणारे आहे. चित्रकार शुभा गोखले व डॉ. नंदकुमार मुलमुले यांनी घेतलेल्या दोन मुलाखतींचे अनिल कुलकर्णी यांनी केलेले शब्दांकन या अंकात आहे. या मुलाखतींमध्ये ग्रेस यांनी त्यांच्या 'आई' या कवितेसह काही कवितांच्या निर्मितिप्रक्रियेचा शोध घेतला आहे. ग्रेस यांच्या कवितेच्या आकलनासाठी तो उपयुक्त ठरेल असे वाटते. चित्रकार शुभा गोखले यांची काही चित्रे ग्रेस यांच्या कवितेतील आशयाशी समांतर आहेत असे वाटते त्यामुळे त्यांची काही चित्रे ग्रेस यांच्या कवितांसह या अंकात प्रकाशित केली आहेत. एकूणच या अंकातून ग्रेस यांच्या व्यक्तिमत्त्वातील विविध पीळ आणि पैलूंचा शोध घेण्याचा प्रयत्न तर केला आहेच, पण त्यांच्या कविता आणि ललितबंधांचा आशय व पोत तपासण्याचाही प्रयत्न केला आहे. ग्रेस यांच्या लेखनाकडे जाण्याच्या काही नव्या वाटा या अंकातून गवसेल असा विश्वास वाटतो.

या अंकासाठी डॉ. प्रभा गणोरकर, श्री. रामदास भटकळ, चित्रकार शुभा गोखले, पॉप्युलर प्रकाशन व अस्मिता मोहिते, छायाचित्रकार कुमार गोखले, डॉ. माधवी ग्रेस यांच्यासह विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष मनोहर म्हैसाळकर, कार्यकारिणीतील पदाधिकारी व सदस्य, कार्यालय व ग्रंथालयातील सर्व कर्मचारी यांनी खूप सहकार्य केले, या सर्वांचे मनःपूर्वक आभार. तसेच या अंकातील सर्व लेखक, छायाचित्रकार, चित्रकार यांचेसह प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे सहकार्य करणाऱ्या सर्वांचे मनःपूर्वक आभार.

ग्रेस यांना भावपूर्ण आदरांजली.

। अजय देशपांडे

कविता

ग्रेस

■

हाका


अगतिक होऊन
दुःखाच्या पहाडात हांका शोधायला निघावं
पण दिसतात...
कपाळींच्या भावविश्वांत निजलेलें
विस्मृतींच्या मौनांत भिजलेलें
तुझ्या साम-भैरवीचें पडसाद
तेव्हांच झोपीं जातो...
बकुळीच्या पापर्णीतून निसटलेला माझा चंद्रकंस
क्षितिजालयांत...

वरदान

पाणी तळमळून हेलकावत जाते
क्षितिज वितळते मला
पिळवटून
विच्छिन्न वास्तवाच्या आभासाचें
मीनार असावेत हे
एका सूक्ष्म लकेरींत तरंगून जातेस तू...
अधिकच निरागस होते तुझ्या
पशुत्वाची जाणीव
पदरांतून आकाश पांघरतेस माझ्यावर...
दुःखाची युगें अधिक गडद होतात तुझ्या
डोळ्यांत... वनवासांतील रामायणासारखी...
अंधार, अंधार राहात नाहीं ते फक्त
प्रकाशाचें वरदान असते...

ग्रेस यांच्या 'बाई! जोगिया पुरूष' हा कवितासंग्रह पॉप्युलर प्रकाशन लवकरच प्रकाशित करीत आहे.
या कविता संग्रहातील ग्रेस यांच्या काही कविता येथे प्रकाशित करीत आहोत.
पॉप्युलर प्रकाशनाचे मनःपूर्वक आभार.
- संपादक

अनुक्रमणिका



विठू


सावळ्या वाटेला
संधिप्रकाशांत...
तहानली रात
आठवते

अवेळीच पाणी
कार्ळेपण घेते
वांझपण रितें
विराटसे

पैलतिरावर
विठू माझा भोळा
माझी पडशाळा
सांभाळती।

वारबंदी वाडा
लिंबोणीची माळ
चांदोबाची शीळ
खुळी कथा।

पण आठवता
दुभंगतो ऊर
आणि येतो पूर
कुठेतरी।



तळापाशीं

झाकळल्या जळी
सावल्यांची साय
पान्हावली गाय
हंबरते।

मनाच्या आभाळा
क्षितिजांचे कांठ
शिडालाही वाट
वारा पुसे।

तरी पोकळींत
सामावलें कांहीं
उमगलें नाही
नभपण।

मातीवर पाय
अनवाणी झालो
तळापाशीं गेलो
ठाव घ्याया।

अनुक्रमणिका



झाली कोवळी वाटुली

माझ्या श्रावण नभांत
रूप सावळें सावळें
आणि मेघांच्या राउळीं
टाळ मृदुंग नादलें।

आता फिटेल हळद
ऊन झेपेल कायेला
मेंदीमधल्या हातांचा
विठू असेल भुकेला।


नाचे म्हणून थेंबांत
वेड्या तुक्याचा अभंग
झाला तीर्थांच्या गजरीं
देह अनंग... अनंग।

मुक्या मातीच्या गंधांत
माझ्या फुलांची सावली
तुझें चरण स्पर्शाया
झाली कोंवळी वाटुली।।

अपरात्र

अशा अपरात्रीं निघालो आहे,
काठांकाठांवर डोलूं लागलेला काळोख,
सभोवतालीं पसरलेले धुके,
पलीकडे कोसळणारा ताऱ्यांचा पाऊस...
अशा अपरात्री निघालो आहे.
कुठून साचतो मनावर एवढा बर्फ या अनिरुद्ध
उमाळ्यांचा; जेव्हा हलकेच येऊन बिलगतात
क्षितिजावरून जाणाऱ्या घोड्यांच्या टापांचे
आवाज... अशा अपरात्रीं गोठलेल्या स्तनांतून
अश्रूंचे थेंबही झरत नाहीत. मग कां बांधून
ठेवलेस पाठीशीं एवढे प्रचंड हॉस्पिटल? संध्याकाळच्या
फकिरासारखी उदासवाणी झाडें...
अशा अपरात्रीं पायांना खोल ओढूं लागतात तुझ्या
रक्ताखालून वाहणाऱ्या चंद्रगार वाऱ्याच्या झळा...
तुझें हे आकाश, अर्धेमुर्धे खचलेले मेघांचे स्मारक,
प्राणांत मिटू लागलेले श्वास... अशा अपरात्रीं
निघालो आहे, जशी बांधलीच नव्हती पक्ष्यांनी
कधी घरटीं...
आता जळू लागतील ना, या नगरींतील प्रकाशवेळा
वितळूं लागेल हळदीवर पसरत जाणाऱ्या
भक्तीचा आवेग...

अनुक्रमणिका



घावांतले देव

माझ्या घरी आलें
हळदीचे पाय
शब्दातीत माय
अर्थ झाली

सार्थ झालें स्वप्न
इंद्रियांचे भाव
घावांतले देव
भेटी आले!

ओणवून गेलें
माझ्यावर पाणी
अंगणांत न्हाणी
तीर्थ झाली!

फक्त देहावर
जखमेचा व्रण
त्याशी सांभाळून
जगायचे।

थडगे

केलीही नसती मी तुझ्यासाठीं प्रार्थना
विस्कटलेल्या बकुळीची माळा
गुंफलाही नसता तुझ्या निरांजनांत
हिमगारांत गोठलेल्या माझ्या प्राणांचा
शुभ्र कापूर...
पण माहेरवाशिणीच्या आभाळांत
आषाढाची आरती सुरू होती!!

असेच मावळलें असतें
रानफुलांच्या ओठांवर फुटलेले हसूं
कार्तिकी पहांटेच्या दंवारल्या मेण्यांत...
पाषाण-नगरींतील उद्‌ध्वस्त शिलालेखाप्रमाणें;
स्वस्थ उभा राहिलो असतो...
काळाचें अश्रू वेचित
पण निळें क्षितिज रक्तवर्ण झालें होतें
पांखरांच्या शोणितानें!!!

सजविलीही नसती समरभूमी
पोलादाचें कवच पांघरून
शोकांतिकेसाठीं कल्पान्ताच्या...
ओतलेही नसते या भावनाट्यांत
तुझ्या जाणिवेचें गर्द जांभळे रंग
आणि कदाचित अंधाराच्या डोळ्यांत रडलोही नसतो...
पण पाहिलें, गहिंवरल्या तेजाच्या करुणेंत
माझेंच थडगें तरंगतांना...

अनुक्रमणिका



मरण

अधू झालें माझें डोळे
आणि अधू झाली नार्ती
जीर्ण वडाच्या पारांत
जशा गळतात वार्ती

आज घराला घेरती
किती हाकांचें आक्रोश
वारा पिऊन पायाला
झोबें सुसाट आकाश


रात्र आंधळी वेगाची
नको होऊस वेगळी
तुझ्या विदग्ध दुःखाला
आण थोडेसें जवळी

सांग बकुळीची कथा
अश्रू भारून जरासा
डोळे विझण्याच्याआर्धी
मला पाहू दे आरसा

व्याप

सायंगंधाची सुकुमार फुलें अंतरंग
उघडून बसली आहेत.
किणकिणत आहे, खडकांच्या कांठावर
पाण्याची मधुवंती.
जपून, सांडवूं नकोस, या सतंद्र धरतीवर
डोळ्यांतील सुखाचे श्वास...
निवांत असू दे; अंगपणाची प्रत्येक बाजू
अंधाराच्या मऊ शाखांवर घडीभर झुलूं दे,
दिशांचे दुःखी पारवें...
तुझ्या छायेंत मिसळूं दे, झाडांच्या प्रदीर्घ
सावल्या; इमारतीचे निकटवर्ती श्वास...
आणि मग टेकूं दे, अधिऱ्या वक्षावर
त्या माझ्या, मावळतीच्या, शब्दव्यापी
पर्वतांच्या कडा.

अनुक्रमणिका



दुःख

विकायला आज
निघालो मी व्यथा
जुनी माझी कथा
कोण घेई?

तुझ्या बाजाराचे
वेगळेच भाव
कसें माझे घांव
खपतील?

हाडांच्या रे भिंती
मातीच्या या घरा
दुःखाचा हा भारा
कोण घेई?

कोण घेई माझ्या
ओसाडाचा भोग
त्याच्या घरा आग
लागायची!

म्हणूनच माझी
दुःखावर माया
वेगळीच काया
हवी मला!

अनुक्रमणिका

काही ‘संदर्भ’

ग्रेस

■■■

घोषवाक्य :

घोषवाक्यात विचार करणारे पुरोगामी लेखन छापल्याने किंवा प्रतिगाम्यांना बळेबळे अंगावर घेतल्याने नियतकालिके पुरोगामी ठरत नाहीत.

एकही पुरोगामी शब्द न योजणारे पण वैश्विक व म्हणून वर्गविरहित जाणीव असणारे लेखन अत्यंत पुरोगामी आणि निरोगी असू शकते; आणि वर्गविरहिततेचे केवळ स्वप्न पाहणारे लेखन अत्यंत आत्मकेंद्रित, वर्गग्रस्त आणि रोगट असू शकते.

क्रांतिनिष्ठ जाणीव ही मनाची आणि जीवनाची एक अत्यंत उन्नत अवस्था होय. समाजाची हीन म्हणजे केवळ स्वार्थप्रेरित - क्रूर - आणि - पार्थिव मनोऽवस्था, साधन म्हणून देखील, जागी करून अशा उन्नत अवस्थेची अपेक्षा करता येत नाही, ती घोर लोकवंचना व आत्मवंचना होय, त्यातून लोकशाहीत झुंडीची हुकुमशाही आणि व्यक्तीचा भोगवाद आणि हुकुमशाहीत छळशिबिरे आणि जडवाद निर्माण होतात.

अशा वंचना विविध झुंडींना आणि त्यांच्या संस्थांना प्रखर प्रासंगिक बळ - आणि - यश देतात. त्यामुळे नागरिक आणि विचारवंत नव्हेत तर सर्व समाजसंस्था आणि सर्व शासनयंत्रणाच झुंडशरण वृत्तीने व्यवहार आणि विचार करू लागते.

अशा ऱ्हासकाळात कलावंताकडे केवळ सांगकामे चाकर म्हणून पाहिले जाते.

पण कलांवत जसा कागदी कातरकाम करणारा नसतो तसा तो झुंडीचे तस्त हातात घेणाराही नसतोच.

:: संपादकीय ‘संदर्भ’ ::

ग्रेस ‘संदर्भ’ या नियतकालिकाचे संपादक होते. ‘संदर्भ’मध्ये त्यांनी सामाजिक सांस्कृतिक पर्यावरण व साहित्य व्यवहारावर भाष्य करणारी स्फुटे लिहिली. हे लेखन आजही विचारप्रवृत्त करणारे आणि ग्रेस यांचा वाङ्मयीन दृष्टिकोन दाखविणारे आहे. ‘संदर्भ’मधील ग्रेस यांचे स्फूट लेखन येथे पुनर्मुद्रित करीत आहोत. **- संपादक**

अनुक्रमणिका

आज इथला कलावंत स्वतःचे बळच विसरत आहे. त्याने नागरिक, विचारवंत, शासनकर्ते आणि झुंड यांना जीवनमर्म दाखवायचे तर तोच त्यांच्या सल्ल्याने आणि हल्ल्याने आपले अक्षांश - रेखांश ठरवीत आहे.

घोषवाक्यात विचार करणे आधी आपण सोडावयास हवे आहे. ('संदर्भ' अंक दुसरा - मार्च एप्रिल १९७५)

पुराण साहित्य : प्रचार साहित्य :

साहित्याने समाजाला क्रियाप्रवण करावे असे नेहमीच सांगितले जाते.

ज्ञानेश्वरांचा अपवाद वगळता महाराष्ट्रातील सर्व प्रमुख संतांनी असे क्रियोन्मुख साहित्यच निर्माण केले आहे.

साहित्यशास्त्रालाही हे प्रयोजन मान्य आहे.

फक्त अशा साहित्याला ललित साहित्य असे नाव नसून 'पुराण साहित्य' असे नाव आहे.

पुराण साहित्य समाजाचा श्रेष्ठ सांस्कृतिक ठेवा आहे, कारण हे साहित्य केवळ समाजदर्शनच घडवीत नाही, समाजपरिवर्तनही घडवून आणते. अशा साहित्याला आज चांगल्या अर्थाने 'प्रचार साहित्य' असे नाव देता येईल.

असे साहित्य प्रतिमाप्रधान, व्यंग्यार्थपूर्ण असून चालत नाही, ते वाच्यार्थप्रधान किंवा रूपकप्रधान असावे लागते, एवढेच नव्हे तर ही रूपके सुस्पष्ट करणाऱ्या संस्था त्या समाजात असाव्या लागतात. कीर्तन, प्रवचन, पुराण या अशा संस्था होत. या संस्था समूहाभिमुख होत्या.

याहून महत्त्वाची गोष्ट म्हणजे असे साहित्य निर्माण करणारा स्वतः आपल्या प्रतिपादनानुसार आचरण करणारा असावा लागतो.

त्याला ऋषी, मुनी किंवा संत अशी संज्ञा आहे. आपल्या प्रतिपादनाशी विसंगत वर्तन करणाऱ्याचे साहित्य, समूहप्रधान माध्यम न वापरणारे साहित्य आणि प्रतिमाप्रधान, व्यंग्यार्थपूर्ण साहित्य समाजाला क्रियाप्रवण करू शकत नाही.

मराठीत आज या संदर्भात काय स्थिती आहे ते सर्वश्रुत आहे.

मराठीला आज श्रेष्ठ पुराण साहित्याची : श्रेष्ठ प्रचार साहित्याची गरज आहे. ('संदर्भ' अंक तिसरा - मे जून १९७५)

प्रतिभावंताची समाजाभिमुखता :

जुन्या - नव्या विचारांना जो विरोध करतो तो प्रतिगामी किंवा पुरोगामी नव्हे विचार समजून घेण्याची कुवत जो गमावून बसला आहे तो प्रतिगामी.

हा रोग जीर्ण पोथ्यांच्या संसर्गाने किंवा पेपरबॅकच्या स्पर्शाने किंवा प्रचार पुस्तिकांना कुशीत घेतल्यानेही येऊ शकतो.

विचारशक्ती न वापरणे, ती गहाण टाकणे हा मध्ययुगीन वृत्तीचा आविष्कार आहे व म्हणून तो प्रतिगामीपणा आहे.

समाजात मिसळणे हा समाजाभिमुखपणा नव्हे, समाजाच्या हितासाठी समूहात संस्थेत वा एकांतात काम करणे ही समाजाभिमुखता होय. शास्त्रज्ञ, तत्त्वज्ञ, कलावंत यांनी मुख्यतः एकांतात राहून समाजाभिमुख व्हायचे असते.

त्यांची समाजाभिमुखता म्हणजे समाजापुढे शरणागती, समाजाचा जयजयकार आणि समाजाच्या पातळीवर स्वतः उतरणे नव्हे, तर समाजाला विचारनिष्ठ विवेकनिष्ठ आणि सौंदर्यनिष्ठ करणे.
('संदर्भ' अंक चौथा - जुलै ऑगस्ट १९७५)

संयोगसाहित्य :

महान साहित्याची निर्मिती भूमी आणि आकाश यांच्या संयोगातून घडून येते.
भूमी म्हणजे पार्थिवता.
भूमी म्हणजे देश्य सांस्कृतिक संचित.
भूमी म्हणजे व्यक्तीची नेणीव.
भूमी म्हणजे व्यक्तीचे अनुभव.
आकाश म्हणजे अपार्थिवता.
आकाश म्हणजे सुदूरचे सांस्कृतिक संचित.
आकाश म्हणजे समष्टीची नेणीव.
आकाश म्हणजे समष्टीचे अनुभव.

तर्कनिष्ठा, व्यक्तिनिष्ठा, पक्षनिष्ठा, पंथनिष्ठा, समूहनिष्ठा, वर्तमाननिष्ठा, गतकाळनिष्ठा...
यांना एकेकट्याने भूमी - आकाशामीलन घडवून आणता येत नाही.
यांना असे संयोगसाहित्य उमजत नाही व म्हणून रूचतही नाही.
पण अखेरीस महात्मतेचे बीज याच संयोगक्षेत्री पेरले जाणार असते.

अनुक्रमणिका

याच संयोगक्षितिजी महात्मतेची वीज लखाखणार असते.

भूमि - साहित्य
भूमीत उगवते, पण भूमीच्या वर उठत नाही, (त्याला आकाशाचे भय वाटते !) भूमिगर्तेतच विस्तारत जाते.
आकाश - साहित्य
आकाश उगवते, पण आकाशातून, मंदाकिनीप्रमाणे, भूमीवर उतरत नाही, (त्याला भूमीची लाज वाटते !)
ते त्रिशंकूसारखे, शोभावेलीसारखे
निराधारच पसरत जाते.

संयोगसाहित्य मात्र
निर्मात्याचे अनुभव
त्याची नेणीव
त्याचे सांस्कृतिक संचित
त्याच्या पलीकडच्या विश्वघटना, संस्कृती, गूढ संकेत यांचाच आविष्कार असते.
ते भूमीतून उगवते आकाशात जाते.
आकाशात उगवते, भूमीत शिरते.
ते आकाश - भूमी यांच्यातील द्वैतच नाहीसे करते.
('संदर्भ' अंक पाचवा - सप्टेंबर आक्टोबर १९७५)

कलावंताचा जोगिया : अनुभूतीचे करूणामूल्य :

किती घरे आहेत इथे.
आणि घरांच्या वस्त्या.
आणि वस्त्यांची शहरे.
या प्रत्येक घरात परस्परात विरोध.
या प्रत्येक वस्तीत. या प्रत्येक शहरात.
तरी गुण्यागोविंदाने हे सारे नांदताहेत.
एकमेकांबद्दल प्रेम आणि विश्वास म्हणून नव्हे,
प्रत्येकजण आपल्यासारखाच घरबंद.
वस्तीबंद आणि शहरबंद म्हणून.
हे गुण्यागोविंदाने नजरबंद.
प्रत्येकजण प्रत्येकाचा द्वेष करीत गुण्यागोविंदाने
आपआपल्या घरात, वस्तीत आणि शहरात खुशाल.
प्रासंगिक राहुट्या बांधून चिरकालाचा वर बावटा
लावणारेही खुशाल.
घरवाल्यांचेही त्यांना भूमिगत आशीर्वाद.
पण कोणी असाही ज्याला घर - वस्ती - शहर
संकल्पनाच नामंजूर. जो जनचर हिंडतो आहे
दारांनी दुभंगलेल्या घरातून, वाटांनी भंगलेल्या
वस्त्यातून, वस्त्यांनी विभागलेल्या शहरातून.
ज्याचे प्रेम आहे हरेक इसमावर, हरेक घरावर,
हरेक वस्तीवर, हरेक शहरावर.
ज्याला मंजूर नाहीत अक्षांशरेखांशाच्या वाटा काल्पनिक.
ज्याला मंजूर नाही तंबूत राहणे आकाशाच्या.
तो सर्वांचा. व्यष्टिसमष्टीचा, सृष्टीपरमेष्टीचा.
प्रत्येक घरातून, प्रत्येक वस्तीतून, प्रत्येक शहरातून
मात्र याच्यावरच रोखलेल्या बंदुका.
ते परस्परांचे कट्टर वैरी असून बंदुका साऱ्यांच्या
याच्यावरच रोखलेल्या; या कफल्लक, विश्वपूर्ण, विश्वमित्रावर.
ज्याने कातडी राहुटीच्या आत तेवणाऱ्या लमाणदिव्यासाठीच
डोके ठेवले सहस्रचरणांवर विश्वाच्या.
सर्वांच्या विरोधी दिशातील गोळ्यांची इथेच एकरूपता.
पण याने सुरूंग लावला आहे प्रत्येकाच्या तुरूंगाला.
हा निर्धास्त.
('संदर्भ' अंक सहावा - नोव्हेंबर डिसेंबर १९७५)

:: वर्गणीदारांसाठी सूचना ::

- 'युगवाणी'चे अंक मिळण्यासाठी वर्गणीदारच व्हावे हे उत्तम.
- 'युगवाणी'च्या एका वर्षातील चार अंकांची वर्गणी १५० रू. आहे.
- वर्गणी फक्त मनीऑर्डर किंवा डिमांड ड्राफ्टने ('विदर्भ साहित्य संघ' या नावाचा) स्वीकारण्यात येईल.
- सध्या, वर्गणी फक्त एका वर्षाची स्वीकारण्यात येईल.
- वर्षाच्या मधल्या अंकापासून वर्गणीदार झालेल्यांना आधीच्या अंकाच्या प्रती शिल्लक असल्यास पाठवणे शक्य होईल.
- वर्गणी पाठविताना आपले नाव, संपूर्ण पत्ता, पिन कोड आणि फोन नंबरही कळवावा.
- पत्ता : विदर्भ साहित्य संघ, सांस्कृतिक संकुल, झाशीराणी चौक, सीताबर्डी, नागपूर - ४४००१२.

अनुक्रमणिका



छायाचित्र डॉ माधवी ग्रेस

मनातुन वाहणारी ही
युगांची आंधळी गाणी
जरासे खोल बघताना
गळ्यातुन शब्द का फुटतो?

पंथविराम

डॉ. माधवी ग्रेस

My father has passed away
Grace has not passed away
Grace is immortal...

१९७७ ह्या साली आमची आई डॉक्टर लीला आम्हाला नेहमीसाठी सोडून गेली. त्यानंतर ग्रेस औदुंबराच्या सावलीत बसून म्हणाले...

गुडघ्यात मान घालून
बसलात का मुलांनो
आताच पान गळले
थांबा जरा फुलांनो...

आई गेल्यानंतर, ग्रेसचे घरटे म्हणजे त्यांचे तीन मुलं. मिथिला, माधवी आणि राघव. ग्रेस आमचे वडील. आम्ही त्यांना दादा म्हणतो. इतरांसाठी ते ग्रेस होते पण आमच्यासाठी ते ग्रेस कमी आणि वडील व मित्र जास्त.

२६ मार्च २०१२ : दिनानाथ मंगेशकर रूग्णालय, पुणे इथे सकाळी नऊच्या सुमारास दादा आम्हाला सोडून गेले. ते चार वर्षांपासून कॅन्सरशी झुंज देत होते. मी जेव्हा त्यांना हॉस्पिटल मध्ये भेटली तेव्हा ते काहीच बोलू शकले नाही. परंतु त्यांच्या डोळ्यातले अश्रू सगळंच काही बोलून गेले. मला माझं संपूर्ण बालपण त्यांच्या डोळ्यातल्या पाण्यात तरंगत दिसलं.

भेट
डोळे ओले
डोळे थकले
डोळे निजले
स्वप्नं राहिले डोळ्यात आपुले...

जितके अफाट कवी तितकेच अफाट वडील. दादांचा जन्म नागपूरला कर्नल बागेत एका चाळीत झाला. त्यांची आई त्यांना लहानपणीच सोडून गेली. आई नव्हती म्हणून बालपण नव्हते. त्यांची आई त्यांच्या कवितेत सगळीकडेच दिसते...

ती गेली तेव्हा रिमझिम
पाऊस निनादत होता
मेघात मिसळली किरणे
हा सूर्य सोडवीत होता
अंगणात गमले मजला
संपले बालपण माझे
खिडकीवर धुरकट तेव्हा
कंदील एकटा होता...

अनुक्रमणिका

त्यांचं शिक्षण एका साधारण शाळेत झालं. शिवराम वाटवे हे त्यांचे गुरू व शिक्षक होते. त्यांच्यापासून दादांना खूप प्रोत्साहन मिळाले. बावीस वर्षाच्या वयातच घर सोडले आणि नंतर आमच्या आईशी लग्न केले. लग्नासाठी घरून विरोध होता. सुरवातीचे दिवस फारच वाईट गेले. हातात पैसे नव्हते पण दोघांजवळ बळ भरपूर होते. आर्थिक परिस्थिती गंभीर असल्यामुळे खूप त्रास झाला, तरीही आमच्या शिक्षणात काही कमी पडू दिले नाही. आईचा साथ दादांना मिळाला, हे त्यांचं मोठे भाग्यच. कारण आईमुळे त्यांची कविता बाहेर येऊ लागली. त्याला एक दिशा मिळाली ताल मिळाला आणि ते फुलू लागले. आमच्या तिघांचा जन्म झाला. आम्ही लहान असल्यामुळे आई आपलं मेडिकलचं शिक्षण पूर्ण करू शकली नाही. दहा वर्षांच्या गॅप नंतर आईनी परत मेडिकल जॉईन केले आणि डिग्री घेतली. ह्या काळात अभ्यास सोडून आमचं सगळं दादाच करायचे. स्वयंपाकापासून तर शाळेपर्यंत. आई आमच्या अभ्यासाच्या बाबतीत फारच कडक होती. तिची खूप भिती वाटायची मात्र दादा आईच्या उलट. आम्हाला ते कधीच रागावले नाही. एक तारखेला पगार झाला की दादा आमच्यासाठी न चुकता खाऊ आणत असतं. बालपण हनुमान नगरात गेलं. तिथे आम्ही शेंडेंच्या घरात राहात असू. घर रस्त्यावर आणि बाहेर झाडीचे कुंपण. कुंपण फक्त नावालाच. इथे खूप चोऱ्या व्हायच्या. एकदा रात्री आमच्या घरात खिडकीतून चोराचा हात आत आला, तेव्हा आईने तो हात अंधारात घट्ट धरला आणि दादांना जोरात हाक मारली, बाहेरून चोराला पकडा असे आईने दादांना सांगितले पण दादा हे पाहून थरथरायला लागले आणि ह्या गोंधळात चोर निसटून गेला. दादा आईला म्हणाले... अगं जीव महत्त्वाचा की चोर? पुढे कधी चोराचा हात पकडू नकोस आणि पकडला तर मला हाक मारू नकोस. आई जितकी शूर होती तितकेच दादा भित्रे.

आई आणि दादांना जुने हिंदी आणि इंग्रजी पिक्चर पाहायचे भरपूर वेड. कसेतरी पैसे जमवून ते आम्हाला बाहेरून बंद करून रात्रीचा शो पाहिला जायचे. पैसे वाचवायला आई लेडीज मध्ये बसायची आणि दादा थर्ड क्लास मध्ये पडद्यासमोर. दादांना मधुबाला, मीनाकुमारी, दिलीपकुमार आवडायचे आणि इंग्रजी नटांमध्ये इन्ग्रिड बर्गमन, क्लिंट इस्टवूड आणि ग्रेगरी पेक. दादाचं बहुतेक आयुष्य सायकलवरच गेलं. ते भर उन्हात शीळ वाजवत सायकलवर चार चार नोकऱ्या करीत असत. बरेचदा आपल्या तंद्रीत राहायचे. आमच्या तिघांचे पाय शाळेत जातांना सायकलच्या चाकात चेंगरले गेल्याचं मला आठवतं.

आईची तब्येत नाजूक होती. आम्ही लहान असतांना ती आजारी पडली. तिच्या आजारपणात दादांनी तिचं खूप केलं. आजारपणातून ती कधीच बाहेर पडू शकली नाही आणि आम्ही शाळेत असतांना आई आम्हाला सोडून गेली. आमचे घरटे तुटले. त्यादिवशी मी पहिल्यांदा दादांना खूप रडतांना पाहिले. एका लहान मुलासारखे, ते कोसळले, पुन्हा एकदा त्यांचासाठी सगळेच संपले, पण हळू हळू त्यांनी स्वतःला आणि आम्हाला सावरलं आणि आमचा मोडलेला संसार आम्ही पुन्हा सुरू केला.

आई गेल्यानंतर आम्ही हनुमान नगर सोडले आणि आईच्या ताज्या आठवणी घेऊन आम्ही टेकडी जवळच्या एका मोठ्या वाड्यातल्या चिमुकल्या घरात राहायला गेलो. ही टेकडी बर्डीवर, पुलाजवळ, स्टेशन कडे जाणाऱ्या रस्त्यावर आहे. घर फारच लहान होते पण इथे आम्ही खूप बिलगून राहिलो. घरमालकाचे नाव सांबारे म्हणून ह्या वाड्याचे नाव सांबारे वाडा असे पडले. ह्या वाड्यात खूप चळवळ असायची आणि पहाट लवकरच व्हायची. मुलांचा सतत गोंगाट असायचा. आमचे आणि इतरांचे दार नेहमीच उघडे असायचे. इथे पाण्याची टंचाई होती त्यामुळे दादा पहाटे चार वाजता पाणी भरायला वाड्यातल्या समोरच्या नळावर जायचे, तिथे रांग असायची तेव्हा ते रांगेत उभे राहायचे. आम्ही मदत करीत असू. कधी कधी आम्ही झोपेत असायचो तेव्हा ते एकटेच पाणी भरायचे. घर पहिल्या माळ्यावर होते. असं असलं तरी तिथले आमचे दिवस फार सुखात गेले. शेजार छान मिळाला आणि खूप प्रेम देखील मिळालं. इथे आम्ही तीन वर्षे राहिलो. दादा म्हणजे जिवंतपणा. त्यांच्यात मला नेहमीच एक विलक्षण शक्ती दिसायची. ते नेहमीच टवटवीत, बेचैन आणि जिवंत दिसायचे एखाद्या वाघासारखे. थकलेले, निजलेले, अंथरूणात पडलेले ते मला फक्त शेवटीच दिसले. ही ताकद त्यांच्यात कुठून यायची कुणास ठाऊक. जणू काही दैवी शक्तीच ही. त्यांच्या डोळ्यातला जिवंतपणा पाहून मी उभी राहायची.

त्यांचं त्यांच्या केसांवर विलक्षण प्रेम, ते जर नीट नसले तर त्यांचा मूडच ऑफ व्हायचा. छान कपडे घालायचा त्यांचा छंद. आम्हाला नवे नवे कुर्ते आणि शर्टस् घालून विचारायचे, मी कसा दिसतो... तेव्हा मी त्यांना म्हणायची अगदी हिरो सारखे, तेव्हा खूप खुश व्हायचे. लहानपण आठवलं की त्यांचा उत्तम स्वयंपाक, वेणीफणी, आम्हा तिघांना शाळेत नेणे हे डोळ्यापुढे येतं. ते फार गमती सांगायचे, लहान मुलासारखे मस्ती करायचे, खूप हसवायचे, गमतीत नावं ठेवायचे. कधी आपल्यात हरवून जायचे. त्यांच्यात एक लहान मूल होतं आणि म्हणूनच बरेचदा



(छायाचित्र : डॉ. माधवी ग्रेस)

त्यांच्या मनाप्रमाणे नाही झालं तर ते रूसून फुगून बसायचे. भेटीत त्यांच्यासाठी काही आणलं नाही तर ते माझ्याशी बोलायचेच नाही.

He had a great sense of humour
My father always made me laugh but his poetry always made me cry
At times he kept to himself
He had his moods with extreme high and low phases which was his fight with himself and his inner turmoil.

जसे जसे आम्ही मोठे होत गेलो तशीतशी परिस्थितीत सुधारणा होत गेली. दादा मॉरिस कॉलेज मध्ये शिकवायला लागले आणि त्यांना सरकारी घर मिळाल्यामुळे आम्ही वाड्यातल्या लहान घरातून नॉर्मल स्कूल क्वॉर्टर्स मध्ये राहायला गेलो. हे घर फारच मोठे होते. इथे दादांनी स्कूटर घेतली. हे घर कौलारू होतं आणि अंगणात मोठे औदुंबराचे झाड, आणि झाडाचा बेधुंद पाचोळा. इथे बरेचदा दादा औदुंबराच्या सावलीत ओट्यावर बसून सिगारेट ओढायचे, कधी आपल्यात तर कधी आमच्यात. पाचोळा झाडून काढायचे आणि तो ढीग एका कोपऱ्यात लावून ठेवायचे. दारात उभे राहून मुसळधार पाऊस पाहायचे. ह्या घरापुढे आणि आजूबाजूला भरपूर हिरवळ होती. एकदा आम्हाला आंगणात भयानक मोठा काळा साप दिसला. दादा साप पाहून घाबरले आणि घरात जाऊन लपले, आता फक्त आम्ही आणि साप समोरासमोर. करायचं तरी काय, हा साप जर घरात शिरला तर आपण मरू असं वाटलं. वस्तीतले लोकं काठ्या घेऊन धावत आले आणि वार करायला तयार झाले. दादांनी आतून म्हटले सापाला मारू नका, बाहेर काढा. पण काही केल्या तो तिथून निघतच नव्हता, शेवटी त्याला मारले. सगळे संपल्यावर दादा हळूच बाहेर आले. दोन दिवसानंतर ते गंभीर स्वरात म्हणाले... काय गं एखाद्यावर सगळ्यांनी तुटून पडणं बरोबर आहे का... ? A snake is less dangerous than man.

इथे सगळंच होतं. झाड, ओटा, पाचोळा, पडवी आणि रेलगाड्यांचा धडधड आवाज, ह्या गाड्यांच्या वेगाने आमच्या घरातल्या खिडकीच्या काचा देखील हलायच्या. घरची कामं आणि दगदगीचा संसार करून त्यांनी कविता लिहिल्या. आपल्या निर्मितीचा वेग कधीच सुटू दिला नाही, म्हणायचे... Creativity is my life and its conviction is my character. मी मेडिकलचा अभ्यास करतांना ते माझ्यासाठी परीक्षेच्या वेळी खूप जागरण करायचे. मला पहाटे उठवून हातात चहाचा कप द्यायचे आणि पेपर सोडवून येईपर्यंत दारात वाट पहायचे. बारावीत असतांना मला त्यांची 'आई'ही कविता अभ्यासक्रमात होती. परीक्षेच्या आदल्या दिवशी मी त्यांना कवितेचा अर्थ विचारला तेव्हा ते संतापले आणि म्हणाले... तू नापास झाली तर चालेल, मी पोसून घेईन, पण पुन्हा विचारू नकोस, ह्याच्या नंतर मी त्यांना काहीच कवितेबद्दल विचारायचं धाडस केलं नाही.

काही वर्षानंतर आम्ही नॉर्मल स्कूलच्या सरकारी प्रशस्त स्वतंत्र मोठ्या घरात राहायला गेलो. इथे दादांच्या देवांना एक मोठी खोलीच मिळाली. मागे पुढे आंगण. इथे जवळ जवळ दहा वर्ष राहिलो. दादा जेव्हा निवृत्त झाले तेव्हा आम्ही पहिल्यांदा आमच्या स्वतःच्या घरात गेलो. हे घर लोकमत चौकात आहे. ह्या घराला दादांनी सुंदर सजवून त्याचे नाव 'पंथविराम' असे ठेवले आणि बाहेर 'ग्रेसचे घरटे' अशी पाटी लावली. घराबाहेर एका पाटीवर I am free but not available असे पण लिहून आहे. एका घरातून दुसऱ्या घरात जातांना त्यांनी कधीच कुठली वस्तू फेकली नाही. तुटल्या आणि मोडक्या वस्तूदेखील त्यांनी आठवणींसह जपून ठेवल्या. दगड काड्या जुन्या वस्तू ह्याला जोडून त्यातून ते काही तरी बनवत

असत. हा त्यांचा छंदच.

He never allowed us to touch or take these things... saying... they are my companions, I talk to them in my loneliness.

He never waited for the sunrise.

पहाटे उठायचे, खटपट दाराचा आवाज, भांड्यांचा आवाज कानावर पडला की चार वाजले असे कळायचे. एका बाजूला टी.व्हीचा मोठा आवाज तर दुसरीकडे रेडिओवर लता मंगेशकरचे गाणे, पुढे इंग्रजी चित्रपट असायचा आणि त्यात त्यांची सकाळची कामं. हे सगळं सोबतच व्हायचं. सकाळी चहा करायचे झाडांना पाणी टाकायचे आणि नंतर आम्हाला बाहेरून कुलूप लावून पोहायला जायचे. ते परत येई पर्यंत माझ्या जीवात जीव रहात नसे आणि माझी झोपच उडायची. उन्हाळा असो की हिवाळा ते न चुकता पोहायला जायचे. थंड पाण्यात उडी नंतर परतांना रस्त्यात चहाच्या टपरीवर चहावाल्याशी गप्पा. हे मला बघवत नसे आणि एकदा मी त्यांना खूप रागावली... तेव्हा ते म्हणाले...

This is my time with Lord.
I seek him in the cool waters
in the silence of dawn.
This silenced me forever, I never stopped him after that, though it was painful to watch...
Once I asked him what is poetry?
He said... Poetry is cry of the soul...

त्यांनी मला काही पुस्तकं निक्षून वाचायला सांगितली Poet Rainer Maria Rile, Vincent Vangough biography, The diary of Anne Frank, Bronte sisters... गालिब, बाबा आमटे, जी. ए. कुलकर्णी... गुलझार आणि शेवटी हॉस्पिटल मध्ये असतांना त्यांनी माझ्या हातात डॉ. बंग यांचे पुस्तक ठेवले आणि म्हणाले, हे वाच आणि वाचून झाल्यावर परत दे. संध्याकाळी न चुकता ते देवासमोर दिवा लावायचे आणि नंतरच जेवायचे. प्रत्येक गुरूवारी ते ताजबागला जात असत तिथून मला नेहमीच त्यांचे फोन यायचे. ते सगळ्याच देवात गुंतले होते. ते मठात, दर्ग्यात, देवळात, चर्चमध्ये सगळीकडेच जायचे, जणू इथून त्यांना हाक येत असे. ते पुण्याला शंकराच्या मठात जाऊन बसायचे. मी गोव्याला गेली तेव्हा मला ख्रिस्ताची मूर्ती आणायला सांगितली.

१० मार्च २००७ : भारतीजी मंगेशकरचा वाढदिवस. ह्या शुभ दिवशी दादांचा आणि हृदयनाथजी मंगेशकरांचा न संपणारा प्रवास इचलकरंजी गावात सुरू झाला. शब्द आणि सूर एकमेकात गुंतले. हृदयनाथजीमुळे ग्रेस आपल्या बिळातून बाहेर आले. Hridaynathji Mangeshkar... opened the gates for Grace... and then there was no looking back. माझ्यासाठी कवी ग्रेस अद्भूत किंवा एक चमत्कारच आहे. त्यांना मी कधीच वाचतांना पाहिले नाही मग कविता येतात कुठून. हे मला आजपर्यंत कळलं नाही. मी त्यांना विचारले तेव्हा ते म्हणाले, मी काहीच नाही, माझ्यावर परमेश्वराची कृपा आहे. माझ्या आईवर देवाचा हात होता आणि तिचा हात माझ्या डोक्यावर होता. प्रत्येक कार्यक्रमाच्या आधी ते एका लहान मुलासारखे नर्वस होत असत आणि डिप्रेशन मध्ये जायचे. मला सारखे फोन करायचे, देवासमोर दिवा लावायला सांगायचे. आजूबाजूच्या लोकांना, कार्यक्रम आयोजित करणाऱ्या लोकांना आणि मला भिती वाटायची... की हे बोलू शकतील की नाही... मात्र स्टेजवर आल्यावर त्याचं रूप पार बदलून जायचं आणि एका श्वासात, वेगात तंद्रीत ते बोलायचे. आधी मला त्यांचं भरपूर टेन्शन यायचं.. नंतर नाही.

२००८ ह्या साली त्यांना कॅन्सर असल्याचे कळले. ते फार निराश झाले परंतु झुंज द्यायला ताठ उभे राहिले, कारण झुंज देणे हा त्यांचा स्वभाव आणि आयुष्यभर त्यांनी प्रत्येक गोष्टीसाठी झुंजच दिली. सहज काहीच मिळाले नाही. ते हसत म्हणाले... सर्दी पडसं तर सगळ्यांनच होतं, पण कॅन्सर सारखा मोठा आजार... बडे लोग को ही होता है असं म्हणून ते स्वतःची आणि आमची समजूत घातल असतं. म्हणायचे कॅन्सर तर मी गिळूनच घेतो तू पहा. खरचं कॅन्सरची गळ्यात गाठ घेऊन ते डौलदारपणे स्टेजवर उभे राहून बोलायचे. त्यांचा आवाज कापला नाही. ते डगमगले नाही. ते म्हणायचे ह्या गाठीनी मला प्रत्येक कार्यक्रमात साथ दिला. जे आपल्याला साथ देतात ते आपले मित्रच. He said... Cancer stood by me, it is my companion.

बाळासाहेब म्हणजे पंडित हृदयनाथजी मंगेशकर, त्यांना जेव्हा दादांच्या कॅन्सरविषयी कळले तेव्हा त्यांनी तातडीने दिनानाथ मंगेशकर रूग्णालयात दादांना आणले आणि त्यांचा पूर्ण ताबा घेतला. भराभर सगळ्या टेस्ट झाल्या आणि रेडिओथेरपी देण्यात आली. हळू हळू दादांच्या प्रकृतीत सुधारणा व्हायला लागली आणि ते पुन्हा आपले कामं करू लागले. This was my fathers rebirth and we could get him back because of Hridaynathji and Bhartiji Mangeshkars efforts and blessings. रेडिओथेरेपीचे भरपूर side effects झाले. दादांना गिळायला खूप त्रास व्हायचा, शरीरात ताकद नसायची मात्र कामाचा आणि लिहायचा वेग जास्तच झाला. पंडितची सोबत अजून कार्यक्रम करू लागले आणि ते

अनुक्रमणिका

एकमेकात रूळू लागले. दोघांनी मिळून सत्तावीस कार्यक्रम केले. इचलकरंजी, कोल्हापूर, पुणे, नागपूर, गोवा, औरंगाबाद...इत्यादी आणि अखेरचा कार्यक्रम ४ मार्च २०१२ ला यवतमाळला झाला. आजारपणातून थोडे बरे झाल्यावर त्यांनी गाडी म्हणजे फोर व्हीलर घेतली. गाडी शिकायला सुरूवात केली. इकडे त्यांचं धाडस वाढलं आणि तिकडे माझी भिती. गाडी घेऊन पहाटे पोहायला जायला लागले. अधून मधून धडक मारायचे, गाडीला लागायचं. एकदा गाडी चालवत असतांना त्यांचा मोठाच अपघात झाला. पायाला मार लागला. मी नागपूरला धावत पळत आली. ते देवाच्या कृपेने वाचले. मी त्यांना बजावून सांगितलं गाडी चालवायची नाही. रीक्षाने प्रवास करायचा, पण जिद्द कमी झाली नाही. इकडे माझी पाठ वळली आणि तिकडे त्यांनी पुन्हा गाडी चालवायला सुरूवात केली. एवढेच नाही कॉम्प्युटर शिकायला लागले. आय डी त्यांनी दिला... virani.grace@gmail.com पण ह्या आयडीहून मला कधीच मेल आला नाही. ते म्हणाले आधी व्यवस्थित शिकून घेतो नंतर तुला मेल पाठवतो.

२०११ : Cancer struck back... He said to me... I dont want to die before my time. म्हणाले... ज्या कामासाठी मी आलो आहे ते पूर्ण व्हायला पाहिजे. ह्या साठी तू प्रार्थना कर. त्यांना दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटल मध्ये सन्मानीय कक्षात ठेवण्यात आले. इथेच 'ओल्या वेळूची बासरी' हे पुस्तक लिहिण्यात आले. ह्या हॉस्पिटलची खोली त्यांनी सुंदर सजवली आणि ते त्यांचं घरच झालं. ह्या खोलीचे दार त्यांनी कधीच बंद केले नाही. पंडित हृदयनाथजी आणि भारतीजी मंगेशकर ह्यांनी दादांची खूप काळजी घेतली. त्यांना तिथे सगळंच मिळालं. मुख्य म्हणजे अपार प्रेम. भारतीजी त्यांच्यासाठी त्यांना आवडणारे पदार्थ बनवून आणायच्या त्यांच्या भेटी गप्पा टप्पा आणि दिवसभर फोनवर चौकशी सुरूच राहायची आणि तेवढेच नाही संपूर्ण मंगेशकर घराणं दादाच्या काळजीत आणि सेवेत आसायचं. मीनाजी अधून मधून येत असत. He was always surrounded by Mangeshkars. He was looked after like a child and recieved utmost attention and care. He was showered with immense love, and this often brought tears in my fathers eyes. Love, flowers and his favourite food came from Mangeshkar home आम्ही हृदयनाथजी, भारतीजी मंगेशकर आणि संपूर्ण मंगेशकर कुटुंबाचे ऋण कसे फेडायचे? हळू हळू कॅन्सर पसरायला लागला पण दादांचा आवाज तसाच ताजा वाटायचा. थकवा यायला लागला. शरीरात खूप वेदना होऊ लागल्या. He described his severe body pain as... burning pain in frozen house... These words are like at thorn to me किमोथारेपी नंतर केस गळायला लागले तेव्हा त्यांना खूप दुःख झाले. कॅन्सर झाल्याचे कमी दुःख पण केस जायचे जास्त. पारितोषिक मिळाले की त्यांना खूप आनंद व्हायचा. नागभूषण, विदर्भ भूषण आणि साहित्य अकादमीचे नॅशनल अवार्ड्स मिळाले. ह्याचा आम्हाला खूप आनंद आहे आणि अर्थात गर्व पण.

Long ago he said to me...
I want to look magnificent in my grave...

ते गेल्यापासून घरात, दारापुढे, भिंतीवर आणि वस्तूंवर धूळच धूळ. धुळीतल्या आरशात, मला माझा चेहारा अस्पष्ट दिसतो पण दादांचा चेहरा आणि त्यांच्या आठवणी स्पष्ट दिसतात. त्यांचा सारखा स्पर्श होतो.

स्पर्श
पहाटे
किरणात, पानात
झऱ्यात, पाण्यात
आणि पडवीत
तुमचा स्पर्श होतो
संध्याकाळी
सुर्यास्तात, समुद्रात
कंदिलात आणि अंगणात
रात्री
चंद्रात, चांदणीत, वाऱ्यात
आता फक्त त्या पावसाची वाट...!


ग्रेसची कविता म्हणजे त्यांचे आयुष्य त्यांचे न संपणारे दुःख, त्यांच्या आयुष्यात आलेली माणसं, त्यांचा संसार, आई, त्यांचे मुलं, मुलांचे दुःख.... सगळंच

आई गेली तेव्हा दादांनी आम्हाला सावरलं. आता कोण ?

भय इथले संपत नाही
मज तुझी आठवण येते...

यह गुजरा हुआ कल नही है
यह हर आनेवाली सुबह कि यादे है...

। डॉ. माधवी ग्रेस
प्लॅट नं. ११०४, अकरावा मजला,
पंचमहाल बिल्डींग, पंचसृष्टी कॉम्प्लेक्स,
एस.एम.शेट्टी स्कूल जवळ,
पवई, मुंबई ४०० ०७६



सतीच्या शब्दांनो, नयन उघडा रंग उडले
चरित्राचे माझ्या हसुनि मिटवा ग्रंथ सगळे

अनुक्रमणिका

प्रिय ग्रेस...

रामदास भटकळ

प्रिय ग्रेस ,

आज तुम्हाला वाढदिवसाचा फोन करता आला असता तर समाधान वाटलं असतं. पण इतक्या वर्षानंतर पहिल्यांदाच हे अशक्य झालंय.

तुमचा - सुरूवातीला तुमच्या नावाचा आणि कवितेचाच फक्त - परिचय होऊन चार तपं होऊन गेली. आपली भेट कधी कशी झाली हा मलाही संशोधनाचा विषय आहे. पण मला आठवणारी तुमची भेट ही 'छंद' मधून. पु. शि. रेगे हौसेने हे द्वैमासिक प्रसिद्ध करत. त्यातील साहित्याच्या निवडीपासून ते सजावटीपर्यंत सर्वच बाबतींत ते चोखंदळ तर होतेच, शिवाय त्यांची संपादकीय प्रतिभा खुलून दिसत होती. 'छंद'मध्ये तुमच्या बऱ्याच कविता एकत्र प्रसिद्ध झाल्या आणि त्यातून तुमच्या अस्तित्त्वाची जाणीव झाली.

रेग्यांच्या घरी सातआठ मित्रमंडळी जमत. त्यात प्रा. वा. ल. कुळकर्णी, द. ग. गोडसे, रा. भि. जोशी अशी बुजुर्ग मंडळी असायची. मी पॉप्युलर प्रकाशनाला सुरूवात केली होती आणि त्यामुळे साहित्यिकांत लुडबुडत होतो. माझाही ह्या मित्रमंडळात शिरकाव झाला. त्यातून झालेला महत्त्वाचा लाभ म्हणजे 'ग्रेस'.

त्या कवितांचं तेव्हा कौतुक का झालं आठवायचा प्रयत्न करतो आहे. तुमची शब्दकळा, छंदोबद्ध कवितेतील लालित्य हे हरखून जाण्यासारख होतंच. तुमची 'प्रतिमासृष्टी' मोहून टाकत होती असं सारे म्हणत. मला जे धूसरपणे जाणवत होतं त्याला शब्द सापडत नव्हते. आत्ताही नाहीत. पण मला म्हणायचं आहे ते काहीसं असं. तुम्ही जे सांगायचा प्रयत्न करत होता ते निरनिराळ्या इंद्रियांना आणि संवेदनांना चाळवणारं होतं. शब्द, दृक्प्रतिमा, रंगरेषा यांचा सहजी उल्लेख तुम्ही करता - ती ज्या वेळी वाचकाच्या संवेदनांना स्पर्श करतात तेव्हा तो वेडावला जातो. वाचक त्या मनस्थितीत नसला तर तो भांबावला जातो. तुमच्या कवितेचा शोध फक्त शब्द आणि अन्वय - फार तर त्यांचा नाद - यांच्यातून घ्यायचा नाही, इतपत माझ्या लगेच मधून लक्षात आलं, त्यापुढे कसं जायचं ते नेहमीच कळतं असे असं नाही त्यामुळे कविता वाचली की लगेच तुम्हाला पत्राने किंवा फोनने कळवायचं ही पद्धत मी सोडून दिली. तुम्हाला अशा प्रतिसादाचं कौतुक होतं याची मला कल्पना होती. पण तारा जुळल्या नाहीत - माझ्या असमर्थतेमुळे का होईना - असं मी सांगितलं असतं तरी

अनुक्रमणिका

तुम्हाला त्रास झाला असता.

कदाचित छंदोबद्ध रचनांमुळे असेल, अनेक संगीतकारांचं तुमच्याकडे लक्ष गेलं तशी आपल्या कविपरंपरेत गडकरी, बोरकर, बापट अशी शब्दलालित्यावर भर देणाऱ्या कवींची मोठी परंपरा आहे. प्रेम, शृंगार, करूणा, भक्ती अशा नवरसांनी थबथबणाऱ्या कविता किंवा गीतं मोठ्या प्रमाणावर लिहिली जातात आणि त्यांना चाली लावून ती भावगीतं लोकप्रियही होतात. परंतु तुमच्या कवितेतील अनुभवांचा लपंडाव हा अनेक संगीतकारांना हुलकावणी द्यायचा पण पाठ सोडत नसे. यशवंत देव यांसारख्या बुजुर्गांनीही हे आव्हान स्वीकारलं. हृदयनाथ मंगेशकर, आनंद मोडक यांना तर तुमच्या कवितेचा ध्यास लागलेला. चंद्रकांत काळे आणि त्यांचे सहकारी यांनी तुमच्या कविता आणि ललितबंध यांना जोडणारं शोधून 'साजणवेळ'सारखा कार्यक्रम करावा ही एक उल्लेखनीय घटना होती. श्रीधर फडके, कौशल इनामदार सारखे नवीन विचारांचे असे संगीतकारही मागे राहिले नाहीत. गेल्या दोनतीन महिन्यांत यांपैकी अनेकांनी तुमच्या तथाकथित दुर्बोधतेचा प्रतिवाद केलेला वाचून तुम्हाला बरं वाटलं असतं.

तुम्हाला तुमच्या कवित्वाची पूर्ण जाणीव होती. तुम्ही अध्यापक ही आपली भूमिका चोख बजावत होता असं मी ऐकून होतो. प्रत्यक्ष तुमच्या वर्गात बसायची संधी मला कधी मिळाली नाही. मी वयाने तुमच्याहून मोठा, तुम्ही शिकवू लागेपर्यंत मी प्रौढ झालो होतो हे एक कारण. पण खरं कारण म्हणजे तुम्ही नागपूरला आणि मी मुंबईत. नाहीतर मी तुमच्या वर्गात येऊन बसलोही असतो. 'संध्याकाळच्या कविता' पुस्तकाला 'रानातल्या कविता' बरोबर राज्य पुरस्कार मिळाला तेव्हा तुम्ही कोवळे होता. मुंबईत आम्ही अचानक कार्यक्रम घडवून आणला. तो अत्यंत यशस्वी झाला. तुम्ही कविता फार चांगल्या वाचल्या, पण त्यांचा बाज वेगळा होता. तरीही तुमच्या लक्षात आलं असणार की ना. धों. महानोर किंवा नारायण सुर्वे हे कविसंमेलनात बाजी मारू शकतात तशी आपली कविता नाही. काही वर्ष तुम्ही कवितासंमेलनं किंवा व्याख्यानं यापासून लांब राहिलात. त्यामुळेही साहित्य विषयक भाषणं अशी तुम्ही फारशी दिली नाहीत. क्वचित आपल्या भेटीत एखाद्या साहित्यकारावर किंवा साहित्यकृतीवर तुम्ही बोलत असा. परंतु तुमच्या कक्षा इतक्या रूंदावलेल्या होत्या, त्यांपैकी प्राचीन मराठी साहित्य किंवा उर्दू साहित्य यांच्याविषयी तर माझं ज्ञान शून्यवत. त्यामुळे आपला संवाद रंगायचा प्रश्नच येत नसे.

पुढे तुम्ही आपल्याला काय सांगायचं आहे आणि ते कसं सांगायचं आहे हे पक्कं जाणलं. त्यात तुम्हाला हृदयनाथांची साथ मिळाली. तुम्हा दोघांचे कार्यक्रम हे मराठी सांस्कृतिक विश्वातलं नवल ठरलं. इतर कवी, कथाकार यांचे रंगणारे कार्यक्रम बहुधा उत्सवी असत. तिकिट काढून रसिकांनी गर्दी करावी आणि तृप्त होऊन जावं ही किमया तुम्हा दोघांचीच.

पण तुम्ही अध्यापन किंवा स्टेजवरील कार्यक्रमाची झिंग बाजूला ठेवून तुमची कवी हीच भूमिका अहम् मानली. 'आम्ही कोण म्हणून काय पुसता' किंवा 'पोएट बोरकर स्पीकिंग' च्या पलीकडे जाऊन तुम्ही प्रतिभावंतांची अस्मिता जपू लागला, मिरवू लागला. माझं सगळं आयुष्य प्रतिभावंतांच्या साहचर्यात गेलेलं. प्रतिभा किती दुर्मिळ आणि आदरणीय किंवा 'ऑसम' गोष्ट आहे याचा मी अनुभव घेतला आहे. प्रतिभावंतांबद्दल मला प्रचंड आदर आणि ममत्त्व आहे. तरी त्यांच्यासाठी नैतिक आणि सामाजिक धारणा वेगळी असावी हे मानायला मी तयार नाही. हा आपला वाद तसाच राहिला आहे.

ही तुमची रूपं अनेकांनी या ना त्या प्रमाणात पाहिली आहेत. जी. ए. कुलकर्णीसारखे काही यांनी प्रत्यक्ष न भेटता तुमच्या लेखनातून आणि पत्रांतून अनुभवली आहेत. मला वाटतं की बाबा आमटे यांचीही तुमची भेट झाली नसावी. पण ज्ञानेश्वरांनंतर इतकं महत्त्वाचं पुस्तक वाचलं नाही असं त्यांनी 'संध्यामग्न पुरूषाची लक्षणे' हे पुस्तक वाचल्यावर माझ्याकडे उद्‌गार काढले.

पण तुमची अगदी वेगळी बाजू पाहण्याची - आणि न पाहण्याची देखील - संधी मला जशी मिळाली तशी क्वचितच इतर कोणाला मिळाली असेल. न पाहिलेल्या गोष्टींतली एक जुनी तुम्हालाही आठवणार नाही. तुम्ही कसल्याशा सभांसाठी मुंबईला येत होता. आधी 'युगवाणी' आणि नंतर 'संदर्भ'च्या संपादनानिमित्तही मित्रमैत्रिणींना भेटत असा. तुम्ही तुमच्या लेखनातून वाचकांची संवेदनशीलता चाळवता असं मी म्हणतो. तसंच संपादक म्हणून त्या अंकांतून विविध विषय सुचवून तुम्ही लेखकांची संवेदनशीलता जागवत असा. तुमचा मित्रपरिवार वाढत होता. ही सगळी माझीही मित्रमंडळी. पण मुंबईत मी माझ्या कामांत बुडालेला असायचो. एक दिवस मला शशी मेहताचा फोन आला की तुम्ही अचानक बेशुद्ध पडलात आणि तुम्हाला शुश्रुषा हॉस्पिटलमध्ये नेलं आहे. डॉ. कुमार पालेकर पाहताहेत. तुमच्या पत्नींना नागपूरहून बोलावून घ्यावं की काय ? तुमचे दोघांचे संबंध फारसे सलोख्याचे नव्हते. तरी प्रसंग जर गंभीर असेल तर निदान त्यांना कळवणं आवश्यक होतं. त्यातून लीलाताई ह्या डॉक्टर.

अनुक्रमणिका



'कावळे उडाले स्वामी' या पुस्तकाच्या प्रकाशन समारंभातील एक क्षण.

मी कुमारला विचारलं. तो माझा मेहुणा आणि त्याहून जिवलग मित्र. तो म्हणाला तशी काही गरज नाही. सलाईन लावलं आहे. उद्या पेशंट ठणठणीत बरा होऊन नागपूरला जाऊ शकेल. मला आश्चर्य वाटलं. तो म्हणला की हा आल्कोहोलचा प्रताप - दुसरं काही नाही. म्हणजे इतके दिवस तुम्ही तुमचा हा गुण माझ्यापासून लपवून ठेवला होता. कोणत्याही बाबतीत मला कोणी घाबरतं यावर माझा विश्वास नाही. पण तुम्ही तोपर्यंतच नव्हे तर नंतरही या बाबतीत माझ्यासमोर सावध राहिलात.

नागपूरला आमचं दुकान होतं. तिथं राहायची सोय होती. मग आम्ही ते दुकान विकलं. त्यानंतर बऱ्याच वेळा मी तुमच्या घरी राहत असे. तुम्ही माझ्या जेवणाची आणि खाण्यापिण्याची देखभाल करायचा तशी कोणीच केली नाही. तुम्ही एकटे राहत होता तरी मला काय आवडेल ते तयार करण्याचा किंवा करून घेण्याचा हट्ट असायचा. त्याहून मी पुरेसं पाणी पीत नाही म्हणून दर तासाभराने स्वतः पेल्यात पाणी आणून प्यायला लावत होता.


मी प्रकाशन कार्यातून निवृत्त झालो तेव्हा सुरूवातीला माझ्या सहकाऱ्यांबरोबर जुळवून घेताना तुम्हाला त्रास झाला. आपले संबंध लेखक - प्रकाशक असे नव्हतेच मुळी. त्याचं वर्णन करायला मैत्री हा शब्दही तुटपुंजा वाटेल. तुम्ही त्यावर तुम्ही सोपा उपाय काढला. हळूहळू अस्मिता, मेघा इतकंच नव्हे तर आमचा विक्रेता सचिन यांच्याशी तुम्ही जिवाभावाचे संबंध जोडले.

केवळ प्रेम आणि आदर यांच्या जोरावर यमधर्माला तुमच्यापासून दूर ठेवणं शक्य असतं तर शेकडो माणसं मंगेशकर हॉस्पिटलच्या बाहेर गराडा टाकून उभी राहिली असती. गेल्या डिसेंबरनंतर माझ्या मुंबई बाहेरील संचारावर बंधनं होती. तरीही मी पुण्याला येऊन तुम्हाला भेटलो. मला वाटतं की बसून दोनचार मिनिटं तुम्ही बोलू शकला असा तो शेवटचा दिवस. आपली भेट झाली याचं दोघांनाही समाधान वाटलं. तुम्ही ते बोलूनही दाखवलं. का कुणास ठाऊक अलीकडे तुम्ही मला रेव्हरंड रामदास म्हणू लागला होतात. धर्मगुरूच्या हाताचं चुंबन घ्यावं तसं तुम्ही माझ्या हातचं चुंबन घेतलं.

तूर्त इतकंच. बाकी सारं पुन्हा कधी तरी.

आपला,
रामदास - फक्त रामदासच.
दि. १० मे २०१२.

रामदास भटकळ
पॉप्युलर प्रकाशन प्रा. लि.
३०१, महालक्ष्मी चेंबर्स,
२२ भुलाभाई देसाई रोड,
मुंबई ४०० ०२६
भ्रमणभाष : ९८२०८७१४०८



गळ्यात शब्द गोठले
अशांतता दिसे धनी
दुःख बांधुनी असे
क्षितीज झाकिले कुणी ?

अनुक्रमणिका

पावसाळी आभाळात एखादाच तारा...

शुभा गोखले

प्रिय ग्रेस सर,

सप्रेम नमस्कार.

पत्र लिहिण्यास कारण की १० मे रोजी तुमचा वाढदिवस. त्या बद्दल आम्हा सर्वांकडून हार्दिक शुभेच्छा ! तुम्ही आज आमच्यात नाहीत असे मी म्हणणार नाही, कारण होतात तेव्हाही आमच्यात नव्हतात आणि नाहीत तेव्हा आमच्यातच आहात की ! हा शाप म्हणू की वरदान, मला ठाऊक नाही (हो, हे वाक्य तुमचेच आहे, पण 'ग्रेस' नावाच्या विद्यापीठात सात वर्षे शिक्षण घेतल्यावर हे होणे साहजिकच आहे.)

तुमचे कौतुक करायचे म्हणजे कॅन्सर सारख्या रोगाला तुम्ही अतिशय हिम्मतीने सामोरे गेलात आणि तुम्ही ठरविल्याप्रमाणे 'I will look magnificiant even in my grave' हे सिद्ध करून दाखवलेत. आयुष्यभर 'विद्वेष' या व्याधीशी लढा दिल्याने तुमच्यात एक वेगळीच प्रतिकार शक्ती आली असणार.

कुठल्याही कलावंताला हेवा वाटेल असे तुम्ही गेल्यावरचे 'महानिर्वाण' नाट्य तुम्हाला साजेसेच होते. एकदा तरी डोळे भरून तुम्ही हे दृश्य पाहायला हवे होते ! तुमचे अंत्यदर्शन घ्यायला असंख्य माणसे आली होती. तुमच्याबद्दल आणि तुमच्या कवितेबद्दल खूप लोकं चांगले बोलत होते हे ऐकल्यावर मात्र तुम्ही भडकणार! ''अहो मायबाई, मी असताना हे सगळे कुठे होते'' असे बेंबीच्या देठापासून ओरडून विचारणार.

सर, तुम्ही हाडाचे शिक्षक आणि मी नेहमीच विद्यार्थी दशेत... अगदी पाटीवर सरस्वती रेखून पूजन करण्यापासून ते पाठीवर गोंदण्यापर्यंत माझी एकच अवस्था. तुमचे मार्गदर्शन मिळणारे काही 'भाग्यवंत' असतात, त्यातली मी एक. शिक्षक म्हणून तुम्ही अत्यंत strict होतात. तुम्ही बोलत असताना कुणी टेकून बसलेले तुम्हाला चालत नसे आणि 'जांभई' वगेरे द्यायला परवानगीच नाही. तुम्ही एका जागी स्वस्थ न बसता येरझारा घालत असत. तुमची शिकवण्याची शैली एवढी वेगळी होती, की सतत जागरूक राहण्याशिवाय गत्यंतरच नव्हते. एकच मुद्दा तुम्ही उलटसुलट करून वेगवेगळ्या पद्धतीने उकलून दाखवीत होतात. त्यामुळे एखाद्या गोष्टीकडे बघण्याची वेगळी दृष्टी, वेगळी परिमाणे मिळत होती. ग्रेस सरांचा तास, मग तो फोनवरून असेल किंवा प्रत्यक्ष समोर बसून असेल, डोके गरगरून टाकणारा, विचार करायला लावणारा आणि ऐकणाऱ्याची बरेचदा त्रेधातिरपीट उडविणारा होता. त्यामुळे

अनुक्रमणिका

खूप चिकाटी आणि शिकण्याची प्रबळ इच्छाशक्ती हे तुमच्या विद्यार्थ्यांमध्ये गुण असल्याशिवाय त्याचे काही खरे नव्हते. तुमची मांडणी जटील होती. विनोबांच्या लिखाणातले साधेपण सांगतानासुद्धा तुम्ही इतकी दालने एका मागून एक उघडत जात होतात की जरा बेसावध असला तर एखाद्याची दिशाभूल होण्याचा धोका ! एक धागा पकडेपर्यंत दुसरा निसटतो की काय हे भय ! तुम्ही मात्र लीलया सगळीकडून हिंडून पुन्हा सम गाठायचात, कारण तुमची वीण घट्ट होती. प्रचंड विद्वत्ता आणि अफाट प्रतिभा तुमच्यापाशी होती. साक्षात शब्दप्रभूच होतात तुम्ही. तुमची सगळ्याच ललित कलांची समज दांडगी होती. त्यांचा परस्परांचा मेळ तुम्ही अत्यंत प्रभावीपणे घालू शकत होतात. परिणामकारक अभिव्यक्तीसाठी मराठी, हिंदी, इंग्लिश, उर्दू जी भाषा त्या क्षणी हाताला लागेल ती तुम्ही बोलत होतात. महत्त्वाची गोष्ट म्हणजे तुम्हाला प्रश्न विचारलेले चालत होते. संवाद आणि परिसंवाद दोन्ही त्यामुळे घडत होते. तुमचे मत लादत नव्हतात तुम्ही दुसऱ्यावर.

तुमच्या शब्दांचा आणि विचारांचा परिसस्पर्श झाल्यावर लौकिकातली एखादी घटना किंवा वस्तू अलौकिक करून टाकायचात तुम्ही, त्यामुळे सतत जाणीव आणि नेणीव या दोन पातळ्यांवर तळ्यातमळ्यात चालत असे. साधे टी.व्ही. वर हरिणाची शिकार करणाऱ्या वाघाचे दृश्य बघितलेत तर कला-निर्मितीतील 'क्रौर्य आणि करूणेचा तोल' इथपर्यंत घेऊन जायचात आम्हाला. कावळा म्हटले तर ज्ञानदेवांचा कावळा, मीरेचा कावळा आणि तुमच्या प्राणातली उदासी खुडू पाहणारा तुमचा सावत्र बाप अशी अनेकविध रूपं दाखवीत होतात, ते ही तुमच्या खास वाणीत आणि तुमच्या देहबोलीतून. Recitation of poetry त्यातील नादमयता, नाट्यमयता, गेयता तुमच्याकडून समजावून घेणे हा एक अनुभव होता.

चित्र आणि चित्रातला माणूस हा मला पडलेला पेच घेऊन मी दहा वर्षापूर्वी तुमच्याकडे आले होते, आणि हा योगायोग म्हणू की नियतीची योजना, तुम्ही नुकतेच गेलात असा निरोप आला तेव्हा मी एक लेख वाचत होते. साहित्यात लेखकाचे खासगी आयुष्य किती शोधावे या संबंधी तो होता. सर, या प्रश्नापाशीच पडदा पडावा ? तुमची निर्मितिप्रक्रिया, तुमचे जगणे जवळून पाहण्याचा योग माझ्या कुंडलीत होता, त्यामुळे थोड्या प्रश्नांची उत्तरे मिळाली, पण नवे प्रश्न निर्माण झाले !

तुमचे लेखन असे जेव्हा मी म्हणते तेव्हा त्यात गद्य आणि पद्य असा मी भेदभाव करीत नाही कारण दोन्ही तितकेच काव्यात्मक आणि lyrical आहे. ''मैं इस दुनियाको भूल जाऊ तो फिर किसके बारे मे लिखू'' आणि ''मुझे मुझसे जुदा देखा न जाय'' ही तुमची खास वाक्ये. रोजच्या जीवनातील घटना तुमच्या लेखनात येतात तेव्हा त्या वेगळीच बुंथी पांघरून येतात. तुम्हाला भेटलेली माणसे ही मिथक, प्रतिमा कधी बनून जातात हे लक्षातच यायचे नाही. सर, तुम्ही त्यावर काय प्रक्रिया करीत होतात देव जाणे... 'शोखीयोमे घोला जाये फुलोंका शबाब, उसमे फिर मिलायी जाये थोडीसी शराब' अशी काही secret receipe होती का तुमची ? एक चमचाभर वास्तव घेऊन ते पेलाभर दुःखात रात्रभर भिजत ठेवणे, सरणाच्या विस्तवावर ते आटवून कवटीत काढून हाडाच्या बत्त्याने बारीक कुटणे व त्यात रक्त, पेशी, आतडी यांचे मिश्रण करून कवीची त्वचा सोलून त्यात हे मिश्रण भरून बाभळीच्या काट्याने ते शिवून ही पुरचंडी संधिप्रकाशात सात दिवस ठेवणे, त्यावर धुके पसरवून थोडा नक्षत्रांचा चुरा पेरून ते रसिकाला देणे. होगा यु नशा जो तय्यार वोह तो ग्रेस की कविता है ! अहो सर, तुमची कविता आमच्यावर जादू करायची की जादूटोणा ? कुठले वास्तव ? ? ? आणि तरीही कलाकृतीतील उत्कटता आणि उत्स्फूर्तता तसूभरही कमी व्हायची नाही. चमत्कार म्हणूया का याला ? ही receipe मी तुम्हाला सांगू! खरे म्हणजे तुम्ही 'सौंदर्यशास्त्र' नाही तर 'शरीरशास्त्रा'चे प्रोफेसर व्हायला हवे होतात असे सांगितल्यावर किती मनापासून हसला होतात ! दुःखाच्या महाकवीची विनोद बुद्धी अत्यंत तल्लख होती आणि 'comdedy' व 'black comedy' तुम्ही नक्कीच लिहू शकला असतात ही मला खात्री होती.

मी चित्र काढत होते म्हणून साहजिकच भारतीय, पाश्चात्य चित्रकारांचे, शिल्पकारांचे उल्लेख वारंवार तुमच्या बोलण्यात यायचे. एक गोष्ट तुमची कौतुक करण्यासारखी म्हणजे समोरच्या माणसाशी बोलताना त्या वेळेपुरते तरी त्याला तुमचा 'EQUAL' मानत होतात. माझी ओळख इतरांना करून देताना 'she is an artist of her own size, not an inch small not an inch tall' अशी करून देत होतात. ह्या वाक्याबद्दल तुमचे आभार मानावे तेवढे थोडेच, स्वतःबद्दल, स्वतःच्या कलानिर्मिती बद्दल कुठलाही गंड माझ्या मनात निर्माण होऊ दिला नाहीत, त्यामुळे मी ही 'चांदी मोडीत काढून कधी सोने नाही मागितले'. माझे प्रेम, माझी निष्ठा ही कुणावर आणि कशावर आहे हे सांगत गेलात, त्यामुळे आत्मशोधाच्या आंधळ्या वाटेचा मार्ग सुकर झाला.

विद्यार्थिनीची प्रगती बरी होते आहे हे लक्ष्यात आल्यावर तुम्ही किती पुस्तके दिलीत मला. पिकासोच्या मैत्रिणीने लिहिलेले आत्मचरित्र, Vincent Van Gogh ने त्या भावाला

अनुक्रमणिका



(छायाचित्र : कुमार गोखले)

लिहिलेली पत्रे (Dear Theo) आणि मुख्य म्हणजे जीएं ची पत्रं. 'दुसऱ्याची पत्रं वाचू नयेत' हे लहानपणीचे संस्कार इतके पक्के होते की ते पुस्तक मी हातात धरायला तयारच नव्हते. पण तुमचा आग्रह म्हणून पहिला खंड उघडला आणि न थांबता चारही खंड पुन्हा पुन्हा वाचले. यात मायना महत्त्वाचा नव्हता, ती स्वगतं होती, they were essays on creativity.

माझ्या studio मध्ये तुम्हाला भेटायला अनेक माणसे येत होती, पण मला खंत अशी वाटते की आपापल्या क्षेत्रात 'दादा' असणारी, तुमच्या कवितेवर प्रेम करणारी माणसे का आली नाहीत ? तुमचे 'निर्मितीनाशाचे भय' मी समजू शकते पण तुमच्या रसिकाचे भय का संपले नाही ? हमसे आया न गया, उनसे बुलाया न गया असेच काहीसे झाले असणार, याला सर तुम्ही ही ५० % जबाबदार आहातच की ! पंडित हृदयनाथ मंगेशकर मात्र येत असत तेव्हा तुमचे जे ज्ञानेश्वर, मीरा, गालिब, आरती प्रभू, रिल्के असे अनेक कलाकारांवर, अनेक कलाकृतींवर बोलणे व्हायचे तेव्हा वाटायचे की माझी ओंजळ छोटी आहे, हे समोर जे आहे ते प्रसादासारखे वाटायला पाहिजे, फक्त माझ्यापाशी ठेवले तर तो गुन्हा होईल, आणि त्यातूनच 'प्रतिभासंवाद' असा आगळा वेगळा कार्यक्रम जन्माला आला. तुम्हाला बोलताना बघायला, तुमचे विचार ऐकायला, तुमची व इतरांची कविता तुमच्याकडून ऐकायला तुडूंब जनसमुदाय लोटायचा.

'मला ग्रेस ची कविता समजली' अशी पाटी मी दारावर लावली नसतानासुद्धा, सर मी कित्येक लोकांचा रोष ओढावून घेतला. ग्रेस आमचा मित्र आहे, आम्ही त्याची कविता गेली ४० वर्षे वाचतो आहोत. तू कोण आलीस, कालची पोर ? सर, ते वाट्यासाठी भांडत होते. they were fighting for a share त्यांना मला एवढेच विचारावेसे वाटते... प्रतिभावंत म्हणजे काही municipality च्या नळातून येणारी पाण्याची धार आहे का हो ? समोर बादल्या आपटून कमरेवर हात ठेऊन भांडण करायला ? ... प्रतिभावंत म्हणजे अथांग, अशांत समुद्र असतो. घ्या ना त्यातील पाणी तुम्ही ओंजळीने, बादलीने किंवा tanker ने !

ए देनेवाले तुने कुछ कमी ना की, अब किसको क्या मिला
ये मुकद्दर की बात है ।

एक चित्रकार, एक सृजनात्म म्हणून मला खूप काही शिकता आले तुमच्याकडून. तुमची कविता कधी abstract

(अमूर्त) तर कधी surrealistic (अतिवास्तववादी) चित्रासारखी भासते. तुमच्या कवितेतील अवकाश, तुमची शब्द रचना, त्यातील लय, त्यातील नाट्यमयता, प्रतिमांची उधळण या सर्वांचे नाते मी चित्रांच्या अवकाशाशी, त्यातील मांडणी, रंग, रेषा, आकार, पोत यांच्याशी जोडून पाहिले, पण शेवटी कविता ही कविता असते आणि चित्र हे चित्र असते. कवितेचे चित्र काढता येत नाही सर !

तुमच्या कवितेचे गारूड काय असते ते मी अनुभवले आहे, पण या बेटावर कायम मुक्काम करून चालत नाही हे उमजले. कविता अंगात जिरवून, मुरवून आणि मिरवून पुन्हा परतावे लागते आपल्या studio मध्ये. पण मग प्रश्न असा पडतो, एखाद्या कलावंताच्या आयुष्यात डोकावून पाहायचेच नाही का ? मोर कायम समोरूनच पाहायचा का ? डोंगर दुरूनच साजरे ? मला वाटते वाकडी वाट करू नका, पण डोंगर समोर आलाच तर हिम्मत करून त्या दऱ्या खोऱ्यातून हिंडून या, वाऱ्या बरोबर विहार करून रान हलते कसे हे नक्कीच पहा, पण डोंगर उतरून पुन्हा पायथ्याशी आलात की मागे वळून पहा. सगळा डोंगर धुक्यात गेलेला धूसर दिसेल. त्यातील थोडे धुके घेऊन studio मध्ये या, त्याने आपली पाटी पुसा आणि कोऱ्या canvas ला सामोरे जा... आपके साथ होगी सिर्फ आपकी तनहाई.

कलावंताची सावली जेव्हा त्याच्या कलाकृतीवरून दूर होते तेव्हा खऱ्या अर्थाने ती कलाकृती स्वतंत्र होते. आता तुमची कविता पोरकी झाली असे मी म्हणणार नाही कारण तिच्यात विलक्षण ताकद आहे व ती नित्यनूतन आहे.

"घरभर सरणाचे पात्र सांडोनी जाई
फिरूनि फिरूनि माझा वंश निर्वंश होई"

अशी जरी तुम्ही तुमच्या कवितेची सोय करून ठेवली असलीत तरी 'माझी कविता जगता जगता वाढेल तोच तिचा वंशवृक्ष' हे ही तुमचेच भाकीत.

'अनवाणी' चालणे जसे फक्त हुसेनलाच साजिरे दिसते, तसेच तुमचा उच्छाद, उन्माद, लक्ष वेधण्यासाठी केलेली बालसुलभ आदळआपट, तुमचा द्वैतीपणा, हे तुम्हालाच शोभून दिसते ! औरंगजेबाने जसे आपले कफन स्वतः शिवले होते, तसे तुम्हीही या शेवटच्या प्रवासाची वळकटी तुमच्या हाताने बांधून तयार ठेवली होतीत. मृत्यू रोज तुमच्या अंगणात सजून येत होता. खरा आला तेव्हा तो तसाच दिसला का तुम्हाला ? तेथील प्रदेश हा चंद्रमाधवीच्या प्रदेशां इतकाच रम्य आहे का ? तिथेही तुमचे मृगजळाचे बांधकाम चालूच आहे का ? वेळ होईल तेव्हा उत्तर धाडा, आणि फोटोही. त्याचा तुम्हाला भारी सोस. मरावे परी फोटोरूपी उरावे म्हणायचात ना ? आणि हो, सर्वांत महत्त्वाची गोष्ट, इथे सतत जत्रेत हरवलेल्या मुलासारखे सैरभैर होतात, सुमित्राबाईंची भेट झाली ना ? त्यांना वाकून नमस्कार सांगा माझा.


कळावे,

आपली
शुभा

(शुभा गोखले यांचा हा लेख 'सामना'च्या 'उत्सव' पुरवणीत प्रकाशित झाला आहे तो लेख मूळ व पूर्ण स्वरूपात लेखिकेच्या परवानगीने येथे पुनर्मुद्रित करीत आहोत.)

शुभा गोखले
'इच्छापूर्ती'
७९, अनंत पाटील रोड (उत्तर),
दादर (पश्चिम), मुंबई ४०० ०२८
दूरभाष : ०२२ २४६९७३८
भ्रमणभाष : ०९३२४४६९७३८

अनुक्रमणिका



अनुक्रमणिका

जुलै - ऑगस्ट - सप्टेंबर २०१२

युगवाणी

॥ ग्रेस विशेषांक ॥



छायाचित्र : सुरेन्द्र पटेल, नागपूर

दोन 'जीवनव्रती'

श्री. महेश एलकुंचवार आणि ग्रेस

चांदणे स्मरणाचे...

प्रा. वसंत पुरके

■

अखिल मराठी साहित्याच्या इतिहासातील २६ मार्च २०१२ हा दिवस अतिशय दुखःदच म्हणावा लागेल. या दिवशी मराठी साहित्य विश्वातील लोकोत्तर प्रज्ञा आणि अलौकिक प्रतिभाप्राप्त कविवर्य ग्रेस यांचे दुःखद निधन झाले. ही वार्ता सकाळी १० वाजून काही मिनिटांनी दूरध्वनीद्वारे माझे मित्र नि ग्रेसांचे जिवलग मित्र श्री. पंढरपुरे यांचे कडून कळाली. खरे तर ४ मार्चला पंडित हृदयनाथ मंगेशकर आणि ग्रेस सरांचा ''प्रतिभान्तरन्यास'' हा कार्यक्रम यवतमाळकरांसाठी पहिला नि शेवटचा ठरला. त्याच वेळी सरांची प्रकृती खूप क्षीण झाल्याचे दिसत होते. आयुष्यभर सरांचा आवाज पहाडी, बोलणे सुस्पष्ट व परखड, सडेतोड कुणाचाही मुलाहिजा न करणारे, पण त्या दिवशी मात्र आवाजाला कंप सुटला होता नि बोलतांना दम लागत होता. हे सर्वांना दिसतही होते. २५-२६ मिनिटे बोलून झाल्यावर ''मला दम लागतो'' म्हणून सर सांगायचे. ग्रेसांची प्रकृती चांगली नसल्याची किंबहुना बिघडल्याची सूचना बाळासाहेब मंगेशकरांनी दिली होती. सरांना केवळ त्रास होवू नये म्हणून बाळासाहेबांनीच अधिक वेळ अनेक गाणी गाऊन त्यांना विश्रांती द्यायचे प्रयत्न केले. कार्यक्रमाची सांगता केली. रसिकांनीही मनमुराद आनंद लुटला, नि दोन दिग्गज कलावंतांच्या दर्शनाने यवतमाळकर धन्य झाले. बाळासाहेब रातोरात नागपुरला गेलेत.

दि. ५ मार्च २०१२ ला ग्रेस सर प्रसन्नचित्त दिसले मला बरे वाटले. घरी आम्हास आशीर्वाद देऊन नागपूरहून पुणे गाठले. दोनच दिवसांनी श्री. पंढरपुरेचा फोन आला सरांची प्रकृती खूपच बिघडली असल्याचा. बाळासाहेबांनी दीनानाथमध्ये नेहमी प्रमाणे भेट घेतली तेंव्हा त्यांनाही कळून चुकले की ग्रेस नावाचा माझा मित्र सोडून चाललाय. ग्रेस नावाचं पर्व संपुष्टात येत असल्याची खात्री झाली. दि. १९/३/२०१२ मुंबईहून मी जाऊन बघितले तर सर कुणालाही ओळखू शकत नव्हते. मिथिलाशी थोडावेळ बोलत बसलो नि सरांची अबोल भेट घेवून मुंबईस आलो. पंढरपुरेंचा प्रत्येक फोन भितिदायक वाटायचा. शेवटी २६/३/२०१२ ला सकाळच्या फोन नंतर सव्वादहाचे दरम्यान नास्ता करतांनाच फोन आला नि मी समजलो बातमी खरी होती ''सर गेले !'' तोच ग्रेस सरांचा अख्खा आयुष्यपटच पुढे उभा झाला. मी लगेच मा. मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण साहेबांना फोन केला. त्यांचे पी. ए. नी घेतला, मी ही बातमी कळविली मा. पृथ्वीराज चव्हाण यांनी लगेच दखल घेतली व त्यांनी मा. दिलीप वळसे पाटील सभागृहाचे अध्यक्ष यांना फोन केला. मी सभागृहात जातोच तेवढ्यात शोकप्रस्तावात

ग्रेससरांचे नावही सहज समाविष्ट झाले होते. एक तासाचे आत सरांविषयी माहिती घेण्यात आली. सभागृहात ११ वाजता मा. मुख्यमंत्री यांनी शोक प्रस्ताव मांडला. विरोधी पक्षनेते व मलाही आदरांजली वाहता आली.

खरे तर सभागृहाचे सदस्य नसतांना कुणाचाही शोक प्रस्ताव घ्यायचा असेल तर बी. ए. सी. त त्याला मान्यता घ्यावी लागते. दुसरी अट अंत्यविधी होण्यापूर्वी शोकप्रस्ताव घेतला जात नाही. यापूर्वी अनेकांचे प्रयत्न झाले पण शक्य झाले नाही पण ग्रेस सर या सर्व बाबींना अपवादच ठरले. एरव्ही ही "ग्रेस" ही अलौकिकच. मा. मुख्यमंत्री महोदयांनी शासकीय इतमामाने ग्रेसांचा अंत्यविधी करण्याचे आदेश फार्मावित्ते नि सर्व यंत्रणा तयारीला लागली. शेकडो चाहते अंत्यदर्शनास येऊ लागले. राज्यकर्ते, साहित्यिक, कलावंत, रसिक, पत्रकार, नात्याचे व हितचिंतक आदि सर्वांनी सरांना अखेरचा निरोप दिला.

ग्रेस सर एक निष्ठावंत व प्रतिभावंत शिक्षक, चाणाक्ष समीक्षक, चोखंदळ व जगावेगळा रसिक, असामान्य कवी, विविध भाषांवर प्रभुत्व, एम. ए. चे वर्गातील अध्यापन अप्रतिम व विचार मौक्तिकांची पेरणी करणारं, अनोख्या संदर्भाची उधळण, नोट्स, टिपणं, मुद्दे, पुस्तके इत्यादी कुबड्या झुगारून स्वच्छंद, उत्स्फूर्त काव्यसरितांचे धबधबेच अनुभवायला यायचे. एम. ए. च्या वर्गातून बाहेर पडतांना सर "राजासारखे बाहेर पडायचे" स्वतः तल्लीन होऊन शिकवत असल्याचे ते स्वतःही व विद्यार्थी मनापासून Teaching enjoy करायचे. प्राध्यापकाचं मटेरियल संपलं की ते चपराशी घंटी कधी वाजवेल याची ते आतुरतेने वाट बघतात असं बेगडी - धंदेवाईक Teaching सरांचे नव्हते. तर ज्ञानेश्वर म्हणतात तसे -

"साधक तूच माऊली
पिके सारस्वत तुझा पाऊली"

ग्रेसांचा पिरेड तर माझेसाठी देवदुर्लभ, देवाघरचे देणेच होते - ग्रेसांचेच शब्दात सांगावयाचे तर,

अलभ्य फुलला सखे
घनवसंत हा मोगरा
विनम्र लपवू कुठे
हृदय स्पंदनाचा झरा

सरांचे Teaching हे Touching असायचं ते मी जाहीरपणे व एकांतात पूर्ण राज्यभर सांगत सुटायचो कारण "कोणत्याही देशाची उंची ही त्याच देशातील शिक्षणापेक्षा अधिक असू शकत नाही, आणि कोणत्याही देशातील शिक्षणाची उंची ही त्याच देशातील शिक्षकापेक्षा अधिक असू शकत नाही" यात अतिशयोक्ती व शिक्षकावरील अतिविश्वासाचा भाग जरी वाटत असला तरी सरांबाबत हे विधान अगदी सार्थ वाटायचे.

ग्रेसांचे समग्र साहित्य हे सहजगम्य तर नाहीच, पण शास्त्रीय संगीतातील एखादा राग अनोळखी असूनही एखादी बंदीशच जर अप्रतिम असेल तर ती न समजताही श्रोत्यांना तिची नशा चढते आणि तो त्यात रममाण होतो तसे ग्रेसांच्या कवितेचे आहे. ती कविता तो गाऊ लागतो, वारंवार उच्चारू लागतो, गुणगुणू लागतो उदाहरणार्थ -

या व्याकुळ संध्यासमयी
शब्दांचा जीव वितळतो
डोळ्यात कुणाच्या क्षितिजे...
मी अपुले होत उजळतो

तू हसलीस तेंव्हा माझ्या
हृदयात मिसळली जाई
तू दूर तरीही घेते
मज कुशीत संध्यामाई

गाय जशी हंबरते
तसेच व्याकुळ व्हावे
बुडता बुडता सांजप्रवाही
अलगद् भरूनी यावे

इत्यादी वा अन्य अनेक कवितांमधील अर्थ शोधतांना कोणताही शब्दकोष घेवून किंवा कोणत्याही (अभिधा, लक्षणा, व्यंजना) शब्दशक्तीचा आधार घेतला तरी अर्थ मात्र आकलन होत नाही. पण वाचक त्यासाठी थांबत नाही. समुद्रात आणि एकांतातही ग्रेसांची कविता गुणगुणाविशी वाटते. अनेक कविता पाठ करून तिची उधळण कराविशी वाटते. कारण ग्रेसांच्या कवितेचे दर्शनी स्वरूपच अत्यंत मोहक आहे. नवतारूण्याने बहरलेल्या लावण्याच्या किशोरगंगेने पहिल्या भेटीतच चित्ताकर्षित करून वेड लावावे तशी अवस्था या कवितेच्या रसिकाची होऊन जाते. इथे सामान्य रसिकांची कवितेचा अन्वय लावण्याची आणि कविता उपभोगण्याची प्रचलित पद्धत मात्र या कवितेच्या संदर्भात उपयोगी पडू शकत नाही. मुळात ही कविता सर्वसामान्य रसिकांच्या आस्वाद प्रक्रियेला आव्हान देणारी आहे. म्हणूनच तर आकलनाचा प्रश्न अनुत्तरीत राहतो. तेंव्हा मी सरांनाही विचारायचो कारण त्यावेळेस "मितवा" हे सदर तरूण भारत मधून सुरू होते. मी म्हणालो सर, लेख खूप सुंदर होता पण मला समजला नाही.

अनुक्रमणिका

त्यावर ग्रेस म्हणाले त्यात माझा विजय आहे. तुम्हाला समजत नाही त्याला मी काय करू ? त्यासाठी तुम्हाला प्रतिभावंताच्या पाताळघरात शिरावे लागेल. तुम्हाला साध सोपं हवं आहे पण...

I can become small for everybody
but I can't become simple for anybody

मी चुपचाप ऐकून घेतलं पण त्याचवेळेस ग्रेसांचे शिवाय इतर कोणताही कवी वा ग्रंथकार शिकवताना दुर्बोधता नव्हती. केशवसुतांची सामाजिक, प्रेम, निसर्ग, गूढगुंजनपर कविता. बालकवींची निसर्गपर व आत्मपर कविता, तांब्यांनी मराठीत दिलेली गेयता, प्रेमगीत, कुसुमाग्रजांच्या विशाखेतील राष्ट्रवाद व मानवतावाद, मर्ढेकरांचे कालपरत्वे बदलत गेलेले व मर्ढेकरांना आकलन झालेले अध्यात्म, समग्र स्त्रीजातीचे भेसूर चित्र, गोविंदाग्रज व कुसुमाग्रजांचे तौलनिक प्रेम अत्यंत सुंदर सुलभ - सुबोध सहज समजेल असे शिकवायचे ज्ञानदेव - नामदेव - तुकाराम शिकवताना तर शेकडो सुभाषितांची पेरणी व्हायची. उदा. 'चर्चबेल' मधील ''आकांताचे देणे''मध्ये सर लिहून जातात. ''ज्ञानेश्वरांच्या कवितेतील स्वराशय व्यक्त करणारी शब्दाची मांडणी, रामदासांची करूणाष्टके व आरत्यांमधील कालिक लयींचा आविष्कार व तुकारामाचे शब्दविश्वाला गवसलेले अनुभूतीचे करूणामूल्य ह्या मराठीच्या मर्मबंधातल्या ठेवी आहेत.''

शिकवितांनाही अनेक सुभाषितांची, काव्यपंक्तींची मालिकाच गुंफली जायची, कुठेही अडखळणे नाही, आठवून - आठवून सांगणे नाही. तर धो - धो पाऊसच पडायचा. मर्ढेकर म्हणतात तसे -

शब्द अर्थाआधी यावा हे तो ईश्वराचे देणे.
पेंगणाऱ्या प्रयासाला उभ्या संसाराचे लेणे.

ग्रेसांचेच शब्दात सांगायचे तर -

मेंदूतून रत्न उगवता
कवटीची भिंतही तडके

मी मात्र वेड्यासारखा या काव्यपंक्ती व सुभाषितं लिहीत बसायचो. त्यावेळी जर माझ्याजवळ मोबाईल असता सर सर्व तासांचे रेकॉर्ड करून घेतले असते. Notes जपून ठेवल्यात पण माझी कुवत वा क्षमता याची मला जाण आहे. परिजातकांच्या फुलांचा प्रचंड वर्षाव व्हायचा पण ती वेचण्याला मर्यादा असायची, पण ग्रेसांचे प्रत्येक साधं वाक्य सुद्धा मॅथ्यू अर्नाल्ड म्हणतो त्याप्रमाणे perfect speach असायचं (poetry is nothing less than the most perfect speach of man that in which he comes nearest to being able to after the truth)

कविवर्य ग्रेस हे कवी, काव्य व काव्यनिर्मितिप्रक्रियेवर अमाप प्रेम करायचे किंबहुना तो त्यांचा मनोधर्मच होता म्हणूनच ते वारंवार म्हणायचेही ''माणिक गोडघाटे'' ग्रेसच्या मार्गात ढवळा - ढवळ करीत असेल तर त्याला ग्रेस चिरडून टाकेन, त्यांनी कवी म्हणून स्वीकारलेलं ग्रेस हेच नांव त्यांच सारसर्वस्व होतं. इतरांनी अनेक प्रेमकविता लिहिल्या, प्रेयसींची विविध वर्णनंही वाचायला मिळाली. परंतु ग्रेसांची प्रेयसीच कविता होती म्हणूनच ग्रेस एके ठिकाणी लिहितात -

माझी ही प्रीत निराळी
संध्येचे शामल पाणी
दुःखाच्या दंतकथेला
डोहोतून बुडवून आणी

ग्रेसांनी कवितेवर केवळ प्रेमच केले नाही तर स्वतःच्या प्रतिभिक ताकदीविषयी, बळाविषयी ते अनेकवेळा निर्भिडपणे, निःसंकोचपणे व आत्मविश्वासाने बोलायचेही. एखादी सुंदर कविता ऐकवून झाली की ते म्हणायचे का हो !, असं इतकं सुंदर कोणी सहज लिहू शकेल काय ? एकदा माझ्या घराच्या 'वल्कल' नामकरण सोहळ्यास आले असता अगदी सकाळी मला ऐकवलेली कविता -

सुखाने तुझे रूप माहेर झाले
हिरे सांडता शुभ्र बर्फावरी
वसंतोत्सवाला जसे वृक्ष जाती
मला वल्कले देउनि ईश्वरी

अलभ्य फुलला सखे
धन वसंत हा मोगरा
विनम्र लपवू कुठे
हृदय स्पंदनाचा झरा

उन्हात मन शिंपिले
पळस पेटला पारवा
कुडीत जळतो जसा
मरणरचंदनाचा दिवा

कविता ऐकून मी बेहद खूष झालो नि मी दाद दिली 'सर क्या बात है' । तीनही कडवे लिहून घेतले. सर म्हणाले ही माझी परमेश्वरी देणगी आहे. व हे केवळ ग्रेसच लिहू शकतो. आपल्या सर्जनशीलतेवर इतका अमाप विश्वास ग्रेसांना होता. उदा. डॉ. अक्षयकुमार काळे सरांनी घेतलेल्या प्रदीर्घ

अनुक्रमणिका

मुलाखतीचेवेळी संतांच्या सुभाषितांमधला व आपल्या सुभाषितांमधला फरक नेमका विशद करता येईल काय ? असा प्रश्न विचारला असता "माझे माहितीप्रमाणे आज काव्यलेखन करणाऱ्या कवीमध्ये ज्याच्या काव्यात पावलोगणिक सुभाषिते विखुरली आहेत असा एकमेव कवी मी आहे असे मला नम्रपणे वाटते" असे ग्रेसांनीच उत्तर दिले. एकूणच ग्रेसांच्या नवनिर्माणक क्षमतेविषयीच्या दुर्दम्य आत्मविश्वासाला तोड नाही. ग्रेसांचे संदर्भ व उदाहरणं जणू एक छोटसं काव्यच असायचं. एकदा एक प्रेषित धर्मग्रंथेप्रमाणे शवागाराची पाहाणी करायला गेले असता तेथे बंद कक्षात मृत व्यक्तींची सर्व शरीरं ही ठेवलेली, परंतु नागव्या अवस्थेत होती, ही पाहणी करतांना धर्मगुरूसोबत एक विदूषी पण होती. हे दृश्य पाहून ती थबकली व म्हणाली सर, एक दिवस माझेही मृत्यूनंतर माझं देखील शरीर असंच उघड - नागडं असेल तर गुरू म्हणाले त्यात संकोच बाळगण्यासारखे काय आहे ?, "गव्हाचा दाणा जमिनीत आपण नागवाच पेरतो, परंतु तो देखील स्वतःचे वस्त्र घेऊनच जन्माला येत असतो की नाही ?" मनुष्याचं शरीर नागवं म्हणून काही माणूस नागवा होत नसतो. ज्याने ज्याने आपले स्वतः, स्वतंत्र अंगभूत वस्त्र विणून परिधान करायचे असते. मानवी समाज मात्र त्याला देहापासून विलग करू शकत नाही. (देहसुकुमारबाई त्याला मायेने सोलवा, ज्याला पुरती वल्कले तोच शोभतो नागवा.) सांप्रतच्या अखिल मानव समाजाच्या मूल्य ऱ्हासाचे संदर्भात ग्रेस खंत व्यक्त करतांना ते एक छोटसं वाक्य उद्धृत करतात ते असं "I am not worried about the burst but I am worried about the leakage"

एखादा स्फोट किंवा विस्फोट होऊन वस्तुंची नासधूस झाली व ती नामशेष झाली असेल तर पर्यायी वस्तू पुरवता येतील, परंतु व्यक्ती वा वस्तू वरकरणी दिसायला सुंदर आहेत, पण गुणधर्म मात्र विषारी वा घातक असतील तर त्यावर मात्र उपाय नाहीच, कारण मनाचे विषारीपणावर औषध नाही, म्हणून ग्रेस सर मानवी अमानुषतेबाबत भिती व्यक्त करून म्हणतात. 'स्फोटाचे भय नाही पण झिरपणीचे भय?' स्वतःचे पुस्तकाचे वा कवितासंग्रहाचे प्रथम पृष्ठावर ख्यातनाम लेखकांचे सुंदर सुभाषित कोट करण्याचा ग्रेसांना छंद होता. उदा. 'संध्याकाळच्या कविता' या कवितासंग्रहात ते समरसेट मॉमचे वाक्य" It's not a tragedy that men become old or die but cease to love.

माणसं मरतात किंवा म्हातारी होतात ही शोकांतिका नाही तर परस्परांवर प्रामाणिक प्रेम करणं थांबते, ही शोकांतिका आहे.

ग्रेस सर शिकवतांना कधी कधी निदा फाजलीच्या गझलचा वारंवार उच्चार करायचे मला तर ते पसायदानाच्या तोडीचं काव्य वाटतं.

> गरज बरस प्यासी धरतीपर फीर पानी दे मौला
> चिडीयोंको दाने बच्चोको गुडधानी दे मौला
> दो और दो का जोड हमेशा चार कहा होता है
> सोच समझवालोको थोडी नादानी दे मौला
> तेरे होते कोई किसीकी जान का दुश्मन क्यो हो
> जिनेवालोको मरनेकी आसानी दे मौला

अशा शेकडो संदर्भ व उदाहरणांनी मी बेहद खुश व तृप्त होऊन त्यांच्या संकलनाबाबत आश्चर्यचकित व्हायचो. मराठी कवितेला ग्रेसांनी दिलेली नवीन नवीन शिर्षकं ही तर मराठी साहित्याला मिळालेली फार मोठी देणचं आहे. लेखांची व पुस्तकांची नावंच जरी वाचली तरी मनुष्याला गुंगी आल्यासारखी होऊन जाते. 'चंद्र माधवीचे प्रदेश', 'राजपुत्र आणि डार्लिंग', 'संध्यामग्न पुरूषाची लक्षणे', 'सांध्यपर्वातील वैष्णवी', 'भासचक्राचे तोल', 'प्रतिभावंताचे पाताळघर', 'ओल्या वेळूची बासरी', 'वाऱ्याने हलते रान', 'गोंदण गावातील मंत्रधून', 'स्वप्न बांधणीतील घावांचे शिलालेख', 'पडशाळेतील चांदणीचे काहुर', 'आकांताचे देणे' इ. या शीर्षकांचा आशय कळत नाही लेखाची थीमही वाचल्या शिवाय कळत नाही. पण वाचकाला वेड लावल्याशिवाय राहत नाही. ही नावं उच्चारल्यावर ऐकणाराही धुंद होऊन ऐकतो. मुलायम शब्दांनी वेढलेली शिर्षकांची बाह्य त्वचा इतकी नादमय आहे की, ती रसिकाला विलक्षण भुरळच घालते. अर्थाकलनाचा रसिकांचा प्रयत्न मात्र पुन्हा इथे विफल ठरतो.

मी शिक्षणमंत्री असताना एका वृत्तपत्रातून बदनामीकारक बनावट बातम्या सतत यायच्या. मी थोडंसं हताश झालो होतो. खामगावच्या सभेत मी विधान केले होते, "मला जनविकासाचे खूप चांगले निर्णय घ्यावयाचे आहेत, परंतु कुठेतरी व कुणीतरी मनोबल दिले पाहिजे. Moral support दिला पाहिजे" दुसऱ्याच दिवशी सकाळी सात वाजता ग्रेस सरांचा फोन आला, म्हणाले, "सर घाबरायचे नाही, अख्खा कविवर्ग तुमच्या पाठीशी हिमालयासारखा आहे. आपल्यासाठी रात्र वैऱ्याची नाही तर दिवसही वैऱ्याचा आहे. सावध राहायचे, नि पुढे चालायचे. एखादी वेश्या धंद्यासाठी सतीची वाटेल तशी बदनामी करण्याची धडपड करू शकते, पण ती सतीचं सतीत्त्व मात्र हिरावून घेऊ शकत नाही. तेव्हा तुम्ही नाऊमेद होऊ नका, जेव्हा हिंमत हरल्यासारखे वाटेल तेव्हा मात्र दोन ओळी लक्षात

अनुक्रमणिका

ठेवायच्याच -

सुत्र देखणा चेहरा माझा
बिगूल मुखातून वाजे
पराभवाच्या पर्वामध्ये
जसे उजळती राजे''

या ओळी ऐकून मला फूल रिचार्ज झाल्यासारखेच वाटले व नव्या जोमाने कामाला लागलो

गेले भरून कोणी
निजल्या कथेत रंग

असाच अनुभव आला. आज मला या अफाट ताकदीच्या प्रतिभावंत कविराजाच्या वरील विधानांची आठवण होते. ग्रेसांची दुःखाला सामोरे जाण्याची पद्धत ही विलक्षण आहे. उदासीनता आणि दुःख यांनी ग्रेसांचे व्यक्तिमत्त्व भारले आहे. दुनियेतील प्रत्येकच व्यक्तीला कमी अधिकप्रमाणात दुःखं भोगावीच लागतात. अनेकांनी आपल्या आयुष्यातील दुःख व्यक्त केलेली आहेत.

जन हे सुखाचे । दिल्या घेतल्याचे
अंतकाळीचे कुणी नाही ।
सोयरे धायरे । संपत्तीचे लोक
अजाणाचा एक पांडुरंग ।

तुकारामांच्या या अभंगातून जग हे स्वार्थी, मतलबी, लुटारू, कृतघ्न लोकांचे आहे. आपण एकटे आहोत हीच भावना व्यक्त होते. मर्ढेकरही याला अपवाद नाहीत -

ऐशा टापून चौफेर । नाही माहेर सासर
कैसे गोत्र वा प्रवर । अनामिका

मर्ढेकरांनी आपण स्वतः या विश्वनाट्यगृहात विदूषक ठरून गेलोत आपण पोरकं, एकटे, एकाकी, उपेक्षित, बेसहारा, असल्याची वेदना व्यक्त केली. कमी अधिक प्रमाणात या सगळ्यांच्या दुःखाची वीण सारखीच आहे.

नाहीच कुणी अपुले रे
प्राणांवर नभ धरणारे
दिक्काल धुक्याच्या वेळी
हृदयाला स्पंदविणारे

ग्रेस यांच्या या मताशी मला सहज सहमत होणे अवघड वाटत आहे. कारण ग्रेसांवर प्रेम करणारे विद्यार्थी, प्रतिभावंत कलावंत, रसिक, समीक्षक, पत्रकार, राज्यकर्ते, अनेक प्रसार माध्यमे, शासन, प्रशासन, गीतकार, संगीतकार, गायक, नट, अभियंते, चित्रकार या सर्वांनीच ग्रेसांवर जीव लावला. कारण मी 'महाराष्ट्र टाईम्स'चा मुंबईचा कार्यक्रम पाहिला, शेवाळकरांकडील १० मे ची मैफिल ऐकली, यवतमाळच्या ४ मार्चचा पं. हृदयनाथ + ग्रेसांचा प्रतिभान्तरण्यास कार्यक्रम अनुभवला, पुणे - मुंबईकडील, गोव्याकडील कार्यक्रमांविषयी ऐकलं. (अख्खं जग ग्रेसांवर प्रेम करायचं व करत राहीलच) मराठी साहित्य अकादमी, विदर्भ साहित्य संघ, नागविदर्भ परिषद, आदी अनेक संस्थांनी ग्रेसांवर खूप - खूप प्रेमच केले नि करतील. परंतु ग्रेस या दुःखाच्या महाकवीला आपल्या दुःखाच्या तन्मय तंद्रितून बाहेरच पडता आले नाही, आता कुठेतरी ग्रेस आणि त्यांचा सर्व चाहता वर्ग यातील दुर्बोधतेचा दुरावा थोडासा कमी होऊ लागला होता, पण बराच उशीर झाला होता कारण -

हसने की चाहने हमको इतना रूलाया है
हमदर्द नही दर्द हमारा साया है ।

किंवा

जे सोसत नाही असले
ते दुःख मला का द्यावे ?
परदेशी आपुल्या घरचे
माणूस जसे भेटावे -

ग्रेसांच्या या प्रश्नाला मात्र आपल्याकडे उत्तर नाही. कॅन्सरसारख्या दुर्धर, भयावह, जीवघेण्या आजाराने फिरून फिरून व वारंवार हल्ले करावेत ग्रेसांचा बचाव करण्यासाठी प. हृदयनाथ मंगेशकरांनी, डॉ. केळकरांनी, मा. लतादिदिंनी, पंढरपुरे, कानेटकर यांनी जिवाची बाजी लावावी परंतु -

जळे माझी वाचा
लागला वोणवा
धाव रे केशवा माय बापा ।

ग्रेसांवर अशी आर्त हाक मारण्याची वेळ यावी याला दैवदुर्विलासच म्हणू नये तर काय ? ग्रेसांना शेकडो प्रचलित दुःखांनी सतावलं, छळलं असेल. कौटुंबिक सामाजिक, वाङ्मयीन इत्यादी क्षेत्रीय दुःख भोगावीच लागतात, त्याला समोरे जावून उपचारही आपण शोधतोय, परंतु ज्याचं नाव ऐकलं की साक्षात मृत्यूच समोर उभा ठाकतो असा महाभयानक कॅंसर घशावर आक्रमण करतो, प्रथमावस्थेत निदान झाल्याने तात्काळ पं. हृदयनाथ मंगेशकरांनी ग्रेसांना मृत्यूच्या जबड्यातून खेचून आणले. असं ग्रेस म्हणायचे. ग्रेस



(कवी ग्रेस आणि प्रा. वसंत पुरके)

''सांजधुळीचे धुरकट अंवर
राऊळमाथी कलते
झरझर फिरते हृदयामधुनी
कवितेचेही पाते''

दैनंदिन जीवन बिनधास्त जगू शकले. पोहण्याचा (२२ वर्षे काही दिवस) अखंड छंद जोपासता आला. तशी व्यवस्था बाळासाहेबांनी केली होती. पुणे, मुंबई, गोवा आदि ठिकाणी मोठे मोठे कार्यक्रम पण सुरू झाले होते. परंतु काही महिन्यांनी लगेच लिव्हर कॅंसरने प्रचंड हल्ला चढविला. पं. हृदयनाथांनी लगेच दिनानाथमध्ये भरती करून घेतले. ते शेवटपर्यंत वाटेल ते उपचार व सर्वतोपरी प्रयत्न करून ग्रेसांना रोगमुक्त झाल्याचा दिलासा मिळाला म्हणूनच ते म्हणाले ही होते यवतमाळला एक जाहीर कार्यक्रम घ्यायचाय. त्याशिवाय जग सोडायचे नाही हा अदम्य विश्वास. त्यामुळेच त्यांना शब्द पाळता आला. पण आजाराने ग्रेसांचा अखेरपर्यंत पाठलाग केला. ग्रेस सर्वच आघाड्यांवर जिंकले, यशस्वी झाले, आयुष्य खूप सुंदर आहे, खूप दिवस जगायचे आहे, अशी त्यांची इच्छाही त्यांनी व्यक्त केली होती. पण खूप झुंज देऊनही दुःख जितके झटकावे, तितके ते अंगाशी झोंबू लागते, अशी भयाण प्रचिती ग्रेसांनाही आली. शेवटी मृत्यूसमोर त्यांना पराभूत व्हावे लागले. सिकंदराकडून जसा पोरसला पराभव पत्करावा लागला तसा. ग्रेस सर सिकंदर - पोरसाचा संदर्भ नेहमीच द्यायचे. ('मितवा'मध्ये तो संदर्भ आला आहे.) सिकंदराने पोरसचा युद्धात पराभव केला आणि मग तो खुळा जगज्जेता पोरसला विचारायला लागला, 'तू युद्धात पराभूत झालेला राजा आहेस, सांग आता तुला कसे वागवू' पोरसने राजासारखेच बाणेदार उत्तर दिले ''You have defeated my kingdom not the kingship. Still I am king and you must treat me like a king ! ग्रेस या अलौकिक प्रतिभावंत कविराजाला यमराजाने असाच प्रश्न विचारला असता तर...'' माझा लाडका वैशाख आग उधळत आला की मग मी निर्धास्त होतो पोळणाऱ्या स्खलनाचे भय उरत नाही, असे सरळ उत्तर दिले असते आणि शेवटच्या कार्यक्रमात मोठ्या हिंमतीने सर म्हणालेही ''मी वेळेपूर्वी जाणार नाही, वेळ येताच थांबणार नाही'' असे म्हणून ग्रेस सर आयुष्यभर वागले - जगले ते राजासारखे व गेलेही राजासारखे. एम. ए. च्या वर्गात खूप सुंदर टिचींग करून तास संपल्यावर जसे मोठ्या दिमाखात बाहेर पडायचे ना तसे !

प्रा. वसंत पुरके
उपसभापती
महाराष्ट्र राज्य विधानसभा, मुंबई.
....
'वल्कलं' दर्डा नगर, यवतमाळ.
दूरभाष : ०७२३२ २४४७५३

सांध्यपर्वातील ग्रेस

डॉ. माधवी वैद्य

■

ग्रेसची कविता म्हणजे सांध्यपर्व. संध्याकाळ आणि रात्र यांना जोडणारा संधिकाळ. किती लहानसाच दिवसाचा भाग म्हणूनच अधिक उत्कट, अधिक जीवघेणा. त्या लहानशाच कालावधीची उत्कटता विलक्षण. ती सारी आर्तता, आशयघन बनून ग्रेसच्या काव्यात प्रकटलेली. आपण वापरतो तेच शब्द, त्याच संकल्पना त्यांच्या कवितेत काही वेगळाच साजशृंगार घेऊन येतात, असा की आपण त्यांना नव्याने भेटतो आहोत असे वाटते. त्यांचे ते अनुभवातून तावून सुलाखून निघून तेजाळलेले रूप पाहून आपण क्षणभर स्तिमित होतो, जरासे भांबावून जातो, जरासे गोंधळतो. कुठे कुठे हे नेहमीचे शब्द त्यांच्या अकल्पित झळाळीने आपल्याला दिपवून टाकतात, बुचकळ्यात पाडतात. आपण प्रथम प्रथम भांबावून जातो पण जेव्हा ग्रेस आपल्या कवितेबद्दल बोलायला लागतात तेव्हा त्यांच्या तोंडून त्यांची कविता ऐकणे, अनुभवणे हा एक थक्क करून सोडणारा अनुभव असतो. याचा प्रत्यय हल्ली लोकांना त्यांच्या कार्यक्रमातून येतो आहे कारण पं. हृदयनाथ मंगेशकरांबरोबर त्यांचे जे कार्यक्रम होत आहेत त्यामुळे आज ग्रेसला रसिक बघू शकत आहेत, भेटू शकत आहेत. त्याच्या तोंडून त्याच्या कवितांचा आस्वाद घेऊ शकत आहेत आणि मग 'अरे ! हे आपल्याला इतके दुर्बोध असल्यासारखे का वाटत होते' असाही प्रश्न त्यांना पडतो आहे. हे अनुभवणेही विलक्षण आहे.

परंतु आम्ही जेव्हा 'कवी शब्दांचे ईश्वर' ही दूरदर्शन मालिका केली. तेव्हा ग्रेस हा आत्ममग्न अवस्थेत आणि स्वतःच्याच घरात बंदिस्त असल्यासारखा कवी होता. कोणाला त्याचे दर्शन घेणे म्हणजे दुरापास्त काम वाटत होते. अनेकांना असाही अनुभव आला होता की दाराची बेल वाजवावी आणि कविरायांनीच दस्तुरखुद्द उत्तर द्यावे की ग्रेस घरात नाहीत म्हणून. अशा कवीला कॅमेऱ्यात चित्रबंद करायचे हे माझ्या समोर खरोखरी एक आव्हान होते. मनात लाख प्रश्न उठत होते. कसे होईल शुटिंग ? नीट होईल ? आपल्याला नेमके हवे आहे ते हाती मिळेल ? हाती मिळेल का हात हलवत परत यावे लागेल ?

शेवटचा प्रश्न मनात येण्यासाठीही कारण तसेच घडले होते. मालिका दूरदर्शवर लागायला सुरूवात झाली होती आणि जसा मालिकेचा एकेक भाग पुढे सरकत होता तसतसे कविरायांचे माझ्या घरी फोन येण्याचे प्रमाणही वाढायला लागले होते. हा फोन साधारणतः भल्या सकाळी सकाळी सहा वाजता यायचा. वैद्य तेव्हा डबा घेऊन फॅक्टरीत जायचे. माझे

हात त्यांचा डबा करण्यात गुंतलेले असायचे आणि तेव्हाच नेमका कविरायांचा फोन यायचा. बरे आवडता कवी. त्याचे शुटिंग घ्यायचे, नवऱ्याच्या डब्याहूनही मला अधिक त्याचे महत्त्व वाटायचे. मी फोन घ्यायची. तो फोनही इतका इंटेन्स असायचा. त्यात आपले शुटिंग कसे होईल याची आशंका असायची. मला असे वाटते की मी तुम्हाला शुटिंग देण्यासाठी जरी हो म्हणालो असलो तरी त्याचा फेरविचार करावा. कारण सध्या मी प्रचंड डिप्रेशनच्या काळातून जातो आहे. हे डिप्रेशन काय असते ते माझे मलाच माहिती आहे. यातून बाहेर निघणे अत्यंत अवघड आहे कारण मला जगावेसेच वाटत नाहीये. एक शब्दही तोंडातून बाहेर पडण्याची शक्यताच नाही अशी स्थिती आहे. कुठेतरी जाऊन हे जीवन संपुष्टात आणण्याचीही भाषा कधी कधी व्हायची. तो फोन ऐकल्यावर माझी अवस्था काय होत असेल याची आपण सर्वांनी कल्पनाच केलेली बरी! कारण शुटिंगला इतका लवाजमा पुण्याहून इतक्या लांब नागपूरपर्यंत घेऊन जायचा म्हणजे काही लहान सहान गोष्ट नव्हती. परत पुरत जसजशी शुटिंगची वेळ जवळ जवळ यायला लागली तशी ही फोनची संख्याही वाढत गेली आणि त्याची बोलण्यातली निराशाही, नैराश्यही अधिक गडद झाल्यासारखे वाटले. 'तुम्ही येऊ नका. आलात आणि' मी जर काही बोलूच शकलो नाही, आणि तसे होण्याची शक्यताच जास्त आहे, तर मग तुमचे इथपर्यंत येण्याचे प्रयोजन आणि सारा व्याप नुसताच खटाटोप ठरण्याची शक्यता आहे. म्हणून हात जोडून प्रार्थना करतो की सारे इथेच थांबवा. तेच बरे होईल'' पण मनात कुठेतरी खोलवर विश्वास होता, 'की नाही, सर्व ठीक होईल आपण जे योजिले आहे ते असे कोलमडायचे नाही'. कुठून हे विचारांचे बळ मनात जमा करत होते आणि जिद्द टिकवून ठेवली होती ? आता विचार केला तर कळत नाही पण प्रत्येक येणाऱ्या फोनला मी तितक्याच शांतपणे, धीराने सामोरी जात होते. पलीकडून जरी अगदी अस्वस्थ होऊन जीवदेण्याची भाषा ऐकू येत होती, कधी कधी तर ओक्साबोक्शी रडणे ही कानावर येत होते. तरीही मी शांत होते. मी एक बघितले आहे की क्राईसिसच्या वेळी देव मला खूप शांत राहण्याची बुद्धी देतो. त्यामुळेच हातून चांगले काम होत असावे. शेवटी शेवटी या नैराश्याची परिसीमा अनुभवायला आली आणि कविराज म्हणायला लागले 'आता सर्वच माझ्या हातून सुटल्यासारखे वाटत आहे. जस्ट प्रे फॉर मी ॲण्ड कम' माझ्यासाठी प्रार्थना करा, ही एकच विनंती करतो मी! आता मी म्हटले 'जरूर तुमच्यासाठी नक्की प्रार्थना करते, सर्व चांगलेच होईल. ठरलेल्या दिवशी सकाळी सर्वजणांना घेऊन येते आहे. माझे मन मला सांगते आहे , मला यश येईल. नक्की येईल.' मी शांतपणे कविरायांना सांगितले.

शुटिंगच्या आधी कविराजांची भेट घेऊन त्यांना एपिसोडचा आराखडा पक्का सांगितलेला होता. तो त्यांना मान्य होता. सर्व एपिसोड संध्याकाळ भोवती गुंफायचा ही त्या भागाची मध्यवर्ती कल्पना होती. त्यासाठी आवश्यक तिथे मागे फक्त मारव्याचे सूर, आलापी ठेवायची. एकेक मुद्दा झाला की अनंत सूर्यास्त, त्याच्या मावळतीचा छटाही तीव्रपणे भासतील अशा दाखवायच्या सर्व काही मनात आधीच गुंफलेले होते.

क्षितिज जसें दिसतें,
तशी म्हणावी गाणी
देहावरची त्वचा आंधळी
छिलून घ्यावी कोणी.
गाय जशी हंबरते,
तसेच व्याकुळ व्हावे
बुडतां बुडतां सांजप्रवाही
अलगद् भरूनी यावे

अशा शब्दांचा प्रत्यय देणारा हा मालिकेचा भाग असावा. असे वाटत होते. सर्व मनातला आराखडा प्रत्यक्षात उतरवण्यासाठी मी ही उत्सुक होते, उताविळ होते. फोनवरून ऐकलेल्या भयनाट्याला मी कसे तोंड देणार, आणि त्याच्यातून वाट कशी काढणार हा माझ्यासमोरचा यक्षप्रश्न असला तरी 'वाट काढीण' हा आत्मविश्वास होता. आणि ती वाट मला एकदम दिसली कविराजाच्या एका वाक्यावरून 'माझ्यासाठी प्रार्थना करा. जस्ट प्रे फॉर मी ॲण्ड देन कम'

आदल्या दिवशी सर्व सामानाची, यंत्रसामग्रीची व्यवस्थित तपासणी करून घेऊन सामान ट्रॅक्स मध्ये भरले. मला यावेळी कोणतीच कसूर ठेवायची नव्हती आणि चित्रीकरणाच्या दृष्टीने कोणताही धोका पत्कारायचा नव्हता. मी सर्वांची जरा जास्तच काळजी घेत होते का ? हो! जरा जास्तीच काळजी करत होते. मला कोणीतरी हटकतही होते. होईल हो ! चांगले ! का काळजी करताय ? ''मी हसून साजरे करत होते पण पोटात कणकेतल्या मिठाएवढी भीती होतीच. मी ट्रॅक्स सुरू झाल्यावर एकदम म्हणावे. आज जरा गाडी दगडू हलवाईच्या गणपती कडून घ्या. त्याचे दर्शन घेऊन, प्रसाद घेऊन पुढे जाऊ यात'' सर्वजण आश्चर्यचकित झाले. असे आजच का ? हा प्रश्न त्यांना पडला. काहींनी विचारलेही 'अरे' आज काय हे नवीन एकदमच ? त्यांचे म्हणणे ही बरोबर होते. मनातल्या भक्तिभावासाठी कोणत्याही प्रकारचे अवडंबर माजवायचे नाही हा 'अनव्यय'चा अलिखित नियम होता. म्हणून कार्यक्रमाची तारीख प्रसिद्ध करणे, हाच आमचा मुहूर्त असायचा. त्यामुळे त्यांचेही असे

अनुक्रमणिका

विचारणे अगदी साहजिकच होते. आम्ही सर्व दगडू हलवाईच्या दर्शनाला गेलो. तिथे मी एक प्रसादाचे, पूजेचे ताट घेतले. पुजाऱ्याला सांगून दगडू हलवाई गणपतीची मनोभावे आरती केली. त्याचा मनोमन आशीर्वाद घेतला. आणि प्रसादाचा नारळ, साखर, फुटाणे, प्रसादाची फुले बांधून घेऊन निघालो.


रात्री नागपूरात पोहोचलो तर नागपूरात कुठे उतरायला जागा नाही. वाय.एम.सी.ए. सर्व भरलेले कुठलेतरी अधिवेशन होते. एकही खोली रिकामी नाही. त्याहून चांगल्या हॉटेलात जाण्याची हिंमतच होईना, कारण हातात तेवढे बजेटच नव्हते. सर्व मालिकाभर बजेटची अशीच ओढाताण झाली होती. शेवटी शेवटी तर हात जास्तीच आवळले जात होते. मी मग शेवटी प्राचार्य राम शेवाळकरांना फोन केला. म्हणजे त्यांच्याकडून काहीतरी व्यवस्था झाली तर बघू. रामभांऊबद्दल जबरदस्त आधार वाटायचा. त्यांच्या बद्दल खूप आपुलकी वाटायची. याला दोन कारणे एक म्हणजे त्यांना एकंदरच साहित्याबद्दल वाटणारी कळकळ, कुणीतरी काहीतरी चांगले करत आहे असे दिसल्यावर त्याच्यामागे ठामपणे उभी राहायची त्यांची इच्छा, कृती, आणि दुसरे म्हणजे माझे 'तपोवन'चे डॉ. शिवाजीराव पटवर्धन आणि अनुताई भागवतांशी असलेले नाते. या दोन्ही कारणाने त्यांच्यात आणि माझ्यात एक चांगल्या प्रतीचा भावबंध निर्माण झाला होता, तो शेवटपर्यंत टिकला. रामभाऊ गेले तेव्हा अशी भावना झाली की विदर्भाचे साहित्यविश्व आज पोरके झाले आहे. तर मी रामभाऊंना फोन केला अशा विश्वासाने की ते माझी अडचण, सर्वच आर्थिकही नक्की समजतील आणि त्यातून वाट काढून देतील. तसेच झाले. त्यांनी वाय.एम.सी.ए. मध्ये दोन खोल्या कशातरी मिळवून दिल्या आणि तिथे सामान टाकून आपल्या हॉटेलमध्ये 'पंचवटीत'त या म्हणाले जेवायला. आम्हाला साग्र संगीत पंचपक्वान्नाचे भोजन देण्याची व्यवस्था त्यांनी केली. निरोपच असा पाठवला होता, "ही मंडळी महाराष्ट्राच्या दृष्टीने कवितेच्या प्रांतात मोलाची कामगिरी करीत आहेत. यांची जेवणाची व्यवस्था उत्तम, पंचपक्वान्नासहित करा" आमचे भागलेले, दमलेले जीव 'असे ब्राह्मण जेवुनी तृप्त झाले' च्या अवस्थेत गाढ झोपी गेले.

दुसऱ्या दिवशी चहा, नाश्ता घेऊन तडक कविरायांचे घर गाठले. तो कविराज दाराच्या चौकटीला एक हात रेलून-ठेवून (जसे एपिसोडच्या सुरूवातीला उभे आहेत तसेच) नकारात्मक भावनेनी दारात उभे ठाकलेले. चेहऱ्यावर नैराश्य पूर्ण दाटलेले. आणि उसासत पहिलाच शब्द "बघा ! मी जे तुम्हाला सांगत होतो, वारंवार फोन करून अगदी तेच झाले. इतके डिप्रेशन आहे की एकही वाक्य काय शब्दही तोंडातून फुटत नाहीये. नाइलाज आहे. इतक्या लांबून तुम्ही सर्व आला आहात पण...!" मी म्हणाले, "पाणी तर द्याल की नाही प्यायला ? घरात तर येऊ ? आम्ही घरात तर प्रवेश घेण्यात यशस्वी झालो. मग थोडा वेळ स्तब्धता ती स्तब्धता चिरायला मी म्हणाले", देवघर कुठे आहे तुमचे ? आहे का ? "ग्रेस म्हणाले, हो आहे ना!" मी म्हणाले, "मग मला जरा नमस्कार करू देत तुमच्या देवांना ! प्रसाद आणला आहे पुण्याहून ! देवाचा ! विघ्नहर्त्याचा ! तो घ्या हातात मग बघू पुढचे काय ते!" ग्रेसनी देवघराच्या समोर नेले. त्यांच्या हातात त्या विघ्नहर्ताचे स्मरण करून मी प्रसादचा नारळ ठेवला. ग्रेस एक क्षणभर स्तब्ध होते. मग विचारते झाले." म्हणजे खरंच देवाला प्रार्थना केलीत? तुम्ही?" मी म्हणाले, "हो। खरंच हा प्रसाद अगदी कालचाच आहे. विचारा या लोकांना बरोबरच्या. आम्ही सारेच जणं गेलो होतो. शुटिंग चांगले व्हावे म्हणून आमच्यावतीने आणि डिप्रेशन जावे म्हणून तुमच्या वतीने पायावर डोके ठेऊन आलो देवाच्या ! चला ! आता सारे ठीक होईल. मला विश्वास आहे. बोलायला लागू यात. तुमच्या तब्येतीनुसार थांबत थांबत घेऊ या शुटिंग. आम्हाला काही घाई नाही. चला!"

मग कॅमेरा बाहेर काढला गेला. रेकॉर्डिस्टने सर्व तयारी केली. तोवर ग्रेसही जरा स्थिर स्थावर झाले. शुटिंगला सुरूवात झाली आणि काय चमत्कार ! सारेच बघून थक्क झाले ! एकेक मुद्दा हळूहळू फूल विकसित व्हावे तसा, एकामागून एक बांधेसूदपणे फुलायला लागला. ग्रेस यांचे वक्तृत्त्व, त्यांचे विचार, त्यांची शब्दकळा, त्यांची प्रभावी शैली, त्यांची शब्दफेक, त्यातली इंटेन्सिटी बघून सारेच थक्क होत होतो. मघाचेच आणि फोनवर बोलणारे ग्रेस ते हेच का ? असा प्रश्न पडावा अशी आमचीच संभ्रमावस्था व्हावी असे सर्व झाले. खरोखरच सांगते अजूनही तो प्रसंग आठवला की अंगावर काटा येतो. माझीच नाही, सर्वांचीच अवस्था अशी झाली होती.

आपल्या कवितेतली संध्याकाळ, आपल्या कवितेतील शब्दकळा, आपल्या कवितेवर दुर्बोधतेचा बसलेला शिक्का आणि त्यामुळे विव्हळ झालेले कविमन, कवितेतल्या प्रतिमा, कवितेची भूमिका, अनंत विषय कवी स्वतःच्या बोलण्यातून उलगडत होता. आपल्याच कवितेविषयीचे ते मुक्त - चिंतन खूप प्रभावीपणे आणि तितक्याच सखोलपणे रसिकांसमोर मांडत होता. ग्रेसच्या निर्मितिप्रक्रियेविषयीची महत्त्वाची सूत्रे रसिकांना या मालिकेच्या भागातर्फे आम्ही पोहोचवणार होतो याचे आम्हाला समाधान होते.

हे शुटींग घेताना ग्रेस हा जसा चांगला कवी आहे तसाच



अभिनेत्याचे सर्व गुण अंगी दैवदत्त असणारा चांगला अभिनेताही आहे याचाही प्रत्यय आम्हाला येत होता. सुंदर खर्जातला आवाज, योग्य ठिकाणी घेतला जाणारा श्वास, योग्य ठिकाणी घेतले गेलेल पॉझेस, आवाजाची योग्य आणि परिणामकारक चढ, उतार योग्य ठिकाणी दिलेले आघात, विशिष्ट पट्टीत आवाज लागणे आणि तो स्वरांच्या सर्व पट्यांतून लीलया फिरणे, बोलण्यातली, नादमयता, लयबद्धता, शब्दफेक आणि कधी कधी चित्रमयताही, शब्दांची इतरांपेक्षा अधिक असलेली जाण, शब्दांमागची नादचित्रे, शिल्पचित्रे आणि रंगचित्रे, प्रतिमांचे साक्षात दिसणे हे सर्व सर्व त्या बोलण्यातून एखाद्या कसदार अभिनेत्याच्या शैलीदार अभिनयातून आमच्यापर्यंत पोहोचत होते. नुसते पोहोचत होते असे नाही तर काळजाला थेट भिडतही होते. मराठी, हिंदी, उर्दू या भाषांवर त्यांचे असलेले प्रभुत्व जाग जागी जाणवत होते. त्यांच्या प्रतिभेला आम्ही मनोगत दंडवत घातले. ग्रेसनी या भागाचे शुटिंग एवढे मनमुराद, स्वागतशील पद्धतीने आणि ग्रेसफुल दिले की काही विचारूच नका.

आम्ही विनंती केल्यावरून अनेक शर्टस् बदलले, अनेक जागा बदलणे, व्हारांड्यात येरझारा घालणे, अनेक मूडस् दाखवणारे क्लोजअप्स घेऊ देणे या सर्व गोष्टींना ग्रेस यांचे उत्तम सहकार्य लाभले. कुठेही री-टेक नाही, कुठेही थांबणे नाही कशालाही मज्जाव नाही अशा मुक्त अवस्थेत घेता आलेले शुटिंग म्हणजे ग्रेसचे शुटिंग असेच मी या शेड्यूलचे वर्णन करीन.

मी जे आतापर्यंत बोललो आहे, त्याच्यापुढे मला जाऊन काहीतरी बोलता आले पाहिजे, काहीतरी नवीन सांगता आले पाहिजे यासाठी मात्र हा कवी खूपच सजग आहे. ते त्यांच्यापाशी इतके सांगण्यासारखे आहे की ते भरभरून बोलले. त्यातून तेवीस मिनिटांचा एक एपिसोड दूरदर्शन कडे देता आलाच पण नंतर एक तासाची 'सांध्यपर्व' नावाची व्हीडिओही आम्ही तयार केली आणि त्याला रसिकांनी पावतीही दिली. ह्या व्हडिओ कॅसटेच्या प्रकाशनासाठी खुद्द ग्रेस पुण्याला आले होते. 'स्नेहसदन'च्या हॉलमध्ये हा समारंभ झाला. पुण्यात तो तसा त्यांचा पहिलाच जाहीर कार्यक्रम होता आणि ग्रेस आपल्या कवितेविषयी त्या दिवशी बिनधास्त बोलले होते. इतके बिनधास्त की त्या बातम्या पार अमेरिकेपर्यंत गेल्या होत्या.

हा मालिकेचा भाग यशस्वी करण्यासाठी आणखी एका फार मोठ्या कलावंताचे सहकार्य लाभले ते म्हणजे माननीय गायक श्री. विजय कुवळेकर यांचे. या कलावंतांने या भागासाठी जी मारव्याची आलापी आम्हाला ध्वनिमुद्रित करून दिली त्याचा आणि ग्रेसच्या बोलण्याचा आणि मालिकेच्या भागात दाखविलेले सूर्यास्त आणि त्या पाठोपाठ येणारा क्षणिक अंधार या साऱ्यांचाच असा काही मेळ जमला की 'सांध्यपर्व'हे दोघांच्याही ग्रेसच्या आणि आमच्या तर आयुष्यातले नक्कीच महत्त्वाचे पर्व ठरले. जी कामे आयुष्यात एकदाच होत असतात तसे योग परत परत आणू म्हटले तरी आणले जाणार नाहीत, त्यातले हे एक महत्त्वाचे काम हातून पार पाडले. या मागे सर्व किमया दगडू हलवाईच्या प्रसादाची आणि ग्रेसच्या अतुलनीय प्रतिभेचीही!

(डॉ. माधवी वैद्य यांचे 'कवी शब्दांचे ईश्वर : या मालिकेची निर्मितीकथा' हे पुस्तक लवकरच प्रकाशित होत आहे. प्रस्तुत लेख या पुस्तकातून घेतला आहे)

। डॉ. माधवी वैद्य
'जनार्दन', प्लॉट नं. ५२,
स्वेदगंगा हाऊसिंग सोसायटी,
वारजे, पुणे. ४११ ०५८
भ्रमणभाष : ९४२२०५७९६०
९८२२०३६५४४

ग्रेस नावाचा माणूस आणि त्याची कविता

हेमंत कर्णिक

■

हे लिहावं की नाही, या विचारात पुष्कळ वेळ गेला. लिहून टाकावं, असा निर्णय झाल्यावर मांडण्याचा प्रयत्न करतो आहे.

मी गडचिरोली जिल्ह्यात डॉ. अभय बंग यांच्या 'सर्च' या संस्थेच्या 'शोधग्राम' या वसाहतीत राहात असतानाची गोष्ट. तिथे चालणाऱ्या कामाविषयी लिहिणे, लिहून आणणे, हे माझं काम होतं. एके दिवशी लायब्ररीत मी कॉम्प्युटरवर काही तरी लिहीत असताना अभयभाऊंचं बोलावणं आलं. मी गेलो. अभयभाऊ म्हणाले, ''आपल्याकडे कवी ग्रेस आले आहेत. काही दिवस रहाणार आहेत. तू त्यांच्याबरोबर रहा. त्यांना कंपनी दे.''

ग्रेस ! मी ग्रेसच्या कविता वाचल्या होत्या. 'राजपुत्र आणि डार्लिंग' हे पुस्तक एकदा, दोनदा, तीनदा, अनेकदा वाचलं. न थांबता, शेवटचं पान संपवलं. की ताबडतोब पहिल्या पानावर सुरूवात करून वाचलं. सगळं लक्ष एकवटून, मन एकाग्र करून वाचण्याचा प्रयत्न केला. काहीही कळलं नाही. शेवटी 'हे हवेवर काढलेलं चित्र आहे, थेट मराठी वाटणारे ध्वनी ऐकवत केलेली भ्रमिष्ट बडबड आहे' असे ठरवून बाजूला केलं. संदिग्धता हा कलेचा दुर्गुण नाही, तर ते कलेचं सामर्थ्य आहे, हे मान्य असूनही ग्रेसची दुर्बोधता मला कधी आवडली नव्हती.

पण त्याची शब्दकळा भूरळ घालत होती. या ओळीनंतर ही दुसरी ओळ कशी कोणाला सुचू शकते, याचा विलक्षण अचंबा वाटायचा. टोकदार प्रतिमा, तीव्र भाव, पण एकुणात काही तरी सांगण्यापेक्षा लपवण्यावर जास्त भर. असं वाटायचं हा कवी मराठी कोळून प्यायला आहे, त्यामुळे विधानांमागून विधानं करूनही वाचकाला आशयाचा लाभ करून देण्याऐवजी संभ्रमित करून टाकणं याला लीलया जमतं. याच्या भाषावैभवामुळे 'आपल्या हाती काहीएक आशय लागलेला नाही' हे वाचकाला शेवटपर्यंत उमगतच नाही, असंही सुचलं होतं. ग्रेसबद्दल वाईट मत नाही झालं (आशय सांगण्याऐवजी आशय लपवणारी कविता करण्यामागे कवीकडे काहीतरी कारणं असतीलच, ग्रेस बुद्धिमान आहेत यात तर तिळमात्र शंका नाही) पण 'ग्रेस माझा आवडता कवी आहे' असं म्हणणाऱ्यांच्या नावापुढे एक फुली मारू लागलो. ग्रेसचं गद्यही तसंच. चर्चबेल आणि स्नोफॉल. जणू हा कवी काही वर्ष युरोपात राहिला आहे. ग्रेसने नूरजहाँवर एक लेख लिहिला आहे. त्यात त्याच्या (ग्रेस मरेपर्यंत एक तरूण कवी होता, यात वाद नसावा. व्यक्ती म्हणून उल्लेख करताना जरी आदरार्थी अनेकवचन वापरणं योग्य असलं, तरी लिखाणाचा संदर्भ

असताना ग्रेस, नामदेव ढसाळ, दिलीप चित्रे, अरूण कोलटकर आणि नंतरच्या पिढीतले सगळे, यांच्या उल्लेख 'अमुक कवितेत कवी म्हणतात' असा करणंच उलट अनैसर्गिक वाटतं.) पद्धतीनुसार भावगर्भ विधानं आहेत. पण नूरजहाँच्या थोर गाण्यांपैकी फारच कमी गाण्यांचे उल्लेख आहेत. याने नूरजहाँची मोजकीच गाणी ऐकून केवळ शैलीवर एक उत्कट लेख घडवला की काय, असा संशय यावा. तर अशी माझ्या मनातली ग्रेसची प्रतिमा. आणि ती प्रतिमा बनवणारे जवळपास सारे तपशील स्मरणात अस्पष्ट झालेले. 'ती गेली तेव्हा' यासारखी गाणी सोडली, तर ग्रेसची एक ओळ मनात जिवंत नाही. ग्रेसशी मी बोलू काय ! मी लटपटलो. पण शोधग्राममध्ये मराठी साहित्याशी सलगी असलेला मीच होतो.

प्रसंग कठीण होता. काही दिवस दारूच्या पूर्ण अधीन झालेल्या त्यांना गाडीत त्यांचा एक मित्र शोधग्रामला घेऊन आला होता. अभयभाऊंनी तात्काळ त्यांची जबाबदारी स्वीकारली होती. त्यांना तपासून औषधं चालू करून आणि सुरूवातीला झोपेची गोळी देऊन अभयभाऊंनी काम सुरू केलं. ग्रेसना अजिबात एकटं वाटू न देण्याचं काम माझ्यावर होतं. खरं तर मी त्यांच्याशी, ते माझ्याशी काय बोलले, मला आठवत नाही. पण आम्ही खूप गप्पा केल्या. साहित्यावर केल्या, शोधग्रामबद्दल केल्या. तिथला परिसर, निसर्ग यांच्यावर केल्या. त्या काळात त्यांनी कधीही दारूची मागणी केली नाही की आठवण काढली नाही. गप्पांमध्ये आमचा दिवस सुरळीत पार पडत असे. मराठी, इंग्रजी, वैश्विक साहित्याचे दाखले ते देत. उतारे पाठ म्हणून दाखवत. काय लय !

ग्रेसना माणसांची आवड आहे आणि समोरच्याला खूष करण्याची कला अवगत आहे, हे माझ्या लक्षात आलं. समोर कुणी इंटेलेक्चुअर असो, की कष्टकरी, ग्रेस त्याला वा तिला सहजी सुखावून टाकत. त्यांना वेळच्या वेळी औषध द्यायला मुली येत. त्यांच्याशी तर त्यांची मैत्रीच झाली. रात्री मात्र ते बेचैन होत. झोपेची गोळी दिली तरी झोपी जात नसत. फोनवर खूप बोलत. कळवळून बोलत. ''कर्णिक, मला सोडून जाऊ नका, हे इथेच बसा. किंवा या शेजारच्या कॉटवरच झोपा'' अशी मला विनंती करत.

दोन गोष्टी सांगायच्या आहेत. खरं तर, त्या सांगण्यासाठीच हे लिहायला घेतलं. एक म्हणजे, त्यांच्या कवितेची तोंडदेखली स्तुती करणं मला जमेना. मी त्यांच्याकवितेचा विषय टाळतो आहे, हे त्यांच्या अर्थातच लक्षात आलं. ते मुळीच नाराज झाले नाहीत. किंवा 'माझी कविता कशी श्रेष्ठ आहे' असं हिरिरीने पटवून देण्याच्या मागेही लागले नाहीत. तेवढे समंजस आणि परिपक्व ते होते. पण त्यांनी त्यांच्या कवितेच्या पंक्ती म्हणायला सुरूवात केली. त्यांच्या खणखणीत, स्पष्ट, उत्कट वाणीतून त्यांचे वजनदार शब्द ऐकणे हा रोमांचक अनुभव होता. पण ते तिथे थांबत नसत. त्या ओळींमधून एक अत्यंत सुसंगत विधान ते उलगडून दाखवत. एक प्रकारे त्यांनी माझी शाळाच घेतली. माझ्यासाठी तो फार मोठा अनुभव होता. टिपिकल ग्रेसच्या अगम्य ओळी. त्यातून पाहाता पाहाता एक दणदणीत विधान उभं राहात असे. मी मनातल्या मनात वरमलो. त्यांचे संदर्भ वर वर हाती न लागणारे असतं. ते त्यांनी सांगितले, की आशय नीट उलगडत असे. त्यात पौराणिक, सांस्कृतिक आणि वैयक्तिक संदर्भ असतं. पण वडाची साल पिंपळाला, असा प्रकार नव्हता. ग्रेस आवडणाऱ्यांच्या नावापुढे फुली मारणं जरी मी बंद केलं नाही, तरी ग्रेस हा खोटारडा किंवा भ्रमोत्पादन करणारा कवी नव्हे, तसं म्हटलं, तर त्याचा अपमान होईल, हा धडा मात्र मी घेतला.

त्यांच्या काव्यात उघड वा छुपेपणाने आई फार आहे. ते जेव्हा स्वतःच्या काव्याबद्दल, निर्मितीप्रेरणेबद्दल बोलत, तेव्हाही आईचं नाव येई. पण त्यांची आई त्यांना त्यांच्या वयाच्या पाचव्या वर्षी सोडून गेली होती ! म्हणजे, त्यांच्या मनातली आई, खरी आई नव्हती, तुटपुंज्या आठवणींमधून त्यांनी स्वतःच तयार केलेली प्रतिमा होती. एकलव्याच्या समर्पित निष्ठेने त्यांनी ती प्रतिमा कायम जपली आणि तिच्यापासून प्रेरणा घेत एक अद्‌भूत प्रतिसृष्टी निर्माण केली. त्यांच्या प्रतिभेला एका इंजिनाची गरज होती, जे या प्रतिमेतून त्यांनी स्वतःसाठी बनवून घेतलं.

त्यांना गोळीविना रात्रभर गाढ झोप लागू लागली आणि त्यांनी शोधग्रामचा निरोप घेतला. जाताना एका कागदावर त्यांनी स्वहस्ते डॉ. राणी बंग यांच्यावर चार ओळी लिहिल्या. जिथे ते राहिले, त्या 'बहावा' या गेस्ट हाऊसच्या भिंतीवर त्या काव्यपंक्तीची फ्रेम लटकवण्यात आली. आजही ती तिथे असेल.

'नागपूरला माझ्या घरी या', असं आमंत्रण मला वारंवार देऊन ते गेले. मी कधीही त्यांच्या घरी गेलो नाही. एक कारण संकोच. त्यांच्या त्या दुर्बल स्थितीत मी त्यांना सोबत केली, या कर्तव्यपालनाच्या बळावर त्यांच्या नॉर्मल, सामाजिक जगण्यावर आक्रमण करणं ठीक नाही, असं मला वाटत राहिलं. दुसरं कारणही सांगितलं पाहिजे. सर्चचा जो ड्रायव्हर त्यांना घरी सोडून आला, तो मला म्हणाला, ''काका, त्यांच्या घराच्या सगळ्या भिंतींवर त्यांचेच फोटो आहेत. लहान फोटो,

अनुक्रमणिका

मोठे फोटो. किती फोटो!'' हे ऐकून मी घाबरलो. 'अशा आत्मप्रेमी माणसाशी आपण किती वेळ बोलू शकणार ? त्यात ते फोटो सतत समोर दिसत असताना !' असं मला सुचलं आणि संकोचाला पाठबळ मिळालं. पण मनात ते खुटखुटत राहिलं. नागपूरला जाण्याची वेळ अनेकदा आली. आठवण झाली, की आपण चुकतोय का, असा प्रश्न चाटून जायचा. मग एकदा ते मुंबईला आले असताना मित्राला बरोबर घेऊन मी मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या सभागृहात गेलो. त्यांचं भाषण ऐकलं. भाषण संपवून ते उतरले की भेटू, असं मनाशी म्हणत राहिलो. पण ते उतरले आणि त्यांच्याभोवती त्यांच्या चाहत्यांचा गराडा पडला. ग्रेस यांच्या कवितेवर, त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर प्रेम करणाऱ्यांची संख्या मोठी. आणि प्रेमही अगदी दुथडी भरून. त्यात ग्रेसना प्रेम देण्याघेण्याची आवड. मी थोडा वेळ वाट पाहिली. मग लक्षात आलं, की गर्दीत घुसून 'मी अमुक अमुक. आपण शोधग्राममध्ये भेटलो होतो' असं म्हणावं लागेल. पुन्हा संकोच आड आला. त्यांना आठवलं नाही तर ? आठवलं आणि आवडलं नाही तर ? न भेटताच मी बाहेर पडलो. आता ते नाहीत. आता भेटता येणार नाही. नागपूरला गेलो, तर एका राहून गेलेल्या कामाची आठवण टोचत बसणार नाही. आता उरल्या ग्रेसच्या कविता. ती शब्दकळा. ते सांगून न सांगणे. ती 'हवेवरची चित्रं !'

ग्रेसच्या जाण्यामुळे जशी शोधग्राममधल्या भेटीची आठवण जागी झाली, तशीच त्या कविता नव्याने नजरेखालून घालाव्याशा वाटल्या. ते असताना ज्या वाटेला जाण्याची इच्छा झाली नाही, तिथे शिरावं, रस्ता सुधरला तर जात रहावं आणि नाही सुधरला, तर निदान त्या वातसदृश चकव्याचं दर्शन घ्यावं, असं जोरात वाटलं. लायब्ररीत गेलो. 'राजपुत्र आणि डार्लिंग' या संग्रहाची अर्पणपत्रिका -

जी ए कुलकर्णीला,
ज्याने मला मित्र
मानलं

अशी आहे, हे लक्षात नव्हतं. त्याहीपेक्षा संग्रहातली सुभाष अवचटची रेखाचित्रं विसरलो, हे जास्त जाणवलं. काय ती शब्दकळा ! 'झाडांची दिशाभुली अरण्ये', 'शिशिरमार्गी शब्दांचे उद्ध्वस्त मुलुख', 'शिशिरबाळाच्या आईने फोडलेल्या मुठी', 'लयदात्री बर्फाच्या राजहंसा', 'लावण्यकाहूर मरण', 'वक्षउभार मुली', 'अंगधूळ गाण्याने थकलेला देश', 'लयभोर करूणेचे हे दोन थेंब'... हे म्हणजे धातुशिल्पासारखं भाषेला वळण देणं झालं. भाषा घडवणं झालं.

आता ओळखीच्या शब्दांनी केलेली वेषांतरं बघू.

कवितेच्या गळ्यावरचे / धारोष्ण रक्त
द्राक्षवेलींचे छिनाल अश्रू
भयसंपन्न अंतराळ

तरी अजून प्रतिमा आणि प्रतिमान काही तरी नातं सांभाळून आहेत. कविता हा तरल संवेदनेचा उत्कट आविष्कार होय असं मानलं, तर तिच्या 'गळ्यावरच्या धारोष्ण रक्ता'मधल्या भडकपणाचा स्वीकार करता येतो. द्राक्षापासून दारू बनते आणि दारूडे भावनोद्रेकात नाटकं करतात, हे लक्षात घेतलं, तर द्राक्षवेलींच्या अश्रूंना छिनाल म्हटलेलं चालू शकतं. आणि अंतराळाचं वर्णन 'भयसंपन्न' असं करणे ही दिव्यदृष्टी आहे, हे तर कुणीही मान्य करेल. प्रतिमांची माळ समोर आली की आणखी वेगळा परिणाम साधतो :

आता ही डहाळी सुकत जाईल
हे खरे आहे.
मला हवाच असतो दग्धमंत्र
खचित हिमगर्द स्वप्नांचा अंधारभोगी आरसा
तू आता थकलास
राजपुत्रा.
नीट मोजून ठेवू दे प्रत्येक बरगडीच्या खाली
नक्षत्रओळ

हे काहीतरी 'लार्जर दॅन लाइफ' आहे, तीव्र संवेदनशीलतेतून वाट्याला आलेली सदासजग कळ आहे, असं वाटतं. आपल्याला कवीमार्फत अलौकिक असा साक्षात्कार घडवला जातो आहे. अशी कृतकृत्य करणारी भावना मनात जागते.... पुढे.... ईश्वरासारखे उदास माझे प्रेम. मृत्यूसारखी नितळ माझी कविता, बर्फाचे चाळ बांधून, वर्तुळभोगी समुद्र, मध्ययुगीन चुंबनाच्या सभ्य शैलीसारखे, सूत्रधाराच्या तंद्रीसारखी एखादी हलकीशी चक्कर, पिसारा खुडून खाणाऱ्या मोराच्या नाटकाच्या... हे काय आहे ! ईश्वर उदास का ? प्रेम ईश्वरासारखं म्हणजे काय ? मृत्यू नितळ असतो ? इतका नितळ की नितळपणाचा मापदंड ठरावा ? समुद्र वर्तुळभोगी... म्हणजे ? का ? पुढच्या प्रतिमेत थोडा सुगावा लागल्याचा भास होतो : 'मध्ययुगीन चुंबनाच्या सभ्य शैलीसारखे' हे कुठलं मध्ययुग ? हा शब्दप्रयोग तर युरोपच्या इतिहासातल्या एका कालखंडाचं वर्णन आहे. आणि व्हिक्टोरियन चुंबनाची शैली 'सभ्य' ठरू शकते ! म्हणजे कवी तिथल्या मूल्यजाणिवांमधून बोलतो आहे का ? पण युरोपातल्या मध्ययुगात बर्फ असला तरी चाळ नक्की नव्हते. म्हणजे, कवीच्या सर्व संज्ञांचं मूळ मध्ययुगात शोधता येणार नाही. कवी मनाने जिथे जिथे फिरला, फिरतो, वावरतो, आतबाहेर जगतो, तिथले संदर्भ तो

अनुक्रमणिका

घेतो. आणि सगळ्या वेळी आपल्याला सांगत नाही. थांग लागू देत नाही. 'अंजिराच्या झाडाखाली तू वाजवीत असतोस पियानो' याला हास्यास्पद म्हणायचं नसेल, तर अंजिराचं झाड आणि पियानो वाजवणे, दोन्हींना काहीतरी सांस्कृतिक वजन आहे आणि ते वजन या कवितेत इंपोर्ट करण्यात आलेलं आहे, हे मान्य करावं लागतं. ग्रेस आस्वादण्यासाठी, 'ग्रेस माझा आवडता कवी आहे' हे विधान 'उचलली जीभ लावली टाळ्याला' या जातीचं नसण्यासाठी केवढी तयारी पाहिजे !

इथपर्यंत आल्यावर थोडं पुढे सरकता येतं. 'डोस्टॉव्हस्कीचे जुगारी हात'. डोस्टोव्हस्की होताच जुगारी ! मग 'नारायणीचा रंगस्तूप', 'एलिससी बाहुली' यातही तथ्य असेल. 'जॅपनीज रेस्टॉरन्टमधील नैसर्गिक उत्पाताच्या भीतीने...' यात आहेच की, पुढे तर सरळ ओळी येतात :

मी म्हणालो : याच का त्या जुळ्या बहिणी ?
नाही ! ही ब्रॉन्टे आणि ही डिकिन्सन.

आपण या दोन्ही एमिल्यांची नावं ऐकून आहोत. त्यांच्या कवितांचा आपला अभ्यास नाही. पॅलेस्टाइनच्या कटातून, माझा पायघोळ सनातन झगा, दुःखी बार्बाराचे नटवे सलून, जोसेफ घरी आला, पेन्विन पक्षी अशा परदेशी प्रतिमांच्या अध्ये मध्ये 'माजघरातून काकणांची किणकिण', '... वाकळ शिवत बसायच्या' असे उल्लेख येतात आणि कवीच्या अंतरंगीचं विश्व संस्कृतिसमृद्ध आहे आणि त्यातल्या बहुरंगी धाग्यांची वीण अगदी घट्ट आहे. याची खात्री पटते.

ग्रेसची कविता अपारदर्शक होण्याला आणखी कारणं आहेत. 'राजपुत्र आणि डार्लिंग' या पुस्तकातल्या कवितांमध्ये अमुक घडत जाण्याचं वर्णन नाही. त्या कविता 'स्टिल लाइफ' स्थिरचित्रणही नाहीत. ती जणू एका मूडची लँडस्केप्स आहेत. त्यांच्यातल्या शब्दांमध्ये, पंक्तींमध्ये दुवा जरूर आहे, पण त्या दुव्याचं लॉजिक रूढ जगातलं नाही. मला असं प्रतीत झालं की ते स्वप्नातल्यासारखं आहे. स्वप्नात जे होतं, त्यात एकेका घटकाला सांकेतिक अर्थ असतो. त्या संकेतांना अनुसरत स्वप्न पुढे सरकत जातं. ते संकेत आपल्या अंतर्मनाच्या परिचयाचे असल्यामुळे त्या संकेतांची साखळी जोडताना झोपेत आपल्याला काही खटकत नाही. स्वप्नात प्रतिमा, घटना, भाव, नाद आणि अनुभवांचे ठसेसुद्धा, हे सगळं एकाच बिनपातळीवर वापरलं, ओळखलं जातं. जागेपणी मात्र त्यांच्या तार्किक पातळ्या वेगळ्या झाल्या की जे आठवतं ते स्वप्न अगम्य, अतर्क्य भासू लागतं. ग्रेसच्या कवितेत हे कसं होतं ? उदाहरणार्थ,

''रक्ताचा ना वंशाचा, स्टीफन झ्वाइग माझा बाप''


यातला कवीला पितृस्थानी वाटणारा झ्वाइग नेमका कोण ? ज्यू ? देशोधडीला लागलेला ? आत्महत्या केलेला ? 'द रॉयल गेम' ही कथा लिहिणारा ? की 'अ लेटर फ्रॉम ॲन अननोन वूमन' या कथेचा लेखक ? बहुधा शेवटचा. पण हे अनुमान मी माझ्या माहितीच्या मर्यादांमध्ये काढलेलं. ग्रेसचा संकेत झ्वाइगच्या कोणत्या वैशिष्ट्याच्या दिशेने आहे, हे निःशंकपणे कोण सांगेल ! एका ठिकाणी ग्रेस म्हणतो, 'मार्क्सवाद्यांची लिरिकल पोएट्रीच म्हणा ना'. ग्रेसने भारलेला वाचक उद्‌गारतो, खरंच की ! मार्क्सवाद ही पोएट्रीच आहे. आणि ती लिरिकलही आहेच ! पण ग्रेस असं म्हणाला नसता, तर मार्क्सवाद आणि पोएट्री आणि लिरिकल, हे शब्द एकत्र येण्याची शक्यता धूसरच होती.

डार्लिंग ही कविता जणू विकास पावत गेलेली कविता आहे. ती जशी पुढे सरकते, तशी मागच्या संदर्भांमधून समृद्ध होत जाते. ग्रेसच्या एकूण कवितेबद्दल हे म्हणता येईल. घरगुती, सार्वजनिक, एकांतातील, व्यवसायाच्या ठिकाणी, भिन्नलिंगी व्यक्तीशी संबंध येताना, अशापैकी एकाच वर्तनावरून ज्याप्रमाणे एखाद्या माणसाचं मूल्यमापन करू नये, तसंच ग्रेसच्या कवितांमधल्या प्रतिमा, त्यातला आशय, तर्कसाखळी, वगैरेतल्या एकाला धरून ग्रेसच्या पोटात शिरण्याचा प्रयत्न करू नये. त्याचं संपूर्ण साहित्य ही एकच निर्मिती आहे, असं धरून सगळ्याचा संदर्भ सगळ्याशी लावत ग्रेसला स्पर्श करावा ! कदाचित एकीकडल्या शब्दप्रयोगावरून दुसरीकडचा आशय मोकळा होऊन जाईल. आणि तो मोकळा आशय कदाचित पहिल्या मांडणीमधलं गूढ उकलेल! स्वतःला उत्कट, संवेदनशील समजणाऱ्या वाचकाचे पाय ग्रेसच्या संसर्गाने जमिनीपासून दोन अंगुळं वर गेल्यासारखे होत असावेत आणि ग्रेसच्या लोकप्रियतेचं हे एक गमक असावं. मलासुद्धा ग्रेसच्या कवितांच्या संपर्कात आल्यावर स्फूरण चढतं आणि अशा शब्दांमध्ये व्यक्त व्हावंसं वाटतं.

ग्रेसची श्रीमंती, आशयघनता, संदर्भविपुलता, तर्कचंचलता, संवेदनतरलता, यांची सोदाहरण, सहृदय, समग्र मांडणी न करता ग्रेसला श्रेष्ठ कवी म्हणणे म्हणजे जबाबदारी झटकणे होय !

हेमंत कर्णिक
एच १:१/३, पॅराडाईस चेंबर्स,
संपदा सेक्टर ०७
नवी मुंबई - ४०० ७०५
भ्रमणभाष : ९८३३२७२६१४

अनुक्रमणिका


जुलै - ऑगस्ट - सप्टेंबर २०१२
युगवाणी
।। ग्रेस विशेषांक ।।
Kumar Gokhale
छायाचित्र : कुमार गोखले, पुणे

अनुक्रमणिका

जुलै - ऑगस्ट - सप्टेंबर २०१२

युगवाणी

।। ग्रेस विशेषांक ।।

अंधार उजळायाला जळतात जिवाने सगळे
जो वीज खुपसतो पोटी तो एकच जलधर उसळे...



छायाचित्र : सुरेश पारळकर, नागपूर

विदर्भ साहित्य संघाचा 'जीवनव्रती' पुरस्कार स्वीकारताना 'ग्रेस'

अनुक्रमणिका

शमा हर रंग में जलती है...

मनोज कुलकर्णी

■

To Ingrid Bergman, अशी अर्पण पत्रिका असलेल्या ग्रेस यांच्या 'संध्याकाळच्या कविता' १९८९ ला एका व्याकुळ संध्यासमयी हातात आल्या. यातल्या काही कविता, तलतची गाणी अख्तरीबाईच्या आवाजातील परिचित अपरिचित शायरांच्या गज़ल त्या सोबत रोशन आणि सज्जाद यांचं संगीत त्यातून निर्माण झालेलं 'दिल का दर्द आणि शहद मिठास' असं अनोखं रसायन अंगात चांगलंच भिनलं होतं, पुढे ते 'चर्चबेल' आणि 'मितवा' त्यानंतर 'चंद्रमाधवीचे प्रदेश' मग 'राजपुत्र आणि डार्लिंग' यांनी ते अधिक दाहक पणे प्रवाहित ठेवलं अक्षरशः झपाटून गेलो होतो मी,

याआधी मला जीए - खानोलकर नामक ताप सणकून येऊन गेला होता. जीए भानामती करायचे खानोलकरांच्या विळख्यातून सुटकाच व्हायची नाही. पण हा तापमात्र खूपच वेगळा आहे याची दरदरून जाणीव झाली. इंद्रियातील अनुभव देणाऱ्या ग्रेस यांच्या साहित्यामुळे 'ज्ञानेंद्रिय पाच आहेत. अनुभवसंपादनाचे तेवढेच काय ते राजमार्ग ? पण त्यांच्या पलीकडेही काही असू शकतं ? हे मान्यचं करायचं नाही, हा मात्र मठ्ठपणा, जन्मांध माणसाने रंगांचे अस्तित्व अमान्य करण्यासारखेच आहे हे', त्यामुळे दुर्बोध म्हणून जे जे काही वाटले ते ते टाळून पळून जाण्यात अर्थ नाही हे आतून जाणवलं याला आणि मग सगळेच दोर कापून टाकले.

यावेळी 'मितवा'मधील 'दुर्बोधतेची बेसरबिंदी' या लेखाने वास्तवातील मितवाप्रमाणे धीर दिला मला. व्रतस्थ भूमिकेतून वाच असं ठणकावून सांगितलं, वाचत राहिलो मी. कविता वाचण्याची रीत मला खानोलकरांच्या 'नक्षत्रांचे देणे' यातल्या पहिल्याच कवितेने शिकवली होती. 'माझ्या या अजाण कवितेचा...' त्यापद्धतीने त्यांच्या आणि ग्रेस यांच्या कविता वाचल्या आणि वाचलो. याचा अर्थ सर्वच्या सर्व ग्रेस कळला असंही कृपया समजू नये. कारण आस्वादनाची प्रक्रिया ही अव्याहतपणे चालूच असते - राहते. अजूनही सुरूच आहे. आस्वादक हा कलावंताला अपेक्षित किंवा वेगळ्या अंगानेही कलाकृतीची त्याच्या भावविश्वात पुनर्निर्मिती करत असतो.

यातूनच मला ग्रेस यांचं साहित्य हे उदासपण, एकटेपण. गूढपण, निःशब्दता, अधीरता, प्रतीक्षा, दुःख आणि आभास या सर्वांना मुक्तपणे सामोरी जाणार आहे असं लक्षात येवू लागलं त्याच बरोबर उदासपण, व्याकुळता, दुःखनिर्भरता यांचे दर्शन ते आपल्या कवितांमधून घडवतात. पण ते त्यांना उगाच भळभळते स्वरूप देत नाहीत. त्यांच्या कवितेत कुठेही

अनुक्रमणिका

केविलवाणा स्वर उमटलेला आपल्याला दिसत नाही हे पण तीव्रतेने जाणवले. अगदी असं 'चूँप हुं तो कलेजा जलता हैं - बोलूं तो तेरी रूसवाई हैं' अशी तडफड ज्यामुळे असं होतं -

दबाके आई है सीनेमें कौनसी आँहे ?
कुछ आज रंग तेरा साँवला लागे है मुझें...

(वाऱ्याने हलते रान)

वेदनेंचे सुलभीकरण करण्यासाठी तिचा अपभ्रंशही करीत नाहीत. थोडासा विचार केला तर असं लक्षात येतं की या अशा गोष्टींच्या चरकात माणसे सदाच चिरडून निघत असतात. वरील पैकी एकेका गोष्टीची अनुभूती आपल्याला सुत्र करायला समर्थ असते, या अशा अनाकलनीय उदास कल्लोळातही ते अंतरात्म्याला जागवत सृजनोत्सव साजरा करतात, या अशा निर्मितीतूनच ग्रेस यांच्या मनाचे वेगळेपण कळते. निर्मितीच्या क्षणी त्यांची अस्मिता अनामिक चैतन्याने प्रभावित होते त्या तरल अनुभवावस्थेचे शब्दांकन त्यांच्या कवितांमधून आपण अनुभवतो. ते लिहून मोकळे होतात. 'भय इथले संपत नाही' किंवा 'कसल्या दुःखाने सुचते हे गाणे' पण ते या साऱ्यांचा उगम कशात आहे ? ते सांगत नाहीत.

जे व्यक्त करावयाचे ते प्रतिमांच्या व उपमांच्या किंवा उपमासदृश विधानांच्या साह्याने व्यक्त करतात.

''स्मरणशिल्पं - स्वप्न - शापच आहे मला संगमरवरात स्वप्न लपवून ठेवण्याचा.'' (संध्याकाळच्या कविता) त्यामुळे नकळतचं एक दुर्बोधपणा साचून राहतो त्यांच्या कवितेत. अशीही दुर्बोधतेची बेसंरबिंदी आपणच हुडकायची असते. आणि ती हुडकत असतांना या कवितेतून आपल्याला जाणवणारी संवेदना, सहवेदना, अनुभूती ही इतर कवितांपेक्षा खूपच वेगळी आहे. तसेच इथे अनुभवलेल्या गूढ, गतिमान प्रदेशातील अविस्मरणीय दृश्यांचे प्रपात, त्यातून ऐकू येणारे प्रवाह संगीत हे सारं अपरिचित असूनही आपलसं वाटतं याची (रसडोळस, सूज्ञ) वाचकाला जाणीव होते.

या कवितेबद्दल तो (आस्वादक) बोलत असतांना, ही कवितां इतर कवितांप्रमाणे नाही हे त्याला प्रकर्षाने जाणवत राहतं. ती आवडते त्याला, पण का? ते कळत नाही. तिने दिलेला अनुभव हा नेमक्या शब्दात तो व्यक्त करू शकत नाही. कारण तयार ज्ञान पुरविण्याऱ्या पठडीबाज विचारसरणीशी बांधिलकी असल्यामुळे या कविता जरी त्याला दुर्बोध वाटत असल्या राहिल्या तरी त्यांचं मनादरचं गारूड कायमसाठी राहातं आणि ते नाकारूनही चालत नाही । ते जसेच्या तसे मान्यच करावं लागतं कारण असं गारूड त्यांनी स्वतः निर्मितीच्या वेळी अनुभवलेले असतं या बद्दल त्यांनी असं सांगितलं...

''ग्रेस हा शब्दच, मुळ अनुभूतीशी निगडीत आहे. 'ग्रेस' म्हणजे दैवी कृपा.'' कवी ग्रेस यांच्या म्हणण्यानुसर त्यांना केंव्हातरी रात्री एकाएकी जाग येते. त्यावेळी त्यांना आपल्या जीवाहून (सेल्फहून) विराट आणि सर्वव्यापी असलेल्या आत्म्यामधून (सोल मधून) एक समृद्ध चैतन्यस्त्रोत वाहत येत आहे अशी जाणीव होते, एक अनामिक तंद्री लागते समोर साक्षात चित्रे दिसू लागतात. पुढे ते सांगतात.

'Now I cannot go to my real life, nor can I retain myself in this painful dreamland of frightened magic world; then I try to establish a link of communication between these two worlds which caused an obscure series of tragic tensions in my life and in the area of my creativity'

मग मी, अगदी एकाएकी मी, ती कागदावर उतरवतो आणि कमालीचा थकवा येऊन मग झोपून जातो आधुनिक मानसशास्त्राने 'ग्रेस' या संकल्पनेचे केलेले विवरण असे केले आहे. ''ग्रेस हा जाणीवेच्या प्रांतात वाहत आलेला आध्यात्मिक शक्तीप्रवाह होय. याचे उगमस्थान अर्धजाणिवेत किंवा पराजाणिवेत असते,'' यातूनच त्यांच्या एकूण सर्वच कवितांच्या तळाशी एक प्रकारची अस्वस्थ करणारी जाणीव व्यक्त होते. ती कोणत्याही विशिष्ट शब्दांमध्ये पकडता येत नाही आपल्याला.

त्यामुळे जीए म्हणतात ते मला पटतं 'शब्दांच्याही अंगात कविता येते ती कविता ग्रेसची असते' विशाल उग्र श्वापदाप्रमाणे वाटणाऱ्या आयुष्याने मध्येच एक डोळा उघडून आपल्याकडे रोखून पहावे. तस्सा... अनुभव देणारी तुमची कविता ! मला कवी होता आले असते तर माझ्याही शब्दांना अर्थाचा थोडातरी स्पर्श झाला असता. दैनंदिन व्यावहारिक जीवनातील जागृतावस्था, त्यातून ग्रेसची कविता निर्माण झालेली नाही.

काव्याचा उगम तसा नवीन नाही. पण अनेकदा त्याचा उगम Subconscious मध्ये, स्वप्नात अगर स्वप्न व पूर्ण जाग यामधील संधिप्रकाशाची असी जी एक 'कासयावेळ' असते तिच्यात झालेल्या स्फोटात... झक्कन चमकलेल्या प्रकाशरेषेत असतो. मग तो प्राणक्षण सांभाळत सांभाळत 'Consciousness' च्या पायरीवर त्याभोवती शब्द उभे राहतात. ती जी एक उत्कट अवस्था असते. ज्या निद्रेत मन 'अतिजागृत' असते. अशा वेळी समोर असलेल्या निर्जीव

अनुक्रमणिका



(छायाचित्र : मनोज कुलकर्णी)

जगापेक्षा, जगामधून जगापलीकडे निराळे काही पाहणाऱ्यांच्या डोळ्यात इतरांना रिता आंधळेपणा दिसतो. पण हा आंधळेपणा दिव्यदृष्टीचा असतो. त्यामुळे आपल्याला अदृश्य जगात डोकावता येते असे काही घडते. (मितवा - दुसऱ्या देवींचा शोध - जीएंची पत्रवेळा) याबद्दल स्व. त्र्यं. वि. सरदेशमुखसरांनी असे मार्गदर्शन केले.

'Sometimes profoundly convulsive and disturbing suddenly becomes visible & audible with indescribable definiteness and exactness... and ecstasy an entire world of forms... Everything occurs quite without violation as if in an eruption of freedom, independence, power & divinity. The spontaneity of the images & similes is most remarkable ' (द क्रियेटीव्ह प्रोसेस फ्रेडरिक नित्शे, पृ. २०२)

या साऱ्या मुळेच मला त्यांची भाषा ही स्वप्नभाषा आहे, प्रतिमानिष्ठ भाषा आहे असे वाटते व ती चित्रलिपीतून प्रकट होताना दिसते आणि त्यामुळेचं ती आपल्याला अवर्णनीय असा, कधी त्रिमीतीय ३ डी तर कधी ४ डी चतुर्मितीय अतिवास्तववादी अनुभव देते.

'Reality is four dimensional (सध्यातरी)
Time is the fourth dimension. Time does not pass.
We pass through time. This is reality'

सरांच्या कविता वाचल्या नंतर त्या कवितांचे संदर्भ एक तर त्यांच्या गद्य रचनेमध्ये म्हणजे ललितबंधांमधून मिळू लागले. तसेच ते यापूर्वी केलेले वाचन, झेपेल इतपत ऐकलेले भारतीय शास्त्रीय कंठसंगीत आणि वाद्यसंगीत मनापासून ऐकलेली मराठी गाणी, हिंदी गज़ल, आवडीने दोन - दोन तीन - तीन वेळा पाहिलेले 'काबुलीवाला', 'दो बिघा जमीन', 'देवदास', 'साहिब बिबी और गुलाम', 'कागज के फूल' या सारखे हिंदी चित्रपट मराठीत 'श्यामची आई', 'माणूस शेजारी' व बरेच इंग्रजी चित्रपट या साऱ्यांमधूनही सापडू लागले. यांच्या जोडीने मला ठाऊक असलेले तुकारामाचे अभंग ज्ञानेश्वरीतल्या ओव्या, पाठ असलेली स्तोत्रे, कविता, सुभाषितें करूणाष्टके पसायदान रामरक्षा पौराणिक कथा इ. गोष्टीही या घडीला महत्त्वाच्या ठरू लागल्या. त्यामुळे भूतकाळात केलेल्या या सर्व गोष्टी वर्तमानात सुरू केलेल्या आस्वादन प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका बजावू लागल्या.

'Nothing comes free and nothing goes waste' या न्यायानं पुढचं वाचणं, ऐकणं आणि पाहणं हे सारं पूर्वीपेक्षा अधिक सजगपणानं, रसडोळसपणे होऊ लागले. रामायण महाभारतातील कथा त्यातील पात्रे त्यांचे जुनेच पेच घेऊन नव्याने कळू लागली. पेच सुटू लागले. आणि वाचताना जे कळत नसे त्यावर प्रश्नचिन्हाची ठळक खूण असा चक्क अभ्यास सुरू झाला. त्यामुळे पूर्वी जे जे वाचले होते ते ते पुन्हां उजळून निघाले, निघू लागले देवपूजेतील समई अन् निरांजनाप्रमाणे.

'औदुंबर', 'चाफा' अगदी 'आनंदी आनंद गडे, या बालांनो सारे या' मधली 'स्वस्थ बसे तोची फसे' चे महत्त्व नव्याने कळले 'नवभूमी दावीन मी या नगराला लागुनियां नवी बघाया ही दुनिया', यासारख्या कवितांनी 'संध्याकाळच्या कविता', 'चंद्रमाधवीचे प्रदेश' यासह ग्रेस निर्मित सर्व प्रदेशांची यात्रा करतांना धीर दिला रसडोळस प्रेरणा दिली, जिगर मजबूत केलं. माझ्यातलं लहानमूल या कवितांनी जिवंत ठेवले होतं. या

मुलांनच निर्भयपणाने आस्वादक शिष्यत्वाच्या भूमिकेतून सरांबरोबर मैत्री केली. पुढील काळात ती कलावंत - आस्वादक, शिक्षक - विद्यार्थी आणि मित्र अशा अंगांनी दृढ होत गेली हे माझ्यासाठी विशेष. त्यामुळेच तर फोन वरून संवादपर्वाची सुरूवात झाली.

हे पर्व म्हणजे माझ्या 'Renaissance' चा काळ होता. यामधूनच मला त्यांचे साहित्य त्यांच्याकडूनच समजून घेण्याची संधी मिळाली, त्याचवेळी त्यांच्या कवितांचे मला उमगलेले अर्थ, त्यासाठी वापरलेले संदर्भ हे सारं तपासून मिळायचे. चित्रपटांसह विविध विषयांवर मुक्त चर्चा व्हायची. याच सुमारास त्यांचे 'सामना' मधून येणारे लिखाण यावरही बोलणे व्हायचे. त्यामुळे मला त्यांच्या नवनिर्मितीविषयी आणि आजपर्यंतच्या (एकूणच) निर्मिती प्रक्रियेविषयी कळू लागलं. त्यातील संदर्भ व त्याबद्दलचे बोलणे यामधून मी आणखीन काय-काय वाचालया पहायला हवे तेही नव्यांनच कळू लागले.


एकदा असेच फोन वरून बोलता बोलता ठरवूनच मी विषय जीए आणि खानोलकरांवर आणला. मग हळूच मी त्यांना खानोलकरांना 'चंद्रमाधवीचे प्रदेश' मधील 'कढ' ही कविता फार भावली होती असे वाचनात आल्याचं सांगून, ती म्हणून दाखवली मी न चुकता न अडखळता. ओळी अशा आहेत -

'सुपाटोपलीच्या तुझ्या संसारात... गार सावलीत राहीन मी.
मध्ये तुटताना माझी प्राण तार मांडीवर घेशील ना ?'

सर खूष झाले, पण थोडं गहिवरल्याचही जाणवले फोन सुरूच पण मध्ये काही काळ शांतता - बोलकी शांतता. (हंऽ बोला सरकार!) त्याच मूड मध्ये त्यांना ठेवत मी 'चंद्रमाधवीचे प्रदेश'मधीलच खानोलकरांवरील 'आरती प्रभू' या त्यांच्या कवितेमधल्या पहिल्याच चरणाबद्दल बोललो चरण असे आहे,

'असे वाटते मृत्यु असतो... सख्या रे, सतीच्या खुनासारखा पोरका' मग खानोलकरांच्या जाण्यामुळे मृत्यु कसा पोरका झाला यावर मला उमगलेला भावार्थ सांगितला. सतीचा मृत्यू हा तिच्यावर लादलेला असतो. यमालाही असे प्राण नको असतात. मग आता या प्राणाचे - आत्म्याचे काय करावे असा प्रश्न निर्माण होतो त्यातून त्या मृत्यूसही एक अनाथपण पोरकेपण येते. असे मला वाटते. हे ऐकून सर उत्स्फूर्तपणे म्हणाले, त्यांच्या खास शैलीत म्हणाले, 'यु आर गेटिंग अे किंग नर्व्ह ऑफ माय पोएम मिस्टर कुलकर्णी' मी पण मस्तच खुललो होतो.

मग सरांनी जीए ना त्यांची 'देवी' कविता किती आवडली होती, नुसतीच आवडली नव्हती तर ते या कवितेमुळे कसे झपाटून गेले होते, ते सांगितले त्याबद्दल जीए नी सरांना पत्र पाठवून तसे कळवलेही होते. ही आठवण सरांनी खुलून सांगितली. हे पत्र पूर्वी 'मितवा'मध्ये आणि आता 'जीएंची पत्रवेळा...' यात प्रसिद्ध झालंय हे सांगताना त्यांनी मला 'क्या क्या बताऊ यार' म्हटलं. मी एकदम फ्लॅटच झालो भान सावरलं. I celebrated that special night या अशा सुबोध सुसंवादांमुळे मला सुलभरित्या मर्ढेकर, रवीन्द्रनाथ टागोर, खलील जिब्रान, मियाँ गालिब, साहीर, शकील बदायुनी, शैलेंद्र, मज़ाज़, मज़रूह, इत्यादी आणि अनेक कवी - शायर अधिक समजले ते या कवींबद्दल खूप आदराने बोलायचे. संगीतकार रोशन वर त्यांनी लिहिलंय 'चर्चबेल'मध्ये. सर नुरजहाँ आणि लतादीदी या दोघींचे चाहते होते. त्या दोघींवर त्यांनी कविताही केलेल्या आहेत. मूड मध्ये असले की ते त्यांच्या खास आवाजात कधी टागोरांच्या कविता तर कधी शायरी ही ऐकवायचे.



(छायाचित्र : मनोज कुलकर्णी)

सरांमुळे या साऱ्या भारतीय कवी / साहित्यिकांच्या बरोबरीने पाश्चात्य साहित्य आणि साहित्यिक, उत्तम चित्रपट यांच्या विषयी त्यांच्याकडून नवे संदर्भ कळले / शिकायला मिळाले. एखाद्या इंग्रजी कवितेबद्दल किंवा इंग्रजी अवतरणाबद्दल बोलताना, 'सरकार हे वाचा ते वाचलंय की नाही ?' असेही मार्गदर्शन क्वचित प्रसंगी बोनस म्हणून मिळायचं त्यातूनच त्यांचे आवडते कवी रील्के आणि कवी येट्स या दोघांवर असणारे त्यांचे प्रेम आणि स्टिफन झ्वाईग, टॉलस्टॉय, लोर्का, एमिली ब्रॉंटे आदींबद्दल त्यांना वाटणारा आदर आणि असलेले आकर्षणही समजले, पण सगळंच मूडवर.

सरांमुळे रिल्के वाचला गेला, ॲना करेनिना कळली, त्यांच्यामुळे बरेच काही नवे समजले आणि जुने नव्या अंगाने कळले. त्यांच्याशी बोलताना बऱ्याचदा नवीन नवीन शेर ऐकायला मिळायचे. सर असेच मूड मध्ये असताना त्यांना म्हणालो, सर मध्यंतरी विजापूरला गेलो होतो. त्यावेळी मला एक मजबूत शेर ऐकायला मिळालाय सांगू का ? (मजबूत या शब्दावर ते हसले मग म्हणाले बोला बोला सरकार) शेर असा आहे.

'रक्स करनेका हुक्म् जो मिला दरियामे -
हमनें खूष होके भँवर बंध लिये पाँवमे'


'वाह क्या बात है' असे म्हणत 'हम भी तो वही कर रहे है ना' अशी खंत व्यक्त केली आणि या दोन ओळी सांगितल्या.

'वक्त के हातोमें ये चमकते हुये खंजर एकसाथ कलेजे में क्युं SS नही उतरते SSS' कुलकर्णी SS मी कांही टांचणा - टिपणातंला माणूंस नाही. आणि माझ्या कवितेचा प्रचारक तर ही नाहीच नाही माझा ब्रॅण्डही नाही आणि मठही नाहीत - पुढे बराच वेळ ट्रांसमधे असल्याप्रमाणे बोलत होते. 'असं सारं असूनही ग्रेस एकच आहे ना?' नाहीतर दोन ग्रेस झाले असते. तीन ग्रेस झाले असते ना? पण झाले नाSSSहीत ना? अहो या मठाधिपतीच्या दरबारांत पोसलेले भाट असतात ते बोंबलत फिरतात आणि काय काय सांगतात यांच्या जिव्हेवर सरस्वती... म्हणे. अहो सरस्वती म्हणजे काय यांना यांच्यासाठी काम करणारी बाई वाटली काय? सांगतात xxx...'I am not worried about explosion, am worried about leakage' I am small but complet पुढे अशाच एका प्रसंगात 'शुभ्र काही जीवघेणे' चा लेखक अंबरीश मिश्र यांनी कणा ताठ असलेल्या कलावंताची आंतरिक वेदना उलगडून दाखवणारा शेर सांगितला होता तो त्यांच्या बरोबर शेअर केला.

कसे-ए-आला से जरा रूबरू हो के तो देखो
कसे-ए-आला से जरा रूबरू हो के तो देखो
उन्चाई योंसे हमारे कद का अंदाजा नही आता...
उ न्चा ई - योंसे हमारे कद का अंदाजा नही आता.

त्यावेळी याचा अर्थ अस्मादिकांसाठी अंबरीश मिश्र यांनी सांगितला होता. तो अजूनही जसाच्यातसा स्मरणांत आहे. सर जाम खूश. तर हे असे सारे सुरळीतपणे चालू होतं. एकेदिवशी मी त्यांना 'सामना'मध्ये त्यांचा 'डोंगरघळीतील टपालाचे वाटप' हा लेख वाचून फोन केला होता. त्यावेळी मला चायनीज मुव्ही 'पोस्टमन इन द माऊंटन' ची कथा आणि हा लेख कसे एकाच घळीतून येतात यावर बोललो.

वेळ आहे नां ? असे म्हणत सुरू झालेले बोलणे चर्चेत बदललं आणि ती (तास दीड तास) फक्त सिनेमावर झाली. त्यावर 'ग्रेस आणि इंग्रजी चित्रपट' हा स्वतंत्र लेखाचा विषय होईल इतके बोलले. इनग्रिडचे जोन ऑफ आर्क, ऑटम सोनाटा, गॅसलाईट, कॅसाब्लांका आणि इन ऑफ द सिक्स्थ हॅपिनेस. हाईट म्हणजे कॅसाब्लांकातल गाणं 'As the time goes by' ची आठवण सांगिली, इनग्रिड म्हणते, 'Sam sing it I'll hmm for you' मग हे गाणं सुरू होतं. हा मुव्ही त्यांनी 'इनग्रिड'साठीच पाहिला असणार हे बोलतांना जाणवलं. यानंतर मेकॅनज गोल्ड मधील डायलॉगही सांगितला. Don't shoot him the map is in his head. या यादीत अनॉ करेनिना, गॉग विथ द विंड, डॉ. झीवॅगो, झोर्बा द ग्रीक, ऐट अँड हाफ, लॉरेन्स ऑफ अरेबिया इत्यादी अशी चांगली १५ - २० नांव सांगितली जर्मन दिग्दर्शक वॉर्नर हेरझ्वोग आणि सत्यजित रे यांचे चित्रपट या विषयी बोलले हे चित्रपट पाहाच असेही सुचवले. असे हे माझ्या प्रबोधन पर्वातले दूर श्राव्य शिक्षण - Audio Distance Learning जे मराठी, हिंदी आणि मला कळेल तेव्हढंच त्यांचे अस्सल इंग्रजी आणि खुशबुदार उर्दु अशा भाषांमधून झाले. यंत्रअभियांत्रिकीचा माझ्यासारखा एक विद्यार्थी आणि शिक्षक आता स्वर्गीय कुलगुरू सर ग्रेस यांच्याकडे Literature engineering यंत्रवत नसणारी 'साहित्य अभियांत्रिकी' स्वर्गीय भाषेतून शिकत होता, समजून घेत होता. सरांमुळे माझ्या आस्वादकतेचे Re-engineering झाले. Application of thoughts हा Engineering चा Oxygen प्राणवायू हीच कमावलेली शिदोरी घेऊन पुढची वाटचाल सशक्त आणि समृद्ध असणार हे नक्की. फार क्वचित प्रसंगी त्यांनी त्यांच्या साहित्यावर कस कसे संस्कार झाले, याबद्दल खुलून सांगितलं. कोणताही आडपडदा न ठेवता हे एक त्यांच फार कमी जणांना ठाऊक असलेले वैशिष्ट्य. त्यामुळेच ही



(छायाचित्र मनोज कुलकर्णी)

मनापासून स्वीकारलेली 'शागीर्दगी' कायमसाठी जपायची आहे. त्यांचे एक खास वाक्य आहे. 'I am an ancient man shaking hands with your modern times' त्यांच्या विद्यार्थ्यांसाठी, त्यांच्या 'वर्गात बसलं' की ते आपोआप पटू लागतं. अशा या अनोख्या ऑन लाईन क्लासला सर मुंबईत असतील तर, ज्यांनी सरांच्या 'वाऱ्याने हलते रान' साहित्य अकादमी चा पुरस्कार प्राप्त झालेली कलाकृती आणि 'सांज भयाच्या साजणी' ह्या कविता संग्रह या पुस्तकांची मुखपृष्ठे आणि आतील चित्रे चितारली त्या चित्रकर्ती शुभा गोखले यांचीही उपस्थिती असायची. या काळाचे सहनशील साक्षीदार म्हणजे माझा मित्र प्रणव आणि मैत्रिण / सहनशील सहचारिणी सौ. गिरिजा. ही दोघं माझा हा वेडेपणा कौतुकाने पहायचे ऐकायचे हसायचे सुद्धा. सरांबरोबर होत असणाऱ्या निखळ अशा साऱ्यां चर्चांतून मला त्यांच्या कवितां बद्दल जे जे वाटतंय त्यातलं चूक काय बरोबर ते कळू लागलं. धुकं हळूहळू वितळू लागलं. रोशनी दिसू लागली.

'चरागा करके दिल बहेला रहे हो क्या जहाँ वालो,
अंधेरा लाख रोशन हो चाहे उजाला, फिर भी उजाला है'

एकेदिवशी 'चर्चबेल' पुन्हां वाचत असताना 'रोशनची गाणी' या लेखात श्रेष्ठ कलाकृतींच्या आस्वादनासाठी छान ओळ मला सापडली. त्यात ते लिहितात. 'श्रेष्ठ निर्मितीचा विशेष असा असतो की, एकाच वेळी ती विश्वाधीन आणि त्याच वेळी ती विश्वातीतही असते' यानंतर आणखी एकेठिकाणी ते लिहितात 'श्रेष्ठतेची अनेक लक्षणे असतील असतातही. मला मात्र सर्वात जवळचे नाभिकेंद्रीय लक्षण गवसलेय. श्रेष्ठ कलाकृतीचा प्रत्येक भाव-विभाव आपल्याला आपल्या भावस्थितीच्या गरजे प्रमाणे कधीही कितीही वेळा तो आपल्या अनुभवाच्या प्रत्येक जीवनावस्थेला सोन्याच्या लगडी प्रमाणे लवचिक करून अनुकूल करून घेता येतो. याप्रक्रियेत रसिकाला आपल्या निर्मितीशील आस्वादक आत्मविष्काराचाही शोध लागतो'.

अगदी असाच प्रकार माझ्याही बाबतीत, माझ्या नकळत घडला असणार, घडत असणार, आणि या साऱ्या प्रक्रियेतूनच - 'मला उमगलेले कवी ग्रेस' हा कार्यक्रम मला सुचला असणार. तो मी सोलापुरातील लोणकरण चंडक स्मृती व्याख्यानमालेच्या उद्घाटन प्रसंगी १७ डिसेंबर २००५ साली आस्वादकाच्या भूमिकेतून सादर केला होता. (तज्ज्ञ व्याख्यात्याच्या भूमिकेतून नाSSSही.) तो सादर करण्यापूर्वी त्याची संहिता तपासून घेतली होती, ती ग्रेस यांच्या कवितांवर साक्षेपी समीक्षा लिहिणारे स्व. त्र्यं वि. सरदेशमुख यांचेकडून. त्यांच्या मार्गदर्शनामुळे, आशीर्वादामुळे आणि सरांच्या शुभेच्छा असल्याने, कार्यक्रम सादर करताना मला कोणतेही दडपण

अनुक्रमणिका

नव्हते. कारण या प्रयत्नांत मला बऱ्याच जणांची मदत झालीय त्यात - श्री. जयंत परांपजे यांचे लिखाण, डॉ. अक्षयकुमार काळे यांनी सरांची घेतलेली दीर्घ मुलाखत आणि दस्तूरखुद्द सरांची झाली आहे. सरांनी त्यांचे 'निर्मितीवर भाष्य करणारे उतारे' कार्यक्रमात सादर करण्यास पूर्ण अनुमती दिली. अनुमती ते देताना म्हणाले, 'अहो सरकार असं काय करताय ? माझं लिहून झालंय आणि त्याचं रसिकार्पणही झालंय. त्यामुळे आता हे तुमचंच आहे' तरीही तुम्ही माझी अनुमती मागताय याचेच मला विशेष वाटतयं. असा प्रामाणिकपणा जपा. अहो कुणाचं कसलेही श्रेयं लाटू नये. ज्याचा वाटा ज्याला त्याला द्यावा. देवंही नाही का देत ! ओ देने वाले तुने तो कोई कमी न की, अब किसीको क्या मिला ये मुकद्दर की बात है. असं म्हणून माझी समजूत काढली. कार्यक्रम करण्यापूर्वी आईला नमस्कार करा. देवासमोर न विसरता उदबत्ती लावून जा. बेस्ट ऑफ लक मिस्टर कुलकर्णी. या अनुमतीयुक्त संभाषणामुळे मला त्याक्षणी 'संध्यामग्न पुरूषाची लक्षणे' ची अर्पण पत्रिका आठवली 'हत्तीच्या डोळ्यातील पाणी निकराने मागे परतविण्याऱ्या एका मुंगीस' आणि मला त्या मुंगी इतके बळ मला नक्कीच मिळालेय या साऱ्या नंतरच - 'मला उमगलेले कवी ग्रेस' हा कार्यक्रम मी सादर केला होता, ज्यामध्ये ग्रेस यांचे साहित्य, या साहित्य निर्मितीच्या मागे असलेला प्रेरणास्त्रोत तसेच त्यांनी अनुभवलेली निर्मिकाची अवस्था निर्मितीची प्रक्रिया यावर क्रमवार प्रकाश टाकण्याचा, आस्वादनात भर पडावी (भार नाही) यासाठीचा तो एक प्रामाणिक प्रयत्न. त्याचा नशा मजा आनंद काही औरच होता. अस्सल कवितांचे पाच संग्रह आणि कसदार निर्मितीचा वेध घेणारे सात ललितबंधसंग्रह यांचा निर्माता प्राचीनपुरूष अवलिया कलावंत चंद्रमाधवीच्या प्रदेशात गेल्यानंतरही ज्याचं गारूड कायम राहातं. अशा कलावंतांसाठी रवीन्द्रनाथांच्या या ओळी नजराणा. And when my voice is silent in death, My song will speak in your living heart. मग ग्रेस या देवाच्या माणसाला उगाचचं दुर्बोध म्हणू नये असे मनापासून वाटायला लागतं. ग्रेस यांचे साहित्य समजून घ्यावंसं वाटलचं तर रवींद्रनाथांनी सुचवलेल्या या मार्गाने परिक्रमा करावी.

Take my wine in my own cup, Friend,
It loses its wreath of foam; When poured into that of others.

सर तुम्ही जिथून आला होतात तिथे परत गेलात त्याबद्दल कसलीही तक्रारखंत नाही. (सुमित्रेच्या) आईच्या जाण्यानंतर तुम्हांला आलेले पोरकेपण 'परशुरामीने तिचे निर्वंश दत्त (क) विधान' तुम्हांला धडधडीत आलिंगन देवून, संध्याकाळच्या चढत्या उतरत्या सावल्यातील भिंतींच्या आकृत्यांची बोळवण करतांना हंबरडा फोडून सांगितले - I have adopted a poet ! आणि तुम्हीही या दत्त (क) विधानाचा जसाच्या तसा गणमात्रांच्या गणगोतासह स्वीकार केलाय हे आपल्या मोकळ्या मनाकडून कळाले. याक्षणी तुमचे दत्त (क) विधान मला प्रश्नांकित करायचे नाहीये पण माझा आत्ताचा पेच जरा वेगळाच आहे. आपल्या उपस्थितीत उत्तरे नाही मिळायची पण प्रश्न बळकट व्हायचे आणि मी पुन्हा नवीन उत्तरे शोधण्यासाठी मार्गस्थ व्हायचो, पण या आत्मशोधाच्या सिद्धार्थवाटेने जाणाऱ्या ऊर्ध्वगामी प्रश्नांचे आता काऽऽऽय होणार, आज वटपौर्णिमा कोणत्या वडाच्या झाडाला प्रदक्षिणा करू ? तुम्हांला पक्कं बांधून ठेवणारी कच्च्या सुताची गुंडी आज निस्तेज दिसतीय मला. व्यथातीर्थाच्या धारा सुरू झाल्यात कधी थांबतील याचां नेम नाही. याचवेळी एक सुफी प्रार्थना ऐकू येतीय आतूऽऽऽन. जीची संथा तुम्हीच मला दिली होतीत.

तडपते दिल की सदा
वो सुने या ना सुने;
अपना तो फर्ज है की
पुकारते रहे...

प्रार्थनेमुळे धारा जरा थांबल्यात डोळे आतून स्वच्छ धुतले गेलेत त्यामुळे फारच स्पष्ट दिसून लागलंय भीतीही वाटू लागलीय काय करूऽऽऽ. अंतर्यामाची अशी निःशब्द निरंजनी हाक ऐकून परशुरामीने माझ्याकडे वळून पाहिलेय, वात्सल्य तिच्या सुकुमार देहातून गायीच्या डोळ्यातून जाणवतंय. पण माझे डोळे अजूनही मिटत नाहीयेत. कान तर मांजरीच्या पावलांचे वेध घेण्याइतके तीक्ष्ण झाल्याचं जाणवतंय. आकाशवाणी होतीय काहीही कळत नाहीय पण मला मात्र चक्क तुमचा आवाज ऐकू येतोय !

'जब मै अपने में खो जाता हुं, तो दुनिया को भुलता नही,
ये जो मेरा खो जाना होता है, उसमें मै बाजुकी दुनिया लपेट लेता हुं,
अगर इस दुनिया से मै नातॉं तोड दुंगा, तो किसके बारे में लिखुंगा'.

■ मनोज नारायण कुलकर्णी
'नारायणी', १२३, गीतानगर,
गोविंदश्री मंगल कार्यालयाजवळ,
जुने सोलापूर, सोलापूर - ४१३ ००४.
भ्रमणभाष : ९४२२४५७१११
दूरध्वनी : ०२१७ - २३४६७०८

इलाख्यातली गुप्त झाली नदी

डॉ. तीर्थराज कापगते

१९९७ च्या फेब्रुवारीत 'दै. सामना'च्या नागपूर आवृत्तीत मी उपसंपादक म्हणून रुजू झालो. 'दै. नागपूर पत्रिका' बंद पडल्यावर सुमारे पाच-सहा महिन्यांच्या बेकारीनंतर नव्या उत्साहाने कामाला लागलो. एप्रिल महिन्यात सामनाच्या 'वैदर्भी' पुरवणीचे संपादनही माझ्याकडे आले. त्याच महिन्यात मंगेशकर कुटुंबियांतर्फे देण्यात येणाऱ्या 'वाग्विलासिनी' पुरस्काराचे वितरण नागपुरात होणार होते. त्या निमित्ताने 'वैदर्भी'च्या पहिल्याच विशेषांकाचे प्रकाशन प्राईड हॉटेलमध्ये प्रत्यक्ष लतादिदींच्या हस्ते झाले. त्या विशेषांकासाठी ग्रेस यांची लता मंगेशकरांवरील कविता त्यांच्याच हस्ताक्षरात मी त्यांच्या घरी जाऊन लिहून मागितली. ती त्यांची - माझी पहिली भेट.

मग जून महिन्यात म्हणजे सरांच्या निवृत्तीनंतर मुंबई 'सामना'च्या 'उत्सव' पुरवणीसाठी ग्रेस यांची मुलाखत घ्या, असा संपादक श्री. संजय राऊत यांचा निरोप आला. मी पुन्हा त्यांच्या घरी गेलो. उन्हाची काहिली आणि पाऊस- काळ या संधिकाळातील ती भेट होती. तेव्हा ते नॉर्मलच्या बंगल्यात राहत होते आणि मी धनतोलीत. निर्मितिशील ग्रेस यांच्या जगण्याची दुसरी व्रतस्थ बाजू म्हणजे त्यांची २९ वर्षांची प्राध्यापकीय कारकीर्द. वाङ्मयप्रेमी विद्यार्थ्यांना भाषेचा सौंदर्यात्मक अर्थ उलगडून दाखवणारे 'ग्रेस' मी समजून घेत होतो. खरे तर मी स्वत:ही त्या काळात प्राध्यापकीच्या उंबरठ्यावर होतो. लग्नानंतर नुकतेच बहि:शाल पद्धतीने एम. ए. केले होते. शिक्षकी जीवनातले आपले विलक्षण अनुभव ते मला सांगत होते, ''वाङ्मयाचे जीवनार्थ शोधताना वर्गात मी कधी खुर्चीवर बसलो नाही. रामाच्या पादुका सिंहासनावर ठेवून भरताने जसा राज्यकारभार सांभाळला, तद्‌वतच माझ्या आत्म्यातील संतशिक्षक खुर्चीवर ठेवून त्याच्या पहाऱ्याखाली मी शिकवले आहे.''

मुलाखतीचे केवळ निमित्त राहिले. मी तर नित्य नवे आविष्कार करणाऱ्या त्यांच्या वाणीनेच भारावून गेलो होतो. इतका; की चांगले तीन-चार दिवस सातत्याने दुपारी मी त्यांच्या घरी गेलो. त्यांच्या बारीकसारीक हालचाली मोठ्या कुतूहलाने निरखण्याचे ते नवखे क्षण अजूनही आठवतात. आमचे बोलणे सुरू असतानाच मध्ये एक दिवस अचानक बाहेर आभाळ भरून आले असावे. पावसाच्या त्या निनादानेही बेभान होऊन ते पडवीतील शिडकाव्यांच्या दिशेने वेगाने गेले. आणि मीही भान हरवून त्यांच्यामागे गेलो. 'पाऊस आला, पाऊस आला, गारांचा वर्षाव' पासून तर, 'पाऊस, आयुष्यात. गल्लीबोळात. जुनेरात. आठवणींच्या पाताळात. समईत' या 'चंद्रमाधवी'तील आणि 'राजपुत्र आणि डार्लिंग' मधील

अनुक्रमणिका


'पावसाचे अनेक अर्थ संभवतात. या पाऊसशैलीला पर्याय नाही, डार्लिंग' यासारख्या ओळी पाऊस सरींप्रमाणे मनापुढे नाचत होत्या; आणि पाऊसगाणे रचणाऱ्या कवीच्या सान्निध्यात मी अंतर्बाह्य चिंब चिंब होत होतो. आमच्या पुढील पंधरा वर्षांच्या निरंतर सहवासाची बीजे या मुलाखतीतील ओलाव्यात पक्की रुजलीत. निरोपाच्या क्षणी ते म्हणाले, ''कापगते, माझे सर्व बोलणे तुम्ही तारतम्याने मांडा. एका कलावंताची आपण ओळख करून देत आहात. नाहीतरी दुर्बोधतेसाठी मी कुप्रसिद्ध आहेच.'' कोणत्याही कलावंताच्या कृतीतील आशय हा तसा अनन्यसाधारणच असतो; कारण त्याच्या व्यक्तित्वाचीच संघटना अनन्य असते. ती दुसऱ्या कुणासारखीही नसते; पण या कलावंताचे आणखी जरा वेगळेच. काव्य, वाणी, लेखन आणि व्यक्तित्व यांच्या एकत्रित येण्यातून जे विलक्षण रसायन तयार झाले आहे, ते म्हणजे ग्रेसतत्त्व. त्या तत्त्वातील काही कवडसेही आपल्या कुवतीनुसार पकडणे किती आनंददायक आहे, हे त्या मुलाखतीत माझ्या लक्षात आले. आतापर्यंत अनुभवलेल्या कवितेतील 'ओळखीच्या वाऱ्याचे' घर गवसत होते. 'भर ओंजळी चांदणे, करु पाचूचा गिलावा' या सारख्या अर्थगर्भ ओळींनी आमचा संसार आधीच भावसमृद्ध झाला होता; आणि छप्पर नसल्याने उकरून गेलेल्या ओल्या भिंतींवर शेवाळाचे हिरवे पाचू बघण्याचा सौंदर्यमंत्र देणारे ग्रेस आता आमच्या भातुकलीतील जगण्याचा एक भाग बनले होते. काही दिवसांनी ते धनतोलीत अगदी चार पावलांवरच्या अंतरावर रहायला आले. वेगवेगळ्या निमित्तांनी आमच्या भेटीगाठी वाढत गेल्या. किंवा भेटीसाठी कोणतेही निमित्त साथ देऊ लागले. त्यांच्या घरी माझे वेळी-अवेळी जाणे सुरू झाले. तेही माझ्या घरी येऊ लागले. धनतोलीत आम्ही भाड्याच्या घरात राहत होतो. तेव्हा भ्रमणध्वनी कुठे होते? आम्ही घरी नसलो, तर मग दारावरील कागदांवर त्यांनी लिहिलेल्या आगळ्यावेगळ्या कवितासदृश्य निरोप-ओळी. त्यांच्या हाती किती वेगाने जिव्हाळ्याच्या संबंधांचे फूल विकसत जात होते!

१९९९ मध्ये सामनासाठी, श्री. संजय राऊत यांच्या विनंतीवरून त्यांनी स्तंभलेखन करण्याचे कबूल केले. त्या स्तंभाचे नाव 'संध्यामग्न पुरुषाची लक्षणे' असे त्यांनी आधीच मुक्रर केले होते. त्या शीर्षकाशी ते सुमारे २७ वर्षापूर्वीच, 'डार्लिंग' कवितेचे लेखन करताना वचनबद्ध झाले होते. ''खरे तर मला संध्यामग्न पुरुषाची लक्षणे सांगायची आहेत,'' असे एका ओळीत त्यांनी म्हटले आहे. लेखनसंकल्पाची त्यांची ही जी कमिटमेंट आहे, ती पक्की असायची. त्यांचे लेखन म्हणजे स्वत:शी केलेला एक अंत:स्थ करारच असायचा. आत्ता फेब्रुवारीत 'बाई! जोगिया पुरुष' या नव्या काव्यसंग्रहाची संहिता जुळवायला सांगत, मला ते म्हणाले, ''तीर्थराज, मला अजून बरेच काम करायचे आहे. तुमची मदत लागेल, सर!'' त्यांच्या ईश्वराने त्यांना अजून थोडा अवधी द्यायला हवा होता. एकेका वाक्याशी, वाक्यखंडाशीच नव्हे- तर एकेका विचारकल्पनेशी ते वर्षानुवर्षेकसे जुळलेले असायचे, हे लेखनादरम्यानच्या चर्चेत माझ्या लक्षात यायचे. 'मृगजळाचे बांधकाम' या 'संध्यामग्न' नंतर म्हणजे २००३ मध्ये प्रकाशित झालेल्या पुस्तकात कवित्वशक्तीच्या सिद्धीचे सूत्र मांडले आहे; पण त्याचे सूतोवाच त्यांनी 'संध्यामग्न'मध्ये 'मृगजळाचे बांधकाम' या शीर्षकाच्या एका लेखात आधीच केले आहे. शीर्षकांचे तर ते बादशहाच होते. त्यांच्या अनेक ललितबंधांना त्यांच्या काव्यओळींची शीर्षके आहेत. पंडित हृदयनाथांसोबतच्या त्यांच्या द्विदल बंदिशमैफिलींच्या कार्यक्रम-मालिकांचे वैशिष्ट्य शीर्षकांपासूनच सुरू होते. 'वाऱ्याने हलते रान' हे साहित्य अकादमीप्राप्त पुस्तक असो, की 'कावळे उडाले स्वामी' या स्वत:च्या मूलभूत देहसूत्र शोधाचे पुस्तक. या पुस्तकांच्या शीर्षकातील आशयघन काव्यओळी, सुभाषितांचे बळ घेऊन त्या त्या कलाकृतीतील आतल्या ललित सामग्रीचे प्रतिनिधित्व करतात.

संध्यामग्नचा पहिलाच ललितलेख नीट पाकिटात बंद करून ते एक दिवस माझ्या घरी घेऊन आले. हिवाळ्याचे दिवस होते ते. त्या वेळची त्यांची ती संकोचशील अवस्था मला नीट आठवते. ललित लेखनात बराच खंड पडला होता. 'मितवा' हे १९८७ चे. म्हणजे प्रकाशित होऊन १२ वर्षे झाली होती. त्या दिवशी पहिल्यांदा मला त्या दिव्य प्रतिभापुरुषातील एका अशक्त माणसाचे दुर्लभ दर्शन झाले. त्यालाच ते 'चंद्रबळाचा माणूस' म्हणायचे. मला म्हणाले, आता वाचू नका. मी गेल्यावर नंतर सावकाशीने वाचा व मला सांगा, कसा झाला ते. मला संकोचल्यासारखे झाले. खरे तर त्या काळात ते अतिशय एकाकी झाले होते. राघवच्या दुराव्याचे मळभ त्यांच्या जीवनाकाशात दाटले होते. कलावंत म्हणून तर ते वनवासातील रामाच्या एकाकी राहुटीसारखेच होते, असे ते म्हणायचे. लौकिक - अलौकिकाच्या द्वैती ताणात मला ते सतत युद्धभूमीवरच्या जखमी सैनिकासारखे भासायचे.

ते गेल्यावर मी तो लेख वाचून काढला. त्यांच्या जीवनसारणीच्या परिचयामुळे असेल कदाचित, त्यातील बराचसा भाग, माझ्या आकलनाच्या कक्षेत आला. 'सलिल संचिताचा शोक' असे त्या लेखाचे नाव होते. विरक्ती आणि आसक्ती यातून वाहणारी कलावंताची जीवनसरिता.

अनुक्रमणिका



आसक्तीचेही टोक आणि विरक्तीचेही. ऐलतीरावरची सौंदर्यसत्यवती आणि पैलतीरावर तपोनिष्ठ पाराशर आणि मध्ये घडणारे महाभारत. गंगा म्हणजे विश्वरहस्याची प्रलयवाणी. कलावंताचा सृजनप्रवास कठोर आत्मशोधाच्या वाटेवरून जातो. 'संध्यामग्न पुरुषाची लक्षणे' मधून कलावंत मानस आणि त्यातील आंदोलने टिपत कलावंताचे संवेदनविश्वच त्यांनी उलगडून दाखवले आहे. त्याचे प्रास्ताविक म्हणजे हा लेख होता. मी दाद दिली. त्यांचं माझं कम्युनिकेशन बरंच वाढलं होतं. ते म्हणाले, ''असं करता का? माझ्या या लेखनाचं डिक्टेशन तुम्ही घेऊ शकाल काय?'' मग पाहता पाहता एका लेखनाच्या संवादपर्वाला सुरुवात झाली. दर आठवड्याला एक ललितलेख या प्रमाणे त्या स्तंभासाठी ५१ लेख आम्ही लिहिले. वर्षभर म्हणजे पहिला लेख धरून बरोबर ५२ आठवडे. अखंडपणे आणि सातत्याने त्यांनी ललितलेखन केले. त्यांचे 'डिटरमिनेशन' म्हणजे थक्क करणारी बाब होती. मधले दोन रविवार 'उत्सव' सुटीमुळे निघाला नाही; तेव्हा त्यांनी मला ते दोन लेख 'वैदर्भी'मध्ये प्रकाशित करायला लावले.

दरम्यान संपूर्ण वर्षभर आणि आठवडाभर म्हणजे जवळपास दररोजच सकाळी ते आमच्या घरी यायचे. प्रेमाच्या कोणत्याही नातेसंबंधात काही क्षणांतच विरघळून जाणे, हा त्यांचा स्वभाव होता. त्या काळात त्यांच्या कुटुंबवत्सलतेचा वेळोवेळी प्रत्यय आला. त्या लीळा वेगळ्याच. ग्रेसच्या एकांतशैलीची ही दुसरी बाजू होती. माझा धाकटा भाऊ मोहन, पत्नी संगीता व एक वर्षाचाही न झालेला मुलगा पुनर्वसू, मी आणि सर अशी ती आमची दररोजची छोटीशी; पण परिपूर्ण मैफल म्हणजे आमच्या कुटुंबाच्या चैतन्याचा झरा होता. त्या नंतर साद-प्रतिसादाच्या हिंदोळ्यावर झुलणारे ग्रेससर आमच्या घरचे सन्माननीय सदस्य झाले. वाङ्मयीन चर्चांनी आमची अभिरुची समृद्ध होत होती. सोबतच अवाङ्मयीन किस्से, माणसांची शब्दचित्रे, त्यांची खास ग्रेसशैलीतील टोपण नावे, प्रसंगचित्रे, ते कथन करतानाची ग्रेसभाषा आणखी वेगळीच. त्यात कायम लक्षात राहतील अशा कोट्या व विनोद. ते म्हणायचे, माझ्याकडे पूर्ण पोतडी भरलेली आहे. दररोज दोन मुठी काढून देतो. आता अलीकडे मेथीचा विषय निघाला. मग एका छोट्या कागदाच्या चिटोऱ्यावर उखाणा, 'हिंग मोहरीत फुले, माझ्या मेथीची फोडणी, ...राव खांद्यावर घेती माझी फुलांची ओढणी.' सर आणि पुनर्वसू यांचे एकमेकांकडे बघून बोट दाखवत ते खळाळून हसणे, आम्ही कधीच विसरलो नाही. पुढे या हास्याच्या आडोशाने- हम शम्मा का सीना रखते हैं, रहते हैं मगर परवानों में- हा दोन भागातील 'सटायर'वजा वैशिष्ट्यपूर्ण लेख, पुनर्वसूशी संवाद साधत त्यांनी डिक्टेट केला. त्या दोघांच्या मैत्रीमुळेच मला ग्रेसमधील लहान मूल समजून घेता आले! ते संध्यामग्नचे दिवस होते. संपूर्ण वर्षभर अनुभवलेल्या त्यांच्या त्या लेखनतंद्रीचे आज स्मरण होते. त्या काळात त्यांच्या जीवनक्रमातील अनेक चढउतार मी पाहिले,

ग्रेसच्या निर्मितिप्रक्रियेतील त्या चढउतारांचे ते मानसिक ताणही मी वर्षभर जोपासले, जणू स्वत:च निर्मितीची अवस्था भोगावी तसे. तो विलक्षण अनुभव आणि कलावंताचा आकांत हा एक स्वतंत्र लेखनाचा विषय आहे. ते म्हणायचे, तुम्ही सृजनप्रवृत्त झाल्यानेच माझे लेखन जस्सेच्या तस्से टिपणे तुम्हाला शक्य झाले. त्या अनुभवात अनेक लक्षवेधक बाबी होत्या. जसे की त्यातील आत्मचरित्रात्मक अंश. प्रत्यक्ष बोलण्यात कधीतरी त्यांनी ते तपशिलाने सांगितले असायचे. पुढच्या काही दिवसांनी मांडणीच्या कलात्मक आविष्कारात त्यांच्या प्रातिभिक परिसस्पर्शाने ते निवेदनात्मक वर्णन लालित्याच्या अंगाने सुवर्णमय व्हायचे. त्या त्या पात्रांचे व्यूह रचताना व ते ते प्रसंग उभे करताना त्यांचे जे आख्यान लागायचे, त्यात अनुभवाची वेगळीच भाषा निर्माण व्हायची. आणि मी थक्क व्हायचो. केवळ आत्मचरित्रात्मक अंशच नाही, तर त्या सृजनपरिसरातील प्रत्येकच सजीव-निर्जीव घटक, व्यक्तिरेखा, संवाद, प्रसंग आणि त्यांच्या भावविश्वाशी निगडित असलेल्या संदर्भांचा एक अद्भुत असा कारखानाच त्यांच्या नेणिवेत होता. ही नेणीव म्हणजे ग्रेसच्या भूतकाळातील अंधारलेली अडगळीची खोलीच जणू. त्यात प्रचंड अशी उलथापालथ त्या लेखनपूर्व डिप्रेशनच्या काळात होत असावी. हेच त्यांचे उसळणे आणि कोसळणे! भाषणापूर्वी असो की लेखनापूर्वी, शेवटपर्यंत त्यांच्या या डिप्रेशनला मी अनुभवले आहे. सतत प्रतिभेच्या पातळीवर आणि निर्मितीच्या आडोशाने जगणाऱ्या कलावंताचा हा आत्मभोग अनुभवणे म्हणजेच कलावंताला प्रत्यक्ष अनुभवणे. त्यांच्या अंतर्मनातील द्वंद्वात्मक विचारांचा जोडबिंदू सापडून आणि त्यामुळे निर्माण होणाऱ्या ताणांची कुठलीशी संगती त्यांना लागू लागली की ते मला बोलावून घ्यायचे. हाच त्यांना वरून मिळालेला आदेश असावा. म्हणायचे, ''गुरुजी ! आज उडा देंगे!''

त्यांच्या घरातील त्या गूढ संधिप्रकाशात दिवाणावर ते बसायचे. मी त्यांच्यापुढे खुर्चीवर लिहायला बसलेला. माझी नजर त्यांच्या घरात सजवून ठेवलेल्या घोड्यांपासून घड्याळांपर्यंतच्या त्या वस्तूंवर, फोटोंवर, चित्रांवर, त्यांचे 'सहोदर' असलेल्या आणि त्यांच्या कुळवृत्तीच्या कलावंतांवर फिरायची. लहान मुलाने एखादे खेळणे जपून ठेवावे, तशी त्यांनी आपल्या पूर्वायुष्यातील अनुभवसामग्री जपून ठेवली होती. त्याचे स्मरण या वस्तू बघताना मला व्हायचे. नेणिवेच्या अडगळीतील जणू ही त्यांची दृश्य-अदृश्य प्रजा. त्यांची स्वत:ची विविध फोटोजेनिक रूपे सभोवती पसरलेली, ज्यांच्याशी ते सतत संवाद साधत असायचे. ग्रेसच्या नेणीवप्रधान निर्मितीचा अभ्यास करण्यासाठी आणि त्या घरातील मांडणीचा अनुबंध तपासण्यासाठी त्यांच्या घराचे स्मारक करणे किती गरजेचे आहे! त्या वस्तूंशी त्यांचे संवेदनविश्व निगडित असायचे. म्हणजे समजा, त्यांच्या अडगळीत एक नाक तुटलेली बाहुली आहे: अंधारात चाचपडताना जरा चुकून अपघात झाला असेल. मग ती जिवंत बाहुली असो की निर्जीव. प्रमाद घडला असेल आणि कदाचित त्या संदर्भातील उलथापालथ असेल, ती सतत सुरू असायची. डिक्टेशन देताना त्यांचा तो निर्मितिसन्मुख चेहरा आणि ती ओलसर बुबुळे आठवतात. डिक्टेशन देताना आपले संपूर्ण पूर्वायुष्य मुठीत धरून हा प्रतिभापुरुष आपल्यासमोर बसला आहे की काय असे वाटायचे. आणि आता तो आपल्या सृजनविश्वातील या सर्व दृश्य-अदृश्य वस्तूंना कसा स्पर्श करेल या कुतुहलाचा एक लख्ख शहारा त्या क्षणांना चिकटलेला असायचा. पुढे लौकिक-अलौकिक अनुभूतीला पकडणारी ही त्यांची स्पर्शभाषा हळूहळू माझ्या परिचयाची झाली. त्यांच्या गद्यशैलीला असलेली अंतर्गत नादाची लय अगदी त्यांच्या कवितेतील निसर्गदत्त घाटाप्रमाणे आहे. अनेकदा स्वत:च्या कवितेच्या परिसराचा शोध ते घेतात. त्या दृष्टीनेही त्यांच्या कवितेचे आणि ललितबंधांचे अनुसंधान महत्त्वाचे आहे. आपल्या जीवनप्रक्रियेचा व आपल्या कवितेचा संचितधर्म घेऊनच ते या चिंतनशील लेखनात विखुरले आहेत. भावमधुर काव्याची डूब घेऊनच ते अनुभवप्रक्रियेच्या तळाशी खोलवर जातात. तर्कसुसंगत विधानांचा आविष्कारही काव्यशैलीच्याच सारणीतूनच होतो; हा ग्रेसने ग्रेसचाच केलेला जणू पाठलाग आहे. त्यामुळेच हे ललितलेखन त्यांनी 'ग्रेस' नावानेच केले असावे. आपण डिक्टेशन घेत नसून, फक्त त्यांना ऐकतो आहे; आणि नकळत त्यांच्या बोलण्याची गतिलय आपली लेखणी सहजतेने पकडत आहे, असा अनुभव असायचा. एका आत्मलीन तंद्रीत मग्न होऊन जणू ते मला सारे समजावून सांगत होते. मुळात ते मला संवाद-लेखक म्हणत. 'लेखनिक' हा शब्द त्यांना आवडत नसे. या शब्दाला कुठलासा 'भाडोत्री माणूस' असा वास आहे, असे ते म्हणायचे. 'संध्यामग्न'च्या आरंभओळींमध्ये ते लिहितात, ''तुमचा माझा अनुबंध मला नवा आणि मोलाचाही आहे आणि अशा सारणीतून अभिव्यक्त होण्याची माझी ही पहिलीच वेळ आहे.'' मध्ये कुठलेही लेखन असो, राजहंस प्रकाशनाला लिहिलेले पत्र असो (ज्यात जी. ए्. वरचे भाष्य आहे), 'दुसऱ्या पिढीचे आत्मकथन' मधील लेख असो, की लोकमत दिवाळी अंकातील त्यांचे संपादकीय- डिक्टेशनपूर्वी अनेक दिवस त्यांचे- माझे बोलणे म्हणजे त्यांची अनोखी चिंतने असायची आणि मला अदमास यायचा, पावसाळी आभाळ आता संपूर्ण

भरून आले आहे! किती बोलले ग्रेस! दिवसाच्या कुठल्या प्रहराचे बंधन नसायचे; पण कधी कंटाळा आला नाही ऐकायचा. किती अनावर बोलायचे!! म्हणायचे, तुम्हाला नाही तर कोणाला सांगू? त्यांच्या बोलण्याचे मोल त्यांना स्वत:ला किती असायचे? म्हणायचे, तुमच्या मनोविकासाची सामग्री आहे ही. किती अंगवळणी पडले होते सारे. 'ओल्या वेळूच्या बासरी'त ते लिहितात, 'माझ्या श्वासातील उद्‍घोषित उद्‍गारांची भाषामांडणी याही वेळी प्रा. तीर्थराज कापगते यांनी केली.' नॉर्मलच्या राहुटीतील मुलाखतीत बोलणारे ग्रेस अगदी शेवटपर्यंत थेट तसेच बोलत गेले. त्याच लयीत. शेवटी मोबाईलच्या बासरीवर दुमडलेली बोटे सैल होईपर्यंत!


त्यांच्या नेणिवेच्या अडगळीत कुठलेसे एक निनादविश्व होते. ते नाद कधीच म्हणायचे नाहीत. त्या निनादांचा अतिशय अंत:स्थ आणि सूक्ष्म असा स्वर त्यांना डिक्टेशन दरम्यान जणू ऐकू येत आहे, त्याचा वेध त्यांचे डोळे जणू घेत आहेत, असे वाटायचे. आणि त्या एकाग्र अवस्थेत संज्ञाप्रवाहाचा आवेगही इतका तीव्र असायचा की वाङ्मयीन, सांस्कृतिक, पौराणिक संदर्भांची अपूर्व दालने तात्काळ उघडली जायची. त्याच वेळी भाषेचा एक भौगोलिक परिसरही ग्रेस चाचपडून पहात आहेत, असे लक्षात यायचे. विद्यार्थी असताना भाषाशास्त्राचा त्यांचा अभ्यास (एम.ए.त ९२ टक्के गुण मिळविण्याइतपत) सखोलच होता. अशा वेळी भाषेच्या उमगस्थानाच्या मुळाशी असलेले नादगुणाचे सुप्त झरेच त्यांच्या हाती लागायचे. त्या क्षणीचे त्यांच्या चेहेऱ्यावरचे संमिश्र भाव टिपणे हा एक विलक्षण अनुभव होता. याच वेळी नकळत त्यांना एखादा नवा शब्द सापडायचा किंवा जोडशब्दाची नवी द्विदल प्रतिमा. म्हणजे समजा कृष्णाच्या बासरीच्या तंद्रीबद्दल ते बोलताहेत- ''तर बासरी ही कृष्णाची समीरशहाणी लेक आहे...'' त्या वेळी त्यांचे संपूर्ण शरीर डोलताना पाहून मीही हरवून जायचो. त्यांच्या विश्वात ते इतके मग्न असायचे की तोंडात 'समीरशहाणी' शब्द आणि आमच्या दारात पडलेले दुधाचे पाकीट त्यांच्या हातात नकळत. ते नीट उचलून टीपॉयवर ठेवले जायचे. 'जीए' म्हणायचे ना, ''काही शब्द गुप्तपणे घेतलेल्या पवित्र शपथेची आठवण ठेवून एकत्र येतात. मग त्या ठिकाणी काय किमया घडते, ते कळत नाही.'' पण एवढे निश्चित की हे शब्द जिवंत असतात म्हणजे काय? केवळ असोसिएशननेही- साहचर्यानेही- थरथरण्याचे सामर्थ्य त्या शब्दांच्या अंगात कसे येते, आणि ती थरथरण्याची प्रक्रिया कशी घडते याचा अनुभव यायचा. असे वाटते, त्यांचे सारे ललितलेखन रसिकांनी त्यांच्या वाणीतूनच ऐकायला हवे होते.

आपल्याच शब्द-निर्मितीने तेही दचकून जायचे. त्या क्षणीच त्यांना ते शेअर करावेसे वाटायचे. त्यांचा हात माझ्यापुढे यायचा आणि त्या हाताला स्पर्श करत माझ्या तोंडूनही 'वा!' असा उद्‍गार नकळत बाहेर पडायचा!

सुंदर लयबद्ध अशा वाक्यांची पखरणच असायची. पारिजातकाचं देठ जसं तोडावं लागत नाही. अगदी सहज. त्यातली एकही ओळ संदर्भहीन नाही. अर्थ म्हणाल तर, ते शब्दांचा पाठलाग करीत यायचे. मर्ढेकरांनी म्हटल्याप्रमाणे. डिक्टेशन देताना टेपरेकॉर्डर चालतच नसे. सावध होतील किंवा 'कॉन्शस' होतील अशी कुठलीच गोष्ट नाही. माझ्याकडे येताना त्यांची ती जपमाळ. एक छोटीशी डबी. बहुधा पिशवीत एक फोटो. लेखनाचे टाचण टिपण, सांगाडा असे काहीच नाही. मी समोर कोरे कागद घेऊन बसलेला. काहीतरी इकडतिकडचे बोलणे सुरू असायचे. आणि अचानक अन् सहज पहिले वाक्य बाहेर पडायचे. वानगीदाखल उदाहरण देतो :

''हिवाळी आवर्तनांचे आकाश, डोईवर घेतले आणि त्याचेच दयावान सर्वगामी क्षितिज पाठीपोटी गुंडाळले, तरी पैलपाराचा एखादा पक्षी तुमच्या अंगणातील वृक्षाच्या डहाळीला खो देऊन तुमच्या खांद्यावर येऊन बसेल, याची हमी देताच येत नाही...'' अशा पहिल्याच वाक्याने माझ्या श्रुतीचा ताबा घेतल्यावर डिक्टेशन सुरू व्हायचे; व ही तंद्री किमान दीड-दोन तास चालायची. मध्ये कलाकृती म्हणून तिचा घाट, घटक सगळे सुव्यवस्थित. कवितेप्रमाणेच जादुई संयोग. ज्यात अनेक घटकांचा समावेश असायचा. लिहिताना माझे संपूर्ण अवधान जसे त्या नवनिर्मितीकडे असायचे, तसे डोळे त्यांच्या देहभाषेकडे लागलेले असायचे. सगळे इतके अद्‍भुत! अद्‍भुत म्हणजे अद्‍भुतच. पूर्ण शरीरच. संपूर्ण त्वचा जणू सोलून निघतेय, असा परिणाम! नुसत्या हस्तमुद्रा तर विलक्षणच! शरीरच माध्यम. शरीरातील सर्वच इंद्रिये जणू निर्मितिमाध्यम. शब्दोच्चारांची स्तोत्रांसारखी मंत्रधून. जसे ग्रेस गुणगुणताहेत. ''स्तोत्रात इंद्रिये अवघी गुणगुणती दु:ख कुणाचे!'' ही ओळ इतकी खरी होती. झोपेतही त्यांच्या उजव्या तर्जनीची हालचाल अक्षरे गिरवल्यासारखी व्हायची. जीवनानुभवातील जे वास्तव आहे, ते स्वप्न आहे की भास आहे की सत्य आहे, असे काहीतरी 'सटल्' पकडण्याची त्या सर्व इंद्रियांची धडपड! अलीकडचीच आठवण. माझ्या या पत्रकार सहनिवासाच्या घरचीच. त्यांच्या पहिल्या कॅंसरनंतरची. एकदा साडेसहा वाजता सकाळी ते ठरल्याप्रमाणे डिक्टेशनसाठी घरी आले... माझं लक्ष त्यांच्या डोळ्यांकडे. वाटले आज काहीतरी गडबड आहे. बसल्यावर ते पुढच्याच क्षणी म्हणाले, ''आज काही

अनुक्रमणिका



भीतीने वावरलेल्या
शब्दांच्या संध्याकाळी
मी विसरुन मोजत बसतो
कवितेच्या माझ्या ओळी...

सुचत नाहीये!'' दरम्यान संगीताने काहीतरी खायला आणले. म्हणाले- नाही. आज या शरीराला मी काही देणार नाही. खरेच, शरीर हेच त्यांच्या निर्मितीचं माध्यम. आणि 'क्रिएटिव्हिटी इज माय लाईफ अँड इट्स कन्व्हिक्शन इज माय कॅरेक्टर.' असे ते म्हणायचे ते काय खोटे होते? विचारायचे धाडस झाले नाही. पण त्या दिवशी ते जेवले नसतीलच. डिप्रेशनमध्ये ते शरीर मी बघू शकायचो! विकल अवस्था. आवाजासहित ती अवस्था पाहणे किंवा दूरध्वनीवर अनुभवणे म्हणजे सहन करण्यापलीकडची गोष्ट! वाटायचे, तो देह कोसळतो की काय? डिप्रेशनमध्ये इतका कठोर आत्मशोध असायचा. लेखकाचे भांडण स्वत:शीच असते म्हणतात, पण ते या पातळीवर? लेखक अनुभवाची केवळ मखरमांडणी करीत नाही, तर त्यातून आपल्या काळजातला अंत:स्थ हुंदकाही ऐकतो, असे ते म्हणायचे. नैराश्य! आणि त्याच्या दुप्पट निर्मिती!!

पण निर्मितीचा त्यांना मिळणारा आनंदही काही और असायचा. कलावंताचा उ:शाप!! बोलता बोलता मध्येच उठायचे. फेऱ्या मारू लागायचे. त्याच तंद्रीत. जणू रंगभूमीवर. डिक्टेशनमधले असे किती प्रसंग! एक प्रसंग आठवतो! विवाहापूर्वी लीलाबाईंना (त्यांच्या पत्नींना) ज्या वेळी ते संध्याकाळी भेटायला जायचे. त्या संदर्भातले लिहिणे सुरू होते. मेडिकलच्या लेडीज होस्टेलवर. त्या दोघांच्या संबंधांचे आणि त्या सांजभेटीचे अगत्य सभ्यपणे ओळखणारा रामरतन चौकीदार त्यांना त्या वेळी आठवला. जसाच्या तसा. तश्शीच ललकारी. ''माटेSSबाईSS साहाब आये हैSS...'' हा मौखिक आविष्कार त्यातल्या सूक्ष्मातिसूक्ष्म घटकांसहित. रामरतनच्या वेळी जसे निनाद होस्टेलच्या खिडकीच्या तावदानांवर उमटले असतील, अगदी तसेच सरांच्या त्या ललकारीनेही. असा हा आविष्कार संपूर्ण असायचा. संगीत, चित्र, शिल्प असे कलाप्रकारांचे आणि कथा, नाट्य अशा लेखनप्रकारांचे गुण त्या आविष्काराला चिकटले असायचे. आणि मी झपाटलेला. ते म्हणायचे- ''ताजमहाल खचला, तर त्याला एखादी वीट लावता येऊ शकते; पण कलाकृती एखाद्या अवयवाशिवाय कायम अपंग राहू शकते !'' अशा वेळी त्या शब्दविसर्जनाच्या प्रदेशात मला किती एकाग्र राहावे लागत असेल एकेका शब्दासाठी? कारण उच्चारलेल्या वाक्याचेच काय शब्दाचेही रिपिटेशन मुळीच नसायचे. त्यांची कलाकृती अशी अखंड बाहेर पडायची. सीतेच्या देहशिल्पाप्रमाणे. अगदी शीर्षकासहित. शीर्षक आधीच ठरवून ठेवलेले असायचे. शीर्षकावरून आठवले. आत्ता. अलीकडची गोष्ट. 'ओल्या

वेळूच्या बासरी'चे दिवस. तसे ते रात्री साडेनऊला झोपायचे. एक दिवस रात्री साडेदहा-अकराला फोन आला. 'काय करताहात?' पुन्हा निर्मितीपूर्वीचे डिप्रेशन. तोच अशक्तपणाचा सूर. मी म्हटलं- सर, हे थोडं पीएच. डी. चं प्रकरण लिहितो आहे; पण खरं सांगू का, तुमची एक कविताही गुणगुणतो आहे. आणि मी मोठ्याने त्यांच्याच शैलीत गाऊ लागलो-

सांज हंबरे पिशी तुझी धुळींत पैंजणे
धुळीस पाय लागतां धुळीत गोंदले जिणें.
गोंदणें कसे निनाद कोरल्या धुक्यांवरी
कलंडल्या दिशा तमांत वांसरें उभी घरीं...
तुझ्या मिठींत मी ढळें तशीच वांसरे मला
वनांत गाय शोधतां कसा सुगंध लागला...

मी इकडे या ओळी गुणगुणत असतानाच तिकडे ग्रेसही पुढच्या ओळी म्हणू लागले :

सूदीर्घ दूर सावल्या तसें क्षितीज भासले
कुण्या फुलांस पांघरू तरूंस मेघ लागले...
सशिल्प दुःख मंदिरीं धुळींत रेखतां तुला
उम्या निर्जेत जागणे दिसे न गांव आपुला.

'दिसे न गाव आपुला.' तीच अनाथावस्था. ही कविता आहे, १९६२ची. वयाच्या २२व्या वर्षी लिहिलेली. आणि आता, २०१० मध्ये त्यांचे वय ७० वर्षांचे. पुन्हा तीच उलथापालथ. निजेतही तसे जागणे. वनात गाय आणि वासरू इकडे घरी. तिला शोधतो आहे. तिकडे गाय हंबरते आहे, तिला वासराचे वेध. ती येईल म्हणून तिच्या पावलांचा सुगंध येतो आहे. ते पुनः पुनः गाऊ लागले- 'वनात गाय शोधता कसा सुगंध लागला...' म्हणाले- लिहून घ्या. फोन बंद. हे होते, 'ओल्या वेळूतील...' सहाव्या ललित लेखाचे शीर्षक, 'वनांत गाय शोधतां कसा सुगंध लागला...' अशी धुंदी सबंध लेखनभर टिकायची. सुट्या लेखां मध्येही संपूर्ण पुस्तकाचा घाट ठरलेला. 'संध्यामग्न'मधील सुरुवात, निर्मितीच्या स्वभावलेखनाची आणि शेवट निर्मितिनाशाच्या भयाची. त्या शेवटच्या लेखाचे शीर्षक आहे, 'भय इथले संपत नाही...' निर्मितिनाशाचे भय हे आणखी वेगळेच प्रकरण. ते इथे आता नको. मला जाणवायचं की त्यांना निर्मितीत ती आरंभीची अवस्था मिळते, ज्याला ते 'एम्ब्रियो पोझिशन' म्हणतात. बालकाला जसा आपल्या आईचा शोध असतो, तशी अवस्था. लेखन संपल्यावर ते प्रचंड थकलेले असायचे. बाळाला जन्म दिलेल्या आईसारखे. हीच कलावंताची मुक्ती आहे का, ठाऊक नाही. एक आठवते, श्री. रामदास भटकळ आपले 'मोहनमाया' पुस्तक घेऊन बाबा आमटेंना भेटायला गेले होते. संध्यामग्नचा विषय निघाला. संध्यामग्नबद्दल 'बाबा' बोलले- ''ज्ञानेश्वरीनंतर इतके महत्त्वाचे पुस्तक मी वाचले नाही...''

इथे त्यांच्या लेखनप्रक्रियेच्या आसपासच्या परिसराचा शोध घेताना निर्मितिपूर्व डिप्रेशनची म्हणजे सृजनाची-अंकुरण्याची अवस्था. प्रत्यक्ष निर्मितीची अवस्था आणि त्यानंतरची लेखनोत्तर पोकळी. अशा अवस्था मला जाणवल्या. त्या पोकळीत महान कलावंतालाही ॲप्रिसिएशनची किती गरज असते! 'भांबावतो जेव्हा अंकुराचा पोत, तेव्हा त्याचा हात सोडू नये!' असे ग्रेस आपल्या एका कवितेत म्हणतात. कलावंताला त्याच्या निर्मिती अवस्थेत हात देणे, ही आपली सामाजिक जबाबदारी आहे, असे मला वाटते. लेखनादरम्यान गावातील अनेक उलटसुलट गोष्टी मी त्यांच्यापर्यंत कधी पोहोचू दिल्या नाहीत आणि स्वतःच्याही तंद्रीला भंग होऊ दिले नाही. त्यांच्यातल्या बालकाचा स्वभाव मला ठाऊक होता. दिवसभर मग त्या नवजात 'बालका'ची म्हणजे ललितबंधाची स्वच्छता. नर्स बाळाचे न्हाणे-धुणे करते तशी. म्हणजे संगणकीकरण. त्यानंतरचे शुद्धीकरण. आधीच वर्तमानपत्रातील प्रूफरीडरच्या आवाक्याबाहेरची ती भाषा! कितीदा प्रिंट आऊट मागायचो, त्याचा हिशेब नसे आणि आई तिकडे निर्मितीनंतरच्या पोकळीत! माझ्याही विविधस्तरीय विवंचना. पत्रकारितेची नोकरी. कॉलेजमध्ये शिकवणे, शिवाय आठवड्याची पुरवणी. त्या तणावातही कुठेतरी वेळ काढून आस्वादाच्या पुनःप्रत्ययाची ऊर्मी पूर्ण करण्यासाठी संगीतासोबत मी तन्मयतेने ते लिखाण वाचून काढायचो. सायंकाळी ते काय करीत असतील?

भीतीने बावरलेल्या
शब्दांच्या संध्याकाळी
मी विसरुन मोजत बसतो
कवितेच्या माझ्या ओळी...

सायंकाळी मी किंवा संगीता त्यांना फोन करून सांगायचो, 'सर, लेख खूप सुंदर झाला. संपूर्ण ग्रेससारखा. लेखन चढत आहे.' तेवढ्याशाही झुळकीने ते लहान मूल आनंदायचे. पण कधीकधी अक्षरशः स्फुंदत म्हणायचे- एखाद्या बालकासारखे. ''तीर्थराज! असं वागतात का हो लेखकाशी? सांगाना, असं वागतात? हाच तुमचा अभिरुचिसंपन्न वाङ्मयीन समाज?'' दुर्बोध म्हणून लौकिक यश मिळण्यात त्यांची घोर उपेक्षा झाली. साहित्य अकादमी पुरस्कारही वयाच्या ७२ व्या

अनुक्रमणिका

वर्षी. बोलताना मी सुत्र. मध्ये शांतता. अश्रू. वैतागून, उद्वेगाने तिडकीने म्हणायचे, ''तुम्हाला सांगतो तीर्थराज! पुढचा जन्म मी आफ्रिकेतल्या जंगलातील रानडुकराचा घेईल, पण या भाषेत जन्माला येणार नाही...'' अर्थात हे त्या उद्वेगापुरते. एरवी मराठी आणि महाराष्ट्रावर आणि आपल्या रसिकांवर त्यांचा कमी का जीव होता! म्हणूनच आज संपूर्ण महाराष्ट्र त्यांच्या श्रवणभक्तीत डोलतो आहे.

कवितेसारखेच विलक्षण त्यांचे व्यक्तित्व. तिच्यासारखीच त्यांच्या जगण्याची सौंदर्यपूर्ण रीत. या गोष्टींचे आकर्षण कधीच आटले नाही, की गोठले नाही. त्यांची प्रत्येकच भेट मैत्रीपूर्ण ओढीची असायची आणि त्या भेटींध्ये प्रत्येक वेळी ते नित्यनूतन भासायचे. कविताच जशी. जगरहाटीच्या धकाधकीत बोथट होऊ पाहणारी संवेदना पुन्हा घासूनपुसून लख्ख करणारी. ग्रेस आमच्या आयुष्यात येण्याच्या दहा-बारा वर्षांपूर्वी त्यांची 'कविता' भेटली. तेव्हा मी फारतर अठरा-वीस वर्षांचा असेन. नागपुरातील एकाकीपणात कितीदा मी ती गुणगुणली, ती काय केवळ नादसमृद्ध आहे म्हणून? नसेलच. आत्म्याचा म्हणजे समग्र व्यक्तित्वाचा उद्‌गार होऊन बाहेर पडलेली ती कविता. तिच्या निर्मात्याच्या अनुभवविश्वाचे तीव्र आकर्षण ती भावण्यामागे असावे. त्यांच्या भेटीपूर्वी इतकी वर्षेनितळ, शांत आणि संपृक्त अशा त्या कवितेच्या जलाशयाशेजारी मी उभा होतो; आणि नंतर ते प्रत्यक्ष आमच्या जगण्याच्या इलाख्यात, आतल्या आवेगाने सळसळणारे अस्सल जीवन घेऊन आणि आपल्या साऱ्या गुण-दुर्गुणांसहित एखाद्या नदीसारखे वाहत राहिले. स्वच्छता-अस्वच्छता आपल्या प्रवाहात सामावून घेणारी, तरीही निर्मळ नदी. जीवनाची निर्दोष पुनर्निर्मिती करणारी. ते म्हणायचे- ''तीर्थराज, तुम्ही मला सगळ्याच अवस्थांमध्ये बघितले आहे.'' ही नदी जीवनदायिनी होती. तिच्या विशाल पात्रावर आपण उभे आहोत असे वाटायचे. तिच्या किनाऱ्यावर वर्तन-गैरवर्तनाची संगती लागून दंतकथांचे धुके पुसले जायचे अन् भावस्पर्शी दुर्बोधता बोलकी व्हायची. तिच्या समृद्ध प्रवाही अस्तित्वानेही आयुष्यात नवेनवेसे काही घडत असायचे. ती एकाएकी कशी गुप्त झाली? ग्रेस नावाची ती तरल लयबद्ध संघटना कुठे अंतर्धान पावली असेल?

असे वाटते मृत्यु असतो सख्या रे
सतीच्या खुनासारखा पोरका;
जळाच्या भयाने दुभंगून गेली
सुन्या स्वप्न पारावरी द्वारका...

ती तरलता, उत्कटता, उत्स्फूर्तता, आविष्कारातुरता, संवेदनशीलता, दु:खव्याकुळता आणि उग्र व्रतस्थता: अशा निसर्गदत्त गुणांसोबतच परफेक्शन, डिटरमिनेशन, कमिटमेंट, कन्व्हिक्शन अशा संपादित गुणांनी युक्त 'ग्रेसपण'; त्यात सततची अस्वस्थता, बेचैनी, आत्मवैराण उदासी आणि भयग्रस्तता अशा कलावंताच्या भागधेयाचा शापदग्ध पाठलाग आणि त्या ग्रेसने निर्मिलेल्या कवितेचे 'कवितापण' या अनुभवण्याच्या- भोगण्याच्या गोष्टी आहेत. अर्थांच्या शिड्यांची चढउतार करण्यापेक्षा प्रत्यक्ष कलाकृतीच्या अनुभवविश्वात जीवनाचे गूढ अज्ञात प्रदेश धुंडाळायचे आणि जीवनच अर्थसमृद्ध करायचे. त्या मूल्ययुक्त जगण्यातील माणूसपणाच्या नुसत्या स्पर्शाच्या आठवणीनेही शहारून जायचे. अगदी अलीकडची गोष्ट आठवते. एक दिवस मी सकाळी साडेसहालाच त्यांच्याकडे गेलो. बोलताना मोबाईल फोन हरवल्याची हळहळ व्यक्त केली. ते म्हणाले, सायंकाळी कुठे कुठे गेलात? आठवा. तडक टी शर्ट घालून बाहेरही पडले. माझ्या दुचाकी गाडीवर मागे बसून मग व्हेरायटी चौकापासून शोध सुरू. जनरल स्टोअर, औषधाचे दुकान व शेवटी झेरॉक्स सेंटर. ते रस्त्यावर गाडीजवळून फोन करायचे आणि मी शटरला कान लावायचो. शेवटी झेरॉक्स सेंटरमधून माझ्या रिंगटोनचा आवाज आला. दुकान उघडल्यावर गेलो, तर तो काऊंटरवर ठेवलेला. मला आनंद झाला, तो त्यात असलेल्या संदेशवाहिनीवरील त्यांचे सुरक्षित केलेले मेसेज सापडल्याचा.

परवा माझा नवा मोबाईल त्यांच्या ऐन जन्मदिनी- '१० मे'ला हरवला. श्री. आशुतोष शेवाळकरांनी त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आयोजिलेल्या कार्यक्रमाच्या रात्री त्यांच्या आठवणींनी अस्वस्थ होऊन, आम्ही- म्हणजे संगीता आणि मी, बऱ्याचदा सकाळी जिथे धर्मासमध्ये त्यांच्यासोबत घ्यायला, चहा घेऊन जायचो, त्या ठिकाणी बसलो. किती तरी वेळ त्यांना आठवत राहिलो. तिथेच विसरलो असेल कदाचित मोबाईल. त्यांच्या जाण्याच्या १० दिवसांपूर्वी, ते मृत्युसमीप निजले असताना माझ्या-त्यांच्या शेवटच्या भेटीचे छायाचित्र त्यात होते. माझे ग्रेस! माझ्याकडे स्नेहार्द्र ममत्वाने बघणारे ग्रेस!! ते आता मला कोण शोधून देईल?

❙ डॉ. तीर्थराज कापगते
३३, बी ३, पत्रकार सहनिवास,
सिव्हिल लाईन्स, नागपूर ४४० ००१
भ्रमणध्वनी : ८६५७० ४९५०७

ग्रेस, युगवाणी आणि मी

गो. ना. मुनघाटे

■

कवी ग्रेस हे 'युगवाणी'चे संपादक होते, हा मराठी नियतकालिकांच्या आणि 'युगवाणी'च्या पुण्याईचाच भाग होता. माझी एक कविता 'निवडक कविता' या सदरात त्यांनी १९६६ च्या 'युगवाणी'च्या दिवाळी अंकात प्रसिद्ध केली होती. मी त्यांना 'युगवाणी'च्या म्हणजेच विदर्भ साहित्य संघाच्या कार्यालयात भेटायला गेलो. साधा बंगाली सदरा व खांद्यावर शबनम बॅग, धारदार डोळे आणि एकूण व्यक्तिमत्त्वच काव्यात्म वलयाने आगळेवेगळे दिसत होते. माझी कविता त्यांना आवडली होती. असे ते मनापासून म्हणाले, पण माझी ती कविता म्हणजे ग्रेस यांच्या अलौकिक प्रतिभेलाच सलाम करण्याचा एक प्रयत्न होता, हे सांगण्याचे धाडस मी करू शकलो नाही. माझी ती कविता अशी :

जेव्हा अनंत आकार,
निराकारातून भिडतात येऊन
प्राकाराच्या पारदर्शक
डोळ्यांना साक्ष ठेवून
भिजून आले चिंब झालेले चांदणेही
फिके पडते मनातल्या ओल्या चिंब चांदण्यापुढे ।

घुटमळणारा पारवा, पीत गारवा
निरवतेच्या चंदेरी स्वप्नात
सारखा तळपतो रात्रंदिन
जेव्हा अनंत आकार निराकारातून भिडतात येऊन ।

मदमत्त पायातील
मेंदीच्या गंधाने पुलकित झालेली वाळू
जिथे भाळी लावण्याची तपश्चर्या
निष्फळ ठरते विश्वमित्राची
तडे जातात बादशहा बेगमच्या
प्रति वारस - ताज महालाला ।

जेव्हा अवकाशाच्या पोकळीचा
वेध घेत दोन ध्रुव
सांधले जातात एका अनामिक रेषेने
आणि अस्पर्शीय चुंबनाच्या -
गुलाबी खुणा उमटतात, गोड गुलाबी रसिल्या गालावर ।

जेव्हा अनंत आकार, निकारातून भिडतात येऊन ।

ग्रेस नागपूरच्या मॉरीस कॉलेजमध्ये प्राध्यापक असतांना त्यावेळी स्थानिक वृत्तपत्रामधून त्यांचे सदरलेखन प्रसिद्ध होत होते. विद्वता, तेज, विश्वसाहित्याची वेगळी जाणीव यामुळे

अत्यंत गूढ अंतर्मनाचा छेद घेणारी शब्दरचना, भव्यदिव्य प्रतिमा व उदात्त काव्यपंक्ती यांनी परिपूर्ण अशा त्यांच्या लेखनाचा प्रत्यय मी त्यांच्या अनेक ललित लेखातून घेतला आहे. एक अभ्यासक म्हणून त्यांच्या काव्यावर अत्यंत आत्मीयतेने व जिज्ञासेने मी प्रेम करीत होतो. मधल्या प्रदीर्घ ४० वर्षाचे कालावधीत त्यांची माझी भेट झाली नव्हती.

मर्ढेकरांच्या काव्यानंतर मी कवी ग्रेस यांच्या काव्याचा अभ्यासक म्हणून माझे काव्यजीवन सुरू केले. 'युगवाणी'त प्रसिद्ध झालेली माझी कविता आणि नागपूर येथे ग्रेस यांची झालेली भेट यामुळे मलाही काव्यनिर्मितीची प्रेरणा मिळाली. त्यानंतर बऱ्याच कालावधीनंतर कविवर्य ग्रेस यांच्या वाणीचा व प्रत्यक्ष भेटीचा योग नवरगाव येथील महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात आला. नवरगावला ग्रेस येणार ही बातमी कळताच मी त्यांच्या दर्शनासाठी हजर झालो. त्या कार्यक्रमाचे संचालन करणाऱ्या एका महिलेजवळ मी मला त्यांची एक छोटीशी कविता त्या कार्यक्रमात त्यांच्यासमोर मी प्रदर्शित करण्याची इच्छा व्यक्त केली. अर्थात त्यांनी दाद दिली नाही. कविवर्य ग्रेस हे अत्यंत शिस्तप्रिय व अत्यंक कडक स्वभावाचे आहेत. त्यांचे संमतीशिवाय मला तुम्हाला काहीच सांगता येत नाही. पुढे पाहू म्हणून सरळ प्रेक्षकात जाऊन बसा असा आदेश दिला. मी थोडा हिरमुसलो. प्रेक्षकात समोरच्या रांगेत जाऊन बसलो. कवी ग्रेस यांना पाहण्यासाठी त्यांना ऐकण्यासाठी भव्य सभामंडप साहित्यप्रेमींनी भरून गेला होता. ग्रेस येताच सर्वांनी उठून त्यांचे स्वागत केले. ग्रेस स्थानापन्न होताच मी समारेच्या प्रेक्षकात पहिल्या रांगेत बसल्याचे त्यांना दिसले. त्यांनी संयोजकांना सांगितले की प्रेक्षकात गो. ना. मुनघाटे बसले आहेत, त्यांना माझ्याजवळची खुर्ची द्या. ग्रेस यांचाच तो आदेश. एवढ्यामोठ्या थोर प्रतिभावंताने भर सभेत आपल्या जवळच्या खुर्चीत बसवून जो सन्मान केला, त्यामुळे सर्वांग रोमांचित झाले व मी गहीवरून गेलो. मी त्यांना म्हणालो, मी माझे जागी जाऊन बसू का ? त्यांनी माझेकडे दृष्टीक्षेप टाकला. त्याचा अर्थ तू येथेच बस असा होता.

मी ग्रेस यांना म्हणालो, या सभेत तुमची आवडती कविता सादर करण्याची संधी मला द्यावी. कवी ग्रेस यांचे काव्य बऱ्याच लोकांना दुर्बोध वाटते. पण ते दुर्बोध नसून कविता समजण्यास थोडाफार व्यासंग असण्याची कशी गरज आहे, असे बोलून त्यांचीच पुढील कविता सादर केली.

तुझा आला गे साजन
नको त्याचे पुढे जालू
त्याने यात्रेत पोरीला
दिले आकाशाचे बाहू
त्याला हात नाही वेडे
उभा अंधारी साजन
तिने जीव दिला तरी
त्यांनी वाहते पाण्याचे
इथे आणिले पैंजण

या कवितेच्या प्रत्येक ओळीचा मी अर्थ समजावून सांगितला आणि मी माझे जागेवर साहेबाजवळ जाऊन बसलो. एका सामान्य कार्यकर्त्याला भरसभेत ऐवढे मोठे सन्मानाचे स्थान देऊन त्यांनी माझ्या प्रतिभेला उजाळा दिला. कविवर्य ग्रेस आज गेले पण काव्यावर असामान्य प्रेम करणारा [illegible] कवीची प्रतिष्ठा कशी राखतो याची आठवण आली की डोळे भरून येतात. अशा असामान्य व्यक्ती परत होणे नाही.

सात आठ वर्षापूर्वी कवी मग एकदा [illegible] पत्रकार व इतर लोकांना बोलावू नका [illegible] नाखले यांनी सांगितले होते. [illegible] हृदय भरून आले. कवी ग्रेस [illegible] बातमी अखेर गावात [illegible] शेवटी. आम्ही दुपारी एक [illegible] हायस्कूलमध्ये पोहचलो. [illegible] वेळे होती. मी म्हणालो [illegible] बसू. पण कवी ग्रेस म्हणाले [illegible] त्या शाळेच्या [illegible] केले. त्यांचे हस्ते एक वृक्ष [illegible] म्हटलेल्या ओळी [illegible] दगडावर कोरून [illegible]


[illegible]
[illegible]

[illegible] अनौपचारिक [illegible] मला न [illegible] उल्लेख केला [illegible] कविता लिहिली आहे [illegible] असतांनाच ग्रेस म्हणाले [illegible] मी लिहिलेली छोटीशी कविता [illegible]

हे खोल [illegible]
[illegible]

• युगवाणी. जुलै ऑगस्ट सप्टेंबर [illegible]

अनुक्रमणिका



अनुक्रमणिका

जुलै - ऑगस्ट - सप्टेंबर २०१२

युगवाणी

।। ग्रेस विशेषांक ।।

मैत्र जीवाचें...!



छायाचित्र : सुरेश पारळकर, नागपूर

कवी ग्रेस आणि विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष मनोहर म्हैसाळकर

ग्रेस यांचे ललितबंध

डॉ. प्रभा गणोरकर

■

कवी ग्रेस यांचे 'चर्चबेल' (तिसरी आवृत्ती : २००८, पृ.१३१) 'मितवा' (दुसऱ्या आवृत्तीचे दुसरे पुनर्मुद्रण : २००८, पृ. २३५), 'संध्यामग्न पुरूषाची लक्षणे' (पुनर्मुद्रण : २००८, पृ. ३५५), 'मृगजळाचे बांधकाम' (पहिली आवृत्ती : २००३, पृ. १६६), 'कावळे उडाले स्वामी' (पहिली आवृत्ती : २०१०, पृष्ठे २०९), 'वाऱ्याने हलते रान' (पुनर्मुद्रण : २०१२, पृ. १२२), 'ओल्या वेळूची बासरी' (पहिली आवृत्ती २०१२, पृ. २८१) हे सात ललितबंधसंग्रह प्रकशित झालेले आहेत. १९७० पासून त्यांचे ललितगद्यलेखन सुरू झाले. गेल्या बेचाळीस वर्षांत हा जवळजवळ पंधराशेहून अधिक पृष्ठांचा मजकूर त्यांनी लिहिला, कविता वेगळी.

हे सर्व गद्यलेखन वेगाने फिरणाऱ्या चक्रासारखे वाटते. लेखकाचे अनुभवविश्व भावविश्व आणि विचारविश्व हे या चक्राचे तीन आस निर्मितीच्या आवर्तात गरगरताना जाणवतात, एकमेकांत मिसळून जातात, सुटे होतात. पुन्हा विलीन होतात. त्यांना अलग करून त्यांचे स्वरूप उलगडणे ही ग्रेसच्या कवितांचा अर्थ लावण्याइतकीच अवघड गोष्ट आहे. तरीही या लेखनामागची काही सूत्रे हाती येतात का हे पाहण्याचा हा प्रयत्न. तो तोकडा असणार आहे याची ही पूर्वकल्पना दिलेली बरी. तरीही या निमित्ताने ग्रेस यांच्या ललितलेखनाच्या काही वैशिष्ट्यांवर प्रकाश टाकता येतो का बघायचे.

॥ १ ॥

'चर्चबेल' (पहिली आवृत्ती : १९७४) हा ग्रेसच्या ललितबंधाचा पहिला संग्रह. 'अवलिया ताजुद्दीन आणि संगीतकार रोशन यांच्या पवित्र स्मृतीस' हा संग्रह अर्पण केलेला आहे. त्यानंतरच्या पुढच्या पृष्ठावर रवीन्द्रनाथ टागोरांचे एक अवतरण आहे. I cast my own shadow upon my path, because I have a lamp that has not been lighted... हे अवतरण आपल्याला पुढेही भेटते. हा या निर्मितीचा स्वभाव आहे. किंबहुना, 'चर्चबेल' मध्ये आलेली, सूचित झालेली अनेक आशयसूत्रे पुढच्या लेखनात पुनःपुन्हा आवर्तित होतात. 'चर्चबेल' हा एखाद्या चित्रकाराने चारकोलने आखलेल्या रेखाचित्रासारखा आहे. पुढच्या संग्रहांमध्ये रेषा, रंग आणि व्यक्तिमत्त्वाचे इतर विशेष भरले जातात. या सर्व सग्रहांमधून ग्रेस यांच्या जाणीव नेणीवेचा विस्तीर्ण प्रदेश दृग्गोचर होत जातो. अर्थात तो पूर्णपणे स्वच्छ, स्पष्ट दिसत नाही. कधी एखादा भाग, त्यावर लक्ष रोखल्याने जवळून पाहिला जाऊ शकतो. तो आपण जाणून घेत आहोत असे वाटते न वाटते तोच हा भाग मागे जातो आणि दूरची काही दृश्ये जवळ येतात.

शिवाय ग्रेस यांच्या ललितबंधात धूसरता तर जाणवतेच परंतु चांदण्यात वाऱ्याने झाडांच्या आकृती सतत रूप बदलताना दिसाव्यात तसे नेहमीचे लौकिक अनुभवही गूढ, बुंथी पांघरल्यासारखे वाटू लागतात.


ललितगद्य हे बव्हंशी स्मृतींवर विसंबून असते. प्रत्यक्ष घडून गेलेले प्रसंग, माणसे यांच्या स्मृती सुदूर बालपणापासून कालच्या वर्तमानापर्यंतच्या कित्येक वर्षांच्या कालपटातील अनेक, जिव्हारात खोल दडूनअसलेल्या या स्मृती हे ललित गद्याचे अंग असते. आत्मपरता आठवणींची त्वचा असते. परंतु ललित गद्य हे आत्मकथन नसते. लेखकाच्या आयुष्याची हळूहळू होत गेलेली घडण किंवा भोवतीच्या जगाचा इतिहास ही जशी आत्मकथनातून प्रकट होत जातात तशी ती ललित गद्यातून होत नाहीत. त्यामुळेच ग्रेस यांच्या या ललितबंधातून त्यांचे आत्मचरित्र हाती लागावे असे एखाद्या वाचकाचे कुतूहल असेल तर तसे होणे अशक्य आहे. किंबहुना तसे ते कुठेही हातात येऊ नये या पद्धतीनेच ग्रेस यांनी आपल्या लौकिक जीवनाचा तपशील दिलेला आहे. आई, तिला ते क्वचितच आई म्हणतात, - सुमित्रा, मधूनमधून डोकावते कारण ती त्यांच्या बालपणीच्या भावविश्वाचा एक अतूट धागा आहे. मिथिला, माधवी आणि राघव यांचे क्वचित उल्लेख आहेत कारण ती त्यांच्या वर्तमानात प्रत्यक्ष वावरत आहेत. ह्या प्रत्यक्षातील व्यक्ती या एवढ्याच, ज्यांच्याशी असणारे त्यांचे रक्ताचे नाते स्पष्ट होते. व्यक्तीच्या चरित्रात व्यक्ती येतात तशीच स्थळेही येतात. या ललितबंधातून आत्मचरित्राशी प्रत्यक्ष निगडित असे एकच खरे गाव आहे. वेल्होर - ते पुनःपुन्हा आठवते कारण त्याच्याशी ग्रेस यांच्या पत्नी, लीला यांचे आजारपण निगडित आहे. या आत्मचरित्रात्मक गोष्टींसंबधांतले इतर तपशील पुरवणे ग्रेस यांनी टाळलेले आहे. हे ललितबंध जाणीव नेणीवेचा विस्तृत प्रदेश दाखवतात असे आपण म्हणत असतो तरी नेणीवेचा प्रदेश अल्प आहे. जाणीवेचा प्रदेशही, त्यावर ग्रेस प्रकाश टाकतात, तो सारखा हलत ठेवल्याने पुरेसा स्पष्ट होत नाही आणि हे ग्रेस जाणीवपूर्वक करतात ! उलट या संदर्भात वाचकाचे कुतूहल शक्यतो पुरवायचे नाही हे ग्रेस यांनी हेतुतः ठरवलेले आहे. काही ललितबंधातून त्यांच्या वास्तव्याच्या ठिकाणांचे उल्लेख आहेत, उदाहरणार्थ, नार्मल साहेबांच्या क्वार्टरच्या आवारातले, मागच्या अंगणात आणि पुढच्या अंगणास औदुंबराची झाडे असणारे घर, ज्याच्याजवळच रेल्वेरूळ होते आणि त्यावरून जाणाऱ्या आगगाडीमुळे घराची तावदाने वाजत, नंतरचे एक क्वार्टर, अभिषेक पारंबी, शेवटी पंथविराम. याशिवाय दीनानाथ हॉस्पिटलमधले वास्तव्याचे ठिकाणही डोकावते. घरांचे उल्लेख आले तरी ती घरे, ज्या गावात होती, त्या गावाचे नाव (नागपूर) कुठेही येत नाही. तेही जाणीवपूर्वकच टाळलेले आहे. ग्रेस यांच्या या ललितबंधांत अनेक गोष्टी अनुभवाच्या आकृतीच्या भोवतीचे लौकिक तपशील, हेतुपूर्वक बाजूला ठेवलेले आहेत. त्यांचे रूप बदललेले आहे किंवा त्यांच्यावर धूसरतेचे अवगुंठन पसरून दिले आहे, अशा वाटतात. यात त्यांचा उद्देश काहीही असो पण उद्देश आहे हे नक्की.

॥ २ ॥

'चर्चबेल' पासूनच ग्रेस यांच्या ललितबंधाचा 'पॅटर्न', या लेखनाची प्रकृती आणि आकृती लक्षात येऊ लागते. या संग्रहातील चौतीस लेखांतून केरळ, वेल्लोर, हॉस्पिटल, मिथिला आणि माधवी यांनी मदत घेऊन केलेला स्वयंपाक - टेकडी, पंचशील टॉकीज, एवढेच लौकिक आणि स्थिर तपशील येतात, हे क्षीण तपशील आधाराला घेऊन लेखक जे इतर तपशील भरत एका बंधाला आकार देत जातो, ते इतर तपशील - १. सहचारी आठवणी, २. वेगवेगळ्या प्रकारची भावस्थिती, ३. लेखकाच्या मनातल्या व्यक्ती, ४. आनुषंगिक विचार वा चिंतन, ५. आनुषंगिक निसर्गचित्रे आणि ६. अन्य लेखकांची व स्वतःच्या कवितांची अवतरणे या सहा प्रकारच्या घटकांचा आधार घेऊन भरतो. हे घटक प्रत्येक ललितबंधात येतातच असे नव्हे, आलटून पालटून येतात. कमीअधिक प्रमाणात येतात. ग्रेसच्या ललितबंधाचा असा हा सुनिश्चित पॅटर्न आहे. आकृतिबंध आहे आणि 'चर्चबेल' पासून 'ओल्या वेळूची बासरी' पर्यंत तो बदललेला नाही. या घटकांचे प्रमाण पुढे पुढे वाढत गेलेले आहे त्यामुळे 'चर्चबेल'मधील ललितबंध जसे लहानखुरे आहेत तसे पुढचे नाहीत. नंतरच्या संग्रहातील ललितबंध या घटकांच्या अनेकविध फांद्यांच्या विस्ताराने आकाराने मोठे झालेले आहेत. हे सहा घटक ग्रेस यांच्या ललितबंधात कसे येतात हेही पाहाता येईल. एक मात्र खरे, हे सहाही घटक ललितबंधात वेढून घेताना ग्रेस यांच्या लोकविलक्षण भाषेचे अजब पोत या ललितबंधांचा पट विणीत जाते, त्यातून एक मोहमयी सृष्टी वाचकाच्या मनावर जादू करीत असते.

ग्रेस यांच्या ललितबंधाचा एक घटक म्हणजे त्यातला निसर्ग आणि त्या निसर्गाच्या भावस्थितीनुसार पालटणारे, आकार घेणारे स्वतः लेखकाचे 'मूडस्' निसर्गाच्या भावस्थितीनुसार रंग धारण करणारे लेखकाचे मूडस् 'संध्याकाळच्या कवितां'पासून ग्रेस यांच्या कवितेत सातत्याने दिसत आले आहेत. तोच प्रकार या ललितबंधांतही आढळतो.

अनुक्रमणिका





संध्याकाळ, पावसाळ्यातली, हिवाळ्यातली किंवा रोजची, बेसुमार पाऊस, संततधार पाऊस, कधी पहाडीतून, कधी पहाडांच्या मागून, कधी झाडांतून तर कधी गढीतून येणारा पाऊस, वैशाख, बर्फाच्छादित हिवाळा आणि हिवाळ्यातील थंडी अशा अनेकविध विभ्रमांसह निसर्ग या ललितबंधांमध्ये सारखा हेलकावत राहातो. विशेषतः 'संध्याकाळ' हे ग्रेस यांच्या उदास मनोवृत्ती ओथंबून आणणारे एक गहनगूढ तत्त्व आहे. 'संध्याकाळ'च्या संदर्भातली काही अवतरणे उदाहरणा दाखल देता येतील. 'मला तर सृजनाचे शील म्हणूनच संधिकाल माझ्या नियतीने मुक्रर करून दिला आहे...' 'देठातून, कळीतून की फूलातून, ही आजची जीवघेणी संध्याकाळ, बोलाफुलाच्या सद्‌गदित संवादासारखी माझ्या अंगावरून पडवीत उतरते आहे' 'आणखी एका हाकेने किंवा प्रार्थनेच्या एका चरणाने हा सूर्य मावळून जाईल आणि माझे दालन संध्यामाईच्या शोकाने भरून येईल...' 'प्रत्येक संध्याकाळीच मला रडू येईल असेच काही नाही. परंतु ऋतुपरिवर्तनातील संधिकालबाबत मात्र मी अशी हमी कधीच देऊ शकत नाही...' 'संधिकाल हा माझ्या निर्मिती प्रदेशाला शाप, अभिशाप आणि उःशाप या त्रिवेणी धारणेतून निसर्गाकडून मला मिळालेला माझा वाटा आहे...' 'मावळत्या, सरत्या सूर्याच्या दूरस्थ सहवासानेही मला उदासी तशीही घेरतच असते...' अशी अनेक अवतरणे, सतत सापडून देता येतील. संध्याकाळाप्रमाणेच हिवाळा, उन्हाळा आणि पावसाळा यांची अनेकानेक रूपे ग्रेस यांच्या भावविश्वांचे रंग बदलत असतात. ऋतुपरिवर्तनाच्या वेळीही उदासी घेरून येते, हिवाळ्याचे त्यांच्या निर्मितीशी 'प्राचीन सख्य' असते; बाहेरचे हवामान बरेचदा त्यांच्या 'आतल्या हवामानावर विपरीत परिणाम घडवून' आणते. ऋतू बदलताना त्यांना 'मानसिक क्लेश' भोगावे लागतात... 'अंतर्यामातील ओसाडीतून चित्रविचित्र भास होऊ' लागतात... पावसाळ्याचीही अनेक रूपे येथे आहेत. पावसाळ्यातले इंद्रधनुष्य, कडकडणाऱ्या, कोसळणाऱ्या विजा, शिवाय नद्या, समुद्र, बर्फाच्छादित शिखरे...

परंतु ही निसर्गवर्णने नाहीत. निसर्गाच्या सान्निध्यातल्या भावस्थिती त्यांच्याशी मिसळून गेल्या आहेत. निसर्गाप्रमाणे पक्षी, प्राणी, झाडे यांचे उल्लेख येतात. कावळे, घारी, खारी, मांजर, कुत्री, पोपट, मैना, बगळे, उंदीर, विंचू, मुंग्या, वाळवी, मोर, वटवाघुळे आणि त्यांची पिल्ले, घुबड - औदुंबर, बदाम, गुलाब, गुलमोहर, जाई, मोगरा - हे सारे मानवेतर सजीव विश्व सहज येत नाही. बहुधा त्यांच्याशी भीषण, अंगावर शहारा आणणाऱ्या सहजी न विसरता येणाऱ्या विचित्र चमत्कारिक घटना निगडीत आहेत. मानवी क्रौर्य आणि नैसर्गिक आपत्ती यांनी या ललितबंधांतील अनेक व्यक्तींप्रमाणेच हे मानवेतर विश्वही कुरतडलेले आहे. हेलपाटलेले आहे, अगतिकपणे नाश पावते आहे. ग्रेस यांचे शोकात्म जीवनभान सर्व जीवमात्रांवरूनही उदासपणे भिरभिरते आहे. ते त्यांना जितके विव्हळ करते तितकेच वाचकांनाही.

॥ ३ ॥

ग्रेस यांचे ललितबंध ही एक गजबजलेली सृष्टी आहे. आपल्या भोवतीच्या सृष्टीप्रमाणेच ती कोणत्याही सूत्रात बसत नाही. नियमात बसत नाही. तिचा अर्थ लागत नाही.

अनुक्रमणिका

सृष्टीतील घटकांमध्ये परस्परसंबंध नसतात, ती अस्तित्वात असते, दिसते पण तिचे आकलन होत नाही. जगातल्या सर्व संवेदनशील लेखकांप्रमाणे ग्रेस ही या सृष्टीमागचे सूत्र शोधण्याचा प्रयत्न करतात. तिचा अर्थ जाणून घेण्याची धडपड करतात. या सृष्टीत अनेक प्रकारच्या व्यक्ती आहेत. काही रक्ताच्या नात्याने आतड्याशी गुंतलेल्या. सुमित्रा, लिली, मिथिला, माधवी, राघव - काही तितक्याच जवळच्या सुभाष, रामदास, जी.ए., केशव, अनिल, सुनंदा अशा काही व्यक्तींचे उल्लेख वेळोवेळी येतात. काही निमित्ताने या जवळच्या व्यक्ती ललितबंधातील भावविश्वाच्या विखुरलेल्या तुकड्यात आरशातल्या आकृती प्रमाणे उतरतात. लिली (ऊर्फ लीला माटे - पूर्वाश्रमीच्या हे रहस्य अचानक उलगडले गेले आहे) त्यांचे आजारपण, त्यांचा मृदु स्वभाव, प्रगल्भता, त्यांचे समृद्ध, संवेदनशील मन, काही ललितबंधांत सहजच आलेल्या उल्लेखातून आपण तुकड्यातुकड्यांमधून त्यांचे व्यक्तिमत्त्व गोळा करतो. तसेच मिथिल, माधवी, राघव यांचेही क्वचित उल्लेख येतात. त्यांच्याशी निगडित अशा काही प्रसंगांचा ओझरता उल्लेख येतो. 'मितवा' या संग्रहात 'शिशिररंग' हा एक ललितबंध आहे. तो एका हळव्या, हळुवार अनुभूतीशी जुळलेला आहे. 'संध्याकाळ फार झपाट्याने येत होती. सावल्या झडत होत्या. काळोख चढत होता. गारवा झोंबत होता. घर अजून दूर होते. बहुधा अर्ध्यामुर्ध्या वाटेवर. घर बंद होते. मुली दाराशी घोटाळत असतील आणि दृष्टी रिती झाल्यावर समोरच्या झाडीच्या दिशेने डोळे सोडून देत असतील. शरीरात गारवा भरल्यावर त्यांना अधिकच आंधळेपण जाणवत असेल. भिरभिरून त्या कासावीस होत असतील... मुली पुन्हा रस्त्याकडे बघत असतील. मग तोच थकवा... मुली मग औदुंबराच्या पारावर गुडघ्यात खाली मान घालून बसल्या असतील. माझी वाट पाहात. मी वेगाने परततो आहे. घराकडे जळकंपनात भेदरलेली कमळे माझ्या अंतःकरणात सैरभैर झाल्यासारखी वाटतात...' हा कधीचा अनुभव आहे ? त्यावेळी राघव कुठे आहे ? मुलींची शाळा जवळ आहे की दूर ? ह्या सर्व तपशीलांना या अनुभवात स्थान नाही - तो मध्येच खंडित होतो. त्यानंतर अगदी वेगळ्या पातळीवर लेख भिरभिरू लगतो. भावानुभवच अचानक खंडित होतो. आपण मात्र मूळ अनुभवाच्या सूत्राशी अडकून पडलेले असतो. आई, चार लग्ने करणारे वडील किंवा मिथिला, माधवी, राघव ही मुले, याव्यतिरिक्त कदाचित जवळची दूरची इतर माणसे यांच्या विषयी ग्रेस विस्ताराने लिहीत नाहीत. मध्येच हाती आलेली सूत्रे तशीच ठेवतात. या सर्वांविषयी, जीवनातल्या लहानमोठ्या घटनांविषयी जर त्यांनी पद्धतशीरपणे लिहिले असते तर ते आत्मकथन झाले असते. ग्रेस यांना आत्मकथन लिहायचे नाही. त्यांना ललित गद्यच लिहायचे आहे. कवितेला जवळ असणारे ललित गद्य या ललित लेखनात अनेक कथात्म अनुभव येतात पण ग्रेसना कथा, कादंबरी, नाटक, खंडकाव्य लिहायचे नाही. आत्मकथन हा थोडासा अडचणीत टाकणारा प्रकार आहे. वाचक त्याच्याकडून प्रत्यक्षाची, वास्तवाची अपेक्षा करतो. ती अपेक्षा रास्तपणे पूर्ण करणे हे आत्मकथनाचे ब्रीद असते. पण त्यामुळेच आत्मकथन 'ललित साहित्य' प्रकाराच्या व्याख्येत बसत नाही. कारण तेथे निर्मिती नाही. सर्जनशीलतेला वाव नाही. प्रत्यक्ष घटितांच्या मांडणीचे कौशल्य एवढीच माफक अपेक्षा आहे. ग्रेस यांच्या प्रकृतीत ते बसणारे नाही. ग्रेस हे प्रतिभावंत कवी. सर्जनशीलता हा त्यांचा स्थायी स्वभाव. कवितेत न सामावणारे अनुभव पुनर्निर्मितीचा संभव धारण करणारे, त्यासाठी आतुर असे अनुभव व्यक्त करण्यासाठी त्यांनी कवितेला जवळचा असणारा रूपबंध निवडला आहे. कवितेप्रमाणेच अभिव्यक्तीच्या आत्यंतिक, अनावर अशा निकडीतून हे ललितबंध अवतरले आहेत.

ग्रेस यांच्या या ललितबंधातून निर्मिती संबंधी, स्वतःच्या काव्यनिर्मिती संबंधी आणि निर्मितिप्रक्रियेसंबंधी ठिकठिकाणी चिंतन केलेले आढळते. पण ते तुटक, जाताजाता केलेले आणि प्रसंगोपात्त आहे. त्यामागे कोणतेही सलग साहित्यशास्त्रीय, सैद्धांतिक सूत्र नाही. खूद्द स्वतः ग्रेस यांच्या निर्मितीविषयी देखील या चिंतनातून काही बोलता येईल असे नाही. ग्रेस यांच्या निर्मितीप्रमाणेच त्यांचे निर्मितीविषयीचे बोलणे, संदिग्ध - जवळजवळ अमूर्त - आहे. 'निर्मात्याच्या अनुभव तुकड्यांचे उलणे, उलत जाणे, तडकत जाणे आणि भंगून तडकल्यावर एक नवेच नवे, अटळ स्वरूप, नवी रूपसिद्धी जन्माला येणे' (ही निर्मितिप्रक्रिया मला स्वतःला तरी कलाकृतीच्या निर्मितिप्रक्रियेवर प्रकाश टाकणारी न वाटता, गुलमोहराच्या किंवा अमलताशाच्या शेंगेत दडलेल्या बी पासून त्याचे झाड होण्याची प्रक्रिया वाटली!) पुढे ते म्हणतात, 'तीही कशी ? कोणत्या अनोख्या प्रक्रियेने ? अगदी एखाद्या अनुभवाचे सर्व तुकडे आपण अतीव साहसाने, अतीव करूणेने' दोन्ही हातांच्या थर्थर ओंजळीत गोळा करावेत... ती ओंजळ दिव्य अदमासाने मस्तकाच्या वर ललाटलिळेने उचलून धरावी आणि खळ्कन ओंजळीतील सर्व तुकडे अकस्मात, खाली, फरशीवर निखळून पडावेत सर तुटलेल्या मोत्यांच्या माळेसारखे ! ते मोती, ते तुकडे गोळा करण्यासाठी आपण खाली वाकावे आणि ते तुकडे, मंत्रभारांचे ऐवज, सर तुटलेले अस्ताव्यस्त मोती चमत्काराप्रमाणे उसळून वर, एक नवेच थक्क शिल्प उभे

अनुक्रमणिका

करून उभे ठाकावे...' (मृगजळाचे बांधकाम,पृ.४७) अनुभवाच्या पुनर्निर्मितीची ही प्रक्रिया अद्भूत दैवी आणि अनाकलनीय आहे असे ग्रेस यांना सुचवायचे आहे. निर्मितीप्रक्रियेविषयी, स्वतःच्या काव्यनिर्मितीविषयी ग्रेस यांनी वारंवार चिंतन केले आहे. (सविस्तर अवतरणांसाठी पाहा 'मृगजळाचे बांधकाम': पृ. ४३-४४, पृ. ८७, ११८, १६४, 'मितवा': पृ. १७६, १९६, 'संध्यामग्न पुरूषाची लक्षणे': पृ. २९१, इत्यादि.) 'कलवंताची निर्मितीप्रक्रियाही आतून केवढी घनदाट, व्यामिश्र आणि आततायी असते याचा अदमासच घेता येत नाही...', 'निर्मितीचा विश्वप्रदेश कितपत तुम्हाला सापडेल हे त्या त्या कलावंताच्या भावानुभूतीच्या अदमास आवाक्यावर अवलंबून असते. आणि त्यावरूनच कलावंताच्या परी, परिमिती आणि परिमाणे निश्चित होत असतात...' '(निर्मितिप्रक्रियेचे) स्वतःचेच, अनंत ताऱ्यांच्या भ्रमणगतीचे, स्वतःचेच अंतरिक्ष असते. तिथे पद्यबंधातील आकृती आणि आकृतीतील पद्यबंध यांची मिती मोजता येत नाही, तशीच ती शोधताही येत नाही...' अशा अनेक अवतरणांतून निर्मिती, पुनर्निर्मिती, कलाकृतीचे कलाकृतीपण यासंबंधी ग्रेस सतत विचार करीत होते हे लक्षात येते. या विचारप्रक्रियेचाच एक भाग म्हणजे त्यांच्या मनाच्या खोल तळघरात कायमच्या वास्तव्यास आलेल्या काही कलाकृतींचे त्यांनी केलेले विश्लेषण. टॉल्स्टॉयची 'ॲना कॅरेनिना', स्टीफन झ्वाइगची 'अ लेटर फ्रॉम ॲन अननोन वुमन', हरमान हेसची 'सिद्धार्थ', शरच्चंद्र चट्टोपाध्यायांची 'देवदास', एमिली ब्रॉन्टेची 'वुदरिंग हाइट्स', बालकवींची 'औदुंबर', बॉदलेयरची 'व्होयाज' किंवा श्री ज्ञानेश्वरांची 'ज्ञानेश्वरी', रामदासांचे 'करूणाष्टक' अशा अनेक कलाकृतींचे संदर्भ त्यांच्या या संग्रहांत सतत येत राहातात. या कलावंतांशी, त्यांचे, स्वतः कलावंत या नात्याने आंतरिक नाते आहेच. पण त्यांच्या कलाकृतींनी त्यांच्यासमोर मानवी स्वभावाची, वर्तनाची, मानवी मनाची असंख्य कोडी, उभी केली आहेत. या प्रतिभावंतांच्या कलाकृतीतील जीवनदर्शनाने त्यांना ढवळून काढले आहे. यात केवळ साहित्यिक, कादंबरीकार, कथाकार, कवीच नाहीत तर व्हिन्सेन्ट व्हॅन गो, पॉल गॉग्रीन रेम्ब्राँ असे चित्रकारही आहेत. सृजनशीलतेचा आणखी एक आविष्कार म्हणजे चित्रपट. 'देवदास', 'डॉ. झिवॅगो', 'इझाडोरा', 'हिरोशिमा माय लव्ह', 'नायगारा', 'लीजंड ऑफ द लॉस्ट' अशा एकेकाळी गाजलेल्या अनेक चित्रपटांचे संदर्भ त्यांच्या या ललितबंधात पुनःपुन्हा डोकावतात.

परंतु श्रेष्ठ साहित्यकारांच्या कथा, कादंबऱ्या, कविता, काही उत्कृष्ट चित्रपट हे ग्रेस यांच्या समग्र भावविश्वाचे गाभाघटक नाहीत. ते पूरक संदर्भ आहेत. त्यांनी या ललितबंधांची समृद्धता आणि खोली वाढविली आहे. तथापि याच कलावंतांच्या याच कलाकृतीचे संदर्भ ग्रेस यांच्या लेखनात वारंवार का डोकावतात याचाही विचार करता येतो व काहीसे दुरान्वयी सूत्रही शोधता येते.

ग्रेस यांच्या प्रतिभेच्या कक्षेत वासना आणि मृत्यू या दोन गोष्टी केंद्रस्थानी आहेत. एवढेच नव्हे तर या दोन्हींशी निगडीत असणाऱ्या शोकसंवेदनेचे त्यांना विलक्षण आकर्षण आहे. ज्योतीसारखे त्यांना या अद्भुत आणि भयप्रद जीवनवास्तवाचे आकर्षण आहे. ते ज्योतींवर पतंगासारखे धडका मारतात आणि होरपळून घेतात , घायाळ होतात. या दोन गोष्टींशी निगडित असलेल्या अनुभवांचे या सर्व ललितबंधसंग्रहांतील प्रमाण लक्षात घेण्यासारखे आहे. त्यांची सुरूबातही 'चर्चबेल' पासूनच झाली आहे. 'चर्चबेल' मधल्या पहिल्याच ललितबंधातील पहिल्याच वाक्यात नेपाली, एलीस, नारायणी आणि फादर ग्रीन यांच्या मृत्यूचे उल्लेख आहेत. विशेष म्हणजे हे सर्व मृत्यू अनैसर्गिक आहेत. अपघात, आत्मघात, हत्या या प्रकारच्या जीवनाच्या अखेरीचे उल्लेख या लेखांत पुष्कळदा येतात. 'चर्चबेल' मध्येच 'मनी सुखिया' (कंदिल) 'ती' (बाहुलीचा मृत्यू) 'एलिनॉर बर्टन' (वेल्लोर हॉस्पिटल...) 'सखी'नावाचे मांजर (ज्यासी आपंगिता नाही) थोरल्या महाराजांची दाई 'कॅथेराईन' (एक ऑस्ट्रेलियन स्वगत) याशिवाय हेमिंग्वे आणि मर्लिन मन्रो - इतके उल्लेख येतात. अनैसर्गिक मृत्यूप्रमाणेच 'मृगजळाचे बांधकाम' मधल्या राधा (पृ.१५०-५१), छल्ली, राखी, सुरंगी (पृ.७६), राधारमण गोसाव्याच्या दोन मुली (पृ.१०३), जगन्नाथ जोगी / धानी (पृ.१२४), घोरपडीच्या कातड्यावर बोटे आदळणारा अहीरस्वामी आणि चंदा वैरागीण (पृ.१५), 'मितवा'तील फुंलवनिया (पृ.५३) गझाला, सिद्धी आणि रॉबर्ट (पृ.५९-६०) सर्वच संग्रहांतून अशा रौद्र, भीषण, शोकात्म दंतकथा शोधून दाखवता येतील. याबाबतील जी. ए. खानोलकर आणि ग्रेस यांची जातकुळी एकच आहे म्हणता येईल. या प्रकारचे अनुभव व्यक्त करण्यासाठी जी. ए. नी कथा तर खानोलकरांनी कादंबरी आणि कथा. काही प्रमाणात कविता आणि ग्रेसनी कविता आणि त्याहूनही अधिक असा ललितबंध हे रूपबंध स्वीकारले. ग्रेस यांच्या ललितबंधाचे घटक आपण पाहातो आहोत. निसर्गाशी निगडित भावाऽवस्था, आठवणी, यांच्या बरोबरच, ज्यांना ते स्वतःच 'दंतकथा' म्हणतात अशा काही स्मरणातल्या व्यक्तीसंबंधीच्या कहाण्या, हा त्यांच्या ललितबंधाचा अतूट (व आवश्यकही!) भाग आहे. हा घटकही 'चर्चबेल' पासूनच आस्तित्वात आहे. त्यात पल्लवी, नेपाली,





देवी, विधवा राजम्मा, मनिसुखिया, तांदूळ मोजणाऱ्या सुभद्रा-जानकी आणि त्यांचा बाप चंद्रम, एलिनॉर बर्टन - अशा अनेकांच्या छोट्या छोट्या कहाण्या येतात. पुढच्या संग्रहांतही अशा अनेक कहाण्या आहेत. त्या परिपूर्ण नसतातच. किंबहुना त्यांचे अंशतः केलेले आणि पुढच्या कोणत्यातरी ललितबंधात सोडून दिलेले तुकडे असेही स्वरूप आहे. उदा. 'चर्चबेल' मधील नारायणी, फादर ग्रीन, एलिनॉर यांचे उल्लेख 'मितवा', 'मृगजळाचे बांधकाम' मध्येही आढळतात. 'मितवा'तली जोन्स पुढे कुठेतरी पुन्हा डोकावते तशीच गौरीही...

वर उल्लेख केल्याप्रमाणे या दंतकथांचे अनेक तुकडे या ललितबंधांमध्ये सर्वत्र विखुरलेले आहेत. ते क्वचितच सलग आणि संपूर्ण आहेत.

या दंतकथांनी ग्रेस यांचे भावविश्व जसे व्यापलेले आहेत तसेच ते काही कलाकृतींनी व कलावंतांनीही व्यापलेले आहेत. श्रीचक्रधर (दृष्टांतपाठ), श्रीज्ञानदेव (ज्ञानेश्वरी), श्रीरामदास (करूणाष्टके), नामदेव, तुकाराम, टॉलस्टॉय (ॲना कॅरोनिना), रवीन्द्रनाथ, मीरा, बालकवी, स्टीफन झ्वाइग (अ लेटर कॉम ॲन अननोन वुमन), एमिली ब्रॉन्टे (वुदरिंग हाइटस्), एमिली डिकन्सन, गालिब, सिल्विया प्लाथ (डॅडी ही कविता), बॉदलेयर, राइनर मारिआ रिल्के या दोघांना तर ते आपले सहोदरच मानतात. दंतकथांमध्ये जसे त्या व्यक्तींच्या आयुष्याच्या शोकात्मिकांच्या काचा आढळतता, तशाच या कलावंतांच्या आयुष्यातले शोकगर्भ अंश या ललितबंधात गुंफले जातात. शरच्चंद्र चट्टोपाध्यायांची 'देवदास' ही कृती आणि तिच्यातली देवदास, पार्वती, चुन्नीबाबू आणि चंद्रमुखी ही पात्रे, टॉलस्टॉयची 'ॲना' तसेच त्याच्या 'फादर सर्जियस' या कथेतही माकोव्हकिना आणि फादर, 'रेझरेक्शन' मधली मास्लोव्हा, इसाडोरा डंकन, अशा अनेक कलाकृतींमधल्या विलक्षण व्यक्ती आणि त्यांच्याशी निगडित कथाभाग हेही या ललितबंधाचा मोठा भाग व्यापणारे अंश आहेत.

अनेक प्रतिभावंतांच्या काव्याची अवतरणे या ललितबंधात विखुरली आहेत. चक्रधर, ज्ञानेश्वर, रामदासांपासून गालिब सारखे उर्दू कवी, रिल्के, बॉदलेयर, सिल्विया प्लाथ पर्यंतचे अनेक पाश्चात्य कवी ग्रेस यांच्या आंतरिक विश्वात वसती करून आहेत. या ललितबंधांच्या पानोपानी, अक्षरशः शेकडो ओळी विखुरलेल्या आहेत. ग्रेस यांची वाङ्मयासक्ती, काव्याभिरूची, वाचन, अवतरणे अचूक ठिकाणी वापरण्यातली अंतःप्रेरणा आणि उत्स्फूर्तता यांना आपण सतत दाद देत राहातो. पण त्याचवेळी, ग्रेस यांचे लेखन शेजारी असताना जाणवून जाते की हे एकही अवतरण, हे काव्य, संदर्भशून्य, दुर्बोध नाही ! नितळ आशय पारदर्शीपणे थेट व्यक्त करणारे आहे, त्यातल्या अर्थात सुसंबद्धता आहे. ती वाचत असताना आपण गोंधळून जात नाही आणि त्यातला आशय समजून घेण्यासाठी आपल्याला इकडेतिकडे शोधाशोधही करावी लागत नाही. अत्यंत सुंदर आणि आपली जीवनजाणीव समृद्ध करणारे हे काव्य आहे. ही कवितांची अवतरणे या ललितबंधातली तत्त्वचिंतनाची गरज सहजच पूर्ण करणारीही आहेत. ही अवतरणे आपला अधिक ताबा घेतात.

ग्रेस यांच्या ललितबंधाचा रूपबंध घडवणारे सर्व घटक सुटे सुटे येत नाहीत. ते सर्व घटक एका अलौकिक, अबोध

पातळीवर सरमिसळले जातात. एकात एक घुसळून येताना त्यांचे प्रमाण कमीअधिक होते. या मिश्रणाच्या प्रक्रियेची संगती तर्काच्या पातळीवर लावता येणे अशक्यच असते. या घुसळणीनंतर जे रसायन तयार होते ते एकमेव, अद्वितीय असते, विलक्षण आकर्षक असते. खेचक, भूल पाडणारे असते. ग्रेस यांच्या लेखनाने अनेक वाचक झपाटून जातात. याचे रहस्य या अनावर आवेगाने कोसळणाऱ्या आंतरिक स्रोतातून गती घेणाऱ्या या रसायनात आहे. त्याचे अनुकरण अनेकांनी करून पाहिले आहे पण ते लेखन किती आणि कसे शबल आहे हे आपण पाहिलेच आहे. ग्रेस यांच्या शैलीचेही आकर्षण अनेकांना आहे. तथापि ही शैली देखील अनुकरणीय नाही. ग्रेस यांच्यासारखे लेखन करणाऱ्यांवर त्यांचा फक्त प्रभाव आहे आणि त्यापोटी आलेले ते अनुकरण आहे. ग्रेस यांची परंपरा असू शकत नाहीत. या अर्थाने तर ग्रेस स्वतःला 'अनुवंश नसणारा' समजत नसतील ना ?

येथेच ग्रेस यांच्या भाषेबद्दलही थोडे सांगता येईल. या ललितबंधांमध्ये ते दोन मराठी आणि तितक्याच हुकुमतीने इंग्रजी भाषाही वापरतात. त्यांच्या भाषेला उत्स्फूर्त आवेग असतो. अनेक विलक्षण प्रतिमांचा संघात त्यांच्या भाषेत एकत्रितपणे अवतरतो. त्या प्रतिमांचा उद्‌गम अनेक घटनांशी, आठवणींशी भिडलेला असतो. ग्रेस यांनी आपल्या काही कवितांची मुळे शोधण्याचा प्रयत्न केलेला आहे. अर्थही लावून पाहिला आहे. त्यातून काही प्रतिमांची संगती व सूत्रे शोधता येतात. एरवी, आपली निर्मितीप्रक्रिया जटिल आहे याची कबुली स्वतः ग्रेस यांनी दिलेली आहेच. तिचा आधार घेऊन स्वस्थ राहावे. 'माझ्या शब्दमयी, शब्दवेल्हाळ अर्थ काढून कवितेवर दुर्बोधतेचा आरोप केला जातो' असे ग्रेस यांनी नमुद केले आहे. तोच आरोप त्यांच्या ललितबंधांवरही करता येईल तर त्यासंबंधी ग्रेस काय म्हणाले असते ?

॥ ४ ॥

जीवनातील तृष्णा, वासना, क्रौर्य, करूणा आणि दुःख या संवेदना उत्कटपणे व्यक्त करणाऱ्या कलावंतांच्या कलाकृतींनी ग्रेस यांचे भावविश्व व्यापून टाकलेले आहे. वर उल्लेखिलेल्या कलाकृतींमध्ये रामायण आणि महाभारत यांचाही समावेश होतो.

तृष्णा, वासना, क्रौर्य, कारूण्य, दुःख यांचा वाटा स्त्रियांच्या पदरात अधिक येतो हेही ग्रेस यांच्या ललितबंधांतील आशयामागचे एक सूत्र आहे. विशेषतः अजाण, कोवळ्या मुली, जसे शेख हमीदच्या वासनेच्या रोजच बळी ठरणाऱ्या फरिदा, आयेशा, मुनेरा या तीन स्त्रिया आहेत तसेच त्याच्या धानी, परवीन, रंगेली यांच्याही वाट्याला बापाच्या वासनेखाली चिरडलेली गुलाब वाळवण्याचे भागधेय आहेच. 'तांदूळ मोजणाऱ्या मुली' (चर्चबेल) बापाच्या क्रौर्याच्याच बळी आहेत. ऊर्मिला, सोनुली, इनोसंट एलिस, नारायणी, शकुंतला, कजरी, बानी, मार्था... मृत्यूची करूणभीषण रूपे. आत्महत्या, हत्या, सर्पदंश, कड्यावरून स्वतःला लोटून घेणे, अनेक प्रकार. यातच सीता, द्रौपदी, सिल्विया प्लाथ, मर्लिन मन्रो येऊन मिळतात. यांची सुरूवात नको असलेल्या शरीरसंबंधानंतर भर दुपारच्या वैशाखउन्हात स्वतःला विवस्त्र करणारी 'सुमित्रा' हिच्यापासून तर झाली नसेल ? या सर्व स्त्रियांच्या कहाण्यांमागे शोक आणि त्याच्याशी अतुटपणे जुळलेली असणारी करूणा हे दोन्ही भाव उत्कटपणे आतूनच एकवटलेले असतात, विशेष म्हणजे त्यासंबंधी काहीही भाष्य नसते. कलावंताची तटस्थता आणि शोकात्म जीवनदर्शन घडवताना अलिप्त राहू शकणारी थंड, संयत वृत्ती या ललितबंधांमधून व्यक्त होत राहाते. वाचकाला मात्र या जीवनदर्शनाने कासावीस झाल्यासारखे वाटते. गुदमरल्यासारखे होते. शोकात्म अनुभूतीने जाणवणारे भय आणि कारूण्य यांनी तो भारून, गलबलून जातो. ग्रेस यांच्या ललितबंधांमधून आदिम पातळ्यांवर जगणारी माणसे, स्त्रिया आणि पुरूष येतात शिवाय फकीर, चर्च, पियानो, चर्चबेल, प्रीस्ट आदिवासी अशा तपशिलांनी उभे होणारे एक अपरिचित विश्वही येते. त्यामुळे हे सर्व ललितबंध वाचकाला अभिमंत्रित करतात. नकोशा वाटणाऱ्या दुनियेतील स्त्रीपुरूषांचे गूढ अनोखे जग आणि त्या जगातले क्रौर्य नाट्य वाचकाला खेचून घेत राहाते. 'कावळे उडाले स्वामी' या संग्रहातील राजघराण्याचे स्मशान, धडगी, देवळे, स्मशानबाग, त्या परिसरात होणारी रेड्यांची कत्तल अशा वातावरणातील दंतकथा मुळातून वाचण्यासारख्या आहेत. या साऱ्या वातावरणात, भिरभिरणारा वारा, पाऊस, काळोख, सतीचा सांगाडा आणि त्यावर ठेवलेल्या दगडातून उमटलेले हुंदके - हे तपशील भय आणि गूढाच्या विळख्यांनी लपेटून घेणारे आहेत. ग्रेस यांच्या या वर्णनाला चित्रपटातील दृश्यात्मकतेचे परिमाण मिळालेले आहे.

ग्रेस यांच्या ललितबंधातील दंतकथांमधून अनेक स्त्रियांच्या शोकमग्न आयुष्यांचे संदर्भ दिसतात त्यांच्याकडे यापूर्वी लक्ष वेधले आहेच. त्याशिवाय अनेक प्रिय स्त्रियांचा रहस्यमय वावर अनेक ललितबंधांत असतो. याची सुरूवात 'चर्चबेल' पासूनच दिसते, पण तेथे त्या सावल्या धूसर आहेत. 'चर्चबेल' नंतर 'मितवा' हा संग्रह सुमारे पंधरा वर्षांनी प्रकाशित झाला. 'मितवा' पासून विलक्षण नावे असणाऱ्या अनेक

अनुक्रमणिका

स्त्रियांनी त्यांच्या उल्लेखांना, त्यांच्याशी असणाऱ्या सान्निध्याच्या, सहवासाच्या, शारीर नात्यांच्या, भावनिक जवळीकीच्या संदर्भांनी, त्यांच्या कधी स्पष्ट कधी धूसर आस्तित्वछायांनी ग्रेस यांचे संपूर्ण लेखन भरून गेलेले आढळते. 'मितवा' (१९८७) या संग्रहाची अर्पणपत्रिका या प्रकारची थेट सुरूवात आहे. 'मागधी'चा प्रथम उल्लेख येथे प्रथम आढळतो. ही 'मागधी', 'स्त्रग्धरा', 'शिराणी' या नावांखाली प्रश्नांकित झाल्याचाही उल्लेख येथेच आहे. (आपणही या तीनही नावांखाली प्रश्नांकित होतो असे खवचटपणे कोणाला म्हणता येईल पण येथे ते असभ्यपणाचे ठरू शकते.) यानंतर, बानी, रेऊ, नंदिनी, अनू, हिमानी, 'ही' (संध्याकाळची प्रेयसी), 'ती' (ती, पाचोळा आणि सिस्टर करोल) भावजयी, सारथी, विराणी, 'ती' (शेवंतीच्या फुलाची साधी आठवण), प्रांजला, अंजनी, गौरी, स्त्रग्धरा, 'तू' (प्रयाणचाराची खाडी) 'बेगम' रूक्मिणी, करूणा सांध्यपाणी... 'मितवा' या एका संग्रहात उल्लेखिल्या गेलेल्या या स्त्रिया आहेत. प्रत्यक्षातल्या. त्याशिवाय, बिंदी, आत्या, द्रौपदी, तिची मुलगी चंद्री, कौसल्या अय्यर, सोनुली, ऊर्मिला, एलिस, नारायणी, फुलबनिया, गझाला, सिद्धी, जुई, कजरी, उमा, सिस्टर करोल, देवलीना आणि रेणुलीना, भावजयी, मालविका जोन्स, प्रणाली, यासंस्मरणात साठलेल्या स्त्रिया आहेत आणि ॲना कॅरेनिना, कॅटरिना मास्लोव्हा, इसाडोरा या साहित्यातील सोबतिणी आहेतच.

'संध्यामग्न पुरूषाची लक्षणे' या तिसऱ्या संग्रहातले स्त्रियांचे उल्लेख अधिक विशिष्ट आहेत. त्यांची व्यक्तिमत्त्वे अधिक उजळ आहेत त्यांच्याशी स्थळांचे संदर्भ स्पष्टपणे निगडित आहेत. या स्त्रिया, समर्पणशील आहेत. रसिक आहेत इंग्रजी बंगाली वाङ्मयाशी परिचित आहेत. ग्रेस यांनी, या स्त्रियांशी असणारे अनुबंध व्यक्त करताना त्यातले शारीर जवळिकीचे उल्लेख टाळलेले नाहीत. किंबहुना तसे टाळण्याची आपल्याला गरज वाटत नाही असा काहीसा आविर्भाव जाणवतो. परंतु अनू स्त्रग्धरा, मागधी, वेणू, सारथी, शिराणी, अंजनी या प्रकारची नावे लेखकाला रहस्यमय बुंधीची गरज असल्याचे स्पष्ट करतात. 'संध्यामग्न पुरूषाची लक्षणे' या संग्रहात स्त्रीपुरूषसंबंधांची विलक्षण रूपे येतात. तेथे या नात्यांच्या अनेक छटा प्रकट झालेल्या आहेत. वाचक त्यामुळे चकित होतो., त्यात गुंतून जातो. या विवेचनाला पूरक म्हणून काही अवतरणे पाहा : 'गंगेच्या ऐलतीरावर उभी राहून माझा एखादा अवयव तोडावा तशी माझ्या कवितेची ओळ तोडून प्रश्नचूर ललकारीचे अर्ध्यदान... तर पैलतीरावरून मुळूमुळू रडत - माझ्या दुसऱ्या ओळीतील एकेका चिंधीचा सलील शोक गंगेच्या स्वाधीन करते वेणू !' (पृ. ५) 'मागधीचे संवेदन मला भोवळ आणते. वेणूचे संवेदन चटका देते... दोघींच्याही अनुभवांचा आघात, स्पर्शाघात जात्यात धान्य चिरडत जाणाऱ्या ओवीच्या वृत्तछंदासारखा आहे' (पृ. ३१) वेणू आणि मागधीचे संदर्भ पुढेही सतत आहेतच (पृ. ७३, १२३, १४९) असे अनेक ठिकाणी 'आम्ही वेरावळ सोडले मी आणि मागधीने मिळून सोडले... गर्द मिठी, गर्द आलिंगने, सुकुमार चुंबनांचे, झरझरते स्निग्ध अभिसार वेचून वेचून मनाचिये गुंती लगडून ठेवलेत...' (पृ. १२३) याप्रमाणे. परंतु स्त्रीपुरूष संबंधाचे काहीएक तत्त्वज्ञानही ग्रेस यांनी 'मितवा'त आणखी इतरत्रही सांगून ठेवले आहे. ग्रेस यांच्या जाणीवेत 'संभोगसुखाने देहावर दुःख पसरते' - हे सामावले आहे त्याचे कारण 'सुमित्रा' हे असावे. अंगसंगाचा उल्लेख त्यांनी 'लघुमरण' असाही केला आहे. स्त्री पुरूषांच्या आकर्षणातले काही पेचही 'संध्यामग्न...'मध्ये दिसतात. सारथी ही स्रग्धरेची 'कूसउजवणी' - मुलगी. आपल्या आईचा पुरूष तिला 'तिचापुरूष' वाटू लागतो. 'शिराणी अशीच एकदा हंबरडा फोडत एका संध्याकाळी मला येऊन बिलगली होती. आता तरी मला तुझ्यात सामावून घे रे... मी बेभान होऊन म्हणालो, एकतर माझी प्रेयसी हो, नाहीतर सून तरी' (हे पेच कसे सुटेल?) (पृ. ४२ - ४३) ग्रेस स्त्रीपुरूष संबंधाविषयी वारंवार बोलतात. त्याचे सूचक उल्लेख करतात. त्यातला आकांत व्यक्त करतात. मागधी जवळ नसतानाचा आर्त क्षण, वेणूने ते दुःख समजून घेणे, साऊलने केलेला देहत्याग असे अनेक संदर्भांचे आवर्त या लेखनात सतत गरगरत असतात. या स्त्रियांविषयीची अनुरक्ती, आसक्ती, रती, सख्य, ममत्त्व क्वचित त्यांच्या अबोल्याने बदलत्या लहरींनी अस्वस्थ होणे, त्यांच्या वियोगाने निर्माण होणारी हुरहूर, आठवणींचे काहूर अशा अनेकविध छटांनी हे सर्वच ललितबंध विभोर आहेत. साऊलने केलेल्या 'देहत्यागा'चे दुःखही अनेक ठिकाणी व्यक्त होते. ग्रेस यांचे झपाटलेपण त्यांतून बिंबित होते. या शारीरिक - मानसिक आकर्षणाविषयीचे इतर संदर्भही ग्रेस मग लेखनात ओवीत जातात. टॉलस्टॉयची ॲना कॅरेनिना, देवदास, पारो, चंद्रमुखी यांचे नाते, रिल्केच्या प्रेमकविता आणि त्याचे स्त्रीविषयक आकर्षण, व्हॅन गो चे वेश्येला स्वतःचा कान कापून देणे, स्त्रियांचा समर्पणभाव, ही सारी कूटे मनात वारंवार पिंगा घालत जातात. ग्रेस स्त्री आणि निर्मिती यांच्यातील साम्य ही शोधू पाहतात. 'स्त्री अनेक गूढांची जशी खाण आहे तशी, षड्रिपूंच्या मायाजाळातील मोहकुळांची ती अनभिषिक्त महाराणीही आहे. त्यामुळे तिचे स्खलन आणि उत्थापन कलाकृतीच्या अपर्यायी स्खलन आणि उत्थापनासारखेच

अनुक्रमणिका

असते' (मृगजळाचे बांधकाम : १६५)

ग्रेस यांनी या ललितबंधांत प्रकट केलेले शरीरसंबंधाविषयीचे वैयक्तिक अनुभव अगदी कमालीचे 'खाजगी' अनुभव म्हणता येतील. तथापि एक नक्की आहे. ग्रेस यांची स्त्रीपुरूषसंबंधासंबंधीची भूमिका संपूर्णपणे ननैतिक (a moral) आहे.


या ललितबंधाची आणखीही एक धाटणी आहे. स्त्रीमुखी रूपबंध ही तऱ्हाही 'चर्चबेल'पासून अवतरली आहे. 'चर्चबेल'मध्ये 'उरलेला चंद्र' हा ललितलेख स्त्रीचा भावाविष्कार आहे. 'इथे मी माझ्या अपेक्षेपेक्षा खूपच रमले' अशी सुरूवात करून नंतर ग्रेसच्या लेखनाची इतर वैशिष्ट्ये लेखात येतात. अनेकविध व्यक्तिनामांची पेरणी येथे 'पालघाट' या गावाचा आणि विराणी भट्टाचार्य या नावाचा उल्लेख आहे. हे दोन्ही उल्लेख पुढे ग्रेसच्या ललितबंधात येतात. येथे ही व्युत्पन्न स्त्री 'यामा'तील विस्तृत अवतरण देऊन पत्र संपवते. 'संध्यामग्न पुरषाची लक्षणे'मध्ये 'सखीच्या पत्रातील संधिकाल' (पृ. २५) तेही 'कवी'लाच लिहिलेले आहे. ग्रेस यांच्या या आत्मीय स्त्रिया कवित्त्वाचा, कविता लेखनाचा सन्मान करतात. कवीला 'कविराज' असे आदरेखून संबोधितात. प्रस्तुत पत्र हे उघडच प्रेमपत्र आहे. आपल्या ओळखीच्या झालेल्या पण अनामिक राहावेसे वाटणाऱ्या त्या स्त्रीचे ग्रेसचे काही ललितबंध वेणू, मागधी, स्त्रग्धरा यांना उद्देशून लिहिलेले आहेत. 'एकट वाळवीचे खिन्न स्वगत (पृ.१९१) ची सुरूवात कोसळतीच्या क्षणाला मी रवीन्द्रनाथांचा नेहमीच आधार घेते' अशी आहे. हीही काव्यासक्त उत्कट, मनस्वी स्त्री आहे. एका तपाहूनही जास्त काळ कवीच्या प्रेमात असणारी ही संवदेनक्षम स्त्री. तत्त्वचिंतनाने हे पत्र अधिक उत्कट व आर्त झाले आहे. येथेही रिल्केचा दीर्घ परिच्छेद आहे.

हे अगदी आरशाइतके स्वच्छ आहे की या सर्व स्त्रिया प्रत्यक्षातल्या संगिनी आहेत. तसे स्पष्ट पुरावे आहेत. ही पत्रे या स्त्रिया अनाम (वृत्तपत्रात कधी उल्लेख असतो ना, नाव बदलले आहे ! तथापि मोहल्ल्यातल्या लोकांना ठाऊक असते की वृत्तातली स्त्री कोण आहे) ठेवण्यामागचा उद्देशही स्पष्ट आहे. जागतिक साहित्यात स्वतःच्या खाजगी जीवनाचे संदर्भ देणारे साहित्य कमी नाही. परंतु ग्रेसच्या ललितबंधांमध्ये ठायी ठायी सतत क्वचित अस्थानी उगीचच उगवणारी मालविका, केतकी, पावरी, अंजनी, सैरंध्री, स्त्रग्धरा अशी अनेक पाचपंचवीस तरी विशेषनामे क्वचित रसविघ्नांसारखी वाटू लागतात त्रस्त करतात. त्यांच्याभोवती लेख फिरत राहिला तरी.

ग्रेस यांचा 'संध्यामग्न'मधील 'हम शम्मा का सीना रखते है: पूर्वार्ध आणि उत्तरार्ध'- हा ग्रेस यांच्या स्वभावाची एक दुसरी ही बाजू अस्सलपणे व्यक्त करणारा लेख आहे. सोबत मागधी आहे. मधे मधे टेलिफोन येत राहतो - ब्लडी टेलिफोन. पलीकडून कोणा 'मठ्ठ गवाळांचे', 'वाळूचे माहेर' चा रेफरन्स मागणाऱ्याचे, मागणारी बाई आहे पलीकडे ! 'महाश्वेता' (मराठी सीरियल - ज्याच्या प्रारंभी - भय इथले संपत नाही हे शीर्षकगीत होते) कुणीतरी त्यासंबंधी टेलिफोनवरून बोलते आहे - विचारते आहे, 'मी संध्याकाळी गातो, तू मला शिकविली गीते' यात गातो ऐवजी लताबाईंनी 'गाते' असे बदलून का घेतले - लोक ग्रेसना याही संदर्भात प्रश्न विचारतात त्यावरची उत्तरे मासलेवाईक आहेत. विनोदी आहेत. आत्ममग्न, हळवा, भावुक, संवेदनाक्षम असा ग्रेस यांचा एक अवतार आहे, जो कवितेतून, ललितबंधातून प्रकटतो. पण याच जन्मात एक उद्धट, कुत्सित, अहंकारी, दुसऱ्यांना टपल्या मारण्यात, खिल्ली उडवण्यात मजा वाटणारा, सडेतोड असाही ग्रेस यांचा एक अवतार होता. जो अनेकांनी अनुभवलाही असणार, तोही 'ओल्या वेळूची बासरी'तील काही लेखांमध्ये प्रकटतो. कृतज्ञता, आत्मीयता ओथंबून आलेले आहेत असेही काही उल्लेख आहेत. एकदा, हॉस्पिटलमध्ये पाय मोडून भरती असताना, शरच्चंद्र मुक्तीबोध, शं. दा. पेंडसे, सहाध्यायिनी उर्मिला पंडित कसे भेटायला आले होते त्याची हृदयंगम आठवण आहे, श्री. पु. भागवत, राम पटवर्धन, हृदयनाथ, भारती मंगेशकर, जी. ए. यांचे उल्लेख येतात तेथे ग्रेस मृदु, हळुवार वाटतात. युगवाणीतील संपादक पर्व कसे अवहेलनेने संपले त्याचा काटा किती खोलवर रूतला आहे ते काही उल्लेखांवरून दिसून येते. ग्रेस हे एक मनस्वी कलावंत होते तसेच ते एक जमिनीवरून चालणारे सर्वसाधारण व्यक्तीही होतेच. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा हा दुहेरी पीळ या ललितबंधांतून दिसत जातो. प्रतिभेचा वरदहस्त अभिमानाने मिरवणारा आणि प्रतिमेशी निगडित असा बहुकेंद्री उन्माद प्रकट करण्यात कसलाही संकोच न मानणारा हा कवी या ललितबंधातून आपले स्वतःचे पोर्ट्रेट काढताना दिसतो. त्याच्या कुंचल्याचे जोरकस फटकारे, रंगांचे, रंगच्छटांचे थर या ललितबंधात स्पष्ट दिसून येतात.

ग्रेस यांच्या या ललितबंधांची रचना, बांधणी, सलग, सुसंगत, सुसूत्र नाही, तुटक, विस्कळित, सतत केंद्र व भावावस्था बदलत राहणारे जसे, कॅलिडिओस्कोप मधील फिरत राहाणाऱ्या वेगवेगळ्या रंगांच्या तुकड्यांमधून अमूर्त आकार तयार होत राहावेत तसे हे गद्यलेखन वाटते.





या ललितबंधांत अनेक प्रसंग आहेत. त्यांच्यातून ग्रेस यांच्या कवितांच्या ओळींचा जन्म झालेला आहे. उदाहरणार्थ, मिथिला एकदा देवघरातले निरांजन उजळायला गेली असताना, तेथे अंधारात दडून असलेल्या विंचवाने तिच्या बोटाला नांगी मारली. हा प्रसंग ग्रेस एका कवितेत रूप पालटून येतो :

"कोनाड्यात विंचू आणि
तिथे निरांजन
नांगीसाठी ज्योत झाली
विधात्याचे धन..."

ग्रेस यांनी आपल्या काही कवितांचे अर्थशोधन करण्याचा प्रयत्न करून पाहिला आहे पण त्यात काही अर्थ नाही. या ललितबंधात आठवणींच्या रूपात येणारे अनेक प्रसंग ग्रेसच्या यांच्या कवितेत ओळी बनून fossil फॉसिल झालेले आहेत. कवीची निर्मिती किती गूढ बनू शकते एवढेच त्यावरून कळते. सहज म्हणून 'चंद्रमाधवीचे प्रदेश' या संग्रहातील कवितांची काही शीर्षके देता येतील. 'फुलांचे दिवे', 'माई', 'संध्यामाई', 'सनई', 'आई', 'हॉस्पिटल', 'मरलिन मन्रो', 'इनोसन्ट एलिस', 'आरती प्रभु -' तूर्त एवढेच पुरे. या आणि अशा कवितांतल्या ओळी ललितबंधांच्या प्रसंगांमध्ये सहज सापडतात. (हवे तर हा एक संशोधनाचा विषय होऊ शकतो) इतकेच नव्हे, 'चंद्रमाधवीचे प्रदेश'च्या सुरूवातीला 'when you have finished with others, that is my time' असे जे वाक्य येते, ते रवीन्द्रनाथांच्या 'गार्डनर'मधल्या माळ्याने राणीला उद्देशून उच्चारले आहे ! (हेही एकदा ललितबंधांत आलेलेच आहे) खरे तर, ग्रेस यांच्या निर्मितीमागचे भावविश्व अनुभवविश्व तसे मर्यादित आहे. पण ग्रेस यांनी हाती असलेल्या काही रंगांतून अनेकविध चित्रकृती कशा निर्मिल्या आहेत हे विलक्षण कोडेच म्हणावे लागेल.

हे सर्वच ललितबंध ग्रेस यांच्या कवितांप्रमाणेच वाचकाला एका धूसर तंद्रीत घेऊन जातात. ग्रेस यांची भाषा, नेहमीच्या भाषेलाच काव्यात्म पातळीवर नेणारी त्यांची प्रतिमासृष्टी, प्रतीकांचे प्रस्तर हा अनुभवण्याचा विषय आहे. ग्रेस यांच्या कवितांसंदर्भात दुर्गाबाई भागवत म्हणाल्या होत्या, त्यांच्या कवितेत, 'दैवी, मानवी, पाशवी जीवनवृत्तींचे अद्‌भूत मिश्रण आहे' हेच त्यांच्या ललितबंधालाही लागू पडते. आशय आणि अभिव्यक्ती या दोन्ही बाबतीत.

ग्रेस यांच्या ललितबंधांचे रूप शब्दात पकडता येत नाही. परंतु सुभाष अवचट यांनी आपल्या चित्रात ते पकडले आहे. 'मृगजळाचे बांधकाम' या पुस्तकाचे मुखपृष्ठ आणि आतील चित्रं त्यांची आहेत. कागदावर रंग ओतून तो कागद हातात धरून हलवावा म्हणजे रंगांतून आकार आणि रेषा यांचे यादृच्छिक बंध तयार होतात. रूपे तयार होतात. प्रत्येक वेळी वेगळे आणि विलक्षण. ग्रेस यांच्या संपूर्ण लेखनाची प्रक्रिया आणि साक्षात त्याचा आशय आणि रूप यांची आकृती कशी घडत असेल ते त्यांनी अचूक पकडले आहे.

▌ डॉ. प्रभा गणोरकर
'कॅक्टस' दक्षिण मालटेकडी,
परिगणित कॉलनी, अमरावती
भ्रमणध्वनी : ९५४५४६१७३७

अनुक्रमणिका

एका प्रतिभावंत पांथस्थाचा पंथविराम

डॉ. आशा सावदेकर

प्रतिभापांथस्थाचा 'पंथविराम' घडला आणि सगळे रसिकजग दुःखी झाले ! कविता आणि ललितबंध यांची निर्मिती करीत करीत कवी ग्रेस केवढा तरी मुलूख पार करून गेले होते. त्यांची निर्मिती ही उखाणे घालणारी होती पण शब्दकळा, अर्थलळा आणि दुःखभान, प्रतिभावरदान यांनी डवरलेली होती. नव्हे, आहे. तरल अनुभवांना चिमटीत धरण्यासाठीही बुद्धी, भावना आणि कल्पना यांची श्रीमंती हवी असते, ती तर माणिक गोडघाटे आणि ग्रेस ह्या लेखक आणि कवी अशा दोघांकडेही होती. प्रतिमांची भावतरलता आणि अर्थाची भाषिक आणि आत्मनिष्ठ संपन्नता ह्या मिलाफातून मुक्त असे काव्यभ्रम मौक्तिक-सरांसारखे ओघळतात आणि प्रतिभावंत आत्मशोध घेतो, आत्मविश्लेषण करतो, संज्ञाप्रवाहात तरंगत अंतःस्थ प्रकाशाचा शोध घेतो ज्यात भावविश्व आणि भासविश्व यांचा एक सहजसंयोग घडलेला असतो.

लेखक, प्रतिभावंत आपले मीपण कधी गोठवून टाकत नाहीत तर हा मी एका सार्वभौम अशा 'मी'त्वात विरघळून टाकतात कारण त्याशिवाय अनुभव हा 'कलात्म' होतच नाही. कवी ग्रेस ह्यांच्या कवितेत मानवी आयुष्यातील अपरिहार्य प्रश्नांची जाण आहे आणि सिद्धान्ताचे दडपण येऊ देणारी अभिव्यक्ती मात्र नाही. म्हणूनच काही ठिकाणी कविता ही कविता उरत नाही, ती 'दुःख वैभवाच्या लिपीतून साकारत जाते' खरी पण तिला महत्त्वाचा प्रश्न पडतो जो ग्रेस यांनी गोंदवून ठेवला आहे - ''...मी आता कुठे जाऊ ? कवितेची किंमत देऊन तुमची संध्यामग्न विश्वरहस्यवाणी शिरोधार्य मानू की कलावंताच्या विश्वरहस्याची वेगळीच संध्यामग्नता दर्शविणारी लक्षणे मांडू ?'' (संध्यामग्न पुरूषाची लक्षणे : पृ. ४)

ग्रेस यांच्या कवितेतवर आधारलेला 'साजणवेळा' हा कार्यक्रम झाला. त्यावेळी ते म्हणाले होते - ''माझ्या कवितेने मराठीला काय दिले व ती काय देत आहे, याचा विचार मला स्वतःला करण्याचे अजिबात कारण नाही, पण माझ्या कवितेने मराठी काव्यात निर्मितीची प्रक्रिया, त्यातून सिद्ध झालेली कलाकृती व तिचा आस्वाद या त्रिवेणीसंबंधी अनेक महत्त्वाचे प्रश्न निर्माण केलेले आहेत. या प्रश्नांच्या सोडवणुकीतून समजातून आणि अपसमजातून या आरोपाचे मी निराकरण करत नाही. जन्मतःच कर्णाला जशी कवचकुंडले शरीरासोबत मिळाली होती, तशी माझ्या कवितेच्या नाकात दुर्बोधतेची बेसरबिंदी जन्मापासूनच टोचलेली आहे. माझी कविता

अनुवंशहीन आहे. ती जगता जगता वाढेल तोच वंशवृक्ष.''

ग्रेस यांची वाटच आगळीवेगळी. ते कवी आणि ललितबंध निर्माते. त्यांचे गद्यलेखन संतकाव्य, सूफी विचार तर कधी पाश्चात्य लेखनातील कसदार अवतरणे यांनी सुशोभित होते. त्यात प्रतिभा, कल्पनाशक्ती यांची साथ असते आणि आत्मनिमग्न अशा मर्मस्थळांना प्रतीके आणि प्रतिमा यांचे पाठबळही लाभलेले असते. त्यांची सखोल एकाग्रता, शब्दवेचणी आणि शब्दार्थ-संपृक्तता यांना तोडच नाही. पोरकेपणाचा भाव, मनातील निनादत राहणारे झंकार आणि शब्दांचे गारूड हेच त्यांचे व्रत ते आत्मप्रकटीकरण करीत नाहीत तर आत्मलोप घडवतात.

''शापच आहे मला संगमरवरात स्वप्न लपवून ठेवण्याचा'' एका भाषणात त्यांनी स्पष्ट केले होत - ''माझी कविता हे एक बेट आहे. मीही एक बेटच आहे. ...या बेटावरून परतीच्या कुठल्याही बोटीची हमी देऊ शकत नाही मी. परतावेसे वाटले तर स्वतःच होडी झाले पाहिजे.''

कवी ग्रेस यांच्या 'चर्चबेल' ह्या पहिल्या ललितबंधांच्या लहानखुऱ्या पुस्तकात छोटे, छोटे अनुभवांचे तुकडे होते. हे लघुनिबंधाशी नाते जुळवणारे होते, परंतु पुढचे ललितलेखन वेगळे होते. ती ह्या माणसाच्या आत्म्याची चित्रे होती आणि वाटही वेगळी होती. ग्रेस यांच्या ललित लेखनात प्रतिमांची उधळण दिसते.

खोल उगमापासूनच्या गूढ अनावर हाका ऐकतच ग्रेस यांना आत्मशोधाच्या अंतिम किनाऱ्याला स्पर्श करता आला होता. प्रतिभाभारली मांडणी आणि देखणी शब्दकळा सूक्ष्म भावानुभवाचे रूप अधिकाधिक गहिरे करते आणि कवीला अस्तित्त्वाचा शोध घेताना दुःखार्त होता येते.

''काहीतरी नाकारल्याशिवाय अस्तित्त्वाला हादरे बसत नाहीत आणि हादरे बसल्याशिवाय काही नवनिर्माण होऊच शकत नाही. ही दुःखवैभवाची संपन्नता'' (मितवाः पृ. १४५) सुखाच्या पोटात आत उसळे दुःख ही ग्रेस यांच्या कवितेची आणि ललितबंधाची ही एक 'ललाटबिंदी' आहे.

ग्रेस प्रतिमाबंध उलगडत नाहीत तर त्यातून नवे असे खूप काही सुचवून जातात. ''शिळेच्या खडबडीत अंगानं जडलेले निबद्ध अभिसाराचे अहंमन्य शाप आणि रघुपतीच्या पावलांवर डागलेले निर्विवाद अनभिषिक देवत्त्व या दोन्ही गोष्टी माझा जीव चोळामोळा करून टाकातात.'' (मितवा : पृ. ११७-११८)

ग्रेस यांना आर्ष प्रतिमाबंध उलगडावेसे वाटत नाहीत तर त्यातून नवे नवे सुचवावेसे वाटते. दुःख संपृक्त जाणिवेतून मानवी करूणेचा प्रत्यय ते जागवतात. शब्दाआधी अर्थ पाझरावा असे हे लेखन. वाचकाकडून तपश्चर्येची मागणी ग्रेस करीत राहिले.

'मी महाकवी दुःखाचा
प्राचीन नदीपरि खोल
दगडाचे माझ्या हाती
वेगाने होते फूल'

''एकामधून आणखी असंख्य पेच निर्माण होत जाणे हे माझ्याच विचारप्रक्रियेचे अटळ प्राक्तन आहे... कलावंताची कलासक्त बांधिलकी ही कुठल्याच सत्तेची गुलामगिरी कधीच होऊ शकत नाही'' (मितवा पृ. ६८) मनाच्या दुखऱ्या अवस्थेत भाषेचे रूप उजळण्यासाठी अनवट शब्दनिर्मिती घडते. त्यांनी म्हटल्याप्रमाणे ''प्रवाहात असावे, परिवर्तनक्षय असावे - हीच माझी दीक्षा'' (मितवा : पृ. १४७) ''आपले जगणे आणि खरे लिहिणे निर्मितीच्या आवर्तनातच शोधायला हवे!'' असे ते स्पष्ट करतात (मितवा : पृ. १५८)

ग्रेस यांचे हे ललितबंध लेखन म्हणजे त्यांचा कठोर आत्मशोध आहे आणि 'अनेकपदरी संबंधातून उद्‌भवणारे संघर्षनाट्य आहे' ज्याला काळोख उजळण्यासाठी स्वतःला जाळून घ्यावे लागण्याचा पेच आहे. निर्मितीच्या आडोशाने जगणारा हा कवी निर्मितीच्या एकाकी बेटावर आत्मभोग भोगताना दिसतो. ''काव्यावतरणाचे सृजन आणि आयुष्यभोगांची करूणा'' यांच्याभोवती फिरत राहतो, आणि नोंदवत राहतो - ''And above all my poetry is like a sad evening rainbow of august, which unites my strenyous worlds the world of lyrical madness and the world of requiem'' (मितवा : पृ. २२३)

'चर्चबेल' ही ग्रेस यांच्या ललितबंधांची पहाट होती. फकिरांची ललकारी, मनाच्या गूढ वेदनेचा स्पर्श आणि चर्चबेलचे निनाद असे श्रीमंत जिवंत चित्र तिथे उमटले. शेजारच्या निराधार जुईच्या परकरातील कळ्या चुलीतल्या जाळात पडल्या, जळू लागल्या तेव्हा ग्रेस सहजपणाने टिपतात - ''आग म्हणजे फक्त लाकडांचा जाळ नव्हे, फुलांची, अंकुरांची... चंद्रचांदण्यांचीही आग असू शकते.'' (मितवा : पृ. ८३)

ग्रेस यांची निर्मिती ही त्यांच्या जीवनशैलीचेच अनुसंधान

अनुक्रमणिका

राखणारी आहे 'संध्यामग्न पुरूषाची लक्षणे' (२०००) मध्ये 'मृगजळाचे बांधकाम' हा लेख आहे तर 'मृगजळाचे बांधकाम' ह्या ललितबंधसंग्रहात (२००३) 'मंत्रशोधातील संध्याकाळ' अवतरते. त्यात निर्मितिप्रक्रियेचा पाठलाग संपून शोधप्रक्रिया निर्माण झालेली दिसते. कवी ग्रेस यांना निसर्गसत्ता आणि जीवनसत्ता यांच्यापेक्षा वर अधिष्ठान असते ते सौंदर्यसत्तेचे असे नेहमीच वाटले, म्हणून ते संध्याकाळ हे निसर्गदान नव्हे तर तो आपल्या तळहातावर पडलेला आपलाच वाटा आहे असे मानतात.

संध्याकाळ हे 'उजेडाच्या समाप्तीचे सूचन' आणि 'मावळता दिवस व चढती रात्र' यांच्या संमीलनाचा जोडबिंदू आहे म्हणून संध्याकाळ - संधिकाल हे एक विराट प्रतीक आहे असे त्यांना वाटले आहे. कलाकृतीचा गाभा म्हणजे अर्थ आणि सृजन यांची सांगड असते. भावकवितेची निर्मिती ही कवीला द्विदलसंभव वाटलेली आहे.

त्यांच्या कवितांमध्ये अंतर्मनालाच प्रश्न विचारले गेलेले आहेत. कारण शरीर निर्माणशीलतेला स्वतंत्र रूप देत नाही, मनच देते.

'नदीच्या शुभ्र धारांना
नदीचा ऊर का फुटतो ?
मनातून वाहणारी ही
युगांची आंधळी गाणी
जरासे खोल बघताना
गळ्यातून शब्द का फुटतो ?'

ग्रेस ह्यांचे निर्मितीविश्व हृदयसौंदर्यातील तलस्पर्शी जाणिवेची नोंद घेत असायचे. कधी कधी तर त्यांच्या मनातील 'स्वप्नबांधणीतील घावांचे शिलालेख' त्यांच्या निर्मितीप्रक्रियेच्या एकाकीपणातच विसर्जित होऊन जायचे.

निसर्गदत्त वरदानामुळेच त्यांची प्रतिभा अनेक काव्यरत्नांना प्रसवू शकली. अदृष्ट धुके पांघरून प्रकटलेली त्यांची कविता आणि ललितबंध यांनी रसिकांकडूनच खऱ्या तपश्चर्येची मागणी केली. त्याचे सार दिसते त्यांच्या पल्लेदार ललितबंधांच्या टोकदार अर्थमग्नतेत. जसे - ''धूप है रेत है सेहरा है जहाँ, प्यास हम अपनी बुझाने निकले''

ग्रेस यांची निर्मितीची तहान शेवटपर्यंत कायम होती. कर्करोगाच्या विळख्यातही त्यांनी आपली निर्मितीची तंद्री आणि धुंदी सतत जपली, कायम ठेवली आणि शेवटी काही काव्यरत्ने आपल्या रसिकांच्या मार्गावर अंथरूनही ठेवली.

'आकाशभाकिते माझी नक्षत्रकूळही दंग
देहास तोडतानाही रडले न फुलांचे अंग...'

आपल्या काव्य तपस्येचे वर्ण करताना त्यांनी आपली काव्यतंद्री आणि दाटलेली करूणा याबद्दल नोंदवून ठेवले आहे. ''वैशाखवणवा मला नवीन नाही. पण त्याच्या वैराण, बेरहम तत्खलीपेक्षा तो वैशाख मला नेहमीच माझा एकमेव करूणेचा वतनदार वाटत आला आहे.''

'कावळे उडाले स्वामी' (२०१०) ह्या ललितबंध संग्रहात महान माणसांच्या आठवणी ग्रेस यांनी गुंफून ठेवलेल्या आहेत. कधी गोविंदाग्रज, कधी चक्रधर, कधी मधुकर केचे, कधी कैफी साहेबांचा शब्दफेक. त्या चित्रपटाच्या कवितेत त्यांना शोकात्मिका दिसते.

'मैं यह सोचकर उसके दर से उठा था
कि वो रोक लेगी, मना लेगी मुझको

मगर ना उसने रोका ना उसने मनाया
... मै आहिस्ता आहिस्ता बढता ही आया
यहाँ तक की उससे जुदा हो गया मैं'

कवी ग्रेस शेवटच्या ओळींना जणू काही भव्य ग्रीक शोकांतिकेचा ताम्रपटच हवा असे म्हणतात. त्यांना नेहमीच कलावंत या नात्याने 'जीवनाची सौंदर्यसंपन्न पुनर्निर्मिती' करावीशी वाटली आहे. ह्या पुनर्निर्मितीला 'निरपेक्ष सौंदर्यसत्तेचेच एकमेव अधिष्ठान' मानले आहे. कवी निर्माणाची अवस्था मांडूनच जातो -

'जिथे पोचती ना कधी शब्द माझे
असे नृत्यगारातले चांदणे
दरीच्या तळाशी जसा सूर जावा
तसा देह घासून छंदावणे...'

हा प्रवास - प्रतिमाप्रवास - स्वतः कवीलाही 'कांचनमृगाया जातीच्या प्रतिमेचा' वाटतो.

'ओल्या वेळूची बासरी' (२०१२) ह्या ललितसंग्रहात ग्रेस यांचे स्वगत आरंभाला अवतरते. शारीर दुःखाला असलेली इयत्ता हॉस्पिटलच्या स्वगतात ग्रेस मांडतात -

'मी इथे व्यथालयात
दुःख सांगतो तुला,
घे मला कुशीत आज
पावलात शृंखला!'

अनुक्रमणिका

सृजनातील निर्मिती ही प्रतिमांमधून होते, आणि त्यांची जन्मभूमी ही 'कलावंताची मनोभूमीच' असते. ह्या नोंदीनेच तर हे ललितबंध सुरू होतात.

'संध्यामग्न पुरूषाची लक्षणे'मध्ये ग्रेस नोंदवितात की कलावंताची कुडीच वेगळी असते. कवी म्हणून जगायचे असेल तर दुःख टाळताच येत नाही. म्हणून 'बनगरवाडीचा मेंढपाळ' मध्ये ग्रेसना व्यंकटेश माडगूळकर आठवतात. 'बनगरवाडी' माडगूळकरांनी पु. भा. भावे यांना अर्पण केली होती. 'वाङ्मय शरण वृत्तीचा दीपस्तंभ ढळू द्यायचा नसतो' असे शब्द नोंदवून विश्वप्रतीतीचे प्रतिभासामर्थ्य ग्रेस अधोरेखित करतात.

'निर्झरिणीच्या हुंदक्यातील रक्त' मध्ये एका प्रतिभावंताला त्याच्या प्रतिभापूरित संपादनाची होळी पाहावी लागावी हे दुःख हळुवारपणे पाझरले आहे. 'थोर कलावंताच्या निर्मितीची दिव्य नजाकत' ग्रेसना आठवली आहे.

कधी एकदम रामदासांची आठवण येते आणि मग करूणाष्टकातील आर्ततेचा करूणाघन आठवतो. 'करूणाष्टका' मधील रामदासांनी उदासी ग्रेसना बालकवींपर्यंत घेऊन जाते. मग नव्या ओळी उमटतात -

'सांभाळ माझ्या उदासीत होतो
उदासीत जातो प्रभूच्या पुढे
जिथे शब्द ढळतात माझे इमानी
तिथे रामदासा तुला ये रडे'

'कल्पवृक्षाची सांधणी' ह्या ललितबंधात प्रतिभावंतांचा विषय येतो. प्रतिभावंत भग्नचित्रेही सावरतो, निर्मितीची परिमाणे जोडतो. मग ग्रेसना प्रश्न पडतो 'ही साधना की सांधणी?'

'एकट वाळवीचे खिन्न स्वगत' मध्ये ग्रेस यांनी आपल्याच ओळी उच्चारल्या आहेत आणि परमेश्वराला ''...माझा वेड्यावाकड्या खेळाची एकदाच सांगता करून टाक ना ! उधळून टाक हा खेळ आणि येऊन माझ्या आत्म्याला कवेत घे... अजूनही तुझी सत्त्वपरीक्षा संपत नाही?'' (संध्यामग्न पुरषाची लक्षणे : पृ. १९५) असे आठवले आहे. कधी ज्ञानेश्वर, लगेच मर्ढेकर आणि कधी गालिब अशा तिहेरी आठवणी आळवीत ग्रेस 'देहशिल्पाचे दोन अपभ्रंश' लिहितात.

एकदा ग्रेसना एकाने विचारले होते की अगदी पहाटेच्या बिकटवेळी तुम्ही पाण्यात का उतरता? त्यावर त्यांनी चार ओळी समोर ठेवल्या होत्या -

'बांधिती नदीवर भिंत
डोहात उतरती रंग
पाण्याला सजवुनि द्यावे
पाण्याचे स्वप्नतरंग' (पृ. २९७)

ग्रेस यांच्या अलीकडच्या 'ओल्या वेळूची बासरी' (२०१२) मध्ये जणू त्यांनी मृत्यूपत्रच नोंदविले आहे.

'घरभर सरणाचे पात्र सांडूनि जाई
फिरूनि फिरूनि माझा वंश निर्वंश होई'

सृजनातील सर्व निर्मितीशील घटक हे प्रतिमाधिष्ठित असतात आणि कलाकृती ही कालातीतच असते.

'जेव्हा अंधारून येतो
सारा अतृप्त पसारा,
कुण्या अबंध जन्मांचा
पक्षी साठविती चारा ?' (पृ. १२)

प्रतिभेची तरलता जाणणारा हा कवी, ललितबंध निर्माता स्वतःला अनेक प्रश्न विचारतो.

'मनातुन वाहणारी ही
युगांची आंधळी गाणी,
जरासे खोल बघताना
गळ्यातुन शब्द का फुटतो?'

सृजनाची ही अलौकिकता ग्रेस यांनी जशी मांडली तशी इतर कुठल्याही कलावंताला कधी मांडता आलेली नाही. त्यांनी सौंदर्यसत्ता आणि निसर्गसत्तेची पुनर्निर्मिती मोलाची मानली. प्रतिमा हे सृजनामधील 'चैतन्याचे प्रकाशतत्त्व' असेच नोंदविले.

'लख्ख निरंजन माझी वाणी
अलख निरंजन माझी कविता'

स्वतःकडे आत डोकावतानाही ईश्वरानेच आपल्याला वाकवत वाकवत 'तरलतेचा लवचिक बिंदू' दिला ही जाण ग्रेस यांनी जपली, त्याचप्रमाणे ''प्रतिमांची निर्मितीच एका अज्ञेय वृत्तीतून होत असावी'' असा अंदाज व्यक्त करीत आपली अनुभवव्यवस्था छोट्या छोट्या तुकड्यांनी निर्मितीचा स्वीकार करीत असते हे नमूद करून ठेवले आहे. (ओल्या वेळूची बासरी : पृ. ३९) 'साऊल संगातली माझी वर्षे म्हणजे मिथिला, माधवी आणि राघव यांची...' (तत्रैव : पृ. ४४)

ग्रेस यांनी आपल्या गद्यलेखनातून आपल्या काव्य निर्मितीविश्वाचे आलेखन केले आहे, नव्हे; स्वतःलाच तर

सोलून काढले आहे. ''कलाकृतीतील भाषा, सामग्री आणि तिची माध्यमे कधीच अशक्त सशक्त नसतात. जीवनानुभवाच्या प्रक्रियेतून झिजताना किंवा ती सर्व सामग्री सोलली जात असताना, तीक्ष्णतेच्या मूळ गाभ्याकडे जात असतात'' (तत्रैव : पृ. ६०) ग्रेस यांची स्पष्ट अशी कबुली आहे की ते ह्यालाच तर 'मृगजळाचे बांधकाम' म्हणतात.

'बाई' बद्दल बोलताना हा हळुवार काळजाचा कवी ओथंबून येतो, गदगदतो -

'अग्निसुपात पाखडे
बाई निखाऱ्यांची राख' (तत्रैव : पृ. ९९)

कवी ग्रेस यांचे ललितबंध हे असे कवितांशी आणि काव्यव्रताशी रक्ताचे नाते सांगत ओथंबून आलेले भाव मांडणारे आहेत. त्यांना 'माणिक गोडघाटे' होऊनच ते लिहिता आले आहेत. पण तिथे सावलीसारखा 'ग्रेस' ही आहे हे निश्चित. आपण 'वणव्यात' उभे आहोत, तरीही 'वाळत नाही घाव' अशीच ही अवस्था आहे.

पिकासोच्या एका विधानाचे स्मरण करून ग्रेस उद्‌गारतात - जी वाणी दिव्यतेची आहे. पिकासो म्हणाला होता - ''Poetry is never obscure, so called reality around her, is an obstinate, shameless, obscurity'' (ओल्या वेळूची बासरी : पृ. १२२)

''कस्तुरीमृगाचे मरण, हे स्वतःभोवतीचा भिंगरप्रदक्षिणेचे मरण असते. शहामृगाचे मरण त्याला अगोदरच माहीत असलेल्या मरणाच्या शोधाचे असते'' (तत्रैव : पृ १३३)

''कलावंताच्या मनोभूमीत, वरील द्विविध लयगतीच्या, सार्वभौम दुःखाच्या जनावरीय - श्वापदीय प्रार्थना सतत घुमत असतात'' इथे ग्रेस यांचा विचार आहे जो त्यांची स्वनिर्मिती आहे, ज्यामागे एक दीर्घ साहित्य तपस्या आहे. आपली कविता 'एकाकी, एकात्म लहराभिमुख आहे' त्याची पूर्ण जाण ठेवूनच हृदयनाथ मंगेशकरांनी आपल्याला वरदान दिले, एकमेव परिमाण दिले हे त्यांनी स्पष्ट केलेले आहे.

कवी ग्रेस ह्या समग्र वाटचालीत 'अनाथ' असण्याची जाणीव, आत्मशोधाचा पीळ, कलावंताचे वैभव आणि दुर्बोधतेचा आरोप आला तरीही त्यांचा आत्मशोध हा त्यांच्या 'संन्यासी' वृत्तीचाच आहे. कधी डीएजीपीटीत नोकरी, कधी युनिव्हर्सिटी कॅम्पस मध्ये एम. ए. साठी वर्ग, कधी 'तरूण भारता'त प्रूफरीडर म्हणून काम करणे अशा यात्रेकडून ते प्राध्यापकीकडे वळले. पण प्रा. माणिक गोडघाटे आणि ग्रेस अशी दुहेरी जबाबदारी त्यांनी प्रामाणिकपणाने निभावली. एकावर दुसऱ्याला कधीही कुरघोडी करू दिली नाही. निर्मितीचा आनंद हेच सुख, तीच तपश्चर्या आणि तिच विश्रांतीही !

समुद्राच्या तळाशी वारंवार बुडी मारून मौल्यवार रत्ने वेचून घ्यावीत तशी ग्रेस यांची कविता होती त्या रत्नांच्या दीप्तीचेच तेज मिरवणारे त्याचे गद्यलेखन होते. ग्रेस यांच्या कवितेनेच तर निर्मितिप्रक्रियेविषयी महत्त्वपूर्ण प्रश्न उभे केले. प्रतिभावंताने केलेले संपादनही निर्मितीशील असते हे अधोरेखित करण्यासाठी 'युगवाणी'चे सर्वोत्कृष्ट आणि विविधरंगी संपादन करून आदर्श निर्माण केला. वेगवेगळे विषय सुचवून रसिकांना व लेखकांना आवाहन केले. त्यांच्या कवितेतही अनुभवाचे सुलभीकरण नव्हते आणि ललित लेखनातही नाही. स्वतःबद्दल 'चर्चबेल'मध्ये त्यांनी नोंदवले आहे - ''माझ्या मनाला एक वाईट खोड आहे. वस्तू आणि व्यक्तीचे संबंध एका भावस्थितीत गुंफून मी जाणिवांच्या दुसऱ्या वर्तुळात उभा असतो.''

कवी ग्रेस यांची आई विषयी जाणीवही पृथगात्म आहे. आईविषयी राग आहे. पोरकेपणाचा भाव आहे आणि रक्ताने दिलेले वात्सल्यही आहे. ''आडवाच झोपलो असतो मीही गर्भाशयात तर! येऊ दिले असते का तुझ्या वाट्याला माऊलीचे भाग्यपण?'' ह्यामधून तर राग, असूया, द्वेष हे सगळे रंग प्रकटून जातात. आईच्या मृत्यूनंतर पोरकेपणाची भयाण जाण प्रकटते. ह्या कवीच्या प्रेमजाणिवाही एकाकी, भयाण, मृत्यूविषयक आकर्षणाने झाकोळलेल्या म्हणूनच गूढ आहेत. दुःखार्त होणे हा त्यांचा योगच आहे. ते आपल्या दुःखाला 'नाहीच कुणी अपुले रे' ह्या भावनेनेच जपतात, मग त्यांची व्याकूळ वृत्ती निसर्ग प्रतिमांमधून व्यक्त होत राहते. शब्दांची विलक्षण समज असल्यामुळे त्यांचे अनुभूतिविश्वच अत्यंत अनवट रूप धारण करते. त्यांच्या प्रतीक - प्रतिमांच्या अनेकार्थाचे सूचन करीत जाण्यामुळे अर्थाची व्यामिश्रता वाढते. एक अभिजात वृत्तीचे भान त्यांच्या कवितेत आहे. तितकेच त्यांच्या गद्यातही आहे. 'ग्रेस आणि दुर्बोधता' ह्या ग्रंथाने ग्रेस यांच्या काव्यविश्वावर प्रकाश टाकू पाहण्याचा चांगला प्रयत्न केला होता. आणि त्याचे मूळ ग्रेस यांच्या व्यक्तित्वात आहे असा एक निष्कर्षही निघत होता. थोडक्यात ते विवरणही 'मृगजळाचे बांधकाम' ठरले.

ह्या ठिकाणी मला आठवते की आपणच निर्माण केलेले पूल आपल्याच हातांनी जाळले गेले तर धड परतीची वाट उरत नाही आणि मागेही वळणे शक्य नसते. अशा घराचा शोध घेत

राहणाऱ्या कलावंताला 'उभं राहायला जागा नाही' असे म्हणणाऱ्या 'एक शून्य बाजीरावा' साररखे तोल सांभाळत जगावे लागते आणि मरावेही लागते. दुःख सोसण्याची प्रत्येकाची रीत वेगळी, तशीच ती ह्या कलावंताचीही असेल. कधी कधी दुःख स्वीकारातही सहजता असते, तीच त्यांनी पत्कारली असावी. पार्थिव जगात जगता जगता 'दिव्याचा हव्यास' धरला तर काय बिघडले ? वेगवेगळे क्षण जगत असताना कधी तलम प्रवास घडतो तर कधी गुदमरून पाण्याच्या तळाशीही जावे लागते. रोज पहाटे (काळोखात) पाण्यात उडी घेऊन जलक्रीडा करणाऱ्या ग्रेसना हे सगळे पूर्णपणे ठाऊक होते.

ग्रेसही द्वैती आणि चक्रधरही द्वैती. त्यामुळेच चक्रधरांची आठवण ग्रेसना येते. बासरीसाठी ''कृष्णाची समीरशहाणी लेक'' अशी प्रतिमा सुचली तरी 'सायुज्यता' नावाची मुक्ती मिळत नाही, मग चक्रधरांनी पुरस्कारिलेल्या कृष्णाला, बहुतेक वेळा बासरीच्या तंद्रीव्यापारातून मोकळेच केलेले आहे. पण समीपता, सलोकता आणि सरूपता या द्वैती मोक्षाचा विचार मांडताना मात्र, त्यांनी बासरीतील मुरलीचा ताण आणि श्वासात गोठलेली हवा, या अनुभवावर बोट ठेवून सरळ 'परमेश्वराकारणे काळकुळलोक यें तीन्ही आंगवावी ।' असे सूत्र मांडले (ओल्या वेळूची बासरी : पृ. १२४)

कवी ग्रेस यांच्या संदर्भात त्र्यं. वि. सरदेशमुखांनी नोंदवले होते, ''ग्रेसच्या कवितेचे अनुपम सौंदर्य मनाच्या निगूढ प्रदेशातून तरळत येणाऱ्या झंकारात आहे'' हे मात्र अगदी खरे।

ग्रेस यांनी 'वाऱ्याने हलते रान' मध्ये नोंदवलेच आहे की, ''...फक्त कलावंतच आपल्या आत्माविष्काराच्या वेदीवर रोज तपासणी करत असतो आणि यातूनच तो भाव - अभावांच्या जोखडाखाली गुदमरणाऱ्या जीवनाची सोडवणूक करून त्याच जीवनाची पुनर्निर्मिती करीत असतो'' मला स्वतःला वाटते की ग्रेस यांच्यामधल्या खऱ्या कलावंताने आपल्या आत्म्याला साक्षी ठेवून हे सगळे फक्त सांगितले नाही तर केले, करून दाखवले.

ग्रेस यांना लाभलेले गौरव, पुरस्कार ह्या सगळ्यांपेक्षा ललितबंधांमधून साकारलेली त्यांच्या वाङ्मयाच्या गुणवत्तेची चढती भाजणी हाच त्यांचा आलेख आहे. त्यांच्या कलावंताच्या जगण्याचा, त्यांच्या असोशीचा, त्यांच्या वाङ्मयीन तपश्चर्येचा सर्वोच्च क्षण त्यांना जगता आला. असाध्य कर्करोगाने शरीर पोखरले तरी त्यांच्यातील प्रतिभावंत आपल्या पूर्ण तेजाने तळपत होता. त्याच्या संवेदना सजग होत्या. हळुवार होत्या आणि धारदारही होत्या. खऱ्या प्रतिभावंताचा प्रत्येक क्षण हा अनन्यसाधारणच असतो. अखेरच्या क्षणीही निश्चित काही दिव्य भास त्यांना दाखवले असतील ! अनुभवातूनच जो वाढत वाढत जात असतो त्याला मृत्यूचे भय नसते. आपल्या वाङ्मय प्रेमातूनच जो माणूस वाढत गेला, नव्हे - ज्याने सतत वाढण्याचाच वसा पत्करला त्याला स्थलकालातीत होता आले. कधीकाळी एक आश्वासक प्रकाश आपल्यापर्यंत पोहोचला, त्याला साद देता आली म्हणून निश्चितच हा जीव आनंदला असेल, एकाचवेळी समतोल सांभाळून राहणारे लावण्य शब्दांच्या चिमटीत पकडता आले ही महत्त्वाची गोष्ट !

कदाचित 'विझवून दीप सारे मी चाललो निजाया, आता अशाश्वताची उरली मुळी न माया' हे जाणवून मुळाशी मिळण्यासाठी ही महावृक्षाची फांदी नियतीच्या स्वाधीन झाली असेल ! संध्याकाळचे तृप्तावलेले भास अस्ताच्या अनुभूतीशी प्राणभेट घडविण्यासाठी गोसावीपण धारण करून गेले असतील !

'फकीर' आणि 'संध्याकाळ' यांचे अतूट नाते जपताना. 'एका गूढ वेदनेचा स्पर्श'च जाणवतो. 'पल्लवीचे पक्षी' ह्या लेखनात पंचशील टॉकीजच्या चौकातला प्रचंड वृक्ष तोडला गेल्यावर त्यावरील शंभर - दीडशे पक्षीकुळे कुठे गेली असतील ह्या जाणिवेने हा माणूस कासावीस होतो आणि त्याला आठवते पल्लवी ह्या मुलीचे वृक्षप्रेम, तिची आत्महत्या आणि ह्या संदर्भांना लाभतो गूढ वेदनांचा अस्तरासारखा स्पर्श. ताजमहालाच्या कारागिरांचे अंगठे शहाजहान ह्या सम्राटने का कापावे ? एकलव्याचा अंगठाही हिंस्र अशा सत्तेचा बळी का ठरावा ? ह्या प्रश्नांमधून गुलामी आणि अभिरूचीचे अवमूल्यन त्यांना जाणवले आहे. आपल्याच मनाचा अदमास घेताना त्यांना आपले निर्मितिविश्व 'lyrical madness' चेच होते असे वाटले आहे. हे सगळे 'स्वप्नबांधणीतील घावांचे शिलालेख' ह्या माणसाने निर्मितिप्रक्रियेच्या एकाकीपणात बुडवून पुन्हा घडविलेले आहेत.

'वस्त्रात द्रौपदीच्याही तो कृष्ण नागडा होता' ह्या ओळीच्या संदर्भात ''स्त्रीच्या व्यक्तिमत्त्वाच्या लज्जेचा आकांत करण्याऐवजी इथे द्रौपदीच्या रूपाने स्त्रीची सनातन लज्जाच अपरंपार होऊन आपल्या आत्मशोधाचा अत्यंत हृदयंगम अभिसार होऊन खुलू लागलेली आहे'' (कावळे उडाले स्वामी : पृ. ८४) ह्या द्रौपदीसाठीच तर काही ओळी जन्मतात -

'कल्पवृक्षांच्या फुलांच्या
हालती सुनसान छाया
निष्कलंकाच्या दयेची

अनुक्रमणिका



द्रौपदी ना चंद्रमाया' (कावळे उडाले स्वामी : पृ. १६२)

'संध्यामग्न पुरूषाची लक्षणे' मध्ये ग्रेस सहजपणाने नोंदवितात. का द्रौपदी, रूक्मिणी, सीता ह्यांचे स्वयंवर पण राधेला तर स्वयंवर लागूच होत नाही.

'तिथे कृष्णएकांत देठात प्राजक्त
राधेस हा रंग येतो कसा ?
सर्वेश्वराला कधी या मुलीने
न मागितला रे तिचा आरसा!'
(कालिंदियेचे हृदयशल्या फेडिले : पृ. ३३९)

द्रौपदीच्या दिठीला 'सुन्या अंतराळातुनि चालणे' मिळाले आणि रूक्मिणीला काय मिळाले? तर 'तुला रूक्मिणी का फुले वेचताना सुगंधातही भेटते वाळवी?' ग्रेस यांनी पुराणकालीन स्त्रीरूपांच्या साह्याने बाईची वेदना मांडली पण ती ताठ मानेचीच आहे.

ग्रेस यांना कावळ्यात जीवनसंभव आणि मृत्यूभय असे दोन्ही घटक दिसतात. म्हणून 'कावळाच कावळा, परंतु सभ्य भासला' ह्या ओळीनंतर धारदार प्रश्न येतो -

'पाकळी धरून हे फुलात चालणे कसे नि
देहकाजळीतही असे कसे निळे पिसे?'
(कावळे उडाले स्वामी : पृ. १८५)

प्रतिभेचे सारे साक्षात्कार वीज झेलावी तसेच झेलून ह्या कवी आणि ललितबंधनिर्मात्याने साहित्यक्षेत्राला दरवळवून टाकले, अर्थसंपृक्तता दिली, आर्त छायेने वेगळे जीवनभर दिले, खूप काही उमगले, काही उमगले नाही पण अलवार शब्दांनी नादावले आणि हंबराची आर्तता अंतरात निनादत साहिली तशी राहिलीही ! हीच होती त्यांच्या 'दुःखवैभवाची संपन्नता' कुंतीनं जसे दुःखच मागितले, तोच वसा माणिक गोडघाटे आणि ग्रेस ह्या दोन्ही कलावंतांनी हृदयाशी धरला आणि हंबराची आर्तता आभाळाला भिडेल अशी विशाल केली. सृजनयोग समृद्धयोग झाला आणि रूग्णालयात मंगेशकर कुटुंबाच्या मायेच्या सावलीत त्यांनी प्रत्यक्ष यमधर्माशी संवाद साधला. डोहातील परतीचे चंद्र मावळता कोसळत्या हातांनी सुहृदांचे आलिंगन सावरले. एकच मंत्र जपला. भावात्म कारूण्याच्या कल्लोळधर्माचा आणि ठसा उमटविला ''क्रिएटिव्हीटी इज माय लाइफ अँड इट्स कनव्हिक्शन इज माय कॅरॅक्टर'' असे म्हणत निर्मितिशीलतेचा वसा अखंड सांभाळणाऱ्या ह्या कलावंताने अखेरचा श्वास घेतला पण तो संपला नाही, संपणार नाही ! कारण -

'माझा आंधळा प्रपंच
झाडे श्रावणसारखी
अशा सांजवेळी आली
मला न्यावया पालखी...
करा अंगण मोकळे
त्यात विझू नये दिवा
एका झुळुकीने माझा
जन्म मातीत मिळावा...'
(ओल्या वेळूची बासरी : पृ. ४२)

शेवटी कलावंत हा कलावंत असतो.

'भुकंप किती जाहले तरि न अंतराळी झरा ।
शरीर विटके तरी पदर तारकांचा चुरा ।।'
(तत्रैव : पृ. ४९)

कलाप्रक्रिया, कलानिर्मिती आणि मनाच्या डोहातील 'प्रतिभा' जलसमाधी ह्यामध्ये ग्रेस आहेतच, असतील, असणारच !

। डॉ. आशा सावदेकर
२५५/२ ब, दक्षिण अंबाझरी मार्ग,
लक्ष्मीनगर, नागपूर - २२
भ्रमणभाष : ९८२२३६३३९६

वाऱ्याने हलते रान - ग्रेसांचे सृजनकाव्य

डॉ. विमल भालेराव

'वाऱ्याने हलते रान' हा ग्रेस यांचा पॉप्युलरने २००८ मध्ये प्रकाशित केलेला ललित लेख संग्रह. अवघ्या १२२ पानांचा. जेमतेम २५ लेखांचा. एक लेख चार ते सहा पृष्ठांच्यावर नसलेला. या संग्रहाला 'साहित्य अकादमी'चे पारितोषिक मिळाले. त्यामुळे पुस्तक वाचायची उत्सुकता होती. पुस्तक हातात पडल्यावर आधाश्यासारखे वाचायला घेतले. ओळीओळींमधून पानापानांतून पुढे सरकता सरकता दमछाक व्हायला लागली. पण पुस्तक हातचे मात्र सुटेना.

पुस्तक वाचून पुरे केल्यावर लक्षात आले ही ग्रेसांच्या निर्मितीची 'सुप्तसूत्रे' आहेत. हे सृजनकाव्य आहे. 'चर्चबेल', 'मितवा', 'संध्यामग्न पुरूषाची लक्षणे', 'मृगजळाचे बांधकाम' नि पुढचा संग्रह 'वाऱ्याने हलते रान'. स्वतःच्या निर्मिती प्रक्रियेचा शोध घेण्याच्या उर्मीतून निर्माण झालेले हे ललितबंध आहेत. ग्रेस निर्मितीचा आद्यबिंदू शोधू पाहतात. त्यांचा शोध विविध अंगांनी मूर्तरूप झाला आहे. त्यासाठी ग्रेस पुनःपुन्हा आपल्या जीवनातील आई, सुमित्रेच्या आठवणी, कधी मुली मिथिला, माधवी, मुलगा राघव बायको लीला गुणवर्धिनी यांच्या संदर्भातील घटना, प्रसंग, कधी साऊल, केशव आजूबाजूचा माणसांचा नि वाङ्मयीन गोतावळा, निसर्गातील ऋतुबदल, पक्ष्यांचे स्थलांतर, झाडांची पानगळ, पाऊस, संध्याकाळ अशी नानाविध रूपे, दंतकथा, पुराणकथा घुसळून पिंजून पिंजून पाहताहेत. निसर्गसत्ता व जीवनसत्ता या दोन्ही सत्तांवर सौंदर्यसत्तेचे अधिष्ठान असते. सौंदर्य ही कलेची निर्मिती आहे. हा ग्रेसचा काव्यसिद्धांत आहे. 'वाऱ्यावर हलणाऱ्या राना'प्रमाणे ग्रेसच्या मनातील असंख्य उर्मींचे हे आविष्कार आहेत. पुन्हाः पुन्हा वाचायचा मोह पाडणारे. अंतर्मुख करणारे. आपल्याही जीवनदिशेचा शोध लागला आहे याची ग्वाही देणारे - शेवटी एक आनंदमंत्र पदरात टाकणारे. ग्रेसांचे 'चर्चबेल', 'ओल्या वेळूची बासरी' पर्यंतचे सर्व ललितबंध एकत्र अभ्यासले तर निर्मितीप्रक्रियेचा एक सुंदर बंध नि अनमोल जीवनचिंतन हातात येईल.

'जसे घायाळाचे बाळ । पुढे रांगते अंगणी...' या लेखात श्यामा आणि संध्या या दोन जुळ्या बहिर्णींची कहाणी सांगतात. पणाला लावून जळते ती पणती, अशी पणतीची व्याख्या करतात. पुढे महाभारताचा संदर्भ घेऊन बोलतात - कलाकृती जीवनातूनच निर्माण होते हे खरे. पण कलाकृतीत व्यक्त झालेले जीवन हे साक्षात जीवनाशी निगडीत असले तरीही त्याचे ते कुठल्याही सबबीवर बांधील नसते. कारण... जीवन जात्याच जगण्याच्या शारीर प्रक्रियेशी बांधील असल्यामुळे त्याला कसलेच स्वातंत्र्य नसते. त्यामुळे

लाचारीच्या तडजोडी करत आत्मवंचनेच्या मार्गाने ते आपली पोळी भाजून घेत असते. जगणे तरीही या ना त्या रूपाने समृद्ध होत जातेच. पण समायोजन आणि तडजोडीच्या अनेक उणिवा स्वीकारून कला अशा जीवनाची पुनर्निर्मिती करते. या प्रक्रियेत तो अनुभव, जीवनाची जी आकृती कलारूपात साकार होते ती निर्दोष आणि परिपूर्ण असते. तेव्हा कलारूपातील जीवन हा साक्षात जीवनापुढचा मोठा भयावह दंडक आणि चिरकालीन आदर्श असतोच. कारण जीवनाच्या फटी आणि उणिवा बुजवण्याचे कार्य करणे हेच कलाकृतीचे धर्म असतात. (पृ.४) जीवनासंबंधीची ही पुनर्निर्मिती असते. पुनर्विचार नसतो. वास्तवकर्माच्या संदर्भातील सदय, निर्दय असे परीक्षण असते. कोणताही रिवाज किंवा रीत स्थापन करण्याची कलेची प्रतिज्ञा नसते. पुनर्निर्मिती जीवनाला पूर्णता देण्यासाठी असते. जडातील सौंदर्याचे जडाव आणि अंतरिक्षातील तरलतेचे पाडाव यांचे संयोजन फक्त कलावंतच करू शकतो. संत नाही, महंत नाही, प्रेषित आणि परमेश्वरही नाही. यासाठी वापरली जाते ती लौकिकातलीच भाषा. पण तिचा बाज वेगळाच असतो. कलाकृतीची जातिवंत, जिवंत उभारणी हे तिचे ध्येय असते. तिला तिचे नियम असतात. लौकिकातील नियमांशी ती बांधील नसते. असे कलाकाराच्या निर्मितीतील बंध ते उलगडून दाखवतात.

ऋतु बदलाच्यावेळी त्यांना एक उदासीनता घेरते. ती त्यांना अनेक जीवनवेधी व जीवनव्यार्धीच्या प्रश्नांनी ढवळून काढते. ती आपल्याला वाचायला मिळते 'जाते है शाख शाख को देते हुए दुवाँ' मध्ये Life is full of inconsistancies & contradictions (पृ.११५) हे टॉलस्टॉयने 'ॲना कॅरेनिना'मध्ये मांडलेले जीवनतत्त्व त्यांना पटते. ॲना ही घरंदाज. तिच्या वाट्याला तत्कालीन रशियन समाजाचे सर्व सरदारी दरकारी वैभव आणि सांस्कृतिक वैशिष्ट्ये आलेली त्यात ती रमलीही होती. तिला सिरोझा नावाचा मुलगाही होता. म्हणजे लौकिक दृष्टीने ती अतिशय सुखात होती. पण ॲना आणि व्रॉन्स्कीचा व्यभिचार; त्यांनी सामाजिक सांस्कृतिक दंडक कुठे गहाण ठेवले होते ? असा प्रश्न ग्रेसांना पडतो. लगेच त्यांना शेक्सपिअर आठवतो. 'हॅम्लेट'मधील 'Frailty thy name is woman' हे वाक्य आठवते. आणि हा तरल संवेदनाक्षम प्रतिभावंत 'frailty' या शब्दातील चंचलता, भयाणता तपासतो. हॅम्लेटची आई, त्याची प्रेयसी ऑफिलिया लेडी मॅकबेथ, 'मर्चंट ऑफ व्हेनिस'मधील पोर्शिया एवढेच नव्हे तर Danial has come to judgement असे पुनःपुन्हा न्यायाधीशाकडे पाहून उद्गारणाऱ्या शॉयलॉकला तरी चंचल म्हणता येईल का ? Frailty thy name is woman this appliss to only frait woman, not to all woman हॅम्लेटनं वैतागाच्या क्षणी काढलेले हे उद्‌गार. त्याचं सामान्यीकरण होऊ शकत नाही. आज अनेक बायका प्रतिभावंतावर जीव टाकणाऱ्या आहेत. लगेच ते साऊलच्या गच्चीवर असलेल्या लंगड्या पारव्याचा दाखला देतात. तो लंगडा म्हणून सगळे पक्षी लंगडे नसतात. यानिमित्ताने त्यांनी केलेले स्त्री आणि पुरूषामधील नीतीमत्तेवरील भाष्य मुळातून वाचण्यासारखे आहे. स्थलांतर केलेल्या पक्ष्यांची नीतीमत्ता - सूफी प्रार्थनेत मांडतात.

> ''जाते है शाख शाख को देते हुए दुवाँ
> आँधीसे बच गये तो इसी रूत मे आएँगे।'' (पृ. ११७)

प्रार्थना म्हणणारा पक्षी मेला की जिवंत हे आपल्याला माहीत नाही. देशांतर ही कल्पना आपल्याला लहानही करता येणार नाही आणि मोठीही. पण आपली अवस्था मात्र -

> ''साहिलकी सारी रेत इमारतमे लग गयी।
> अब हम कहाँसे अपने घरोदें बनायेंगे।'' (पृ. ११७)

पणतीत पाणी घेऊन जीव द्यायला निघायचं आणि जीव जात नाही म्हणून ओरडाचे. हीच सर्वसामान्य व्यवहारी माणसाची केविलवाणी रीत आणि करंटी कुवत!

या निबंधात काव्यसत्यासंबंधी ते म्हणतात, काव्यसत्याचे सर्व कल्प आणि विकल्प गोळा करताना एकदाच नव्हे तर अनेकदा सर्व गृहीत, अगृहीत, स्थापित सर्वच सांस्कृतिक नात्यांचे विसर्जन करावे लागते. अक्षरशः मूलाधारासाठी गीतेचे निकष घेऊन, प्रतिमासृष्टीने तिच्या भाष्याचा आविष्कारातून प्रबंध रचणाऱ्या ज्ञानेश्वरांचाही याला अपवाद नाही... आपल्या चिमुकल्या दाताखाली ओठाला दाबून छोट्याशा रक्तथेंबावर उद्‌गारतात की -

> ''गीते विणेही रंगू दावी
> तो हा लोभाचा प्रबंधु ओवी
> केला मिया'' (पृ. ११४)

काव्यसत्य आणि काव्य न्याय ह्या सौंदर्यसत्तेच्या दोन अंतिम उपाधी आहेत. (१३) हे सत्य उभे करण्याची, त्याची अगणित रूपे उभी करण्याची ताकद फक्त कलावंताची.

ग्रेस यांचे बालपण दुःखात गेले. वडील व्यसनी. आई सुमित्रा क्षयरोगाने ग्रासलेली. लवकर गेली. घरात सुमित्रा सोडून चार सावत्र आया. प्रचंड बायामाणसांचे कुटुंब. आदिम गुहेतील इच्छा वासनांचे अनुबंध लहानपणीच दिसले. सुमित्रा गेल्यावर ते एकटे पडले. बालपण शिळेसारखे गोठले.

''आभाळ सावल्यांचे झाले नदीत गोळा
आई घरी मुलांना वाटून दे उन्हाळा''

अशी भीषण अवस्था. जीवनाच्या कौटुंबिक, आर्थिक, भावनिक, सामाजिक अशा सर्वस्तरांवर त्यांना संघर्ष करावा लागला. जीवनाची राखरांगोळी होईपर्यंत भोगल्याचे ते सांगतात.

''नाहीच कुणी रे आपुले
प्राणांवर नभ धरणारे
दिक्काल धुक्याच्या वेळी
हृदयाला स्पंदविणारे '' (ललित : मे २०१२, पृ. ३८)

ही वस्तुस्थिती. पण त्यांनी स्वतः भोगलेल्या यातनांचे ओरखडे दुसऱ्यांवर अजिबात उमटू दिले नाहीत. आपल्यावरील अन्यायाचा ना बोभाटा ना कुणावर दोषारोप ! कुठे आक्रस्ताळेपणा नाही. आपल्या दुःखाशी त्यांनी दाट मैत्री केली. ते कवितेत उमटले नि ललित गद्यातही. कधी स्वतःच्या निमित्ताने कधी साधारणीकरणातून. वेदनेचे कुठे भांडवल होऊ दिले नाही. या परिस्थितीत ग्रेसांनी जन्मजात लाभलेली प्रतिभा सांभाळली. तिला सकस - समृद्ध केले. त्यासाठी लागणारे संवेदनक्षम मन डोळ्यात तेल घालून जपले. याचा अनुभव 'वाऱ्याने हलते रान' नी इतर लेखन वाचताना येतो. येथे 'चर्चबेल'मधील 'चिमण्या' आवर्जून आठवतात. ग्रेसच्या घरात घरटं बांधू पाहणाऱ्या, ग्रेसच्या फोटोवर आपल्या घरट्याचं गवत वारंवार आणून ठेवणाऱ्या चिमण्यांना ते वैतागतात. कितीतरी वेळा ते गवत उचलून फेकतात. दारे लावून त्यांचे येणे बंद करतात. पण चिमण्या कशालाच जुमानत नाहीत. त्यांची घरटे बांधण्याची उमेद रोज नव्या जोमाने वाढते. शेवटी त्यांच्या घरट्याचे गवत जाळले तर चिमण्या परत येत नाही हा आठवलेला इलाज ते करतात. नि चिमण्या त्यांना वाळीत टाकतात. चिमण्या येण्यासाठी ते किती प्रयत्न किती आर्जव करतात पण चिमण्या आपला बहिष्कार मागे घेत नाहीत. ग्रेस लिहितात - ''चिमण्यांनी टाकलेला बहिष्कार पान खाऊन तोंडावर थुंकण्यासारखा मला वाटला ! माणसांच्या संस्कृतीत निर्दयतेचे ही पश्चात्तापाने, नव्हे क्षमा केल्याने परिमार्जन होऊ शकते. प्राण्यांच्या, पक्ष्यांच्या जीवनक्रमात अशी एखादी सोय नसेल काय ?'' (चर्चबेल : चिमण्या, पृ. ७) पुढेही छोट्या मंडळींना काऊचिऊची गोष्ट सांगताना त्यांचे शब्द निसरडे होतात.

''माझ्या अंगणात
चिमण्यांची किलबिल
हळू पाय टाका
भुर्र्ऽ उडूनी जातील'' (चर्चबेल : ७)

इथे त्यांच्या गळ्याला कोरड पडते. हिंग टाकून केशवने नष्ट केलेले गुलमोहराचे झाड - त्याचा 'वाऱ्याने...' मध्ये बरेचदा आलेला उल्लेख My first & last allegation, you know, that is the murder of Gulmohar (पृ. ११५) केशवच्या या कृत्याला क्षमा नाही. संवेदनाक्षम मनाचे न्यायालय येथे दयेचा अर्ज स्वीकारू शकत नाही. 'त्यांची जात मऊ मेणाहुनी आम्ही विष्णुदास' अशी. अशी कितीतरी उदाहरणे या पुस्तकात आहेत. हे झाले ओझरते नमुने.

स्त्रियांवरील अत्याचारानेही त्यांच्या संवेदनक्षम मनाला यातना होतात. यादृष्टीने 'अहिल्येच्या शिळेतील शिल्पभावाचे अभिसार' हा निबंध बोलका आहे. ग्रेसांनी या सर्व चांगल्या खुराकानं तो पुष्ट केला आहे याचा पदोपदी अनुभव येतो.

ग्रेसांना पावसाचे प्रचंड आकर्षण. पाऊस काळचा अप्रतिम नजराणा म्हणजे इंद्रधनुष्य - ते बघावे ते त्यांच्या डोळ्यांनी - 'ताऱ्यांच्या प्रहरापाशी । पाऊस असा कोसळला'मध्ये ह्याने आपल्यालाही एक नवी नजर मिळते.

'वाऱ्यांने हलते रान'मध्ये महानुभाव वाङ्मय, ज्ञानेश्वर, तुकाराम, कबीर, जे कृष्णमुर्ती, जी. ए. केचे, एमिली, रिक्ले, डोस्टोव्हस्की, शेक्सपिअर, टालस्टॉय ऑडेन असे अगणित मराठी, इंग्रजी, उर्दू, बंगाली संदर्भ येतात. ग्रेसांचे कृलाकृतीवर बोलणे म्हणजे काव्यात्म टीका. श्री. के. क्षीरसागर, रवींद्रनाथ टागोर यासारख्यांची आठवण करून देणारी पुस्तकाला संदर्भग्रंथाचे मोल देणारी. ग्रेसांचा हा लेखनविलास म्हणजे भाषेचा उत्तम नमुना आहे. ज्याला भाषेत गती मिळवायची आहे त्याला अभ्यास करण्यासारखी !

'वाऱ्याने हलते रान' वाचताना ग्रेसांच्या प्रतिभेचे नवनवोन्मेषशाली रूप बघून आपण कितीतरीवेळा अवाक होतो. खुपदा कृतज्ञतेने नम्र होतो. त्याचं कौतुक तर सतत सुरूच असते. त्यांना वाचणे, बारीक अभ्यास करणे हीच आपली श्रद्धांजली !

'वाऱ्याने हलते रान', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पुनर्मुद्रण - २०१२, पृष्ठे १२२, मूल्य-१६०/-

▌डॉ. विमल भालेराव
'मैत्र', अ-३,सुधीर कॉलनी,
अकोला - ४४४ ००१
दूरभाष : ०७२४ - २४५६९२९
भ्रमणभाष : ९४२१७५५५१३

शिल्पान्त खंड स्मरणाचा

वीणा आलासे

■■■

॥ १ ॥

दोन हजार बारा सालच्या मार्च महिन्याच्या सव्वीस तारखेला जी अपेक्षितच होती ती कवी ग्रेस यांच्या मृत्यूची बातमी येऊन धडकली. बातमी तशी अपेक्षित असली तरी मृत्यू तो मृत्यूच ! एखादे माणूस असणे आणि नसणे म्हणजे काय याची खऱ्या अर्थी मनाला सुन्न करणारी जाणीव करून देतो, एकमेव मृत्यूच !

या घटनेपूर्वी फेब्रुवारी महिन्याच्या सत्तावीस तारखेला मी त्यांना भेटण्यासाठी शांतिनिकेतनहून पुण्याला गेले होते. त्यांच्या शरीराला जे भोग भोगावे लागत आहेत त्यातून त्यांच्या प्राणांची सुटका होणे कठीण आहे हे मला जाणवत होते. त्यांनीही फोनवर बोलताना भेटीसाठी यायचे असेल तर फेब्रुवारी महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात येऊन जावे अशी इच्छा व्यक्त केली होती. त्यानुसार सव्वीस फेब्रुवारीला मी पुण्यात पोहोचले व सत्तावीस तारखेला सकाळी दहा वाजताच्या सुमारास ऑटोरिक्षाच्या भरवशावर मास्टर दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटलच्या आवारात जाऊन पोहोचले. आता या एवढ्या मोठ्या दवाखान्यात त्यांना शोधावे कसे असा विचार करत करत समोरच्या काऊंटरवरच्या एका मुलीकडे चौकशी केली. एकतर पुणे शहर माझ्या परिचयाचे नाही, त्यात मंगेशकर हॉस्पिटल हे फक्त ऐकूनच माहीत होते. पण मुलींनी मदत केली आणि त्यानुसार आमची स्वारी दवाखान्याच्या आठव्या मजल्यावरच्या कवी ग्रेस यांच्या खोलीत जाऊन पोहोचली.

आत जाऊन पाहते तर काय ? खोलीत चहुकडे ग्रेसचेच फोटो आणि मध्ये पलंगावर ग्रेस. त्यांच्या नागपूरच्या घरात त्यांच्या सभोवती त्यांचे फोटो लावलेले असत हे मी पाहिले होते. नागपुरात जितकी घरे बदलली त्या सर्वच घरांमध्ये जाण्यापूर्वी स्वतःची बसायची जागा ठरवून, भोवतालच्या भिंतींवर स्वतःचे भरपूर फोटो लावून मगच ते गृहप्रवेश करीत असत. पण इथे ? दवाखान्यात ? कॅन्सरसारख्या दुराराध्य रोगाची त्या रोगापेक्षाही भयंकर जीवघेणी ट्रीटमेंट घेतल्यानंतर ?

मग त्यांना जरा मूडमध्ये आणण्यासाठी हसतहसत म्हटलं - इथे सुद्धा चहूकडे आपलेच फोटो लावून टाकले का हो ! कमाल झाली ! उत्तरादाखल ते पलंगावरून उठले आणि चहुकडे अंगुलिनिर्देश करत म्हणाले - ''हे बघा बाई, आमच्या गुलजारसाहेबांनी लिहून ठेवलंय ना - काय लिहिलं ? मै देखूँ

जिस ओर सखी री, सामने मेरे सावरिया - तसं आहे हे. हा असा इथे मी, आणि जिकडे बघेन तिकडे माझा सावरिया म्हणजेही मीच. आलं लक्षात ? माझं थोबाड सतत माझ्या डोळ्यासमोर पाहिजे - आहे की नाही मजा ! मग काय म्हणता याला ? आत्मप्रीती, आत्ममग्नता, आत्मकेंद्रितता की आणखी काही ? द्या टाळी ! बसा, फार दूरून आलात...''

असो. व्यक्तिगत अनुभव सांगण्याची ही जागा नाही पण आज या ठिकाणी ग्रेस यांचे मराठी साहित्याच्या अलिकडच्या इतिहासातील स्थान शोधतशोधत त्यांच्या कवितेतील दुर्बोधतेचा जरा वेगळ्या दिशेने उहापोह करणार आहे, त्या दृष्टीने मला हे शेवटच्या भेटीतले त्यांचे उद्‌गार महत्त्वाचे वाटतात. का ? ते लेखनाच्या प्रवाहात हळूहळू स्पष्ट होत जाईल असे वाटते. ग्रेस गेल्यानंतर आज पहिल्यांदाच त्यांच्याबाबत काही लिहायला लेखणी उचलली आहे. स्वतः ग्रेस दवाखान्यातही अखेरपर्यंत काही ना काही लिहितच होते. तो त्यांचा स्वभावच होता. निर्मिती चा अखंड निदिध्यास - अगदी हव्यास म्हणावा इतका. त्यामुळे ते सतत अस्वस्थ असत. मृत्यूने त्यांची या मानसिक ओढाताणीतून सुटका केली. त्यांच्या आत्म्याला आता शांती व चिरविश्रांती लाभलीच असणार म्हणूनच माझी ही छोटीशी स्मरणांजली.

शेवटच्या भेटीतले ग्रेस यांचे बोलणे मला महत्त्वाचे वाटले कारण त्यांनी स्वतःच स्वतःबद्दल आत्मप्रीती, आत्ममग्नता वगैरे शब्द गमतीने का होईना, पण वापरले होते. एरवी आपण कोणीही त्यांच्याबद्दल हे शब्द वापरले तर ते चिडून कमालीचा आक्रमक व संरक्षणात्मक पवित्रा घेत असत आणि 'मी असा नाही', 'मी तसाही नाही', 'मी वेगळा आहे व माझ्यासारखा फक्त मीच आहे' आणि 'कसाही असलो तरी तुम्हाला समजून जाईन असा तर नाहीच नाही' - असे बोलून गप्प करत असत. पण शेवटच्या भेटीत तेच शब्द त्यांनी वापरले तेव्हा मला दोन प्रकारचे अर्थ त्यातून जाणवले - एकतर आत्मप्रीती व आत्ममग्नता आपल्यात आहे ही गोष्ट त्यांना प्रकर्षाने जाणवली असेल, किंवा हे शब्द वापरून कोणी त्यांना कितीही हिणवण्याचा प्रयत्न केला तरी हीच वैशिष्ट्ये त्यांच्या कवितेला अनवट, पृथगात्म, तेजस्वी व भर्जरी सौंदर्य प्राप्त करून देणारी दैदिप्यमान वैशिष्ट्ये आहेत हे निक्षून सांगायचे असेल.

।। २ ।।


एकेकाळी ग्रेस यांच्या कवितेने भारावलेल्या पिढीतच माझी गणना होते. खरोखरच त्यांच्या कवितेने मी झपाटले होते. पण त्यावेळीही मला त्यांच्या कवितेचा अर्थ लागत नव्हता. '''चंद्रमाधवीच्या प्रदेश'च्या निमित्ताने'' हा लेख मी लिहिला व एकोणीसशे ऐंशी साली 'सत्यकथा' मासिकात तो प्रकाशित झाला. त्यावेळी मी त्यांच्या कवितेचा अन्वय लावून पाहण्याचा आणि त्यांच्या प्रतिमा - प्रतीकांचे अर्थ व संदर्भ शोधण्याचा आटोकाट प्रयत्न केला होता. इतकी मोहक व नादावतींनी खेचून घेणारी कविता आपल्याला समजत कशी नाही, हेच मला कळत उलगडत नव्हते. तिला अर्थाचे निकष लावून पाहण्यासाठी विश्वसाहित्यातील मिळतील तितकी दुर्बोधताविषयक पुस्तके वाचण्याची तयारी होती. मराठी तर माझी मातृभाषा आहे आणि ती मला चांगल्यापैकी समजते. त्याबरोबरच बांगला भाषा मला चोवीस तास ऐकावी व बोलावी लागते आणि त्या भाषेतील उत्तमोत्तम साहित्यकृती मी मुळातून वाचलेल्या आहेत. शिवाय इंग्रजी व संस्कृत या भाषा लहानपणापासून परिचित असल्यामुळे बऱ्यापैकी समजतात. अशा परिस्थितीत माझ्या मातृभाषेतील एखाद्या लेखकाचे लेखन मला समजू शकत नाही ही वस्तुस्थिती पचवणे फार कठीण जात होते. म्हणून चंग बांधला होता की आपल्याला ग्रेसच्या कवितेचा अर्थ लावता आलाच पाहिजे. कारण भाषा म्हटली की तिला अर्थ हा असतोच, आपल्याला समजत नाही म्हणजे अर्थ नाहीच, असे समजणे हा लेखकावर अन्याय करणे आहे असे वाटत होते. महाकवी कालीदास यांनी त्यांच्या 'रघुवंश' या काव्याच्या सुरवातीलाच देवतावंदन करताना -


'वागर्थाविव संपृक्तौ वागर्थप्रतिपत्तये ।
जगतः पितरौ वन्दे पार्वतीपरमेश्वरौ ।।' -

हा श्लोक रचला आणि वाक् म्हणजे वाणी व तिचा अर्थ यांचे अद्वैत म्हणजे पार्वतीपरमेश्वराच्या अद्वैतासारखे मानले. शब्द व त्याचा अर्थ यांच्या एकरूपतेला पार्वतीपरमेश्वराच्या एकरूपतेची उपमा देऊन अजरामर करून ठेवले.

।। ३ ।।

'''चंद्रमाधवीचेप्रदेश'च्या निमित्ताने'' हा लेख लिहिल्यानंतर गेली बत्तीस - तेहेतीस वर्षे मी ग्रेस यांच्या कवितेवर काहीही लिहिले नाही. कारण १९८० सालाच्या आसपासच्या काळापासून ग्रेस स्वतःबद्दल आणि त्यांच्या निर्मितीप्रक्रियेबद्दल इतके लिहू व बोलू लागले की कवी जर स्वतःच त्याच्या कवितेबद्दल भरभरून काही सांगत असेल तर त्यापुढे आपण आणखी काय टिप्पणी करणार ? त्यापूर्वी ग्रेस स्वतःच्या कवितेबद्दल काहीच बोलत नसत हेच त्यांचे कौतुकास्पद वैशिष्ट्य होते. विशेषतः 'माय पोएट्री इज माय डिफेन्स' अशी वाक्ये तर मी त्यांच्या तोंडून कधीच ऐकली





नव्हती. मराठीत सांगायचे तर 'माझी कविता हेच माझे कवच आहे' असा वरील इंग्रजी अवतरणाचा अर्थ होईल. कसले कवच ! आणि कशासाठी ? कोण जाणे ! त्यांना विचारायची तर काही सोयच नव्हती. सतत संरक्षणात्मक पवित्रा घेणारी व्यक्ती हळूहळू समाजापासूनच नव्हे तर स्वतःच्या निर्मितीच्या दुर्मिळ मुहूर्तांपासूनही दुरावत जाते.

१९७० ते ८० या दशकात ग्रेस यांच्या कवितेच्या शैलीचे फार अनुकरण होत होते... त्या कवितेभोवती एकप्रकारची रहस्यमय सौंदर्याची प्रभावळ निर्माण झाली होती. याबाबतीत मराठीतले काही जबाबदार लेखक काळजी व्यक्त करून आक्षेपही नोंदवत होते. अशा लेखकांची काही अवतरणे मी माझ्या 'चंद्रमाधवी'वरच्या लेखाच्या सुरवातीलाच दिली आहेत. ती आज वाचकांच्या सोयीसाठी पुन्हा उद्‌धृत करते. कारण गेल्या तीस वर्षात पुलाखालून पुष्कळ पाणी वाहून गेले आहे. आता एक इतिहास म्हणून त्यावेळच्या साहित्याकडे बघून प्रत्येक साहित्यकाराच्या कलाकृती काळाच्या विशाल व समग्र संदर्भात नेमक्या कुठे बसतात ते पारखून घेण्याची वेळ आली आहे. तर मुद्दा हा की तीस वर्षापूर्वीच्या माझ्या त्या लेखातील सुरवातीला भाग हा असा होता -

''अंजली बिनीवाले 'चर्चबेल'वरील परीक्षणात म्हणतात - 'ग्रेस यांच्या प्रतिमाजड शैलीला किती प्रतिसाद मिळतो हे नव्याने लिहू लागलेल्या कवींच्या कविता वाचताना प्रामुख्याने जाणवते. ग्रेस यांच्या शैलीचे आत्यंतिक अनुकरण केले जाताना दिसते'. तसेच प्रभा गणोरकर यांनी देवानंद गोरडे यांच्या कवितासंग्रहाच्या परीक्षणात - 'मराठी कवितेत माजलेल्या या अराजकाला जबाबदार कोण?' असा प्रश्न उपस्थित करून अनुत्तरित ठेवला आहे आणि या अराजकाची उदाहरणे म्हणून 'चंद्रधून', 'चंद्रगर्भ', 'रंगउधाण' असे शब्द असलेल्या गोरडे यांच्या ओळी उद्‌धृत केल्या आहेत. असे सामासिक शब्द ग्रेस यांच्या कवितेत वारंवार भेटतात आणि अशा शब्दघाटांचे अनुकरण अतिरिक्त प्रमाणात चालू आहे.''

आज तीस वर्षानंतर ग्रेस यांच्या कवितेबद्दल लिहिताना मला अनुकरणाचा प्रश्न सतावत नाही, कारण ती लाट ओसरून गेली आहे, निदान अशा अनुकरणातला फोलपणा स्पष्ट झाला आहेच. आज मला फार महत्त्वाचा वाटतो तो प्रभा गणोरकर यांच्या अवतरणातील 'अराजका'चा प्रश्न.

आज मागे वळून गेल्या पन्नासेक वर्षातली मराठी साहित्याची वाटचाल बघितली तर त्यातला १९६० ते १९८० हा वीस वर्षाचा कालखंड स्पष्टपणे अनेक परिवर्तनांचा व खळबळीचा दिसतो. याच काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वामुळे तयार झालेली व सुशिक्षित होऊन आत्मविश्वासाने लिहू लागलेली दलित कवींची एक मोठी फळी निर्माण झाली. 'दलित' हा शब्द मला फारसा पटत नाही, त्याऐवजी मी या कवींना 'विद्रोही' म्हणून संबोधणे जास्त

आदराचे गमक मानते. हे सर्व कवी ताज्या दमाचे तरूण होते. जातिभेदामुळे या समाजातील एका मोठ्या वर्गाला किती दारिद्र्य, अवहेलना व अन्याय सहन करावे लागत आहेत या वस्तुस्थितीविरूद्ध बंड करून उठलेली त्यांची कविता प्रखर जळजळीत भाषेत व्यक्त होत होती. ते भारतीय संस्कृतीचा, तीत मुरून समाजमान्य झालेल्या अस्पृश्यतेचा - अंधविश्वासाचा - रूढिग्रस्ततेचा धिक्कार व निषेध करत होते. ही धर्माश्रित रूढींनी बरबटलेली संस्कृती आता निकामी झाली आहे असा त्यांचा दावा होता. हे सर्व नाकारून ते नव्या सूर्योदयाची गाणी गात होते.

त्याचवेळी दुसरीकडे बा. सी. मर्ढेकर यांच्या कवितेतून निघालेला एक नवकाव्याचा प्रवाह जोर धरत होता. रोमँटिक कवितेला नाकारणारा हा प्रवाह होता. विशुद्ध कविता लिहिणाऱ्या या नवकवितेत भाषेचे व रचनातंत्राचे नवनवीन प्रयोग होत होते. पारंपरिक भाषाव्यवहाराला वेगळी वळणे लागत होती. रूढ शब्दार्थांना तासूनपुसून नव्या मुशीत घडवले जात होते. 'इरेस पडलो तर बच्चमजी' पासून ते 'भंगु दे काठिण्य माझे' पर्यंतचा प्रवास नवकवींवर प्रभाव पाडत होता आणि भाषेचा बाज बदलत होता. कवितेत वास्तववाद, अस्तित्त्ववाद, अतिवास्तववाद, संज्ञाप्रवाह वगैरे नवीन धारा येऊन थडकल्यामुळे दुर्बोधता वाढत होती. या नवकवितेच्या प्रवाहाची भाषा ही तथाकथित लब्धप्रतिष्ठित व पाश्चात्त्य साहित्याशी परिचित असलेल्या उच्चभ्रू समाजाची भाषा होती.

पण महत्त्वाची गोष्ट ही की नवकविता आणि विद्रोही कविता या दोन्ही ठसठशीत वेगळ्या प्रवाहांची 'टार्गेट रीडरशिप' म्हणजे अपेक्षित वाचकवर्ग हा एकच होता ! या वाचकवर्गात मुख्यतः मराठीचे प्राध्यापक, काही इतर व्यवसायातली साहित्यप्रेमी मंडळी, प्रकाशकवर्ग आणि 'आपण मराठी भाषेत काही आगळेवेगळे करून नाव कमावले पाहिजे' अशी तीव्र इच्छा असलेली काही मंडळी होती. या सर्वच प्रकारांमधला बहुसंख्य वाचकवर्ग सुशिक्षित व मध्यमवर्गीय होता आणि शरच्चंद्र - फडके - खांडेकर - रविकिरण मंडळातील कवींची कविता व भावनाप्रधान ललितसाहित्य या साहित्यसामग्रीवर पोसला हाता. अशा वातावरणात काही महत्त्वाचे करून यश मिळवायचे असल्यास एकतर विद्रोही सूर लावणे किंवा नवे भाषिक प्रयोग करणे हे दोन मार्ग उपलब्ध होते आणि जो सूर लावला त्या गटात लेखक अपरिहार्यपणे ओढला जाणे अटळ होते.

या पार्श्वभूमीवर कवी ग्रेस हे एकदम 'भाषाच ही निकामी, अर्थासही पुरेना' असा चढा सूर लावून थेट लब्धप्रतिष्ठितांच्या बालेकिल्ल्यातच जाऊन थडकले. 'शब्दांच्या अर्थाचीही मज कधी न आली करूणा' असा पुकारा करून त्यांनी शब्दार्थाचे घाट मोडून टाकले. नभ, हृदय इत्यादी शब्दांची मराठीत अनेकवचनी रूपे होत नाहीत पण ग्रेसच्या कवितेत ती होतात आणि आपण ती मानूनही घेतो कारण त्यांच्या कवितेचे अपरूप सौंदर्य, विद्रोही कवितेत सूर्योदयाचे वेध होते, उलट ग्रेस यांनी चंद्रवेध घेतला. 'चंद्रधून', 'चंद्रशिल्प', 'चंद्रदुःख', 'चंद्रमाधवी', 'चंद्रवारा', 'चंद्रव्याकुळ' अशी किती उदाहरणे द्यावीत ! मुद्दा हा की त्यांनी भाषाविद्रोह स्वीकारला व पारंपारिक भाषेतील शब्दभांडार स्वीकारून शब्दार्थांचे मुलुख उद्ध्वस्त करण्याची जिद्द बाळगली. तितकी प्रतिभा त्यांच्यात होती म्हणूनच ते दोन्ही प्रचलित प्रवाहांमध्ये हरवून गेले नाहीत, नामशेष झाले नाहीत. 'मी एक बेट आहे', 'ज्या भाषेत जन्मलो त्या भाषेतच अनाथ वाटते मला' अशी आर्जवी व उदास विधाने करत अक्षरशः 'संगमरवरात' त्यांची स्वप्ने त्यांनी दडवून ठेवली. सगळीकडे आपले आणि फक्त आपलेच प्रतिबिंब दिसेल असा आरसेमहाल त्यांना हवा होता. लब्धप्रतिष्ठितांच्या भाषेत लिहून, त्यांचीच भाषा निकामी आहे म्हणत निर्दयपणे शब्दार्थांचे मुलुख उद्ध्वस्त करून, फक्त मी एकमात्र सृजनदीप्तीचा स्वामी आहे हे दाखवून देण्याचा मनातला अट्टाहास दिसू नये म्हणून त्यांनी स्वतःभोवती जी मजबूत, आकर्षक व रहस्यमय तटबंदी केली तीच त्यांची कविता, त्यांची जन्मदात्री, त्यांचा डिफेन्स ! ग्रेसच्या संपूर्ण कवितेत मंत्रशक्तीचे सामर्थ्य, बेभाव वेग, भारलेल्या दंतकथा, अद्भूत रहस्यमय क्रौर्य, उदासीच्या प्रार्थना ठासून भरलेल्या आहेत. याच अद्‌भुतात ते स्वतःही सामील आहेत. म्हणूनच - एका धर्माचे जन्मनाव, दुसऱ्या धर्माचे टोपणनाव आणि तिसऱ्याच धर्माच्या अवलियाचा दंतकथेतील फकीरासारखा अनियमित पण मुक्त वावर ! माईंची शुभं करोति, हॉस्पिटलमधली कॅथेड्रल धून, अवलियाची आजान आणि सूफी प्रार्थना - सगळेच एकरूप आणि एकाकार !

आज तीस वर्षानंतर ग्रेस यांच्या कवितेतील दुर्बोधता व मराठी साहित्याच्या इतिहासातील त्यांचे स्थान याबाबत विचार करताना ते खरोखरच जेथे दुसरे कोणीही नाही अशा एकट बेटावर विराजमान झालेले दिसतात. त्यांची कविता हा मराठी भाषेतला एक 'न भूतो न भविष्यति' असा चमत्कार आहे. ते स्वतःही त्यांच्या कवितेला कधी 'मिरॅकल' तर कधी 'मिराज' म्हणतात. कदाचित त्यांनी जाणूनबुजून नव्हे तर नकळत का होईना, पण मृगजळालाच बांधून ठेवण्याचा ध्यास घेतला. असे मी का म्हणजे त्याचा त्यांच्या कवितेच्याच अंगाने थोडा शोध घेऊ या.

'राजपुत्र आणि डार्लिंग' या १९७४ साली प्रकाशित झालेल्या पुस्तकातला पहिलाच शब्द - ऑकेस्ट्रा. आता माझ्या हाताशी संदर्भग्रंथ नसला तरी मला स्पष्ट आठवते की रेने - वेलेक यांच्या समीक्षाशास्त्रावरील ग्रंथात 'ऑर्केस्ट्रायझेशन' हे कवितेतील दुर्बोधतेचे एक कारण मानले आहे. एखादा कवी शब्दाशेजारी शब्द मांडून अशी काही अनवट रचना करतो की त्या शब्दांच्या ध्वनीमधूनच एक नादावर्त क्षणभर डोळे दिपवणाऱ्या विद्युल्लतेसारखा प्रचंड वेगाने निनादत लुप्त होऊन जातो. आपण पहिल्याच एकदोन ओळींच्या अर्थाभोवती घुटमळत असतो तोवर आपल्या संवेदनेला गरगरवून ती कविता संपलेली असते. जणुकाही असंख्य वाद्यांचा वाद्यवृंद केवळ शब्दांच्या मांडणीतून झंकारून जातो. अशी कविता अर्थाच्या अंगाने आस्वादता येत नाही. भाषिक व्यवहारामध्ये शब्दाला अर्थ लगडलेला असतो. त्यामुळे कवीला शब्दार्थाला तुडवततुडवतच ध्वनिकंपनाच्या लहरींवर सतत करामत करावी लागते. असा विलक्षण प्रयोग करणारे सर्वच कवी यशस्वी होत नाहीत, पण एखाद्याला जर जमून गेलं तर भाषिक चमत्कार घडून जातो तर कविता यशस्वी होते. अर्थात् त्याच कवीला पुन्हा कविता लिहिताना, प्रत्येक कवितेत हे साधेलच अशी त्याची त्यालाही खात्री नसते म्हणूनच 'भय इथले संपत नाही' अशी असुरक्षितता हा त्याचा अटळ भोग ठरतो. कवी ग्रेसही त्यांनी वापरलेल्या या वाद्यवृंदसदृश शैलीची प्रत्येक वेळी खात्री देऊ शकत नाहीत. म्हणूनच त्यांच्या मुक्तछंदातल्या कविता कोसळतात, गद्यलेखन विस्कळित होते.

ग्रेसना या गोष्टीची जाणीव होती की नाही ते मला माहीत नाही. त्यांचे 'राजपुत्र आणि डार्लिंग' हे पुस्तक फारसे लोकप्रियही नाही पण ग्रेस मात्र या पुस्तकाला त्यांचे फार महत्त्वाचे पुस्तक मानत असत आणि याच पुस्तकात मला त्यांच्या वाद्यवृंदसदृश शैलीचा संदर्भ सापडला -

'ऑर्केस्ट्रा आणि त्याचा एकएक सुटत जाणारा
वाद्यावयव.
मनगटावरील सुन्न शिरात शिरलेली
कॅथेड्रल धून.
कधीतरी या कवितेचा अर्थ स्पष्ट होत जाईल.'

वाद्यवृंदसदृश शब्दझंकारानेच संवेदनेला हलकासा झोका देऊन जाणारी व शब्दोच्चारांच्या मंत्रशक्तीने भारलेली कविता ग्रेस यांनी लिहिली व ती त्यांना 'संध्याकाळच्या कविता' या त्यांच्या पहिल्याच कवितासंग्रहात उत्तम साधून गेली. या कवितेसाठी त्यांनी भरपूर सामग्री जमवली होती असे दिसते. कोणती ही सामग्री ? एक - अभिजात साहित्यातील भारदस्त संस्कृतप्रचुर भाषा अभ्यासून त्यातले नादझंकृत शब्द तोंडी रूळवले. दोन - पंरपरेतील गणमात्रावृत्ते वापरली कारण आपल्या वृत्तांची वीण अगदी ठराविक अशी घाटदार व नक्षीदार असते नादाची पुनरावर्तने फार गतिमान व लयबद्ध असतात. तीन - प्राचीन महाकाव्यांमधली व पुराणांमधली व्यक्तींची नावे कवितेमध्ये मधूनमधून पेरण्यासाठी आत्मसात केली. या व्यक्तिरेखांची एक मान्यता पावलेली प्रतिमा आपल्या मनात स्थिर झालेली असते त्या प्रतिमेला छेद देणारी नवी परिमाणे दिली. चार - या नव्या परिमाणांकडे पहिल्यास स्पष्ट जाणवते की सर्व व्यक्तिरेखांचा मूलभाव 'उदासी' हाच असावा अशी काळजी घेतली गेली आहे. पाच - कविप्रदत्त उदासीमुळे वाचकाच्या मनात एक प्रकारचा नॉस्टालजिया म्हणजेच मनाला हळवी हुरहुर लावणारी जाणीव निर्माण होते. सहा - मराठी वाचकाला अकल्पनीय वाटतील व भांबावून टाकतील असे जोडशब्द व सामाजिक शब्द तयार केले. उदाहरणार्थ -

'तुझ्या स्पर्शगांधार शैलीतले शिल्प
स्वप्नात माझ्या हसावे जसे...'

तीस वर्षापूर्वी या ओळींचा अर्थ लावण्याच्या जिद्दीने मी 'गांधार' हा संगीतातला स्वर, विशेषतः कोमल गांधारामुळे प्रत्ययास येणारी आर्तता वगैरे आधार घेऊन अर्थाप्रत पोहोचता येते का याचा अदमास घेण्याचा प्रयत्न केला होता. गांधार ही एक शिल्पशैली ही आहेच. पण आता लक्षात येते की, या ओळींना अर्थाचे निकष लावणेच चुकले. कारण 'स्पर्शगांधार' या शब्दाऐवजी 'शिल्पगांधार', 'स्वप्नगांधार' असे शब्द वापरून बाकी शब्दांची थोडी पुनर्रचना केली तरी या कवितेचे काही बिघडत तर नाहीच, एकदा शिल्प - स्वप्न - शैली व गांधार हे शब्द वृत्ताच्या नादावर्तात चपखल बसले की एक प्रकाराचा भारावून टाकणारा मूड आपोआप येतो. अट फक्त एकच आपण आपली अर्थवेध घेण्याची खोड जिरवून टाकायची. ग्रेस यांच्या कवितेला अनेक वाचकांनी, रसिकांनी, विविध माध्यमांच्या जाणकारांनी उलगडून पाहण्याचा प्रयत्न केला. सर्वांना त्यांनी दिलेले उत्तर किंवा अवतरण म्हणा, येथे उद्धृत करते -

''माझे सर्व बोध, संबोध लुळे पडताहेत इथे... माझ्या आत दाटून, दाटून उठणारा, उसळून, उसळून गरगरणारा माझ्या विभूमिमत्त्वाचा ऑकेस्ट्रा, मी तिच्या टोटल रेलेव्हन्सच्या पंथप्रणालीशी जोडून पाहण्याचा प्रयत्न करताच (निर्मिती) निर्माणसंस्थेची संहिता विस्कटून गेली. नव्या संधिकालाचे अनेक अर्थकल्लोळ माझ्या विभूतिमत्त्वाशी संहारयुद्धाची भाषा करू लागते.'' (मृगजळाचे बांधकाम) मुद्दा हा की अर्थ

अनुक्रमणिका

शोधण्याची धडपड न करता केवळ नादाच्या तरल अंगाने ग्रेस यांची कविता आपल्याला न समजताही भावून जाते, झपाटून टाकते. शब्दांमागून शब्दांचा व प्रतिमांमागून प्रतिमांचा अतिशय वेगवान स्फोट करून दिपवून टाकते. तिचे आकर्षण सुटत नाही आणि आकलन होत नाही तरीही तिचे अढळ स्थान ढळत नाही. ही किमयाच म्हणावी लागले.

जी कविता जमून जाते तेथे ही किमया घडते, इतरत्र नाही. कारण शब्दांमधले झंकारणारे संगीत हे कितीही प्रभावशाली असले तरी भाषा ही ''फार डिमांडिंग असते. ती अर्थसंमृद्ध असते आणि तिची प्रसरणशक्ती अचाट. ग्रेस यांनाही ही जाणीव होती, त्यामुळे त्यांनी भाषेच्या बहिरंगाची समृद्धी जास्त जास्त नेत्रदीपक होत जाईल आणि काही वाक्ये व वाक्यांश सुटेसुटेपणाने अगदी सुभाषितांच्या स्तरावर जातील इतके धारदार केली आहेत. उदाहरणार्थ -

''ऊन सागरी जळे नि सागरी उन्हे तुला
मूक ही धरा उभी अजाण दग्ध श्यामला...''

किंवा

''तुला स्मरून बांधली करूण रंगली गोधने
समुद्रभर धूळ ये अन् धुळीतली काकणे
धुक्यात मग वृक्ष घे कुशित राहिलेले ससे
अरण्यभर सांडला मधुर अस्त माझा दिसे''

अशी अनेक उदाहरणे ग्रेस यांच्या कवितासंग्रहांच्या कुठल्याही पानावरून सहज देता येतील. त्यांनी वापरलेले हे सगळे शब्द आपल्याला त्यांच्या वाच्यार्थापासून व्यंग्यार्थापर्यंत माहीत असतात पण त्यांचा परस्परसंबंध कळत नाही. तरीही

''इथे दुःखाचा हा बहर पिकला सांजगहिरा
तुझ्या केसांचा की धुळित पडला खिन्न गजरा''

किंवा

''तू उदास मी उदास मेघही उदासले
स्मृतीतले विदग्ध नाद पैंजणात सांडले''

अशा ओळी संवेदनेला ओझरता स्पर्श करून एकप्रकारची हुरहुर लावतात. या ओळींच्या अवतीभवती शब्दांचा ऑर्केस्ट्रा साथ देत असतो. या ओळींच्या खिन्न मूडमध्ये आपण आधीच गुरफटून गेलेले असतो.

गजरा, पैंजण, काकणे, मेंदी, बेसर, काजळ, चोळी, मोकळे केसे, ऊद, चंदन, हळद इत्यादी स्त्री - शृंगाराच्या अभिजात प्रसाधनांचे उल्लेख वारंवार येतात पण त्यातून शृंगाररस निर्माण होत नाही. ही प्रसाधने गळून पडतात आणि उदासी निर्माण करतात. ग्रेस यांच्या अख्ख्या कवितेचाच स्थायीभाव उदासी हा आहे की काय असे वाटू लागते. ग्रेस यांच्या कवितेचा अर्थ मला कळणार नाही, ती वेगळ्या अर्थनिरपेक्ष भावनेने आस्वादण्याची कविता आहे हे आता मला पूर्णपणे कळले आहे. कारण ते स्वतः शब्द व अर्थाच्या बाबतीत -

''शब्दांच्या अर्थाचीही
मज कधी न आली करूणा''

''आज दुःखाला लागली
भोळ्या उर्मिलेची ठेच
भग्न शब्दांच्या ओठात
रित्या आशयाचा घोट''

''या प्रदोषपूजेसाठी
तू संध तरंगत जाशी
मी चंद्र खुडाया गेलो
शब्दांच्या खोल तळाशी''

''मनात कविता जुळे चिणुन शब्द माझा नवा''

अशा अनेक ओळींमधून कवीच्या मनातील निर्मितीप्रक्रियेचे ताणतणाव सूचकपणे व्यक्त झाले आहेत की काय ?

पण याबाबतीत शेवटी ग्रेसच आपल्या मदतीला येऊन 'ओल्या वेळूची बासरी' या ललितबंध संग्रहात म्हणतात -

''माझी कविता शब्दकोडेही नाही आणि लाजेने, नवऱ्याचे नाव दडवण्याचा उखाणा भूतबाधक नसूनही ती मला अजिबात समजत नाही असे मी मानतो. याचा अर्थ ती दुर्बोध आहे असे समजण्याचे काहीच कारण नाही''

'ओल्या वेळूची बासरी' या ललितबंध संग्रहात अशा काही स्वीकारोक्ती विखुरलेल्या आहेत.

|| ४ ||

आपल्याच मनाचे सागरमंथन करून त्यातून निघालेले अमृताचे व विषाचे कुंभही या पुस्तकात वाचकांसमोर ठेवलेले

आहेत. उदाहरणार्थ -

''कलेच्या परिभाषेत वास्तववादापासून तर अस्तित्ववादापर्यंतच्या सगळ्या विचारसरणी, मूळ सौंदर्यानुभव न समजल्यामुळे, त्याची हत्या करण्यासाठी, गारद्याच्या प्रमाणे वेटोळे करून उभ्या झाल्या आहेत''

''तस्लिमा नसरीन, सलमान रश्दी यांच्या बाबतीत social धार्मिक बंडखोरीच्या Risk चे चुकीने Creative Risk शी नाते जोडण्यात आले. They are not great artists at all. सांस्कृतिक वातावरणात उथळ आकलनाचे हे असे भडक हीण शिरले की मग काय विचारता ?''

ग्रेस यांचे हे विचार त्यांच्या पुरते अगदी अंतिम स्वरूपाचे होते. त्यांची कुठलीही मुलाखत घ्या किंवा मीडियामधले बोलणे घ्या - फक्त सौंदर्यतत्त्वावरच निष्ठा होती असे ते निक्षून सांगतात. शेवटपर्यंत त्यांची हीच मते कायम होती. त्यांना हे जग सोडून जाताजाता ललितबंधलेखक म्हणून साहित्य अकादमीचा सन्माननीय पुरस्कार मिळाला, तरीही मराठी वाचकांचे ते कवीच आहेत. पुढेमागे १९६० सालानंतरचा मराठी साहित्याचा इतिहास कधी लिहिला गेला तर त्यांचे स्थान त्यात फार लक्षणीय व महत्त्वाचे ठरेल. 'संध्याकाळच्या कविता' हे पुस्तक तर खऱ्या अर्थी 'आधी कळस' असेच ठरेल असा मला विश्वास वाटतो.

कारण, कवी ग्रेस यांचा शेवटचा, लवकरच येऊ घातलेला 'बाई ! जोगिया पुरूष' या कवितासंग्रहाचा प्रकाशनपूर्व मसुदा काही कामानिमित्त माझ्याकडे आला होता. त्यातील कविता वाचून मी खूपच अचंबित झाले आहे. कारण हा तर 'संध्याकाळच्या कविता' मधलाच ओळखीचा सूर ! तशाच वृत्तबद्ध आणि हळव्या कोवळ्या कविता. म्हणजे ग्रेस यांचा प्रवास 'संध्याकाळच्या कवितां'पासून सुरू होऊन पुन्हा संध्याकाळातच येऊन पोहोचला की काय ? म्हणजे हे संपूर्ण वर्तुळ कळसापासून सुरू होऊन पुन्हा कळसावर !

'बाई ! जोगिया पुरूष' या कवितासंग्रहातल्या दोन कविता येथे उद्धृत करते. कवीच्या वाचकांना काही संशयच राहणार नाही.

(या कविता उद्धृत करण्यासाठी प्रकाशकाची अनुमती घेतलेली आहे)

१) ''गंध हा जळे फुलात स्पर्श होऊ दे निळा
स्वप्ननीज पालवीत रंग ये नि सावळा
खिन्न हे उभे नि माड झावळात चांदणे
गौर नितळ पावलात नादतील पैंजणे

तहान फार तापवीत सागरातली शिडे
कोण चालले कुठे नि ऊर बापुडे रडे
तोडलेत मावबंध वेदनाही झोपली
गूढ या तमात हाक दूर फार लोपली!

रात्र जाऊ दे अशीच घे धुळीत हे ललाट
मावळेल ध्यास हाही दुःख होऊ दे विराट !''

२) ''घावांवर धैर्य कुणाचे
कधि तरते का रे बाळा ?
ही कट्यार खुपसुन जाइल
वृत्तांचा छांदस चाळा... ?

थडग्यावर दूर पलिकडे
थांबली उसासुन मैना
ओढ्याच्या पाण्यामधला
शोधिते तडकला ऐना...

नभ हातांवरती माझ्या
वाकता निसटतो तारा
नक्षत्रकुळाच्या लेखी
हा उल्केमधला पारा...''

आणखी काय लिहिणार ? 'बाई ! जोगिया पुरूष' हा कवितासंग्रह लवकरच सर्वांच्या भेटीला येतो आहे. त्यातल्या कविताच काय बोलायचं ते बोलतील, वृत्तझंकारातून थिरकतील. कवीला त्रिवार वंदन करण्यापेक्षा जास्त आपल्या हातात असतेच काय ?

वीणा आलासे
8 Holly Hock Co-op. Society
J 380, B.P.Township
Kolkata - 700 094
Cell : 09830918166

अनुक्रमणिका



(चित्र : शुभा गोखले)

तूं उदास मी उदास मेघही उदासले
स्मृतींतले विदग्ध नाद पैंजणांत सांडले

तुझ्या तनूंत चंद्रशिल्प सांजलीं निळीं जळें
जसा समुद्र आंधळा नि सूर्य दूर मावळे...

मंद मंद वाहते दिव्यांतली अनंतता
तुझ्या सुखांस गंधवीत लोचनीं निजे कथा...

अंगणांत ये सजून मृत्यु रोज एकला
पावसाळिं ये जसा नदीस पूर सावळा...

कुठें धुक्यांत चाललीस गर्दलें नभावरी
विश्वमंदल्या दिठींत रात्र थांबली जरी...

पाठमोरी कविता : राधा पार्थसारथी

डॉ. द. भि. कुलकर्णी

॥ एक ॥

कवितेला मथळा आहे 'राधा पार्थसारथी'. काहीतरी वेगळंच वाटत नं ? कुठे राधा, कुठे पार्थसारथी. अर्जुनाचा जीवनरथ सुरक्षित मार्गाला नेणारा पार्थसारथी; तर आपल्या पाव्याच्या वेधक सुरावटीने राधेला भुलविणारा नटखट बालकृष्ण.

राधा पार्थसारथी. राधा-कृष्ण हे युगल आपणांस ज्ञात; पार्थ-पार्थसारथी ही जोडीही आपणास माहीत. राधा पार्थसारथी या जोडशब्दांनी दचकतोच आपण. राधा हे नाव आणि पार्थसारथी हे आडनाव असे तर नाही ? अहो, दक्षिणेत असे नाव - आडनाव असेलही; आपल्या महाराष्ट्रात कुठले !

मथळ्यापाशीच लवमात्र आपण असे घुटमळतो.

कविता वाचायला सुरुवात केली की ही घुटमळ आणखी डुचमळायला लागते.

नागवी तुझी काचोळी
नागव्या स्तनांना राधे
हलतात कशाला माड
तू सांग एवढे साधे.....

केरळी चंदनी वारा
तू सांग एवढे साधे
मोगरी चांदणे टिचले
की तुझ्या बिल्वरी राधे....

हा तृषित मोकळा सागर
अन् धुके रेशमी दाट
की असे प्रहर चढताना
तू गोंदुनि घेशी पाठ...

देहावर दुःख जरासे
मग फूल कशाला साधे
की तुझ्या नग्न अंगाला
तू स्वतः बिलगशी राधे

॥ दोन ॥

दिवसाचे चार भाग पडतात; त्यांना पूर्वाण्ह, मध्यान्ह, अपराण्ह, सायान्ह असे म्हणतात. या प्रत्येक विभागास प्रहर अशी संज्ञा आहे. तिसऱ्या कडव्यात 'की असे प्रहर चढताना तू गोंदुनि घेशी पाठ'... असे कविता सांगते. तीनेक तासांचा एक प्रहर होतो. ही राधा असे अनेक प्रहर चढते आहे. चालते आहे.

अनुक्रमणिका

चौथ्या प्रहरी समुद्रावर 'मंद सुशीतल' वारा वाहत असतो; कुणास ठाऊक ! वेळ उतरत्या संध्याकाळची आहे. क्षितिजरेषेतून मंद किरणे तिच्या अंगावर पडली आहेत; आणि वरुन तितकेच मंद चंद्रतेज.

ही वेळ या कवीला भुरळ घालणारी; त्याने म्हटलेच आहेः

शब्दांनी हरवुनी जावे
क्षितिजाची मिटता ओळ
मी सांजफुलांची वेळ

हा कवी काय एकेक अनुभव पिळून, चुरगाळून, कुस्करुन त्याचे अत्तर काढतो की काय ? नाही. अनुभवाची अलवार पुष्पे जळात सोडून वर आलेला तवंग अलवारपणे कवितारुप करतो ? ही राधा केरळी असेल तर ती कृष्णासारखी काळीसावळीच असणार; आणि नाकीडोळी तरतरीत आणि बांधा शेलाटा. कवी केरळात गेला होता की नाही याच्याशी आपले काही देणेघेणे नाही ही कवितेतली राधा निघाली असेल आपल्या कृष्णाला भेटायला आपल्याच तंद्रीत. मग तिला झुलणाऱ्या झावळ्यांचे भान कुठले, मग तिला मलयानिलाचे अवधान कुठले ? माडांचे सोडा, चंदनी वाऱ्याचे आणि मोगरी चांदण्यांचे सोडा; एवढा मोठा समुद्रही तिला पाहून तहानेला झाला आहे - त्याच्यावर रेशमी दाट धुके पसरलेले असूनही आपल्याला त्याचा तृषार्त भाव कळतो आहे. पाठीवर तिने खरेच गोंदले आहे की तिची सावली की तो डाग ? काही का असेना, ही राधा पाठमोरी आहे. हिच्या देहबोलीतून किंचीत क्लेश जाणवताहेत. कशाचे ? चालण्याचे ? चढणीचे ? श्रमाचे ? पण ते 'जरासेच' आहेत. का ? तर तिला ओढ आहे आपल्या प्रियाळाची. प्रीतिपुष्पच इतके साधे, इतके वेल्हाळ आहे की मग या राधेने खोप्यात फूल खोवायची गरजच काय ? पाठीवर गाठ असणारी काचोळी ती ल्याली आहे; पण तिची मग्नता इतकी अविरल, तिची प्रीती इतकी नीरव, की तिला आपल्या यौवनाचे आणि लावण्याचे भानच नाही - या अर्थाने तिची काचोळी, तिचे स्तन, तिचे अगांग नग्नच. जणू काही तीच राधा, तीच कृष्ण. तिच्यातील कृष्णच तिला बिलगला आहे. मग तिला माड, वारा, चांदणे, समुद्र, धुके, फूल, यांचे काय अप्रूप ?

'नागवी,'काचोळी','स्तन','नग्न' या शब्दांनी आपण बिचकायचे नाही की हुरळूनही जायचे नाही. 'मांड', 'चंदनी', 'मोगरी', 'रेशमी' या शब्दांनीही हुळहुळायचे नाही. अनेकदा, चालीमुळे असेल, एखाद्या कवितेतील एखादी ओळच आपल्या स्मरणात राहते आणि समग्र कवितेचे आपले अवधान सुटते.

'ती आई होती म्हणुनी, घनव्याकुळ मी ही रडलो' अशा सुट्या ओळी आपल्या काळजात रुजतात आणि मग ती कविता आपण 'आई म्हणोनी कोणी' या कवितेच्या पातळीवर आणून ठेवतो. अहो साहेब, या कवीच्या काव्यात भय, वियोग, माता, मृत्यू हे घटक प्रतिमा म्हणून येतात, सामग्री म्हणून येतात; तो काही त्यांच्या निर्मितीचा केंद्रबिंदू नसतो. शुध्द शब्दात सांगायचे तर अशा जीवशास्त्रीय भावना आविष्कृत करणे हा कवीचा आणि त्याच्या काव्याचा हेतूच नसतो, जीवनातील विविध सुख-दुःखरुप अनुभवांना लावण्यमय करणे, त्यातून स्वतःचे आणि सर्वांचे मन अनुभवसमृध्द करणे हाच त्यांचा आरंभीचा आणि अखेरीचा हेतू असतो. 'मी महाकवी दुःखाचा' असे कवीने म्हटले असले तरी त्याच्या काव्याचा प्रत्यय कधीच दुःखपूर्ण नसतो. कवी ग्रेस हा दुःखाचा कवी नाही, लावण्याचा कवी आहे. त्यांच्या कविता वाचताना आपणांस कधी दुःखाचा प्रत्यय येतो ? आपणांस लावण्याचा प्रत्यय येतो. स्वतःचे खासगी अनुभव कळीच्या दुःखसामग्रीला जोडून ती लावण्यमय कविता विटाळण्याचा अधिकार कोणासही नाही !

अहो, राधा हीच पार्थसारथी. कृष्णाप्रमाणेच तिला ना कुळ-वर्ण-गोत्र. ती प्रीतीची प्रतिमा, ती प्रीतीचे प्रतीक. आपल्या मंद दृष्टीला ती पाठमारीच. त्या पाठमोऱ्या सौंदर्याला सामोरे जायचे आणि आपल्या आस्वादशक्तीने तिच्याशी एकरुप व्हायचे; आपणच कविता, राधा, कृष्ण व्हायचे; आपणच कवी व्हायचे.

॥ तीन ॥

या कवितेत मुक्त, आऊट-डोअर वातावरण आहे : (१) माड (२) वारा (३) चांदणे (४) सागर (५) धुके. राधेला पाहून म्हणजे तिचे तारुण्य आणि लावण्य पाहून हे सगळे चळले आहेत : (१) माड आपल्या झावळ्या हलवीत आहेत (२) वारा चंदनाचा सुगंध लेऊन आला आहे. (३) चांदणे मोगऱ्यासारखे रुप धारण करुन तिच्या कांकणाची खेळते आहे. (४) समुद्र तहानेला झाला आहे. (५) लालसेने धुके आणखी दाट झाले आहे.

असे उद्दीपन विभाव भोवती असताना, दुसरी एखादी प्रमदा असती तर ती खचित चळती एकांत. आवाहक खाणाखुणा सुंगधी झुळका. शुभ्रधवल चंद्र - प्रकाश. वासनेने उत्तेजित झालेला जलधी त्याच्यावरचे दुलईसारखे गर्द रेशमी धुके. आणखी काय पाहिजे ? हो. आणखी म्हणजे राधेचे वक्ष इतके उतट की तिने कंचुकी घातली असूनही घातलीच नाही असे वाटावे, इतके. म्हणून तर कविता सांगते, तिच्या विवस्त्र

उरोजावर विवस्त्र काचोळी आहे ! कवितेतील शब्द 'नागवी'.'विवस्त्र' ह्या शब्दापेक्षा 'नागवी-नागव्या' ह्या शब्दांनी यौवनी लावण्याचा प्रत्यय अचुक साधला आहे; नव्हे?

कविता एका उन्मादक निसर्गदृश्याचे शब्दचित्र रेखाटत नाहीये; ते सोपे असते कवीच्या दृष्टीने. ते सोपे असते निष्क्रिय वाचकाच्या दृष्टीने. ती अनुकृती असते निसर्गदृश्याची; ती नवनिर्मिती नसते.

इथे मात्र कवीने, निसर्गदृश्यातून जो आशय अभिव्यक्त होतोय तो आशय दृश्यमान केला आहे - हा भेद मूलभूत आहे. नाटकात दृश्याचा अर्थप्रत्यय आला पाहिजे आणि काव्यात अर्थाचा दृश्यमय प्रत्यय आला पाहिजे. असे म्हणतात ते आले ना लक्षात ? नाही ? अहो, नाट्याचा आस्वाद रसध्वनीरुप असतो. बस्स ! हा क्रम इतका गतिमान असतो की आधी आणि नंतर हा भेद तिथे लुप्त होतो. राधा आणि तिचा आसमंत यांचा इंद्रियसंवेदनामय प्रत्यय येतो. दुसरा एखादा कवी असता तर त्याने मारे त्या राधेचे सावयव आणि सालंकृत शब्दचित्र रेखाटले असते, निसर्गाचे स्वभावोक्तीपूर्ण वर्णन केले असते आणि आपणही इतके ग्रेट की लगेच त्या कवीची पाठ थोपटली असती, सभेत टाळ्या वाजवल्या असत्या; असत्या ? करतोच आपण असे. होय; वाजवतोच आपण टाळ्या.

इथेच ह्या कवितेचे लावण्य थांबत नाही. हे एवढे जाणवले की पाठमोरी राधा- नव्हे पाठमोरी कविता - अश्शी आपल्या समोर येते; तिचे ते सामोरं सौंदर्य पाहून आपण हरखून जातो. हे टकटक लावण्य असतं. राधा आणि आसमंत यांच्यातील संवाद-विरोधाचं. हा घटकांतला संवाद-विरोध नसतो, हा असतो संबंधातील संवाद-विरोध : आसमंत मनोज्ञ, राधाही मनोज्ञ - 'अधिक मनोज्ञा;' पण आसमंत खुळावलेला तर राधा त्याला पाठमोरी. बेदखल. हा लयबंध वेगळा जाणवतच नाही ; एकदम जाणवतो तो त्याचा भावनान्त प्रभावच. हेच या कवितेचे कलात्मक साफल्य आहे. राधा या साऱ्या सुंदरतेला आणि लोलुपतेला पाठमोरी आहे. ती प्रहरभर चढते आहे. श्रमानं की कशानं ती जराशी घामेजली असेल, तिनं रेशमी दाट - धुक्यासारखा दाट- कचभार मानेपाशी गुंफला असेल. आता ती वेगळीच 'पाठ'- मोरी दिसत असेल. दुरून, एखादी बट गोंदणासारखी तर दिसत नसेल ? ती मान, तो केशसंभार, तो गोंदण-आभास हे सारे इतके विलोल-इतके विलोल की तिथे कुठले फूल 'साधे' च ठरावे. सगळी दुःखे - मग ती गोंदणाची असो-नसो, चढणीची असो-नसो, लोलुप आसमंताची असो-नसो, कृष्ण वियोगाची असो-नसो-ते सारे दुःख 'जरासे'च ठरते. मग ? कृष्ण दूर, लोलुप आसमंत वर्ज्य. मग ? मग ही अभिसारिका आत्मरतच होणार ना ? तिच्या लावण्याचा आणि तिच्या तारुण्याचा आस्वाद आणि उपभोग घेण्याची पात्रता काय माड-वारा-चांदणे-समुद्र-धुके यांच्यात आहे? ही राधा पार्थसारथी कृष्णाची आहे तो काय हिला अशा अवस्थेत राहू देईल ? तोच राधा होईल, तिलाच पार्थसारथी करील - राधा आणि कृष्ण एकरुप होतील. राधा स्वतःला म्हणजे कृष्णालाच आलिंगन देईल. अव्दैत होतेच; आता त्या अव्दैताचा 'दोघे' अनुभव घेतील.

राधेचे कुलनाम पार्थसारथी.
कृष्णाचे नाव राधा.

∴ कवितेचा मथळा 'राधा पार्थसारथी'.

कवी ग्रेस यांची ही कविता आपणांस निष्क्रिय राहून देत नाही; ती आपली कल्पना आणि प्रतिमा उन्मीलित करते. ती वाचकास निर्मितीप्रक्रियेत अनुप्रवेश करावयास लावते. ती शृंगाराचा लालस प्रत्यय देत नाही; ती सुंदरतेचा, सर्जनतेचा अद्भुत प्रत्यय देते. ती रसिकाला कवी करुन त्याचे अनुभूतिविश्व समृध्द करते.

कवी ग्रेस हा दुःखाचा, कारुण्याचा, करुणेचा, निसर्गप्रेमाचा, मातृप्रेमाचा, मातृगंडाचा कवी नाही; तो 'सौंदर्यसत्तेचा' स्वामी आहे - 'मी'. या स्वामी च्या श्वासवेलीला पाने-फुले -फळे लगडली आहेत ; ती फाटणारी-चुरगळणारी-कुस्करणारी नाहीत.

कुणास ठाऊक
अब्जामध्येच एक आढळणारं
असं ते मूल असून
तेदेखील
भोवतालच्या अंधाऱ्या अजस्त्र
भिंती फोडून
सूर्यप्रकाशाकडे येण्याची
कधीतरी
धडपड करणार असेल;
आणि तसं असेल तर
ते तुझ्या रक्तनात्याचंच आहे
म्हणून तू
त्याच्यावर
कृध्द होऊ नकोस !

कळलं जीएंचं म्हणणं ?

ता.क. :

चौथ्या प्रहरी समुद्रावर 'मंद सुशीतल' वारा वाहत असतो; कुणास ठाऊक ! वेळ उतरत्या संध्याकाळची आहे. क्षितिजरेषेतून मंद किरणे तिच्या अंगावर पडली आहेत; आणि वरुन तितकेच मंद चंद्रतेज.

ही वेळ या कवीला भुरळ घालणारी; त्याने म्हटलेच आहेः

शब्दांनी हरवुनी जावे
क्षितिजाची मिटता ओळ
मी सांजफुलांची वेळ

हा कवी काय एकेक अनुभव पिळून, चुरगाळून, कुस्करुन त्याचे अत्तर काढतो की काय ? नाही. अनुभवाची अलवार पुष्पे जळात सोडून वर आलेला तवंग अलवारपणे कवितारुप करतो ? ही राधा केरळी असेल तर ती कृष्णासारखी काळीसावळीच असणार; आणि नाकीडोळी तरतरीत आणि बांधा शेलाटा. कवी केरळात गेला होता की नाही याच्याशी आपले काही देणेघेणे नाही ही कवितेतली राधा निघाली असेल आपल्या कृष्णाला भेटायला आपल्याच तंद्रीत. मग तिला झुलणाऱ्या झावळ्यांचे भान कुठले, मग तिला मलयानिलाचे अवधान कुठले ? माडांचे सोडा, चंदनी वाऱ्याचे आणि मोगरी चांदण्यांचे सोडा; एवढा मोठा समुद्रही तिला पाहून तहानेला झाला आहे - त्याच्यावर रेशमी दाट धुके पसरलेले असूनही आपल्याला त्याचा तृषार्त भाव कळतो आहे. पाठीवर तिने खरेच गोंदले आहे की तिची सावली की तो डाग? काही का असेना, ही राधा पाठमोरी आहे. हिच्या देहबोलीतून किंचीत क्लेश जाणवताहेत. कशाचे ? चालण्याचे ? चढणीचे ? श्रमाचे ? पण ते 'जरासेच' आहेत. का ? तर तिला ओढ आहे आपल्या प्रियाळाची. प्रीतिपुष्पच इतके साधे, इतके वेल्हाळ आहे की मग या राधेने खोप्यात फूल खोवायची गरजच काय ? पाठीवर गाठ असणारी काचोळी ती ल्याली आहे; पण तिची मग्नता इतकी अविरल, तिची प्रीती इतकी नीरव, की तिला आपल्या यौवनाचे आणि लावण्याचे भानच नाही - या अर्थाने तिची काचोळी, तिचे स्तन, तिचे अगांग नग्नच. जणू काही तीच राधा, तीच कृष्ण. तिच्यातील कृष्णच तिला बिलगला आहे. मग तिला माड, वारा, चांदणे, समुद्र, धुके, फूल, यांचे काय अप्रूप ?

'नागवी,'काचोळी','स्तन','नग्न' या शब्दांनी आपण बिचकायचे नाही की हुरळूनही जायचे नाही. 'मांड', 'चंदनी', 'मोगरी', 'रेशमी' या शब्दांनीही हुळहुळायचे नाही. अनेकदा, चालीमुळे असेल, एखाद्या कवितेतील एखादी ओळच आपल्या स्मरणात राहते आणि समग्र कवितेचे आपले अवधान सुटते.

'ती आई होती म्हणुनी, घनव्याकुळ मी ही रडलो' अशा सुट्या ओळी आपल्या काळजात रुजतात आणि मग ती कविता आपण 'आई म्हणोनी कोणी' या कवितेच्या पातळीवर आणून ठेवतो. अहो साहेब, या कवीच्या काव्यात भय, वियोग, माता, मृत्यू हे घटक प्रतिमा म्हणून येतात, सामग्री म्हणून येतात; तो काही त्यांच्या निर्मितीचा केंद्रबिंदू नसतो. शुध्द शब्दात सांगायचे तर अशा जीवशास्त्रीय भावना आविष्कृत करणे हा कवीचा आणि त्याच्या काव्याचा हेतूच नसतो, जीवनातील विविध सुख-दुःखरुप अनुभवांना लावण्यमय करणे, त्यातून स्वतःचे आणि सर्वांचे मन अनुभवसमृध्द करणे हाच त्यांचा आरंभीचा आणि अखेरीचा हेतू असतो. 'मी महाकवी दुःखाचा' असे कवीने म्हटले असले तरी त्याच्या काव्याचा प्रत्यय कधीच दुःखपूर्ण नसतो. कवी ग्रेस हा दुःखाचा कवी नाही, लावण्याचा कवी आहे. त्यांच्या कविता वाचताना आपणांस कधी दुःखाचा प्रत्यय येतो ? आपणांस लावण्याचा प्रत्यय येतो. स्वतःचे खासगी अनुभव कळीच्या दुःखसामग्रीला जोडून ती लावण्यमय कविता विटाळण्याचा अधिकार कोणासही नाही !

अहो, राधा हीच पार्थसारथी. कृष्णाप्रमाणेच तिला ना कुळ-वर्ण-गोत्र. ती प्रीतीची प्रतिमा, ती प्रीतीचे प्रतीक. आपल्या मंद दृष्टीला ती पाठमारीच. त्या पाठमोऱ्या सौंदर्याला सामोरे जायचे आणि आपल्या आस्वादशक्तीने तिच्याशी एकरुप व्हायचे; आपणच कविता, राधा, कृष्ण व्हायचे; आपणच कवी व्हायचे.

।। तीन ।।

या कवितेत मुक्त, आऊट-डोअर वातावरण आहे : (१) माड (२) वारा (३) चांदणे (४) सागर (५) धुके. राधेला पाहून म्हणजे तिचे तारुण्य आणि लावण्य पाहून हे सगळे चळले आहेत : (१) माड आपल्या झावळ्या हलवीत आहेत (२) वारा चंदनाचा सुगंध लेऊन आला आहे. (३) चांदणे मोगऱ्यासारखे रुप धारण करुन तिच्या कांकणाची खेळते आहे. (४) समुद्र तहानेला झाला आहे. (५) लालसेने धुके आणखी दाट झाले आहे.

असे उद्दीपन विभाव भोवती असताना, दुसरी एखादी प्रमदा असती तर ती खचित चळती एकांत. आवाहक खाणाखुणा सुंगधी झुळका. शुभ्रधवल चंद्र - प्रकाश. वासनेने उत्तेजित झालेला जलधी त्याच्यावरचे दुलईसारखे गर्द रेशमी धुके. आणखी काय पाहिजे ? हो. आणखी म्हणजे राधेचे वक्ष इतके उतट की तिने कंचुकी घातली असूनही घातलीच नाही असे वाटावे, इतके. म्हणून तर कविता सांगते, तिच्या विवस्त्र

उरोजावर विवस्त्र काचोळी आहे ! कवितेतील शब्द 'नागवी'.'विवस्त्र' ह्या शब्दापेक्षा 'नागवी-नागव्या' ह्या शब्दांनी यौवनी लावण्याचा प्रत्यय अचुक साधला आहे; नव्हे?

कविता एका उन्मादक निसर्गदृश्याचे शब्दचित्र रेखाटत नाहीये; ते सोपे असते कवीच्या दृष्टीने. ते सोपे असते निष्क्रिय वाचकाच्या दृष्टीने. ती अनुकृती असते निसर्गदृश्याची; ती नवनिर्मिती नसते.

इथे मात्र कवीने, निसर्गदृश्यातून जो आशय अभिव्यक्त होतोय तो आशय दृश्यमान केला आहे - हा भेद मूलभूत आहे. नाटकात दृश्याचा अर्थप्रत्यय आला पाहिजे आणि काव्यात अर्थाचा दृश्यमय प्रत्यय आला पाहिजे. असे म्हणतात ते आले ना लक्षात ? नाही ? अहो, नाट्याचा आस्वाद रसध्वनीरुप असतो. बस्स ! हा क्रम इतका गतिमान असतो की आधी आणि नंतर हा भेद तिथे लुप्त होतो. राधा आणि तिचा आसमंत यांचा इंद्रियसंवेदनामय प्रत्यय येतो. दुसरा एखादा कवी असता तर त्याने मारे त्या राधेचे सावयव आणि सालंकृत शब्दचित्र रेखाटले असते, निसर्गाचे स्वभावोक्तीपूर्ण वर्णन केले असते आणि आपणही इतके ग्रेट की लगेच त्या कवीची पाठ थोपटली असती, सभेत टाळ्या वाजवल्या असत्या; असत्या ? करतोच आपण असे. होय; वाजवतोच आपण टाळ्या.

इथेच ह्या कवितेचे लावण्य थांबत नाही. हे एवढे जाणवले की पाठमोरी राधा- नव्हे पाठमोरी कविता - अश्शी आपल्या समोर येते; तिचे ते सामोरं सौंदर्य पाहून आपण हरखून जातो. हे टकटक लावण्य असतं. राधा आणि आसमंत यांच्यातील संवाद-विरोधाचं. हा घटकांतला संवाद-विरोध नसतो, हा असतो संबंधातील संवाद-विरोध : आसमंत मनोज्ञ, राधाही मनोज्ञ - 'अधिक मनोज्ञा;' पण आसमंत खुळावलेला तर राधा त्याला पाठमोरी. बेदखल. हा लयबंध वेगळा जाणवतच नाही ; एकदम जाणवतो तो त्याचा भावनान्त प्रभावच. हेच या कवितेचे कलात्मक साफल्य आहे. राधा या साऱ्या सुंदरतेला आणि लोलुपतेला पाठमोरी आहे. ती प्रहरभर चढते आहे. श्रमानं की कशानं ती जराशी घामेजली असेल, तिनं रेशमी दाट - धुक्यासारखा दाट- कचभार मानेपाशी गुंफला असेल. आता ती वेगळीच 'पाठ'- मोरी दिसत असेल. दुरून, एखादी बट गोंदणासारखी तर दिसत नसेल ? ती मान, तो केशसंभार, तो गोंदण-आभास हे सारे इतके विलोल-इतके विलोल की तिथे कुठले फूल 'साधे' च ठरावे. सगळी दुःखे - मग ती गोंदणाची असो-नसो, चढणीची असो-नसो, लोलुप आसमंताची असो-नसो, कृष्ण वियोगाची असो-नसो-ते सारे दुःख 'जरासे'च ठरते. मग ? कृष्ण दूर, लोलुप आसमंत वर्ज्य. मग ? मग ही अभिसारिका आत्मरतच होणार ना ? तिच्या लावण्याचा आणि तिच्या तारुण्याचा आस्वाद आणि उपभोग घेण्याची पात्रता काय माड-वारा-चांदणे-समुद्र-धुके यांच्यात आहे? ही राधा पार्थसारथी कृष्णाची आहे तो काय हिला अशा अवस्थेत राहू देईल ? तोच राधा होईल, तिलाच पार्थसारथी करील - राधा आणि कृष्ण एकरुप होतील. राधा स्वतःला म्हणजे कृष्णालाच आलिंगन देईल. अव्दैत होतेच; आता त्या अव्दैताचा 'दोघे' अनुभव घेतील.

राधेचे कुलनाम पार्थसारथी.
कृष्णाचे नाव राधा.

∴ कवितेचा मथळा 'राधा पार्थसारथी'.


कवी ग्रेस यांची ही कविता आपणांस निष्क्रिय राहून देत नाही; ती आपली कल्पना आणि प्रतिभा उन्मीलित करते. ती वाचकास निर्मितीप्रक्रियेत अनुप्रवेश करावयास लावते. ती शृंगाराचा लालस प्रत्यय देत नाही; ती सुंदरतेचा, सर्जनतेचा अद्भूत प्रत्यय देते. ती रसिकाला कवी करुन त्याचे अनुभूतिविश्व समृध्द करते.

कवी ग्रेस हा दुःखाचा, कारुण्याचा, करुणेचा, निसर्गप्रेमाचा, मातृप्रेमाचा, मातृगंडाचा कवी नाही; तो 'सौंदर्यसत्तेचा' स्वामी आहे - 'मी'. या स्वामी च्या श्वासवेलीला पाने-फुले -फळे लगडली आहेत ; ती फाटणारी-चुरगळणारी-कुस्करणारी नाहीत.

कुणास ठाऊक
अब्जामध्येच एक आढळणारं
असं ते मूल असून
तेदेखील
भोवतालच्या अंधाऱ्या अजस्त्र
भिंती फोडून
सूर्यप्रकाशाकडे येण्याची
कधीतरी
धडपड करणार असेल;
आणि तसं असेल तर
ते तुझ्या रक्तनात्याचंच आहे
म्हणून तू
त्याच्यावर
कृद्ध होऊ नकोस !

कळलं जीएंचं म्हणणं ?

ता.क. :



देहावर दुःख जरासे
मग फूल कशाला साधे
की तुझ्या नग्न अंगाला
तू स्वतः बिलगशी राधे...

ग्रेस. कितीतरी दिवस या ओळींची पुनर्निर्मिती जमेना. कशाचे दुःख? मनाला? नव्हे देहाला. देहाला? नव्हे 'देहावर'. देहाच्या आत नव्हे; देहावर. तुझ्या देहावर दुःख कशाचे? तेही जरासे? मन जबाब देईना. कशाचे देहावर जरासे दुःख? जबाब देण्याजागी मन सवालच उभे करी श्रमाचे? उन्हाचे? वियोगाचे? मनाचे... समाधान होईना.

- आणि आता पडसाद ऐकला : लालसा. लालसेचे दुःख. जरासे. माड-वारा-चांदणे-सागर-धुके. यांच्या लालसेचे. माझे रुप-यौवन देखून हे चळले. हलले, उजळले, उसळले, दाटले. बस्स. एक एकटे नव्हे; मिळून सारेजण. साऱ्यांची वासना एकवटून जणू माझ्या देहावर गोंदली जातेय. होय ; पण जराशीच. होय. माझ्या मनात प्रियप्रीती अथांग. समुद्रवत्. माझ्या मनात प्रियप्रीती सघन नीहारवत्. चंद्रिकेहून धवल. माडाहून अचल; वायूहून विलोल. या माझ्या मनःशक्तीपुढे यांची देहलालसा जराशीच. राधे, हे ही खरेच की तुझी देहलता तशीच कमनीय, तशीच विलोभनीय. तुलाही तुझा मोह पडला होय ? म्हणून का -

तुझ्या नग्न अंगाला
तू स्वतः बिलगशी राधे ?
प्रश्नरुप उत्तराशी शब्द थबकले !


डॉ. द. भि. कुलकर्णी
'वसुधा-००४'डी.एस.के. विश्व
ऑफ सिंहगड रोड, धायरी,
पुणे-४११०४१
दूरध्वनी : ०२० २४३८०८९४

अनुक्रमणिका

जुलै - ऑगस्ट - सप्टेंबर २०१२

युगवाणी

|| ग्रेस विशेषांक ||



त्र : शुभा गोखले

उठा दयाघना लावा निरांजने
देहातले सोने काळे झाले
झोपतले जीवन झोपेतच मेले
आभाळचि गेले पंखापाशी
इथे नागव्याने शोधावा आचार
जैसा व्यभिचार जोगिणीचा
उध्दावली पोर हिंडे दारोदारी
तैसे माझ्या घरी नारायणा
पंढरीचे पेठे रात्र मोठी वाटे
दगडाला काटे फुटलेले
गोंजारून घे ना माझे हे लांच्छन
रक्ताला दूषण देण्यासाठी

अनुक्रमणिका

जुलै - ऑगस्ट - सप्टेंबर २०१२

युगवाणी

॥ ग्रेस विशेषांक ॥



चित्र : शुभा गोखले

पक्षी अनाथ असतो आणी धुक्यात रडतो
निष्पर्ण झाड होता सोडून देश जातो.
आभाळ खूण करते देशांतरांत त्याला
घरट्यातल्या पिलांची स्मृति जेवढी तरूला.
पंखातली भरारी ये मोक्ष संधिकाल
पाण्यात कोसळे की रंगांध सूर्य खोल.
चोचीत वेचलेला फेकून घट्ट चारा
येतो समुद्रकाठी बघतो सुना किनारा.
दृष्टीत झाकलेला हा कोठला इलाखा
झडल्या पिसांत गेल्या वाहून सर्व हाका.
उसळून लाट झाली चैतन्यफूल शुभ्र
हलकेच एक आला त्याच्या गळ्यात अभ्र.
सुकुमार पाउलांची कमळे क्षणात झाली
कविताच वाजवी की ताऱ्यांत शीळ ओली.
त्याच्या समोर बसली कुणि एक मुग्ध बाला
हलत्या तमात शिरली मोकाट धर्मशाळा.
आणी हिऱ्यांत घुसल्या म्यानांतल्या कट्यारी
रक्तात चंद्र आला काया बघून गोरी...
विस्तीर्ण वाळवंट त्याच्या जमे सभोती
अंगात टाचले की त्याच्या असंख्य मोती.
त्याला कुठे दिसेना त्याचा सुबुद्ध बाण
माझे धनुष्य तुटले तू जा पुन्हा उडून.

जुलै - ऑगस्ट - सप्टेंबर २०१२

युगवाणी

।। ग्रेस विशेषांक ।।



: शुभा गोखले

सावल्या विसावल्या नि
विश्वतेज मावळे
आरतींत नादातील
सजल सांध्य देउळें

सांद्र रंग, सूर संथ
क्षितिज स्फुंदतें अबोल
मूक वर्तुळांत शब्द -
शून्य हा विराट गोल !

गगन हें कुठें सरे नि
रंग हा कसा निळा
दूर पाहतो उदास
संथ भास एकला

मी इथें व्यथालयांत
दु:ख सांगतों तुला
घे मला कुशींत आज
पावलांत शृंखला !

संपणार ना कधींहि
रात्र घोर पापिणी
ओंजळींत हीं फुलें नि
आंसवांत पापणी !

ग्रेस

अनुक्रमणिका

जुलै - ऑगस्ट - सप्टेंबर २०१२

युगवाणी

॥ ग्रेस विशेषांक ॥



चित्र : शुभा गोखले

ही चंद्र-उदयिनी वेळा
घननीळ कांठ मेघांचे
भरतीच्या क्षितिजावरूनी
घर दूर जसें सजणाचें...

तूं उभी अधोमुख येथें
निद्रेचा उधळुन जोग
गर्भात धरित्रीच्याही
ये जशी फुलांना जाग...

बहरांत दुःख अनवाणी
कीं पैलथडीची रात...
माझाच स्पर्श सर्पाचा
अमृतमय माझे हात...

अंधार कडे घेऊन
हें कोण रडाया आलें ?
दृष्टींत अरण्यामधलें
मातीचें चंदन ओलें...

तरि तुझ्या कुशीचा रंग
शरिरावर माझ्या उमटे
कीं चिंब अभंगामधला
भगवंत स्मृतीवर दाटे...

अनुक्रमणिका

ग्रेसच्या दोन कवितांचे रसग्रहण

डॉ. निशिकांत मिरजकर

॥ १ ॥

हळवी

जळात भिजलें
वळण उन्हाचें,
मावळतीच्या सरणावरती
निजून आलें
उरलें सुरलें दुःख मनाचें.

धुक्यांत गढल्या
भित्र्या अगतिक
कौलारांच्या तांबुस ओळी,
मी फिरलें
दारावर झोकुन शिणली मोळी.

झालें हलकें
तमांत पैंजण
तंग जरासा उसवुन वारा,
भावुक हळवी
धांवत सुटलें मृद्‌बंधांतुन.

'संध्याकाळच्या कविता' या संग्रहामधील या कवितेत ग्रेसनी संध्याकाळच्या वेळेच्या आर्तहळव्या भावस्थितीचे प्रतिमांकित चित्रण केलेले आहे. ही आर्तहळवी भावस्थिती कवीने अनुभवलेली आहे, पण कवितेमध्ये तिला शब्दबद्ध करताना कवी एका स्त्रीच्या भूमिकेतून प्रथम पुरूषी निवेदन करीत तिचा प्रत्यय घडवितो आहे.

असे का ?

कारण ही जी आर्तहळवी भावस्थिती कवीने अनुभवलेली आहे, तिची अनुभूती आणि कवीच्या आत्मकेंद्री वृत्तीमध्ये उठलेले तदनुषगिक तरंग, कवीच्या अनुभूतिगुंग मनाने दिलेले प्रतिसाद, त्या अनुभूतीच्या छायेत कवीला जाणवणारी भवतालच्या निसर्गाची प्रारूपे, या सगळ्यांकरिता स्त्रीच्या अनुभूति स्वीकाराची आणि प्रतिसादांची भूमिका कवीला जास्त स्वाभाविक वाटते. स्त्रीचे हळवेपण, तिच्या प्रतिसादांतील आर्तता, तिची तितिक्षा, तिचे भित्रेपण, तिची अगतिकता आणि भावनेच्या लाटेबरोबर उफाळून येणारा तिचाच उन्मुक्तपणा हे सगळे या आर्तहळव्या भावस्थितीशी संवादी आहे, असे कवीला वाटते.

म्हणून कवी स्त्रीच्या भूमिकेतून या अनुभूतीला सामोरा जातो. की ही अनुभूतीच स्त्रीचे रूप घेऊन शब्दांमध्ये साकार होते ? ग्रेसच्या कवितांतील प्रतिमांमध्ये असे नेहमीच घडते. तिथे अलंकरणाची ठोस समीकरणे (उपमेय - उपमान - साधर्म्य) तर नसतातच, पण प्रतिमांकनाचे द्विविध स्तरही परस्परांत मिसळून गेलेले असतात. अद्वैतानुभूतीमध्ये द्रष्टा, दृश्य आणि दर्शन परस्परांमध्ये विलय पावावेत तसे. वेळ संध्याकाळची आहे. उन्हाची तीव्रता कमी होऊन त्याला मार्दव प्राप्त झालेले आहे. मुळात हे संध्याकाळचे परतणारे ऊन आहे. मागे वळलेले. उन्हाचे हे मागे परतणे आणि त्याला आलेले मार्दव या दोन्हीची गति - स्थिती ''जळात भिजले, वळण उन्हाचे'' या वर्णनातून ग्रेसनी कवितेच्या प्रारंभीच प्रस्थापित केली आहे.

आता ही जी या अनुभूतीला सामोरी जाणारी स्त्री आहे, तिने या दिवसभरात खूप दुःख भोगलेले आहे. त्या दुःखाची भीषण दाहकता ती अजूनपर्यंत सोसत होतीच. पण आता या जळात भिजलेल्या वळत्या उन्हाच्या मार्दवक्षणी तिने निर्धाराने त्या दुःखाचा निरोप घ्यायचा निर्णय घेतलेला आहे. इकडे दिवसही मावळतो आहे. मावळतीला लाल रंग उसळलेला आहे. दिवसाच्या अंताचे सूचन करणारा हा लाल रंग म्हणजे जणू मावळतीला पेटलेले सरणच आहे. दिवसाची चिता आहे. या 'मी' - स्त्रीचे उरलेसुरले दुःखही त्या मावळतीच्या सरणावर निजून आले आहे. 'निजून आले' या पदबंधातून दोन गोष्टी सूचित होतात. एक म्हणजे, तिच्या मनाच्या दुःखाने जणू सतीच्या निष्ठेने दिवसाच्या चितेवर समर्पण केले आहे. स्वतःचे अस्तित्व स्वतःहून संपवले आहे. पण सतीपेक्षाही हे प्रत्यक्षात घडणे कठीण आहे. दिवसाच्या सरणावरती स्वतःहून निजल्यानंतरही हे दुःख जळून गेलेले नाही. त्याचे अस्तित्व संपलेले नाही. ते पुन्हा मुकाटपणे त्या स्त्रीकडेच परत आलेले आहे. त्याचा बराचसा भाग संपून गेला खरा, पण जे काही 'उरले सुरले' दुःख आहे, ते तिच्याकडे परत 'आले' आहे.

मात्र सरणावरती निजून आल्यानंतर, अग्निपरीक्षेतून बाहेर पडलेल्या सीतेप्रमाणे, त्या दुःखाच्या जीवनाची परिमाणे बदलणार नाहीत का ?

तशी ती बदलल्याचा प्रत्यय पुढल्या कडव्यामध्ये येतोच. आजूबाजूचे निसर्गदृश्य आणि मानवी व्यवहाराचे चित्र तसेच आहे. भित्रे आणि अगतिक. घरांना सावली देणारी कौलारे धुक्यात गढून गेलेली आहेत. धुक्यात गुरफटलेल्या कौलारांच्या तांबुस ओळी हे निसर्गचित्र एक गोठलेपण,चैतन्यहीनता, उदासीनता, अस्पष्टता व्यक्त करते. वातावरणातील ऊर्जा आणि गती अशी कुंठित झालेली आहे. पण जिचे दुःख मावळतीच्या सरणावर निजून आले आहे. ती 'मी' या भित्र्या अगतिकतेने बाध्य झालेली नाही. तिला सगळे दमलेपणाचे ओझे फेकून आता मुक्त व्हायचे आहे. धुक्यात हरपलेल्या घरांची दारे बंद असली तरी तिला त्याची फिकीर नाही. आपले दमलेपणाचे ओझे दारावर फेकून नव्या तळमळीने ती परत फिरली आहे. या तिच्या प्रतिसादाच्या वर्णनात ग्रेसनी आणखी एक कलात्मक अभिव्यक्ती साधलेली आहे. दिवसभर डोक्यावर मोळी वाहून ती स्त्रीच खरे म्हणजे शिणलेली आहे. (कसली मोळी ? दुःखाची, अपेक्षांची, स्वप्नांची, व्यवहारातील कर्तव्यांची व जबाबदाऱ्यांची... सगळ्या - सगळ्याची. व्यवहारी जीवनात वाटचाल करताना जे जे ओझे शिरावर वहावे लागते, त्या सगळ्याची.) पण ग्रेस 'शिणली' हे विशेषण स्त्रीला उद्देशून वापरत नाहीत. ते म्हणतात, 'मी फिरले, दारावर झोकुन शिणली मोळी' कारण स्त्रीच्या वृत्ती आता बदललेल्या आहेत. तिचा शीण तिने डोक्यावरच्या मोळीला सोपवून टाकला आहे, आणि मग ती शिणलेली मोळीही दारावर झोकून ती मागे फिरली. सगळ्या शिणवट्यापासून आणि ओझ्यापासून तिने आपली मुक्तता करून घेतली.

मानवी भावस्थितीतून आलेल्या प्रतिसादांचे स्थलांतरण वस्तूंमध्ये करून त्या भावप्रतिसादांना अधिक व्यापक आणि अधिक उत्कट बनविण्याची कलात्मक क्लृप्ती ग्रेस पुढल्या कडव्यातही पुन्हा वापरतात. मोळी दाराशी झोकून दिल्यानंतर 'मी' चे ओझे उतरले आहे. तिचे तन - मन हलके झाले आहे. पण ग्रेस वर्णन करतात, 'तमात हलके झाले पैजण'. 'मी'च्या पायीचे पैंजण 'हलके' झाले. डोईवरच्या ओझ्याने तिचे पाय जडावले होते. मोळी झोकून दिल्यावर शीण गेला. पायही (पायांतले पैंजण !) हलके झाले. त्यांत गती भरू लागली. ज्या देह जाणिवा आतापर्यंत दडपून टाकलेल्या होत्या, त्याही उत्फुल्ल झाल्या. अधीर झाल्या. 'तंग जरासा उसवुन वारा' ही ओळ अनेक प्रतिमा - प्रतीकांना एकत्र गुंफून 'मी'च्या उधाणलेल्या, उत्फुल्ल झालेल्या दैहिक जाणिवांचा उत्कटतेने प्रत्यय देते. वारा 'तंग' नसतो. काचोळी तंग असते. यौवनाचा स्तनभार देहजाणिवेने रसरसला की काचोळी तंग होते. ('शाकुंतला'मध्ये कालिदासाने या संकेताचा फार खुबीदार उपयोग करून घेतलेला आहे. वसंत बापटांच्या 'प्रियंवदा' कवितेत आणि व्ही. शांताराम यांच्या 'पिंजरा' चित्रपटातील निळू फुले यांच्या तोंडच्या एका संवादातही त्याचा तसाच वापर केलेला आहे.) अशा वेळी, देहजाणिवा अधिकाधिक तीव्र

अनुक्रमणिका

झाल्यावर उतटलेल्या स्तनांच्या भाराने चोळी उसवते. उसवल्यामुळे चोळी सैल होते आणि उफाणलेल्या अंगाला वारा लागतो. चोळीचे 'तंग' होणे, तिचे 'उसवणे' आणि मग अंगाला मोकळा 'वारा' लागणे या तिन्हींच्या प्रतीकार्थाची एकत्र सरमिसळ करून 'तंग जरासा उसवुन वारा' ही पंक्ती कवीने रचलेली आहे. तंग होणे आणि उसवणे या चोळीच्या प्रतिसादांना वाऱ्यावरच आरोपित केले आहे.

कारण या साऱ्या अनुभवाला सामोरी जाणारी ती जी 'मी' आहे, ती या सर्व अनुभवाची जणू 'साक्षी' आहे. ती फक्त 'अनुभवते' आहे. त्या अनुभवात ती सामील झालेली असली, तरी आव आणते आहे. दूरस्थपणाचा. तिच्या मनाचे दुःख आपणहून मावळतीच्या सरणावर निजून आले आहे. ती दूरस्थच. कौलारांच्या तांबूस ओळी भित्र्या आहेत, अगतिक आहेत, धुक्यात गुरफटलेल्या आहेत, ती नाही. मोळी शिणली आहे. ती नाही. पैंजण हलके झालेत. तिचे चरण नव्हे. तंग वारा उसवलेला आहे. ती फक्त दूरून पाहते आहे ! आतापर्यंत क्रिया अशी तिने फक्त एकच केलेली आहे. तीही अपसाराची. दूर जाण्याची. परत फिरण्याची. गुंतण्याची नव्हे.

हे असे दूरून न्याहाळता न्याहाळताच आपण त्या अनुभवात सामील असल्याचे भान तिला येते. त्या मावळतीच्या सरणाशी, त्यावर निजून आलेल्या मनाच्या दुःखाशी, भित्र्या अगतिक कौलारांच्या ओळींशी, त्या शिणल्या मोळीशी, त्या हलक्या झालेल्या पैंजणांशी, त्या तंग उसवलेल्या वाऱ्याशी ती एकरूप होते. ही सगळी आपल्याच अनुभवाची प्रतिमारूपे आहेत, याची तीव्रतेने जाणीव होते.

आणि मग ती धावत सुटते. बेभानपणे दिशाहीन. 'मृद्‌बंधांतुन' मातीची बंधने अटळ असतात. ती व्यक्तीला इहाशी आणि इहवादी अस्तित्त्वाशी बांधून ठेवतात. पण संध्याकाळच्या वेळी मनाच्या दुःखाला मावळतीच्या सरणावर धाडून, शिणलेली मोळी फेकून, तंग वारा उसवून, हलक्या पैंजणांसह भावुक होऊन धावत सुटलेल्या या हळव्या 'मी' ला त्या मृद्‌बंधांची तमा नाही.

'मृद्‌बंध' हा शब्द फारसा प्रचारात नाही. 'मृद्‌गंध' हा शब्द प्रचारात आहे. कवीने येथे 'मृद्‌बंध' हा शब्द योजल्यामुळे 'मृद्‌गंधा'ची छाया मनामध्ये ध्वनिसाम्यामुळे जागी होते आणि 'मृद्‌गंधा'चे स्वरूप जाचक, अडविणारे, रोखणारे असे न राहता पावसाच्या पहिल्या सरीने दरवळणाऱ्या धरित्रीचा उन्मादक आणि उत्तेजक गंध त्यांना प्राप्त होतो.

कवितेत क्रमाक्रमाने वेगवान होत गेलेली गती भरलेली आहे. पहिल्या कडव्यात 'मी' जळात भिजल्या उन्हाकडे एकटक पाहते आहे. तिच्या मनाचे दुःख तिच्यापासून विलग होऊन मावळतीच्या सरणावर जाऊन निजते आणि त्यात जळून उरले सुरले तिच्याकडे परत येते. दुसऱ्या कडव्यात भवताल स्थिर आहे. गूढतेत लपेटलेला आहे. पण 'मी' गतिमान झालेली आहे. सगळी भीती, सगळी अगतिकता, सगळा शीण नाकारण्याचा निर्धार तिने केलेला आहे. ते सर्व दारावर भिरकावून ती स्वेच्छेने परतली आहे. मग तिसऱ्या कडव्यात तिची गती पहिल्यांदा हलकी, नाचरी होते. आणि मग बेबंद धावत सुटते.

कवितांतर्गत 'मी'च्या प्रतिसादातील गतीचा हा आलेख संध्याकाळच्या गूढ कातर वेळी कवीच्या मनामध्ये उसळणाऱ्या विविध भावोर्मींचा प्रतिमारूप आलेख आहे. कवितांतर्गत 'मी'च्या प्रतिसादांची ही जी स्थित्यतरे कवितेच्या तीन कडव्यांमधून क्रमाक्रमाने दिसून येतात, ती भवतालच्या निसर्गातील स्थित्यंतरांशी संवादी अशी आहेत. पहिल्या कडव्यात ऊन्ह आहे. परतलेले आहे, जळात भिजलेले मार्दवयुक्त आहे, पण ऊन्ह आहे. दुसऱ्या कडव्यात 'धुके' आहे. म्हणजे संधिप्रकाश आहे. ऊन्ह मावळले आहे. पहिल्या कडव्यातील उन्हाला मावळतीच्या सरणाचे कारूण्य आहे. तर दुसऱ्या कडव्यातल्या धुक्याला भय व अगतिकता यांचा स्पर्श आहे. तिसऱ्या कडव्यात ऊन्हही नाही, धुक्यासारखा संधिप्रकाशही नाही तर 'तम' आहे. मावळतीच्या उन्हाचे कारूण्य गेले, संधिप्रकाशाची भीती-अगतिकता गेली, आता रात्र अवतरत आहे. आणि ही रात्र आहे भार हलका करणारी. वस्त्रे विगलित करणारी, भावुक हळवेपणाने बेबंद गती अंगाअंगात भिनवणारी.

संध्याकाळच्या बदलात जाणाऱ्या भवतालाबरोबर मनाच्या वृत्तींचे बदलणारे नाट्य असे या छोट्याशा कवितेत ग्रेसनी प्रभावीपणे शब्दबध्द केले आहे.

।। २ ।।

<u>आठवणी</u>

दीर्घ आजारासारखे
सारे आयुष्य चालले
कोणी भेटाया न आले
नाही निरोपाची फुले.

मोर आषाढाच्या काठी
कथा ऐकायास आला

त्याचा सारंग पिसारा
वारा घेऊन पळाला

चंद्र लिंबोणीच्या मागे
असा गुंतला साजणी
चिरेबंदी वाड्यामध्ये
शिरे किरणाचे पाणी...

पृथ्वी सारून वेडाने
आज आठवणी येती
तुझ्या सावळ्या हातात
जशी तुळशीची माती!

रसग्रहणासाठी ग्रेसची ही कविता मी निवडली, कारण या कवितेच्या प्रारंभीच्या ओळी काळजात घुसणाऱ्या कट्यारीसारख्या माझ्या मनात आरपार घुसत गेल्या. सरत्या आयुष्याच्या शेवटी, दीर्घ आजाराने ग्रेस रूग्णालयात अंथरूणात पडून होते. त्यांच्या प्रतिभेची टवटवी त्याही अवस्थेत कायम होती, ते कविता लिहीत होते, एका पुस्तकाचे प्रकाशनही त्यांनी रूग्णालयातच केले, त्यांना भेटायला माणसे येत होती, रूग्णालयाचा सेवकवर्ग त्यांची उत्तम देखभाल करीत होता, हे सगळे खरे. पण आजारपण ते आजारपणच. या दीर्घ आजारपणात कित्येक क्षण असे आले असतील की जेव्हा ग्रेसना आजाराशी झुंजताना प्रचंड एकटेपणा आणि वैराणता जाणवली असेल.

त्यावेळी ही स्वतःची कविता त्यांना आठवली असेल का ? अशा दीर्घ आजारपणाची प्रतिमा त्यांनी या कवितेत आपली भावस्थिती व्यक्त करण्यासाठी वापरावी, हा योगायोग की एक प्रकाराची पूर्वसूचना ? की प्रतिभावंताला भूत - वर्तमान - भविष्य सगळे एकदमच दिसते - जाणवते याचा हा पुरावा ?

या कवितेत प्रारंभीच कवीने एक उदास, एकाकी, सुन्न मनस्थितीचा कॅनव्हास रंगवलेला आहे. एखाद्या दीर्घ आजाराने ग्रस्त होऊन एकाकी पडून रहावे, तसे आयुष्य चालले आहे, असे कवी म्हणतो. या एकाकीपणाच्या उदासीला छेद देईल असे काहीच घडताना दिसत नाही. ना कुणी भेटायला येत, ना कुणी धाडलेली 'गेट वेल सून' च्या निरोपाची फुले आलेली. सलगपणे लांबत जाणाऱ्या कंटाळवाण्या उदासीनतेला व व्यथेला बदलवणारे, वळवणारे काहीच घडत नाही. दीर्घ आजाराची ही प्रतिमा विलक्षण अर्थपूर्ण, उत्कट आणि प्रभावी आहे. कंटाळवाण्या एकाकी आयुष्याचे चित्र ती सर्व कंगोऱ्यासह उभे करते.

या उदास, एकाकी, सुन्न मनस्थितीच्या कॅनव्हासवर मग एकेक चित्र उमटू लागते. आषाढ येऊ घातला आहे. अवघ्या धरित्रीला घनघोर वर्षावाने तो चिंब भिजवणार आहे. आकाशात ढगांचा गडगडाट सुरू झालेला आहे. जणू आपल्या आणि धरित्रीच्या वर्षामीलनाची कथा सांगायला आकाशाने प्रारंभ केला आहे. आषाढात असे मेघ गर्जू लागले की ते मोराला आवतणच असते. हर्षाने उत्फुल्ल होऊन पिसारा फुलवून मोर नाचू लागतो. आताही आषाढाच्या काठावर मेघांच्या गडगडाटाची कथा ऐकायला मोर आलेला आहे. पण त्याला पिसारा फुलवता येत नाही. कारण त्याचा 'सारंग' पिसारा वारा घेऊन पळून गेला आहे. आजारपण सदृश एकाकी, उदास मनःस्थितीच्या व्याकूळ कॅनव्हासवर उत्सुकतेने आलेल्या, पण पिसारा हरवून बसलेल्या भुंड्या मोराचे चित्र फारच केविलवाणे दिसते आहे.

अशीच एखादी चिंब मीलनाची हर्षोत्फुल्ल करू शकणारी, पण उत्सवाचा दिमाख हरवून बसलेली आठवण कवीला यातून चित्रित करायची असेल का ?

'सारंग' हे विशेषण पिसाऱ्यासाठी किती छान योजले आहे! 'सारंग' म्हणजे चित्रविचित्र, रंगीबेरंगी, नक्षीनक्षीचा. मोराचा पिसारा असतोच ना तसा! पण 'सारंग' म्हणजे 'मेघ' असाही एक अर्थ आहे. या अर्थाशी पुढची ओळ कशी छान जुळते! वारा मेघांना पळवून लावतो. इथे मोराचा 'सारंग' पिसारा घेऊन वारा पळून गेला आहे. 'सारंग' या विशेषणाने मोराच्या दिमाखदार पिसाऱ्याचे यथार्थ वर्णन करताकरता पुढच्या ओळीतल्या कल्पनेशी असा एक धागा जोडून ठेवला आहे.

अर्थात महत्त्व आहे ते मोराच्या अगतिक केविलवाणेपणाला. आषाढ येऊन ठेपला आहे, त्याची गडगडाटी कथा सुरू झालेली आहे. पण बिचाऱ्या मोराला पिसारा फुलवता येत नाही. त्याचा पिसाराच हरपलेला आहे.

पुढच्या कडव्यात कॅनव्हासवर दुसरे चित्र उमटते. लिंबोणीच्या झाडामागे चंद्र रेंगाळला आहे. गुंतला आहे. करवंदी लिंबोणीच्या झाडापलीकडे चिरेबंदी वाडा आहे. चंद्राच्या किरणाचे पाणी त्या चिरेबंदी वाड्यात शिरते आहे.

बालपणीची कविता स्मृतिकोषातून तरंगत येते ना? 'चांदोबा, चांदोबा, भागलास का?/लिंबोणीच्या झाडामागे लपलास का?/ लिंबोणीचे झाड करवंदी / मामाचा वाडा चिरेबंदी' तर असे हे लिंबोणीच्या झाडामागचा चंद्र आणि

अनुक्रमणिका

चिरेबंदी वाडा यांचे साहचर्य समूहमनात पक्के रूजलेले. मामाच्या चिरेबंदी वाड्यात येऊन जाण्याचे चंद्राला कायमचे निमंत्रण. इथे कवीचे दीर्घ आजारासारखे कंटाळवाणे, एकाकी जीवन हा जणू चिरेबंदी वाडा. आपल्या बंदिस्तपणाशी ठाम असलेला. मजबूत आणि या एकटेपणात तरंगत आलेली 'साजणी'ची आठवण हा लिंबोणी मागचा चंद्र. ती आठवण भूतकाळातली म्हणून लिंबोणीच्या मागे गुंतलेली पण त्या आठवणीचे शीतल सौंदर्य इतके प्रभावी, की या चंद्राच्या किरणाचे पाणी त्या एकटेपणाच्या ठोस चिरेबंदी वाड्यातही येऊन पोचलेले.

या कडव्याच्या अर्थ प्रतीतीचा कवडसा मागच्या कडव्यावर पडतो. तेव्हा त्यातल्या आषाढाच्या कथेला आणि मोराला नवी झळाळी प्राप्त होते ना ? पण त्याचबरोबर हेही लक्षात येते, की कवितेतील भावाशयाला एक निश्चित गती प्राप्त झालेली आहे. मागच्या कडव्यातला मोर पिसारा फुलवून नाचू शकत नाही. कारण त्याचा पिसारा घेऊन वारा पळून गेला आहे. ह्या कडव्यात मात्र चंद्र लिंबोणीच्या मागे गुंतलेला असला तरी त्याच्या किरणाचे पाणी चिरेबंदी वाड्यामध्ये शिरलेले आहे. मनाला निववणाऱ्या, एकटेपणाची उदासीनता कमी करणाऱ्या 'साजणी'च्या आठवणीचे हे पुढे पुढे जाणारे, अधिकाधिक बळावणारे रूप आहे का? सुरूवातीला ती आठवण शबल आहे. वाऱ्याने उडून जाणारी आहे. पण पुढे तिचे बळ वाढलेले आहे. मनाला सुखविणारी तिची शीतलता चिरेबंदी वाड्याचा ठामपणा न जुमानता त्याच्या अंतरंगात प्रविष्ट झालेली आहे.

होता होता त्या आठवणी इतक्या प्रबळ होतात की आता त्यांना कुठलाच अडथळा रोखू शकत नाही. अगदी पृथ्वीएवढा मोठा असला तरी. त्यांच्या अंगात वेडच भरते. त्या वेडाच्या भरात पृथ्वीला मागे सारून आठवणी येत राहतात. मात्र या आठवणींमध्ये वेड भरलेले असले तरी त्यामध्ये वेडाचा उन्माद नाही. त्या बहकलेल्या नाही. त्यांचे स्वरूप सात्त्विक आणि शीतलच आहे. कसे ? 'साजणी'च्या सावळ्या हातांतल्या तुळशीच्या मातीसारखे !

'साजणी' चे हात 'सावळे' आहेत. 'गोर गोरे' नाहीत. 'सावळा' रंग हा शांत, शीतल सौंदर्याचे प्रतीक आहेत. द्रौपदी सावळी होती आणि कृष्णही सावळाच होता. 'मेघदूता'तील यक्षपत्नी देखील 'तन्वी श्यामा' अशीच होती. सावळ्या वर्णात आश्वासकपणाही आहे. आणि सावळ्या हातांत आहे 'तुळशीची माती'. तुळशीच्या मातीमध्ये 'healing properties' असतात. व्याधींवर उतार पाडण्याची संजीवक क्षमता असते, असे परंपरा मानते. 'सावळे हात', सावळी तुळस आणि तुळशीची सावळी माती अशी त्रिवेणी इथे कवीच्या एकटेपणावर आणि उदासीनतेवर शांतवनाचा उतारा म्हणून एकवटलेली आहे.

कवितेची पहिली दोन कडवी कवी स्वतःच्या अवस्थेचे वर्णन करतो आहे. जणू स्वतःशीच बोलतो आहे. नंतरच्या दोन कडव्यात तो 'साजणी'ला उद्देशून बोलत आहे. स्वतःकडून 'साजणी'कडे वळलेला निवेदनाचा रोख हा चिरेबंदी वाड्यात शिरलेल्या किरणाच्या पाण्याचा प्रताप आहे. एका उदास उबगलेल्या आत्मस्वराने सुरू झालेली ही कविता त्यामुळे 'साजणी'शी उत्कट हितगुज करीत, तिच्या आश्वासक आठवणीत संपलेली आहे. कवितेच्या बांधणीचा अष्टाक्षरी छंद प्रारंभीच्या उदासीला आणि अंतीच्या आश्वस्ततेला सारखाच पोषक आहे.

I डॉ. निशिकांत मिरजकर
बी-३०२, डीएस्के गार्डन एनक्लेव
स.नं.३७, कोंढवा खुर्द, पुणे - ४११ ०४८
भ्रमणभाष : ९९७०१८४३६२

ग्रेसची कविता : कूळ आणि मूळ

प्रा. नारायण कुलकर्णी कवठेकर

■

ग्रेस यांचा पहिला कवितासंग्रह 'संध्याकाळच्या कविता' १९६७ साली कवितेच्या वाचकांसमोर आला. कवितेचा वाचक असा मुद्दाम उल्लेख वा गटनिर्देश यासाठी केला की कथा, कादंबरी, चरित्र-आत्मचरित्र या वाङ्मय प्रकारांच्या वाचकांची संख्या जेवढी मोठी असते, मराठी कवितेचे वाचक त्यामानाने कमी असतात. पण जे असतात ते निष्ठावान असतात, नेटाने कविता वाचतात, काही काव्यवेडे असतात. कविता हा वाङ्मयप्रकार वेगळा आहे, हृदयाला भिडणारा आहे, पुन्हा पुन्हा वाचन करायला लावणारा आहे अशी किमान जाण या वाचकाजवळ असते. या वाङ्मयप्रकाराचे आकर्षण इतके विलक्षण की इतर वाङ्मयप्रकारामध्ये दर्जेदार लेखन करून प्रतिष्ठा पावलेले प्रसिद्ध लेखकही कविता लिहून पाहतात. कवितेची समीक्षा लिहिणारांनी एक वेगळेच स्थान स्वतःचे गृहीत धरलेले असते. कवितेच्या दोन ओळींच्या मध्ये असलेल्या रिकाम्या जागेत असलेला अर्थ सूक्ष्म तरलतेने उकलण्याचे, प्रतिभेच्या पातळीवरचे कौशल्य अशा भाग्यवंताजवळ असते असे काहीजण मानतात. म्हणूनच ज्ञानदेवांपासून ते अलीकडच्या ज्ञानपीठ प्राप्त कवींपर्यंत अनेकांचे आंतर्विश्व वाचकरसिकांपर्यंत 'हलक्या हाते' पोचविण्याचे कार्य अनेकांनी केले. 'फोल आणि निके' यातील फरक वाचकांसमोर परखडपणे ठेवला.

ग्रेसच्या कवितेचा विचार करताना वेगवेगळी समीक्षादृष्टी घेऊन काव्याकडे पाहणाऱ्या जाणकारांची, आस्वादकांची गरज तीव्रतेन जाणवते. गेल्या पन्नास वर्षांच्या कालखंडात मर्ढेकर, मुक्तिबोध, करंदीकर, इंदिरा संत, ढसाळ, कोलटकर, डहाके आणि आणखीही काही 'वेगळ्या' कवींच्या संदर्भात अनेक जाणकारांनी वाचक-रसिक-अभ्यासकांसाठी मोलाचे लेखन केलेले आहे.

'संध्याकाळच्या कविता' आल्या तेव्हा आधी ठसले मनावर ते या कवितांचे अनेक बाबतीतले वेगळेपण. लेखनक्रमाने 'चंद्रमाधवीचे प्रदेश' हा दुसरा कवितासंग्रह. 'राजपुत्र आणि डार्लिंग' तिसरा. हे मुद्दाम ध्यानात घेण्याचे कारण असे की व्यावहारिक वा प्रकाशकीय कारणांसाठी 'संध्याकाळ' मधील कवितांची संख्या मर्यादित (८१?) ठेवलेली असावी. पण 'संध्याकाळ'च्या काळातल्या व आधीच्याही कवितांचा समावेश 'चंद्रमाधवीचे प्रदेश' मध्ये केलेला आहे. या कवितांमध्ये नवीनता आणि ताजेपणा जाणवला. विशेषतः अवतीभवती मुक्तछंदात प्रामुख्याने कवितेचे आविष्करण होत असताना वृत्त, छंद, लय, ताल,

अनुक्रमणिका

गीतात्मता, नादमयता, अंतर्गत संगीत यांनी उमलून आलेली कविता - साद घालू लागली, आपल्या विलक्षण विभ्रमांनी तिने कवितेच्या वाचकांना, रसिकांना, जाणकारांना खिळवून ठेवले. (आता वाटते, बरेच झाले की आधीच्या कविता, नंतरच्या संग्रहात आल्या. मराठी कवितेच्या क्षेत्रात (ढोबळमानाने) कवींचे दोन गट दिसतात. एक-पहिल्या कविता संग्रहाने स्थिरपद मिळालेल्यांचा आणि दोन-दुसऱ्या संग्रहाने स्थिरपद झाले त्यांचा. ग्रेस गट क्रमांक एकमध्ये येतात. असो.)

या कवितांवर प्रभाव म्हणावा असा कुणाचा दिसत नव्हता. कुठेकुठे - रचनेच्या बाबतीत करंदीकर, कुठेकुठे शब्दकळेच्या बाबतीत पु. शि. रेगे, कुठेकुठे आध्यात्मिक भाववृत्तीच्या बाबतीत केचे यांच्या अभंगरचनेचा पण तुरळकच बाकी रचना म्हणजे - पुढे स्वतः कवींने 'माझी कविता अनुवंशहीन आहे' किंवा 'ज्या भाषेत मी जन्माला आलो / तिथेही अनाथ वाटते मला' असा आत्मघोष करण्याचा पूर्वसंकेत म्हणता येतील अशाच वळणाच्या होत्या.

या कवितेची शब्दकळा, प्रतिमा, सामासिक शब्द अनुभवाची धूसर पण आकर्षक प्रत, लय, नादानुकूल छंद, संगीतात्मकता - सारे काही विलक्षण होते. ही कविता मोठ्याने वाचणे म्हणजे श्रुतिसंवदेनांना सुखवणे होते. परिचित भाग होता तो भक्तिपरंपरेशी नाते सांगणारा. ती व्याकुळता इतक्या उत्कटपणे आणि नवीन रीतीने मांडण्यात आली होती की कवीचे आर्त वाचकालाही जाणवावे -

'मालविल्या सांज दिव्यांची
    तम मार्गावरती खंत
वृद्धेच्या ओवींमधला
    उरिं दाटून ये भगवंत'

या ओळी, किंवा या

'देह ओवूं जाता जडे
अंबराचा मणी
अजाणाचा संग माझा
पाडुरंग धनी.'

पुढे 'दुःखाचा महाकवी' झालेल्या ग्रेस यांच्या भावविश्वातील काही सुखाची कोवळी किरणे या संग्रहात दिसतात. अगदी 'अंगीअंगी पानकले / केशरांचे दिवे' अशी आनंदमय अवस्था. 'आषाढबन', 'रंग', 'उखाणा', 'सोन्याच्या मोहरा', 'हळवी', 'पहाट', 'पार्श्वभूमी', 'भगवंत', 'श्रावण', 'जन्म, वर्षाव', 'संग', 'विश्व गळता', 'आठवण' - अशा अनेक कवितांमधून छोट्या छोट्या घटना, प्रसंगातून मनाला लाभलेली छोटीशी पण मोलाची तृप्ती, दिलासा, आल्हाद यांचे मनोहारी चित्रण ग्रेस यांनी केले आहे, जे पुढील संग्रहामधून जवळजवळ दिसेनासे झाले आहे. याचबरोबर, हा कवी वेगळ्या वाटेने वेगाने निघालेला आहे आणि स्वतःची दिशा याला सापडलेली आहे हे सूचित करणाऱ्या 'पांढरे हत्ती', 'बर्फाच्या कविता', 'वार्ड नं. ६ : आर्थोपिडिक्स', 'घोडे', 'संभ्रम हळदीचे हात', 'वैरी' या कविता ठळकपणे लक्ष वेधून घेत होत्या. पुढील काळात वर्चस्व गाजवणारी दुर्बोधता या संग्रहात जरा अंग चोरून उभी होती. जागतिक वाङ्मयाचे, लेखनकृतीतील पात्रांचे, कवि - लेखकांचे, ख्रिश्चन, इस्लाम, हिंदू धर्मातील पुराणकथांचे विपुल संदर्भ हे ग्रेसच्या लेखनाचे - त्या लेखनाला संदर्भ समृद्धीचे परिमाण देणारे एक वैशिष्ट्यच आहे. मात्र हे संदर्भ सरळ वा सांकेतिक पद्धतीने येत नाहीत. त्या त्या व्यक्तित्वाला अधोरेखित करणारे सर्वपरिचित असे प्रसंग ग्रेस सांगत नाहीत. ते त्या कवितेतच शोधावे लागतात. (जे काही आहे ते संहितेतच आहे.)

ग्रेस यांच्या कवितेची 'बोली' कशी वेगळी आहे हे कळण्यासाठी या काही 'साध्या' ओळी. जीवनसाथीच्या निधनानंतरचा हा विलाप. कवितेत संदर्भ आहे मुलाचा म्हणजे राघवचा. ज्याला बिशू म्हणून लाडाने एरवी ते हाक मारतात. (बिशू हे नाव ग्रेस यांनी शरच्चंद्र मुक्तिबोधांच्या कादंबरीच्या नायकाचे म्हणून मोठ्या आवडीने आणि आदराने घेतले. ही गोष्ट ग्रेस यांनीच एका ललितलेखात - म्हणजे ललितबंधात सांगितली आहे. या माझ्या लेखात दोन लेखनाचाच फक्त उपयोग केलेला आहे. 'ग्रेस'ची 'निर्मिती' म्हणता येईल असे दोनच प्रकार - कविता आणि ललित लेखन. या दोहोंतीलच शब्दांची साक्ष मी काढलेली आहे. बाकी मुलाखती, भाषणे, प्रतिक्रिया यावर कितपत भरवसा ठेवावा याविषयी मी साशंक आहे. कारण या निर्मिती नसलेल्या शब्दांना सत्यापेक्षा हेतूंचा वास कधीकधी येतो. असो.) तर 'चंद्रमाधवी'च्या प्रदेशातील (पृ.८३) ओळी अशा -

दुर्गुण सांगितल्याने
माया वाढते
कुणी ढकलून देणार नाही
अशा मांडीचा
शोध घेत राहिलो
आणि आत्ता तू
जन्माचा अबोला धरलास
तुलाच हे प्रदेश

अर्पण करतो
बिशूला मी राघव म्हणत
नाही आत्ताशा
रघुनाऽऽऽथ अशी
पिकलेली हाक
देतो

काय आहे या कवितेचे म्हणणे. एका पतीची कबुली जे आयुष्यात करता आले नाही; चुकांची स्वीकृती. अपराधभाव, पश्चातबुद्धी, पश्चातापाची जाणीव. ध्रुवबाळासारखे प्रत्येक मांडीवरून उठविल्या गेलो. तुझ्या मांडीवर विसावायला होते. पण माझा दोष माझे दुर्गुण आड आले. आणि आत्ता तू कायमची सोडून गेलीस. हा सल आयुष्यभर छळत राहील. या प्रदेशावर, या निर्मितीवर खरा अधिकार तुझा. कारण या निर्मितीचे मूळ आणि स्वरूप तुलाच माहीत. तू साक्षीदार सगळ्यांची. आता उरली फक्त व्याकुळता आणि बाप म्हणून आलेले एक शहाणपण ते प्रकट होते. रघुनाऽऽऽथ या हंबरड्याचा भास देणाऱ्या हाकेतून श्रीरामाची आठवण. या विकल मनोवस्थेतून सावरण्यासाठी.

'कौटुंबिक' असे ढोबळमानाने म्हणता येईल अशा अनुभवाला करूणेच्या पातळीवर नेताना ग्रेस शब्दांना कसे आशयभारित करतात हे स्तिमित करणारे काम पाहण्यासारखे आहे.

रोमँटिसिझमची लक्षणे म्हणजे निसर्गपूजा. निसर्गावर मानवी भावभावनांचे आरोपण. निसर्गप्रतिमांचा सढळ वापर. हौतात्म्याचे आणि मृत्यूचे आकर्षण. शारीर संवदेनांवर विश्वास. जग विरूद्ध आपण असे कल्पिलेले द्वंद्व. एकाकीपण, एकटेपण, अलिप्तपण यांची जाणीव आणि हे विशेष जोपासणे. स्वतःची प्रतिमा जपणे, तिची जपणूक करणे. उदात्ततेच्या, समर्पणाच्या, त्यागाच्या, दुःखभोगाच्या साक्षात्काराने प्रभावित होणे वा भारून जाणे. निसर्गनिर्मिती, मानवी संबंध, विश्वरहस्य अशा गोष्टींविषयी कमालीचे औत्सुक्य आणि कुतूहल असणे अज्ञाताची ओढ आणि साशंकता. बाहेरच्या दर्शनापेक्षा आत्मशोधात रममाण होणे...

या इथें, झाडांना उदासीन करणाऱ्या संधिप्रकाशांत
मी जेव्हा ईश्वरी करूणांची स्तोत्रे म्हणून लागतो
मावळतीला, शेवटच्या किरणांची फुलें समुद्राच्या
दिशाहीन पाण्यात बुडून जातात... कुठें जातात?

अशा ओळींमध्ये तर वरील अनेक लक्षणे संपूर्ण सामर्थ्यानि एकवटलेली दिसतात.



दुःख ग्रेसच्या कवितेत पुन्हा पुन्हा अवतरते. या दुःखाचा तपशील आणि स्वरूप धूसर स्वरूपात सूचक शब्दात कधीकधी कवी मांडतो. पण १९५७ पासून ते २०१२ पर्यंत हे दुःख फिरून फिरून कवितेत जिवंत होत राहते ते कसे असेल?

'माझे छोटेसे दुःख घेऊन मी नीट उभा
राहू शकेन असे शोधतोय
शहर'
इथपासून तर - 'मी महाकवी दुःखाचा
प्राचीन नदीपरि खोल'

असे म्हणायला भाग पाडणारे सर्वव्यापी दुःख कोणते? त्याचे मूळ कुठे आहे ? ग्रेस यांनी काय लिहिले ते महत्त्वाचे. एरवी स्पष्ट सविस्तर न बोलणाऱ्या ग्रेस यांनी त्यांचे जन्मरहस्य स्वतःहून सांगितले कारण हृदयात दडवून ठेवणे त्यांना असह्य आणि अनावर झाले असेल म्हणूनच. १९७४ साली प्रसिद्ध झालेल्या 'चर्चबेल' मधील लेख (वा बंध) १९७० ते ७२ या कालखंडात नागपूरच्या 'तरूण भारत'च्या रविवार अंकातून प्रकशित झाले. म्हणजे जवळजवळ ४० वर्षांपूर्वीची हे लेखन. या पुस्तकात 'उन्हातील आई' या शीर्षकाचा एक लेख आहे. ग्रेसच्या कवितेला, अस्तित्त्वाला, मनोविश्वाला, जीवनव्यवहाराला व्यापून असलेली ही आई. पण ही आई 'प्रेमस्वरूप आई' किंवा 'आई म्हणोनि कोणी' या

अनुक्रमणिका

कवितांमधली आई तर नाहीच पण सामान्यांपासून असामान्यांपर्यंतच्या मनात असलेल्या आई या प्रतिमेशी, कल्पनांशी, महन्मंगल अशीसुद्धा नाही. ही फक्त ग्रेसचीच आई आहे.

या लेखामध्ये (चर्चबेल : पृ. ६२) ग्रेस, आईच्या निमित्ताने पालघाटच्या विराणी अय्यंगारची गोष्ट सांगताना म्हणतात, 'पालघाटची विराणी अय्यंगार काय कमी देखणी होती? पण चंदनाच्या पोटी इंधन जन्माला गावे तशी मोना निपजली ! याचा दोष विराणीला देता येणार नाही. कारण मला ठामपणे ठाऊक आहे की, मोना ही मिस्टर अय्यंगारच्या संबंधाची निपज नाहीच. मास्टर बेदीचे आणि विराणीचे संबंध जगजाहीर होते.' याला जोडूनच ग्रेस पुढे लिहितात, 'माझ्या वडिलांच्या चौथ्या लग्नाला ज्या वेळी मी आक्षेप घेतला त्याच वेळी निद्रिस्त ज्वालामुखीला अचानक जाग यावी त्याप्रमाणे माझे तीर्थरूप गर्जून गेले. मग माझी जन्मकथा स्पष्ट, सुबोध, धुतल्या तांदळासारखी स्वच्छ होऊन गेली! माझ्या रक्तावर माझे मनापासून प्रेम आहे, आत्मपूजेच्या लयीसारखे. या जगात आणखी दुसरे देखणे रूप कोणते असू शकेल?' - कथा पुरेशी स्पष्ट आहे. स्वतः ग्रेसनीच लिहून छापल्यामुळे मी उद्धृत केली. (Trust the tale, not the teller असे म्हटले आहे. डी. एच. लॉरेन्सने) पण इथे कथा कथनकाराहून वेगळी काढता येत नाही, कारण ती दुःखाचे मूळ. या कथेने ग्रेसच्या पदरात काय टाकले. भारतीय वर्णव्यवस्थेच्या परंपरेतील शेवटच्या वर्णातील एक जात. आणि त्यावेळच्या सामाजिक आणि शासकीय नियमानुसार बापाची ती मुलाची जात. जात छोटी व मोठी, वर्ण उच्च वा नीच हा मुद्दाच नव्हता. जी नव्हती ती जात मरेपर्यंत चिकटली. काही वेळा उच्चवर्णीय मानसिकतेने तिचा उपहासाने अपमान वाटावा असा निर्देशही केला. म्हणून मग कावळ्याला आग्रह - 'चोचीत पिंड घे तू सावत्र बाप माझा'

आई कशी? 'माझ्या आईच्या सडसडीत बांध्याचे आणि विलक्षण पाणीदार डोळ्यांचे, नागाच्या मस्तकावरील तेजस्वी मण्याप्रमाणे मला आकर्षण आहे' पण तिच्या वाट्याला तरी सौख्य आले का? नाही. तिच्या वाट्याला आली 'पाशवी कौर्याची उद्ध्वस्त गुंफा'. मग हळवे होणे क्रमप्राप्तच होते.

याच लेखात एक प्रसंग सांगून ग्रेस म्हणतात, 'त्या रात्री जरी माझी आई गाईसारखी हंबरली. कुत्र्यासारखी भुंकला तरी आज माझ्या चोवीस बरगड्यांच्या परगण्यात वैशाखाने वृद्ध झालेला एक सूर्य आणि आणि स्वप्नांच्या पालखीत कुंकू वाढवणारी एक कुंती निवांत निजून आहेत...'

ग्रेस यांच्या कवितेत कर्ण आणि कुंती, कुंती आणि कर्ण यांचे उल्लेख शंभरदा आणि गडद होऊन येतात. त्याचे मूळ इथे आणि असे आहे. बरे, ही आई प्रेमळा होती असेही ग्रेस म्हणत नाहीत. ओगल्याचा जळता कंदील तिने कवीच्या पायावर आपटला होता, त्याची खूण अजून आहे आणि माझ्या आईने कधीही माझ्या अंगाईत खडीसाखर पेरली नाही असेही नमूद करतात. एखादेवेळीच ग्रेस वैतागतात, संतापतात आईवर आणि म्हणतात.

आडवाच झोपलो असतो
मीही गर्भाशयात तर
येऊ दिले असते का
तुझ्या वाट्याला माऊलीचे भाग्यपण?

पण असा उद्गार अपवादात्मक. एरवी आईच्या म्हणून स्त्रीच्या वाट्याला काय येत असेल याची जाण या कवीला आहे. तो स्त्रीवादी कविता लिहीत नाही. पण स्त्री म्हणजे काय याची वेगळ्या पातळीवरची समज त्याच्या कवितेत दिसते. आपल्यांनी केलेला स्त्रीचा घात.

नथ आडण्या दांड्याची ज्याने नाकात घातली
भांग मोडून त्यानेच केली कुंकवाची होळी

ही ग्रेसच्या अभिव्यक्तीची रीत.

एक आणखी गोष्ट जाणवते. त्यांच्या कवितेतील जवळजवळ सर्वच स्त्रियांना 'देह' आहे. आणि म्हणून देहाबरोबर येणाऱ्या वासना, विकार, अंगसंग आणि मग दुःख. यातून ना कुंती सुटली ना द्रौपदी. सोसणारी फक्त उर्मिला!

लक्ष्मणाची रेघ आली
उर्मिलेच्या कामी

जे आपण नाही, ते लादलेले, चुकीचे अस्तित्त्व घेऊन जगणे म्हणजे काय हे जावे त्याच्या वंशा तेव्हा कळे. बालपणापासून थेट मृत्युपर्यंत असेच कोळपत, कुढत जगणे. त्या बालमन व तरूण मनाची काहिली संवेदनशील मनान कशी सोसली असेल? मग एकाकीपण, स्वतःचा एक कोश तयार करून जगणे. जगाविषयी एक अढी घेऊन जगणे. मग स्वतःच्या विश्वात दुःख कुरवाळत जगणे.

कुणी आपुले म्हणेना
कुणी बिलगेना गळा
कंठ दाटताना झाला
रंग कावळ्याचा काळा



अशी आपली प्रतिमा करून झुरणे किंवा

नाहीच कुणी अपुले रे
प्राणावर नभ धरणारे
दिःक्काल धुक्याच्या वेळी
हृदयाला स्पंदविणारे

असे काळीज विदीर्ण करणारे उद्‌गार ग्रेसच्या कवितेत अनेक ठिकाणी सापडतात. या दुःखाने गुदमरून मरू नये म्हणून देवाने त्यांना कवितेचे वरदान दिले असावे आणि आई नावाचे अस्तित्व वेगवेगळ्या रूपात जाणवून देणारी देहधारी स्त्री. ती म्हणजे जणू जखमी श्वापदाला गवसलेले शरणस्थळ. पु. शि. रेगे यांच्या उत्तरार्धातील कवितांमध्ये स्त्री, तिच्या स्तनांचा 'ळ'कार त्यांना देवीच्या मूर्तीची आठवण करून देतो तसे ग्रेस यांचे होत नाही. पण वासनेच्या पलीकडची स्त्रीरूपे त्यांच्या कवितेत दिसतात. तो एक स्वतंत्र विषयच व्हावा. रेगे यांना जसे समीक्षक गंगाधर पाटील लाभले तसे कुणी ग्रेस यांच्या कवितेला भेटले तर ग्रेस यांचे म्हणणे सार्थ होईल -

मोडलेल्या प्रार्थनांची
वीण उसविणारा
एखादा फकीर
मला सापडेल

ग्रेसच्या कवितेच्या संदर्भात मायाजाल, गारूड, शब्दबंबाळ, अर्थकाहूर कविता असे म्हणणे म्हणजे जबाबदारी झटकणे होय. ग्रेस संबंधी लिहिताना काहीजण ग्रेसच्या कवितेपेक्षाही दुर्बोध लिहितात किंवा ग्रेसच्या शैलीतच लिहितात (करिती आपणांसारखे!) काहीजण तर त्यांच्यासंबंधीच्या अफवा, आख्यायिका यांचाही आधार घेतात. Honest criticism and sensitive appreciation is directed not upon the poet but upon the poetry असे प्रतिपादन (टी. एस. इलियट यांचे?) ग्रेसच्या संदर्भात ध्यानात घेणे अगत्याचे वाटते. काही जण काही सोप्या वाटणाऱ्या (म्हणजे कळल्या असे वाटणाऱ्या) ओळी मूळ मोठ्या कवितेतून वेगळ्या काढतात आणि हिरिरीने मतप्रदर्शन करतात. खरे तर कविता ही पहिल्या शब्दापासून तर शेवटच्या शब्दापर्यंत - नव्हे शेवटच्या शब्दानंतरच्या पूर्णविराम किंवा उद्‌गारवाचक चिन्ह किंवा कोरी जागा किंवा तीन टिंबे इथपर्यंत एक संपूर्ण असे एकक असते. पण 'चंद्रमाधवीचे प्रदेश' नंतर ग्रेस यांच्या रचनांमध्येच विस्कळितपणा यायला लागला असे वाटते. एक तर अत्यंत खासगी अनुभव, व्यक्ती, घटना, प्रसंग आणि सामासिक शब्दांची घडण आणि रूपक वा प्रतिमांचा वर्षाव, संदर्भबहुलता यामुळे अनेक कविता वाचकाच्या कुठल्याच संवेदनेला आवाहन करीत नाहीत.

वाटीत बिशूचे दूध
कुलुपात बंद मी केले
सखि तीक्ष्ण नखांनी उकरे
हृदयाचे कवच भुकेले

'मांजर' कवितेतल्या ओळी काही केल्या वाचकाच्या होत नाहीत. मग शेवटी

रूसले बाई रूसले
सखि कृष्णकुळांतील मांजर
लग्नात तिच्या मी देईन
अंधारभयाचे अंबर

असे जिव्हाळ्याने कवी म्हणतो तरी, मांजरीच्या रंग काळा आहे. यापलीकडे ही कविता सुबोध होत नाही.

मराठी कवितेच्या वाचकाला दुर्बोधता नवीन नाही. ती ज्ञानदेव, तुकाराम, एकनाथ, मुक्ताबाई, बालकवी, मर्ढेकर, कोलटकर यांच्या निर्मितीमध्येही आहे. पण त्यांच्या प्रतिभेचा स्वभाव आणि रचनेची रीत समजूत घेतली तर आशयाकडे पोचता येते पण काय म्हणायचे आहे हे कवीच्या मनात तरी स्पष्ट असले पाहिजे.

अनुक्रमणिका

क्षितिज जसे दिसते
तशी म्हणावी गाणी
देहावरची त्वचा आंधळी
छिलून घ्यावी कोणी

याअप्रतिम ओळी काय सुबोध आहेत? संगमरवरात स्वप्न लपवून ठेवण्याचा शाप असणाऱ्या कवीला क्षितिजासारखी दूरची धूसर, आहे की नाही असा भूल पाडणारा संभ्रम निर्माण करणारी गाणी लिहावीशी वाटावी यात नवल नाही. आणि सत्याच्या जवळ जाण्यामध्ये अडथळा त्वचेचा म्हणजे शरीराचा आहे, पंचेंद्रियाच्या पलीकडचेही अनुभव येण्यासाठी आणि घेण्यासाठी, अनावर, अधाशी, स्खलनशील त्वचा छिलूनच वेगळी काढणे आवश्यक आहे, अशी काहीशी आध्यात्मिक जाणीव या गोळीबंद ओळी मांडतात. कवितेतील शब्दांमध्ये अर्थभारलेपण काय असते, याचा प्रत्यय या ओळी देतात.

एक दृश्य मला जाणवते कवितेच्या क्षेत्रात आणि अस्वस्थही करते. ते असे - छंदामध्ये, वृत्तामध्ये किंवा यमकाश्रयी रूपामध्ये किंवा गीतात्म स्वरूपात प्रामुख्याने रचना करणाऱ्या कवींच्या कविता संख्येने जास्त (म्हणूनही संग्रह ही जास्त) कां असतात? मर्ढेकर म्हणाले होते की, 'शब्दांवर थोडीफार हुकूमत असली अन् लय अंगवळणी पडली की कविता लिहिणे फारसे कठीण नसते...' मग काय होते? आशय एका आयुष्यात किती असणार? (व्यासोच्छिष्ट ?) मग तऱ्हेतऱ्हेने आलाप घेत राहणे सुरू होते का? की एकच गाणे 'चाल बदलून' गात राहायचे? मग तीचतीच प्रतीके, चिन्हे, प्रतिमा, वस्तू, घटना, व्यक्ती, संकेत सतत येतच राहणार. माझ्या कवितेत सतत - असे समर्थनात्मक आणि सृजनशक्ती बंधनात अडकल्याचे भाव व्यक्त करणारे वक्तव्य करण्याची वेळ कवीवर का यावी? पण हेही खरे की कवीला या सर्वांचे भान आहे. पण स्वतःला ओलांडता येत नाही हीही अडचण असावी. 'मितवा'मध्ये (पृ. १९८) ग्रेस म्हणतात की, 'माझ्या कवितेने मराठीला काय दिले आहे व ती काय देत आहे याचा विचार मला स्वतःला करण्याचे अजिबात कारण नाही. पण माझ्या कवितेने मराठी काव्यात निर्मितीची प्रक्रिया, त्यातून सिद्ध झालेली कलाकृती व तिचा आस्वाद या त्रिवेणीसंबंधी अनेक महत्त्वाचे प्रश्न निर्माण केलेले आहेत.' यानंतर स्वतःच्या कवितेचे 'शब्दमयी, शब्दवेल्हाळ आणि अर्थकाहूर' असे कौतुकभरले आणि यथार्थ वर्णन करतात. 'दुर्बोधतेची बेसरबिंदी' असे रूपक कल्पून ती मी मुद्दाम माझ्या कवितेत दडवून ठेवली आहे असे सांगतात तेव्हा प्रश्न पडतो की असे कवीला निर्मितीच्या तंद्रीत करता येते? की परिष्करण करताना हा प्रयोग कवी करतो. कपाळबिंदी, ललाटबिंदी, बेसरबिंदी या प्रतिमा तशा दुर्बोध नाहीत. कपाळ आणि ललाट यातील फरक समजू शकतो. बेसरबिंदी कौमार्याची खूण मानायची काय? कवितेच्या कौमार्याची? ग्रेस म्हणतात ते रहस्यशरणतेचे गुपित आहे. म्हणजे आणखी एक गाठ. म्हणून वाटते कवीला न विचारता कवितेकडे जावे. यासंदर्भात डॉ. अक्षयकुमार काळे यांनी फार चांगले काम केले. त्यांनी ग्रेस यांची प्रदीर्घ मुलाखत घेतली. ती वाचताना पुन्हा पुन्हा कवीला प्रश्न विचारून मुद्याकडे डॉ. काळे आणताना दिसतात. आणि कवी उत्तर देताना काळे यांना अवकाश आणि अंतराळ फिरवून आणतो. आपल्या प्रश्नाच्या पदरात उत्तराचे नेमके दान पडले का असा प्रश्न डॉ. काळे स्वतःलाच विचारीत असावेत असे वाटते. पण ती मुलाखत ग्रेसच्या एकूण मानसिकतेचा, त्यांच्या जीवनदृष्टी आणि स्रोतांचा सविस्तर आणि सखोल धांडोळा घेताना दिसते.

एक निरीक्षण असे नोंदवावेसे वाटते. 'संध्याकाळच्या कविता', 'चंद्रमाधवीचे प्रदेश', 'राजपुत्र आणि डार्लिंग', 'चर्चबेल' या संग्रहांच्या सुरूवातीला सॉमरसेट मॉम, रवीन्द्र टागोर, एमिलीची वचने मांडणारे ग्रेस पुढे स्वतःच लिहिलेली इंग्रजी अवतरणे (?) द्यायला लागले. आत्मप्रीती आणि आत्मलीनतेनंतरची ही आत्मतृप्ती आणि आत्मगौरवाची अवस्था म्हणायची का? एक मोठा कवी स्वतःला 'शब्दांचा किंकर, डफ्फर मी' आणि आपल्या कवितेला 'टिनपाट, चोंबडी उत्तरे' संबोधतो आणि एक कवी स्वतःला 'मी महाकवी दुःखाचा' म्हणवतो. पुढे पुढे तर 'मी' अधिकच ठळक होत जातो एका ओळीत एकच अक्षर - 'मी'.

आता ग्रेसकडे - म्हणजे त्यांच्या कवितेकडे वळणे सुरू होईल नव्याने. ही कविता काळाच्या पुढची आहे का? नाही. काळापेक्षा वेगळी आहे. समकालीनांपेक्षा वेगळी आहे पण अपूर्व नाही. काळातीत असेल का? होय. कारण तिच्या अंगी जे गुण आहेत ते कुठल्याही काळी जाणवतीलच. आजच्या काळातही अर्थ न कळताही नाद, लय, शब्दकळा, काही मूलभूत भावनांची अभिव्यक्ती यामुळे सर्व स्तरातील काव्यवाचकाचे लक्ष वेधून घेतेच. ही कविता वाचक, अभ्यासकांना स्वस्थ बसू देणार नाही. बालकवींच्या 'औदुंबरा'ने स्वतःवर शंभर लेख लिहायला काव्यप्रेमींना बाध्य केलेच ना? ग्रेसच्या भक्तांकडून फारशी अपेक्षा नाही. भिंत चालवण्याला आणि सदेह वैकुंठगमनालाच त्यांचे सामर्थ्य समजणाऱ्यांना ज्ञानेश्वर आणि तुकारामाचे मोल काय कळणार? समीक्षेची वेगवेगळी आयुधे सहृदयपणे वापरून ग्रेसच्या कवितेकडे जाता येईल. कवितेचे झालात तरच मी



कळेन अशी अट घालणारी ही लाडावलेली कविता. 'आईचे गाणे' या कवितेने स्तब्ध केल्यानंतर मी अनेक महिने (कदाचित वर्षेही) या कवितेचा अनुनय करीत होतो. (चंद्रमाधवीचे प्रदेश : पृ. ३६) यातील तपशील सांगण्यासाठी प्रतिमा जणू उमलून येतात. पाकळ्या मिटून घेत नाहीत. वाचक कळवळतो, कधी कासावीस होतो. कविता संपते तेव्हा सुन्न होतो. या कवितेत दोन ओळी अशा -

ते चंद्र विटले चोळी दुधात भिजली
पाठीत वाकताना आई गळ्यात हसली

ही गोष्ट कळेचना. मग पुन्हा पुन्हा वाचन, मोठ्याने वाचन. (हो ग्रेसची कविता ऐकू येते. उत्तम कवितेचे उदाहरण त्यांनीच एका लेखात दिले आहे - 'वाजे की घनदाट दूर कुठले देऊळ रानातले' वरील कवितेत 'शब्दापेक्षाही अर्थाचा उदास करणारा नादगुण' जाणवतो. काही मित्रांशी चर्चा, शिक्षकांशी संवाद, समान आशय असलेल्या कवितांचा शोध, ओठांची मिथिला त्याया/ पदारातुन नभ व्याकुळते किंवा अंगाईचे उल्लेख आणि खुद्द कवीने एकदा बेसावध अवस्थेत केलेले अस्फुटसे सूचन - एवढ्या प्राणांतिक सायासानंतर कळले ते असे की, बाळाला पाहून पान्हा दाटून येतो, चोळी दुधात भिजते. पाजून झाल्यानंतर आई बाळाला दोन हातांवर आडवे तोलून झोळीत टाकताना पाठीत वाकते आणि कंठातून अंगाई गीत आनंदाने आणि वात्सल्याने स्रवत असते - आई गळ्यात हसली... ह्या आनंदात आणि तृप्तीत पुढे बरेच दिवस विहरत राहिलो...

ग्रेस यांनी उखाणे म्हणून - तसे शीर्षक देऊन काही कविता लिहिल्या आहेत. खरे तर ग्रेसची प्रत्येक कविताच एक उखाणा आहे. खरे तर 'क्षणात नाहीसे होणारे दिव्य भास' शब्दात पकडताना त्यांच्याच प्रतिभेची दमछाक होत असणार. त्यात संगमरवरात स्वप्न दडवण्याचा शाप त्यात पुन्हा 'भाषाचही निकामी, अर्थासही पुरेना' अशी होणारी जाणीव, आणि गळाभर दाटून येणाऱ्या शब्दांची अवस्था अशी - 'या व्याकुळ संध्यासमयी, शब्दांचा जीव वितळतो...' ही निर्मिती कधीकधी अद्भुताचा भास करून देते. काळ जाईल. पुराचे पाणी ओसरून जाईल जास्तीचे आहे ते. नंतर शिल्लक राहील मधुर पाण्याचा नितळ स्वच्छ प्रवाह, रसिकांची काव्यपिपासा भागविणारा, पिढ्यान्‌पिढ्या!

'संध्याकाळच्या कविता' मध्ये एक 'चिमणी' शीर्षकाची छोटीशी कविता आहे. विश्ववाङ्मयात शोभावी अशी आणि 'परतत्त्वस्पर्शा'ची आस बाळगूण असणारी. लौकिकात राहून अलौकिक अशा निर्मितीचा ध्यास ग्रेस यांनी नेहमीच बाळगला. त्याचे सौम्य, मनोहर सृजनरूप म्हणजे ही कविता -

चिमणी

मावळत्या संधिप्रकाशात मी शून्यपणे
बसून आहे.
मागचे आणि पलीकडचे मला
काहीच दिसत नाही,
शेवटच्या काही क्षणांसारखे स्मृतीचे
दिवे अंधुक झाले आहेत.
उंदरांनी कुरतडलेल्या कवितांचे कागद
माझ्या उशाखाली आहेत.
माझी एकच इच्छा आहे आता,
तुझ्या विटलेल्या पदराच्या ओबडधोबड
धाग्यांनी एक चित्र विणावे
आणि रंगीत तावदानांच्या काचांना फोडून
येणाऱ्या चिमणीच्या धक्क्याने, गर्द शाईचा
निळा सागर त्यावर कलंडून जावा...

प्रा. नारायण कुळकर्णी कवठेकर
'किताब', राऊतवाडी, अकोला - ४४४ ००५
भ्रमणभाष : ९८५०७४२८८१

ग्रेस : कविता आणि काव्य

डॉ. माधवी देसाई

■

पु. शि. रेगे - मर्ढेकरोत्तर काळात निर्माण झालेल्या मराठी कवितेत सुर्वे, चित्रे आरती प्रभू, कोलटकर, नामदेव ढसाळ, मधुकर केचे, सुरेश भट, ग्रेस इत्यादी कवींचे योगदान उल्लेखनीय आहे. रेगे - मर्ढेकर - मुक्तिबोध या कवित्रयींनी मराठी नवकविता घडविली. त्यांच्या कवितेचा प्रभाव नंतरच्या कवींवर पडणे स्वाभाविक होते. काही कवी मर्ढेकरांच्या तर काही मुक्तिबोधांच्या काव्यवाटेने गेले तर काही कवी रेग्यांच्या कवितेने प्रभावित झाले. उदा. दि. पु. चित्रे, ग्रेस. कवी ग्रेस पु. शि. रेग्यांचा प्रभाव मान्य करीत नाहीत उलट स्वतःला 'अनुवंशहीन' कवी म्हणवतात; पण त्यात तथ्य नाही. तरीही मर्ढेकरोत्तर काळातील ग्रेस हे एक लक्षणीय कवी आहेत. त्यांच्या कवितेबद्दल परस्पर विरोधी प्रतिक्रिया व्यक्त झाल्या. ग्रेस यांची कविता दुर्बोध आणि अनाकलनीय आहे असे म्हणणारा एक वर्ग आहे. ग्रेस यांच्या कवितांवर प्रेम करणारा एक स्वतंत्र रसिकवर्ग आहे. ग्रेस यांच्या कवितेतेत प्रेम, विरह, आत्मलीनता या भावना तीव्रेतेने व्यक्त होत असल्याने तरूणाईला त्यांची संगीतकर्षी नादमय कविता आवडते. लता मंगेशकर, हृदयनाथ मंगेशकर, त्याचबरोबर सुरेश वाडकर, माधुरी पुरंदरे, मुकुंद फणसळकर यांनी अत्यंत बहारदार स्वरमेळात सजविलेल्या ग्रेस यांच्या कवितांचे सुरेल आवाजात गायन केले. मंगेशकर मंडळींनी ग्रेस यांच्या कविता गायनाचे अनेक ठिकाणी जाहीर कार्यक्रम केले. चित्रपटातही ग्रेस यांच्या कविता घेण्यात आल्या. उदा. 'निवडुंग' शिवाय 'साजणवेळा' सारख्या ध्वनिफितींच्या माध्यमातून ग्रेस यांची कविता लोकांपर्यंत पोचली. अशी लोकप्रियता रेगे, मर्ढेकर, चित्रे, कोलटकर, सुर्वे, सुरेश भट इत्यादी कवींच्या वाट्याला आली (अल्पसा अपवाद असू शकतो) नाही, कारण त्यांच्या कविता संगीतबद्ध करून त्यांचे जाहीर कार्यक्रम दिग्गज गायक कलावंतांनी केले नाहीत की त्यांच्या कवितांच्या कॅसेटस् सीडीज्ही निघाल्या नाहीत. अन्यथा त्यांनाही अशीच लोकप्रियता मिळाली असती. ग्रेस यांना मिळालेल्या प्रसिद्धीचे आणि लोकप्रियतेचे हे एक मोठे कारण आहे. अशीच प्रसिद्धी सुरेश भटांना मिळाली पण ग्रेस यांच्या इतकी नाहीच. कारण सुरेश भटांच्या प्रेमगीतांना भावगीतांना प्रसिद्धी मिळाली परंतु भटांच्या जीवनभाष्य करणाऱ्या कवितांचा विचार अजूनही व्हावयास पाहिजे तेवढा झाला नाही. तरीही ग्रेस आणि सुरेश भट यांच्या प्रसिद्धीचा आणि लोकप्रियतेचा विचार केला तर भटांच्या कवितेविरोधात फारशी चर्चा झाली नाही पण ग्रेस यांच्या कवितेच्या विरोधात खूप चर्चा झाली. कारण त्यांच्या कवितेतील दुर्बोधता, असंबद्ध अतार्किकता आणि

अनुक्रमणिका

व्यक्तिगतता. ग्रेस यांच्या ज्या काही निवडक कविता स्वरबद्ध होऊन लोकांपर्यंत/रसिकांपर्यंत पोचल्या त्या सर्वच कविताही सुबोध, अर्थघन आशयसंपृक्त आहेत असे नाही, कारण त्यातून 'काव्य' थोडे आणि कविता अधिक आहे. 'ती गेली तेव्हा रिमझिम, पाऊस निनादत होता' या सारखी एखादी कविता त्याला अपवाद आहे, परंतु बहुसंख्य कविता दुर्बोध, अर्थहीन, अर्थबंबाळ आहेत, परंतु त्यातील दोन चार ओळीतच काव्य असते. उदा. निष्पर्ण तरूंची राई, चंद्र, सत्य, काळा घोडेस्वार, गाई, काही धारा, माझ्या पोरी, गंगास्तोत्र, नर्तकी, प्रपंच, प्रीत इत्यादी. या कवितांतील दोन चार ओळीतील काव्य मनात रेंगाळत राहते.

'चंद्रमाधवीचे प्रदेश' या कवितासंग्रहातील 'चंद्र' या कवितेतच्या प्रत्येक कडव्यात ग्रेस यांनी एक निसर्गदृश्य शब्दबद्ध केले आहे. त्यांची परस्परांशी साहचर्य सुसंगती नाही पण त्यातून गूढगुंजन निसर्गवर्णन आहे. संगीताकर्षी सुंदर शब्दांच्या यमकअनुप्रासबद्ध रचनेने कविता गेय झाली आहे. ग्रेस लिहितात,

कंठात दिशांचे हार । निळा अभिसार
वेळुच्या रानी
झाडीत दडे । देऊळ गडे
येतसे जिथुन मुलतानी ।।

लागली दारीला ओढ । कुणाची गाढ
पाखरे जाती ।
आभाळ चिंब । चोचीत बिंब
पाऊस जसा तुजभवती ।।

गाईंचे दुडुदुडु पाय । डोंगरी जाय
पुन्हा हा माळ ।
डोळ्यात सांज । वक्षात झांज
गुंफिते दिव्याची माळ ।।

मातीस लागले वेड । अंगणी झाड
एक चाफ्याचे ।
वाऱ्यात भरे । पदरात शिरे
अंधारकृष्ण रंगाचे ।।

या प्रत्येक कडव्यात एक निसर्गदृश्य नजरेसमोर साकारते. त्यातही खूप आशयसंपृक्तता आहे असे नाही... परंतु शेवटच्या कडव्यात ग्रेस लिहितात,

मेघात अडकले रंग । कुणाचा संग
मिळविती पेशी ?
चढशील वाट ? रक्तात घाट
पलिकडे चंद्र अविनाशी ।।

'अविनाशी चंद्र' हे अमरत्वाचे प्रतीक आहे. पण तो 'पलिकडे' आहे. त्याला प्राप्त करण्यासाठी चढाची वाट आणि रक्त आटविणारा घाट पार करावयाचा म्हणजेच भवसागर पार करायचे दिव्य पार पाडायचे आहे. ग्रेस यांना या 'अविनाशी चंद्रा'ची ची आस होती. निर्मितीनाशाच्या भयाने 'भयग्रस्त' झालेले ग्रेस यांचे मन केवळ या अविनाशी चंद्राच्या प्राप्तीनेच निर्भय होऊ शकले असते. ही संपूर्ण कविता असंबद्ध, अल्पार्थी असली तरी शेवटच्या चार चमकदार ओळी मनाची पकड घेतात. 'साजणवेळा' या ध्वनिफितीत समाविष्ट असलेली ही कविता माधुरी पुरंदरेंनी अतिशय सुरेख गाऊन अवीट श्रवणीय केली आहे.

'सत्य' (चंद्रमाधवीचे प्रदेश) कवितेत ग्रेस यांच्या व्यक्तिगत संदर्भाचे, प्रेमभावनेचे, दृष्कृत्यांचे, उदासीचे अनावश्यक वर्णन येते. काही भावनांची धूसर तुटक अनुभूती देणाऱ्या या कवितेत ग्रेस यांनी व्यक्तिगत जीवनातील छोटया घटनांचे अवडंबर माजविले असून त्यांची आत्मकेंद्री वृत्ती दिसते... परंतु शेवटच्या चार - पाच ओळी मात्र सत्यावर भाष्य करतात. सत्याचा शोध घेताना ग्रेस अभावानेच दिसले; पण येथे ग्रेस म्हणतात -

''यात काय करायचे असते आत्मसात ?
माझ्या धैर्याचा पुरावा ? फकिरांचा उरूस ?
वसंताच्या पूर्वार्धातील पाऊस ? हात सोडवून
घेतानाची बातमी ? स्तनांवरचा तीळ ? संन्याशाची आत्मपीडा ?
जिथे तुम्हाला सत्य सापडेल तिथून मला निरोप धाडा''

या संपूर्ण कवितेतून ग्रेस यांचा अहंभाव, आत्मपूजा दिसत असली तरी सत्यशोधनाची आसही दिसते. कवीला सत्यानुभूती घ्यावयाची आहे पण सत्य सापडत नाही, कारण ते स्वतःमध्ये आहे की समष्टीमध्ये ? एकांतात आहे की उरूसांमध्ये ? निसर्गात आहे की ऋतुचक्रात की मानवी प्रवृत्तीमध्ये ? स्त्रीदेहसंगात आहे की संन्यस्तवृत्तीमध्ये आहे ? नेमके सत्य कुठे आहे याबाबात कवी दिशाहीन आहे... पण जर ते कुणाला सापडलेच तर कवी म्हणतो, 'तिथून मला निरोप धाडा'.

'मुद्रा' (चंद्रमाधवीचे प्रदेश) ही कविताही धूसर अर्थप्रतिपादन करणारी दुर्बोध कविता आहे, पण त्यातील दोनच ओळी मात्र वेगळेच वास्तवदर्शन करून देतात. ग्रेस लिहितात,

''शोकातिल दाट विणीची
गुम्फात अरण्ये असती
वाटेत झरा उचलाया
खडकाची लागे छाती''

शोकाची दाट अरण्ये असलेल्या दुःखी जीवनातही निखळ आणि नितळ आनंदाचा झुळझुळणारा झरा असतो आणि तो झरा जपायचा असतो. शोकाला खंबीर मनाने सामोरे जायचे, पण आनंदाच्या झऱ्याची अनुभूती घेण्यासाठी मनही तसेच तरल आणि संवेदनशील असले पाहिजे. पण ग्रेस म्हणतात की, तो झरा झेलण्यासाठी खडकाची / दगडाची समर्थ छाती असली पाहिजे. जर झरा मातीचा जमिनीवरून वाहू लागला तर तो मातीत जिरून जाईल. झऱ्याला वाहते, खळाळते जिवंत ठेवायचे असेल तर त्याला खडकावरूनच वाहवे लागेल. एरवी दगडाची छाती / दगडाचे काळीज म्हणजे निर्दयी मन किंवा कठोर मनाच्या माणसाला उद्देशून म्हटले जाते. पण इथे तरल 'झरा उचलाया... खडकाची लागे छाती...' तरलता आणि कठोरता, पारदर्शिता आणि अपारदर्शित्त्व, गतिशीलता आणि स्थितीशीलता यातील विरोधाभास एक आगळेच सत्य किंवा वास्तव सांगून जातो.

'सांध्यपर्वातील वैष्णवी' या कवितासंग्रहातील 'गाई' ही एक अर्थबंबाळ अतार्किक कविता आहे. पूर्वार्धात ती तुटक तुटक अनुभव सांगते तर उत्तरार्धात अधिक दुर्बोध होते. मध्येच दोन ओळीत कवीची शब्दजाणीव व्यक्त होते, ग्रेस सांगतात.

''भाषाच ही निकामी शब्दासही पुरेना
संवेदनाच द्यावी अर्थास काय पुन्हा?''

त्यानंतर ग्रेस एकदम महाभारताच्या काळात जातात आणि म्हणतात,

''असतील लाख कृष्ण कालिंदीच्या तटाला
राधेस जो मिळाला तो एकटाच उरला''

'गाई' या कवितेच्या एवढ्या दोन ओळीतच काव्य भेटते. उर्वरित सर्व कविता म्हणजे देखण्या तादमधुर शब्दांचा अर्थहीन पसारा आहे. या दोन ओळींच्या काव्यात कृष्ण, राधा या प्रतिमा अर्थघन आणि प्रसरणशील झाल्या आहेत. राधेचे लोकविलक्षण निरपेक्ष प्रेम आणि कृष्णाचे अस्तित्व यांचे असे मनोज्ञ वर्णन क्वचितच आढळते. कृष्ण हा पूर्णपुरूषोत्तम अवतार होता. तो कुणाचा होता? तो सर्वांचाच होता... प्रत्येकासाठी तो 'विशेष महत्त्वाचा' होता. प्रत्येकाच्याच हृदयात त्याचे स्वतंत्र स्थान होते. वसुदेव - देवकीचा कृष्ण, नंद - यशोधेचा कृष्ण, सांदिपनींचा कृष्ण, सुदामापेंद्याचा कृष्ण, गोप- गोपींचा कृष्ण, कुब्जेचा कृष्ण, कुंती - विदुराचा कृष्ण, रूक्मिणी - सत्यभामा - सोळा हजार एकशे साठ पत्नींचा कृष्ण, भीष्माचार्यांचा कृष्ण, कर्णाचा कृष्ण, अर्जुनाचा कृष्ण, सुभद्रा - द्रौपदीचा कृष्ण, मथुरेचा - द्वारकेचा - वृंदावनीचा गोकुळीचा कृष्ण, पांडव - कौरवांचा कृष्ण आणि कंस - शिशुपाल आणि कालियाचासुद्धा कृष्ण. कृष्णाच्या अगाध लीला - असंख्य रूपे. कालिंदीच्या थेंबा थेंबात कृष्ण होता... तरीही राधेला वगळता कृष्ण अपूर्णच. म्हणूनच कालिंदीच्या तटाला लाख लाख कृष्ण असतील पण राधेला कृष्णाचे जे रूप मिळाले तोच खरा कृष्ण...

या दोन ओळींच्या काव्यात राधा आणि कृष्ण यांच्यासह कालिंदी नदीची प्रतिमाही भावरम्य आणि अर्थवाही झाली आहे.

ग्रेस यांच्या दुर्बोध आणि आत्मकेंद्री कवितांमध्ये एखादी सुबोध कविता वाचकांना आश्चर्यचकित करते. उदा. 'सांध्यपर्वातील वैष्णवी' या कवितासंग्रहात 'बाग' कविता येते. या कवितेतही अपूर्व अर्थप्रतिपादन नाही पण एका बागेचे / उद्यानाचे चित्र ग्रेस शब्दबद्ध करतात. बागेत वृक्ष, वेली, फुलझाडे, हिरवळ, झोपाळे, पक्षीप्राण्यांच्या कृत्रिम प्रतिकृती, पुतळे आणि विविधरंगी गुलाबाचे ताटवे फुलले आहेत. आकार चढलेल्या फुलवेली गर्द हिरवाईचे सौंदर्य खुलवित आहेत. बागेशेजारच्या रस्त्यावरून एखादे मोठे वाहन गेले की वाऱ्याच्या झोताने या वेली जोराने हलतात. या वेलींसाठी ग्रेस यांनी 'चहाटळ मुली' ही लडिवाळ प्रतिमा उपयोजिली आहे. ढगांचा गडगडाट ऐकून जेव्हा अल्लड किशोरी घाबरून पळतात तशा या फुलवेली वाऱ्याने हलतात. जणु येणारी - जाणारी वाहने या वेलींना भिववित आहेत.

संध्याकाळी बागेत लहान मुलांना फिरायला घेऊन येणारे आजी-आजोबा, आई-बाबा यांच्या वात्सल्याला ग्रेस 'जावळ भरले हात' ही अचूक प्रतिमा योजतात. एकांतात भेटण्यासाठी आलेले प्रेमीयुगुल बागेतील हत्तीच्या प्रतिकृतीच्या आडोशाला बसून चोरट्या प्रेमचेष्टा करतात त्याचे सूचन ग्रेस यांनी 'हत्तीच्या पायाशी पडली चुरगळलेली वेणी' या नेमक्या शब्दात केले आहे. दिवे लागणीच्या कातरवेळी सगळे शहर भराभर 'परतुनि मागे घराकडे अपुल्या' सरकत आहे आणि कवीचा उदास जीव दुःखाचे धागे उसविणारे गीत गात आहे. गावातील कौलारू घरातून वर येणारा धूर दिसतो आहे. अशा या सगळ्या वात्सल्यपूर्ण, प्रेममय, व्याकुळ भावना कवी वर्णन करतो आहे. आणि या सायंकाळी संध्येने आपला साजण म्हणजे



संध्याकाळचा सूर्य आपल्या वक्षी घेतला आहे. या सर्वाला बागेतील गुलाब साक्षी आहेत. बागेतील कारंज्याच्या विविधरंगी तुषारातून मावळतीची किरणे रंगांची उधळण करताहेत. सांजधूळ उडवित परतणाऱ्या गार्यीच्या पावलात घराची ओढ, डोळ्यात सायंकाळची कातरता आणि वासरांबद्दलचे वात्सल्य आहे. हे सगळे 'बाग' या कवितेत ग्रेस यांनी सुबोध सुगम शब्दातून मांडले आहे. ग्रेस इतके सुबोध साधे लिहू शकतात तर मग दुर्बोध कविता लिहिण्याची पोज का घ्यावी? हा प्रश्न मनात येतो. कारण ग्रेस यांच्या बऱ्याच कविता विशेषतः 'राजपुत्र आणि डार्लिंग' ही कविता, 'सांध्यपर्वातील वैष्णवी' आणि 'सांजभयाच्या साजणी' या कवितासंग्रहातील कविता या पोज घेऊन लिहिल्या आहेत असे वाटते. त्यामुळे प्रारंभीची उत्तम आणि अस्सल कविता उत्तरोत्तर कृत्रिम आणि कोरडी होत जाते.

'सांध्यपर्वातील वैष्णवी' कवितासंग्रहात 'कंदील' ही दुर्बोध कविता आहे. कवितेत प्रतिमांची भाऊगर्दी आणि असंबद्ध अर्थबंबाळ दिशाहीन शब्दांची उधळण आहे. धूसर भावभिव्यक्ती आणि आईची अपारंपरिक प्रतिमा यामुळे ही कविता पुन्हा वाचवत नाही. वाचल्यावर ती लक्षातही राहत नाही. पण याच कवितेत चार ओळींचे मौलिक काव्य भेटते. एका नैसर्गिक घटनेच्या वर्णनातून दिव्य जीवनाचा प्रत्यय येतो. ग्रेस लिहितात,

''उजळून निघायासाठी
जळतात जिवाने सगळे
जो वीज खुपसतो पोटी
तो एकच जलधर उजळे''

जीवन अधिकाधिक अनुभवसमृद्ध करण्यासाठी, उच्च मूल्याधिष्ठित जीवनासाठी, आत्मानुभूती घेण्यासाठी प्रत्येक जण आपापल्या मगदुराप्रमाणे, जीवनदृष्टीप्रमाणे प्रयत्न करीत असतो. त्यालाच ग्रेस 'जिवाने जळणे' असे संबोधतात. पण प्रत्येकालाच त्यात यश येईल असे नाही, कारण त्यासाठी आत्मशोधाची, विश्वव्यापक दृष्टिकोनाची आवश्यकता असते. ज्ञानेश्वर तुकारामादी संत आणि विवेकानंद आंबेडकरादी महामानवांनाच ते शक्य झाले. त्यासाठी केवळ 'जिवाने जळून' भागत नाही तर - जो वीज खुपसतो पोटी - या उक्तीप्रमाणे वीज स्वतःच्या पोटात खुपसून घेण्याचे अफाट धैर्य आणि अलौकिक सामर्थ्य असावे लागते, ते सर्वसामान्यांच्यात नसते तर विश्वकल्याणाची आस आणि ध्यास घेणाऱ्या संताच्या आणि द्रष्ट्या महामानवांच्या ठायी असते. जीवनरहस्य जाणून आत्मानुभूती घेण्यासाठी तेजाची, दिव्यत्वाची प्रचिती घेण्यासाठी उरात वीज खुपसून घेण्याचे अग्निदिव्य करावे लागते. प्रसंगी आत्मताप सहन करून, आत्मत्याग करून स्वार्थ आणि 'स्व' विसरून वणव्यातून चालावे लागते. ज्या ढगात वीज तळपते तोच ढग तेवढा उजळून निघतो... त्याचप्रमाणे असामान्य लोकांचेही जीवन उजळते त्यावेळी मनाची अवस्था - 'तुका आकाशाएवढा' - आणि 'उरलो उपकारापुरता' अशी होते... अशी वीज ग्रेस यांनी पोटी खुपसून घेतली होती कां? अशी आत्मानुभूती ग्रेस यांना आली होती का?.... नाही.... ग्रेस यांची समग्र कविता या प्रश्नाचे उत्तर नकारार्थी देते. कारण ग्रेस प्रारंभापासून अंतापर्यंत लौकिक 'स्व'च्या, 'स्वत्वा'च्या शोधात आणि आत्मशोधाच्या आंधळ्या वाटेवरून चालत होते. त्यांची कविता त्यांच्या व्यक्तिगत जीवनवर्तुळाच्या परिघातच फिरत राहिली. ती व्यक्तिगततेकडून समष्टीकडे व्यक्तीकडून वैश्विकतेकडे कधीच गेली नाही. ती नेहमी वैयक्तिक निमित्तांमध्ये, व्यक्तिगत वेदनेमध्ये दुःखप्रीती करीत राहिली, आत्मदुःखाच्या आत्मसमर्थनार्थ विव्हळत, कण्हत तर कधी आकांत करीत राहिली. संत, फकीर, प्रीस्टस, मंदिरे, मशिदी, चर्च, निसर्ग, ऋतुचक्र, कालचक्र, ईश्वर हे सर्व ग्रेस यांच्या कवितेत येत असले तरी ते सर्व त्यांच्या आत्मसुखासाठी, आत्मदुःखासाठी आणि आत्मसमर्थनासाठी येते त्यात मूल्यभाव नाही. कारण त्यांच्या कवितेचे स्वरूप त्यांच्या 'स्वसंवादाचे'च आहे... असो.

अनुक्रमणिका

ग्रेस यांच्या कवितेला वाङ्‌मयीन प्रसिद्धी मिळाली. लोकप्रियताही मिळाली असे असले तरी त्यांच्या कवितेला वाङ्‌मयीन प्रतिष्ठा मिळाली का? ... इथे एक मुद्दा विचारात घ्यावा लागतो, तो म्हणजे प्रसिद्धी आणि प्रतिष्ठा यात मूलभूत फरक आहे. रेगे, मर्ढेकर लोकप्रिय कवी कधीच नव्हते. मर्ढेकरांच्या कवितेची चर्चा तर त्यांच्या मृत्यूनंतरच अधिक झाली. रेगे, मर्ढेकर, मुक्तिबोध आणि प्रारंभी उल्लेखलेले कवी हे विदग्ध वाचकांचे कवी होते. चित्रे, ग्रेस हे सुद्धा विदग्ध वाचकांचे कवी होते. पण ग्रेस यांच्याच कवितेच्या विरोधात खूप प्रतिक्रिया आल्या आणि त्यांची कविता वाचकविन्मुख आणि समीक्षाविन्मुख झाली. रेगे - मर्ढेकरादी कवींच्या कवितेची दखल सर्व थोर, दिग्गज समीक्षकांनी घेतली. वा. ल. कुलकर्णी, गंगाधर गाडगीळ, द. भि. कुळकर्णी, पाध्ये, आचवल, सुधीर रसाळ, व. दि. कुळकर्णी, वसंत पाटणकर, प्रकाश देशपांडे, म. वा. धोंड, नेमाडे, देशपांडे, केशव सद्रे इत्यादी समीक्षकांनी त्यांच्या कवितेची साक्षेपी समीक्षा लिहिली. या कवींच्या कवितेला वाङ्‌मयीन प्रतिष्ठा मिळाली. या पार्श्वभूमीवर ग्रेस यांच्या कवितेच्या बाबतीत एक गोष्ट लक्षात येते की, त्यांच्या कवितेला वाङ्‌मयीन प्रतिष्ठा मिळाली नाही. कारण ग्रेस यांची धूसर, दुर्बोध निर्मिती आणि साहित्यविषयक आत्मकेंद्री भूमिका... आपल्या निर्मितीविषयी ग्रेस लिहितात,

''कधीं पांघरावे मीहि
    माझ्या रक्ताचे प्रपात
गूढ घावांचे किनारे
    मीच तोडावे वेगांत
असा आंधळा आवेग
    मीच टाळावी बंधने
विश्वनिर्मितीच्या रात्री
    मला छेदावे श्रद्धेने''

नवनिर्मितीच्या प्रसववेदना सोसून कलावंत बंधने टाळून, आंधळ्या आवेगाने गूढ घावांचे किनारे तोडून, रक्ताचे प्रपात पांघरून नवनिर्मिती करतो. ज्या एका अंधाऱ्या रात्री विश्वाची निर्मिती होऊन उषःकालाचा अंकुर धुमारला असेल त्याच रात्रीप्रमाणे हा नवनिर्मितीचा क्षण असतो. परंतु इथेच थांबतील तर ते ग्रेस कसले? कारण ग्रेस आत्मकेंद्री आहेत. ते पुढे लिहितात,

''अशा लाघवी   क्षणांना
    माझ्या अहंतेचे टोक
शब्द फुटण्याच्या आधी
    ऊर दुभंगते हाक''

कवितेच्या शेवटी ग्रेस यांनी कवितेला व्यक्तिगत पातळीवर आणले आहे. कारण त्यांची आत्मकेंद्री वृत्ती आणि अहंगड...

स्वतःच्या निर्मितीबाबत एके ठिकाणी ते लिहितात,

''एक हलकासा तरंग घेऊन मीहि
ढवळून काढावा आसमंत...
ही शिखरे मोडावींत...
ही झाडे सारावीत...
    - हा पूल जोडावा...
आणि नसलेल्या सुरूंच्या झाडांना
द्यावी एखाद्या प्राचीन शिल्पाची
पार्श्वभूमि''

जे प्रत्यक्षात नाही ते प्रत्यक्षात आणायचे, जे आहे त्यांची मोडतोड करायची, ते बाजूला सारायचे आणि पुन्हा प्राचीनच शिल्पाची पार्श्वभूमी द्यायची असा द्रविडी प्राणायाम करून कवी नवनिर्मिती कशी करणार? नवे काहीच नाही, जे जुने आहे ते कवीला नको आहे... अशा द्विधा मनःस्थितीत कवी नित्यच असल्यामुळे संदिग्धता, गोंधळलेली अवस्था ग्रेस यांच्या बव्हंशी कवितेतून विखुरलेली आहे.

जे साहित्य केवळ स्वतःसाठी, स्वआविष्कारासाठी. व्यक्तिगत जीवनातील नातेसंबंधांचे घटनाप्रसंगाचे वर्णन करण्यासाठी अवडंबर माजवून लिहिले जाते त्याची दखल समीक्षा घेत नाही. ग्रेस यांच्या कवितेविषयी जयंत परांजपे, अक्षयकुमार काळे आणि मुलमुले यांनी लिहिले आहे पण ते साक्षेपी व अलिप्तपणे लिहिले नसून साहित्यशरणतेने लिहिले आहे. अन्यथा द. भि. कुळकर्णी, त्र्यं. वि. सरदेशमुख आणि थोडासा म. सु. पाटील यांचा अपवाद वगळता अन्य समीक्षकांनी ग्रेस यांच्या कवितेची फारशी दखल घेतली नाही. ग्रेस यांच्या कवितेला वाङ्‌मयीन प्रसिद्धी मिळाली पण वाङ्‌मयीन प्रतिष्ठा मिळाली नाही हे सत्य नाकारता येत नाही.

डॉ. माधवी देसाई
४०४, खण भाग, जुने रेल्वे स्टेशन,
सांगली - ४१६४१६
भ्रमणभाष : ९३२५०६३६०६

अनुक्रमणिका

दृश्य कला आणि ग्रेस यांची कविता : काही विचार

शशिकांत सावंत

■

दृश्यात्मकता हे ग्रेस यांच्या कवितेचं मोठं वैशिष्ट्यं आहे. दृश्यकलेबाबत आपल्याकडे आजही उदासीनता आहे. एखादं चित्रप्रदर्शन आवर्जून पाहणं किंवा त्याची प्रिंट विकत घेणें अशी प्रथा जवळपास नाहीच. मात्र कॅलेंडर आर्टला भरपूर उठाव आहे. दुसऱ्या बाजूने टीव्ही आणि सिनेमा या दोन्हीतून विविध रंग, आकार अशा दृश्य निगडीत प्रतिमांचा मारा होतो.

चित्रकलेत विशिष्ट अवकाशात निर्माण केलेल्या प्रतिमा या चित्र किंवा पेंटींग म्हणून आपल्यासमोर येतात. प्राचीन काळापासून आधी देवदेवतांची चित्रं रंगवणे, मग राजे - रजवाडे, सामान्य माणसं असा चित्रकलेचा प्रवास तेव्हापासून आजपर्यंत झाला आहे. पश्चिमेत आणि पूर्वेकडे म्हणजे आपल्याकडे मिनीएचरच्या ज्या विविध शैली निर्माण झाल्या, त्या साऱ्यातून भगवान कृष्ण ते राजे - राजवाड्यांपर्यंत विविध विषयांवर लघुचित्रं आढळतात. याला समांतर अशी परंपरा दिसून येते, ती म्हणजे आदिवासी कला, यालाच फोक आर्टही म्हणतात. ही कला मधुबनी ते वारली अशा चित्रशैलींची आहे.

विसाव्या शतकात रशियन चित्रकार मेल्विज वासीली कँडीस्की (याचं मूळ रशियन होतं) पाल्कली हा जर्मन चित्रकार यांनी प्रामुख्याने सुरूवातीला अमूर्त आशय चित्रकलेत आणण्याचा प्रयत्न केला. मेल्विजने केवळ भौमितिक आकार वापरले आणि पांढऱ्यावर लाल चौकोन असलेलं रेड स्क्वेअरचं चित्र काढून खळबळ उडवली. कॅडीस्कीने मुक्त अशा आकारात रंग लावत. चित्र निर्माण केली तर पॉल्कलीने बारीक नाजूक रेषा, थोडेसे ओळखीचे आकार आणि कागदाच्या टेक्शरचा वापर जलरंगाच्या प्रवाहीपणाचा वापर करून काव्यमय चित्र निर्माण केली.

याचा परिचय ग्रेस यांना किती होता, हे सांगणं कठीण आहे. पण त्यांच्या गद्यलेखातून पश्चिमेतील अनेक लेखक, चित्रकार, कवींचे उद्‌गार आढळतात. पश्चिमी संवेदनशीलतेशी यांचा संबंध आढळतो. या संवेदनशीलतेतून आपल्याकडे दोन गोष्टी आल्या. एक म्हणजे ॲब्सॉर्डीटी. एकमेकांशी पूर्णतः विसंगत गोष्टी. दुसरं म्हणजे अमूर्तता. याचा अर्थ असा नव्हे की, भारतीय कला व लेखनात अमूर्ततेला स्थान नाही. पण आपल्या कला या प्रामुख्याने नॅरेटीव्ह म्हणजे कथा सांगणाऱ्या आहेत. आपली विविध पुराणे, रामायण, महाभारत, कथासरिता सागरसारखे ग्रंथ, खंडकाव्य, पोवाडे या साऱ्यातून घटनांचं निवेदन करणं याला खूप महत्त्व आहे. सहाजिकच नवचित्रकला, नवकाव्य इथे आल्यावर याचा अर्थ काय असा

अनुक्रमणिका

प्रश्न विचारण्यात आला. नवचित्रकलेने अर्थापासून चित्राला मुक्त केलं. पॉलकली, जॉ मिरो, ॲग्रेस मार्टीन, जॅक्सन पोला किंवा आपल्याकडचे चित्रकार वासुदेव गायतोंडे, प्रभाकर कोलते, लक्ष्मण श्रेष्ठ यांच्या कलेत काहीवेळा ओळखीचे घटक आढळतात. पण या चित्रांचा अर्थ काय हे सांगणं कठीण होतं. ग्रेसच्या कवितेमध्ये ओळखीच्या प्रतिमा आढळतात. त्या प्रतिमा एकमेकांशेजारी ठेवून जे काव्य केलेलं असतं, त्याला लिनीयर अर्थ नसतो. उदाहरणार्थ 'चंद्रमाधवीचे प्रदेश' मधील कविता.

आता 'चंद्रमोजणी' ही कविता घेऊ. आपल्या शृंगार, नभ, चाफा, वाळवंट, तारका या शब्दांचे अर्थ माहीत आहेत. पण त्यांचा आभार घेऊन जेव्हा ग्रेस म्हणतात,

तिचा वाळला मंद शृंगार येथे
नभाच्या निळाईत चाफा फुले;
जशी वाळवंटातही तारकांची,
कुणाला दिसावी जुळी पाऊले...

आता या ओळींमधून किंवा अख्या कवितेतून सरळ ओळीत अर्थ काढता येईल का ? तर ते कठीण आहे. ग्रेसच्या कवितासंग्रहामध्ये मग 'संध्याकाळच्या कविता' अशा किंवा 'चंद्रमाधवीचे प्रदेश' असो अशा अनेक ओळी सापडतात. काहीवेळा साध्या, सरळ, सोप्या ओळी अर्थातच असतात. जसे की,

मोरांना कळते वेळ,
पण कोकीळ असते हळवे;
भर रस्त्यावर झालेली,
मज लाज तुझी ना बघवे

पण मग ग्रेस हा दुर्बोध कवी आहे. त्याच्या कवितेला अर्थ नाही असं मानायचं का, या प्रश्नाचा विचार करताना आपल्याला परंपरागत अर्थ, गद्य, पद्य, काव्यमयता इत्यादी गोष्टींचं जोखड बाजूला ठेवावं लागतं. एखादा कलावंत समजून घेण्यासाठी दोन सोपे मार्ग आहेत, त्यांचा आधार घेता येईल.

१) त्या कलावंताचं बॉडी ऑफ वर्क म्हणजे पहिल्यापासून शेवटपर्यंतच्या बऱ्याचशा कामाचा परिचय करून घेणे.

२) ज्या कलेबद्दल आपण बोलतो आहोत, त्या कलेच्या इतिहासातील काही टप्पे माहीत करून घेणे. अर्थातच हे मेहनतीचे काम आहे. ग्रेस यांचे कवितासंग्रह मिळवणं कठीण नाही. पण एकूण कवितेच्या विविध परंपरा माहीत करून घेणे आणि अभ्यासणे कठीण काम आहे.

पिकासोचं १९०८ चं 'द मॉझल ॲवॉंगन' सारखं एखादंच किंवा ब्राकचं आणि पिकासोचं १९११ सालचं 'क्युबिझम' शैलीचं एखादंच चित्र घेतलं तर ते कळणं कठीण जाईल. पण एकंदरीत पिकासोची अगदी तरूण वयात केलेली चित्रं पाहिली तर ती खूप वास्तवदर्शी आहेत. विविध कालखंड पाहिले. पॅरिसमधील १९०१ ते १९०४ मध्ये केली ती ब्ल्यू पिरीयड, १९०४ ते १९०५ हा रोझ पिरीयड, १९०८ ते १९२० पर्यंत त्यांनी सर्व शैलीत काम केलेलं आहे. वेगवेगळ्या शैलींचा संकर केला आहे. मग जर आपण एकूणच मृत्यूपर्यंत त्याचा कालखंड पाहिला तर व्हिपिंग वुमन, मासे पकडणाऱ्या कोळ्याचं चित्र, गर्निका, विविध स्त्रियांची पोर्ट्रेट्स, एन ग्रेव्हिंग्ज तंत्राने केलेले बैल,चित्रकार आणि प्रेयसी अशी चित्रमालिका. हे सगळं पाहिलं की, पिकासोच्या प्रतिमा सृष्टीशी आपला परिचय होतो. यातील घटक फार बदलत नाहीत. पण तंत्र बदलत राहते. पिकासोसारखा एखादा चित्रकार बरेच प्रयोग करतो तर हेन्री मार्थीससारखा चित्रकार भावलेल्या गोष्टी, वस्तू, मॉडेल रंगवत राहतो. अशा अनेक चित्रकारांचं काम पाहिलं की, कलेची संवेदन वृत्ती प्राप्त होते. ज्यातून आपण ही चित्र समजू शकतो.

ग्रेस यांच्या सुरूवातीपासूनच्या कवितांपासून आतापर्यंत जितक्या कविता वाचू, ती तितकी त्यांची प्रतिमासृष्टी परिचित होत जाते. त्यात परिचित वस्तू, घर, देऊळ, पक्षी, जडाव, कांकणे अशी एक यादी करता येईल. निसर्ग ज्यात तारे. धुकं, अरण्य, समुद्र, वाळवंट, नदी अशी यादी करता येईल. तिसरी यादी म्हणजे भावविश्वाचं केलेलं प्रगटीकरण ते करताना कवितांचा घेतलेला आधार -

फुटून मग ते रक्त ये सरळ काळजाला मिळे
किंवा
डोळ्यात उतरले पाणी,
पाण्यावर डोळे फिरती
किंवा
किती शांतपणे जळत आहेत
माझ्या हातातील मातीचे दिवे

हा झाला कवितेच्या घटकांचा सुटा-सुटा विचार, पण हे घटक एकत्र करताना जे काही घडते त्याला कविता म्हणता येईल का?

विसाव्या शतकातील इंग्रजी - मराठी कवींच्या कामाचा परिचय करून देताना दोन्हीतील काही लोकप्रिय कवी येतात.

अनुक्रमणिका

उदाहरणार्थ, मराठीत केशवसुत, गोविंदाग्रज, बालकवी, विंदा करंदीकर, मंगेश पाडगावकर इत्यादी. मराठीतील मर्ढेकर, पु.शि.रेगे, मुक्तिबोध, नारायण सुर्वे, भालचंद्र नेमाडे, अरूण कोलटकर, दिलीप चित्रे, नितीन कुलकर्णी, वर्जेस सोळंकी, सलील वाघ अशी वेगळ्या वाटेच्या कविता लिहिणाऱ्यांची मोठी यादी करता येईल. अर्थात अशी नावं इथे घेता येणं शक्य नाही. पण विसाव्या शतकातील गद्यापेक्षा पद्य या अमूर्त प्रतिमांचा वापर करणारे आणि प्रयोग करणारे आहेत. अमूर्त गद्यांचा आविष्कार म्हणून 'चरसी' या कादंबरीचा उल्लेख करता येईल.

मन्या ओक आणि नामदेव ढसाळ, ग्रेस यांच्या कवितेत बरंच अंतर आहे. ग्रेस यांचं भावविश्व जितकं आपल्याला गद्यातून परिचित होतं, तितकं आपल्याला क्लासिसिजम म्हणजे अभिजाततेशी घट्ट असलेली नाळ कळत जाते. कवी, निसर्ग, शृंगार, वैराग्य, अस्तित्वाच्या यातना आणि साहित्यातील अभिजात वळणं यातून तयार झालेल्या स्वप्नसृष्टीत उभा आहे. विसावं शतक उजाडलं तरी या कवितेत कॉम्प्युटर येत नाही. शहर डोकावत नाही. कवी ज्या विदर्भात राहतो, तिथल्या बोलीचा स्पर्शही होत नाही. तिचा आशय हा चित्रकलेतील नाईव्ह आर्टप्रमाणे मार्थीससारख्या अभिजात वाद्याप्रमाणे देखण्या सृष्टीचं वर्णन करतो. त्याने तयार केलेली चित्रलिपी प्रतिमांशी जसा परिचय होतो, तशी ती अधिक कळत जाते. एकप्रकारे ही सारी कविता प्रोसेस जाणून घेतल्यावर कला कळणं याचं उदाहरण.

उदाहरणार्थ - शास्त्रीय संगीत शिकणाऱ्याला त्याचा हिशोब शिकवला जातो. ज्यातून शास्त्रीय संगीत तो अधिकप्रकारे समजू शकतो किंवा पश्चिमी संगीत ऐकताना त्यातील जाणकार नोटेशन समोर ठेवून ऐकतात, त्यात वाद्याच्या ताल - सूराचा उंचसखोलपणा लिहिलेला असतो. हे न करताही पश्चिमी संगीत ऐकता येतं.

चित्रकार नितीन कुलकर्णी यांनी चित्रकार प्रतिमांच्या साह्याने चित्रापर्यंत कसा जातो याचा अभ्यास केला. त्यासाठी झाड, पर्वत अशी काही ओळखीची चित्र लोकांना दिली. त्यातून पहिल्यांदा त्याचं चित्रण करणं, त्यांच परस्पर नातं जोडणारं चित्रण करणे आणि त्यानंतर या साऱ्याला एकत्र करून कल्पना शक्तीने चित्र तयार करणे असे तीन पार्ट त्याने चित्रकाराला दिले. त्यातून तयार झालेली तीन स्केचेस वाचकांना पाहता येतील.

प्रभाकर बर्वे यांचं 'अल्फावेरस ऑफ नेचर' हे भारतीय चित्रकला इतिहासातील अजोड असं चित्रण. या चित्रात आपल्याला गोगलगाय, फाटलेलं पान, फळ इत्यादी वस्तू दिसतात. या निसर्गातल्या आहेत हेच साम्य. पण निळ्या - करड्या अवकाशात या वस्तू तरंगत ठेवून त्याचे आपल्या पद्धतीने रेंडरिंग करून चित्रकाराने त्याचं पेंटींगमध्ये रूपांतर केलं आहे. हे करताना -

१. तो प्रातिनिधिक अशा निसर्गातील वस्तू जमवतो.

२. या पेंटींगसाठी स्केच करताना बर्वे यांनी रेखाटनं सुरू केली. त्यांनी सुरूवातीला निवडलेले चित्रघटक आणि आताचे यात खूप फरक आहे. या चित्रांना चित्रकार स्वतःच्या शैलीत रंगवतो. म्हणजे इनॅमल रंग खूप पांढरा रंग मिसळून ते वापरत. त्यामुळे यातील कोणताही आकार गडद झालेला नाही.

३. बर्वे यांनी रेखाटनाची विशिष्ट शैली तयार केली, ज्यात त्यांची रेषा क्रुकेड, नाजूक नसलेली अशी असत. शेडींगऐवजी ते एकमेकांना छेदणाऱ्या रेषा वापरत.

४. बर्वे यांच्या चित्रात पर्सपेक्टीव्हचा अभाव असे.

मिनीएचरप्रमाणे त्यांची चित्रं सपाट वाटतं. या चित्रात वस्तू स्टील लाईफप्रमाणे न दिसता काचेवर शेजारी - शेजारी अनेक कटआऊट ठेवावे तसे दिसते. तरीही केवळ विशिष्ट प्रतिमांची मांडणी आपल्याला पेंटींग म्हणून भावते. याचे कारण नेहमी दिसणाऱ्या वस्तूंना चित्रकार आपली शैली, अनुभव आणि विचार यातून आकार देतो. वस्तू सपाट वाटणे ही त्यांच्या शैलीची मर्यादा होती. ज्यांचा त्यांनी उपयोग करून घेतला.

ग्रेस यांचे व्यक्तिमत्त्व अंतर्मुख कला विचारत रमणारे आणि रामायण, महाभारत, विसाव्या शतकातील श्रेष्ठ साहित्यकृती यात गुंतलेले आहे. रोजच्या जगण्यातील व्हरायटीचा त्यांना ध्यास नाही. चित्रकलेप्रमाणे तंत्राच्या विपुल वापराला कवितेत संधी नसते. नाद आणि विविध ध्वनी याचा वापर कवितेत करता येईल. अनेकदा शब्दांचा केवळ नादासाठी वापर करतात. ज्याचं वर्णन इंग्रजीत वर्ड्स फॉर... साऊंड अलोन असं करता येतं. बिलन थॉमससारख्या विसाव्या शतकातील लिरिक कवीच्या कवितेत ते जसं दिसतं तसं ते ॲलन ग्रिन्सबर्ग या ब्रिटनिक कवीच्या 'हॉल' या कवितेतही दिसते.

बिलन थॉमस यांच्या गाजलेल्या दोन ओळी अशा आहेत.

नॉट गो जेन्टल इन्टू दॅट गोल्डन नाईट रेझ - रेझ.. ... ..

या अशा ओळीचा शब्दाला शब्द असा अनुवाद करत गेल्यास ती नादासाठीच गोड वाटते.

गणगोत परतले तेव्हा चिवचिवली अवघी घरटी
चांदणे तसे झिळमिळले झाडांच्या वृद्ध ललाटी

अशा ओळी केवळ नादामुळे आपल्याला ओढून घेतात. मग आपण त्याच्या आशयाच्या शोधाकडे जातो.

संध्याकाळी माझ्याजवळी सर्व देऊळे जमली
तरंग पसरून रंगदिशेने क्षितीज उतरते खाली

प्रतिमा नाद आणि काव्यविचार या साऱ्यातून एक निळे अमूर्त चित्र उभे करणारी कविता म्हणजे 'निळाई'.

असे रंग आणि ढगांच्या किनारी
निळे ऊन लागे मला साजणी
निळे घाटमाथे निळ्या राऊळांचे
निळाईत माझी भिजे पापणी

निळ्याशार मंदार पाऊलवाटा
धुक्याची निळी भूल लागे कुणा ?
तुला प्रार्थनांचे किती अर्ध्य देऊ
निळ्या अस्तकालीन नारायणा ?

निळेशार तारे जळाची शिराणी
निळ्या चंद्रओवीत संध्या डुले
निळे दुःख चोचीत घेऊन आली
निळ्या पाखरांची निळी पाउले

निळे सूर आणि निळी गीतशाळा
निळाईत आली सखीची सखी
निळ्या चांदण्याने निळ्या चंदनाची
भिजेना परी ही निळी पालखी...

किती खोल आणि किती ओल वक्षी
तुझा सूर्य आणि तुझे चांदणे ?
प्राणातले ऊन प्राणात गेले
या सागराची निळी तोरणे... (चंद्रमाधवीचे प्रदेश)

प्रतिमांच्या केवळ मांडणीने मनात अनेक तरंग उमटतात. खरेतर चित्रकला विद्यार्थ्यांना काहीवेळा असाईनमेंट देतात. तसे कवितेतली ओळ अन् ओळ चित्रित करण्याचा प्रयत्न या कवितेबद्दल करायला हवा.


प्रामुख्याने लेखक, कवी, चित्रकार यांचे अनुभवविश्व हा त्यांच्या लिखाणाचा घटक असतो. पण ग्रेस यांच्या स्वप्नविश्वात बर्फाळ प्रदेश, समुद्र, चर्च असे सारेच परके जग वस्तीला येऊन बसले होते. नरेटिव्ह भारतीय परंपरेशी ओळख सांगणाऱ्या काही कविता लिहिण्याचा प्रयत्न केला. दौलतराव गोळे, आरती प्रभू, मर्लिन मन्रो आणि त्यातही क्वचितच कथन येते. मर्लिन मन्रोच्या पहिल्या परिच्छेदातल्या -

आवर्ताच्या नृत्यूभूमीत भटकणारा एक पक्षी तसे तुझे केस
पक्षी मला आवडतात त्यांच्या रक्तबंबाळ तन्हांमुळे
मैलोगणिक ते उडत जातात, त्यावेळी वरच्यावर अलगद उचलून
धरतात सूर्यप्रकाश; आणि मग सर्वत्र संधीप्रकाशाचा प्रदेश
द रिजन ऑफ ट्वलाईट !


काहीवेळा कथा - कादंबरीला, सिनेमा किंवा नाटकात रूपांतरीत करता येते. अशावेळी तिला वेगळे परिमाण प्राप्त होते. रवींद्रनाथ टागोर यांच्या 'नष्टनीड' या कथेचे रूपांतर चारूलता सिनेमात सत्यजित रे यांनी केले. 'शाळा'पर्यंत सिनेमाचे माध्यम नेहमीच रसिकांना वेगळे काहीतरी देत आले. काही दीर्घकाव्यांचे सिनेमात रूपांतर झाले आहे. अर्थात जसे रामायण, महाभारताचे किंवा बिवोल्फसारख्या ब्रिटीश महाकाव्याचे. सुभाष अवचट आणि शुभा गोखलेसारख्या चित्रकारांनी आणि हृदयनाथ मंगेशकरांसारख्या संगीतकारांनी ग्रेस यांच्या कवितेला वेगळं परिमाण दिलं. 'चंद्रमाधवीचे प्रदेश'मधील अवचटांची चित्रं ज्यात तुटक रेषांचा वापर करून केलेली चित्रं ही ग्रेसला अपेक्षित स्वप्नभूमीचा निर्देश करतात तर निळसर करड्या रंगात रंगवलेली चित्रं. क्रॉस आणि कवीचे पश्चिमी भावविश्व यांच्याशी नाते सांगते.

ग्रेस यांनी परंपरागत ओवीचा जसा वापर केला आहे, तसा तीन शब्दांच्या ओळीचाही. लघुचित्र, ओवीचित्र, ओवी या परंपरेत छोट्या छोट्या आकारातील मांडणीचा मोठ्या आशयासाठी वापर करणे हे बऱ्याचदा घडते.

'घर थकलेले संन्यासी' या कवितेला मंगेशकरांनी दिलेल्या चालीत हळूहळू शब्द नाजूकपणे उच्चारून 'आठवते' हा शब्द किंचित थांबून उद्गारणे अशा सांगीतिक खेळी दिसतात. पण हे सर्व एका परंपरेतून येते, हे लक्षात घ्यावे लागते, ती परंपरा आहे; सुरांनी अवकाश भरून टाकण्याची व चित्रकलेपेक्षाही जुनी. ग्रेस यांच्या अखेरच्या कवितासंग्रहाला शुभा गोखले यांनी दिलेली चित्रं जलरंगाचा वापर करून बहुधा हॅण्डमेड कागदावर केलेली चित्रं आहेत. अशा वेळी रंग



Circular Oneness, enamel on canvas, 41.5" x 47.5", 1994



Existence, enamel on canvas, 47.2" x 55.1", 1986

(चित्रकार प्रभाकर बर्वे यांची दोन चित्रे)

कागदावर अधिक पसरतो आणि विरतो. त्यातून रेषेच्या भोवती विस्कटल्यासारखा एक परिणाम तयार होतो. या शैलीत शुभा गोखले यांनी केलेली न्यूड्स आणि कवीची रेखाटनं ही उत्तरार्धातल्या आशयधीट कवितेच्या अधिक जवळ जातात. शेवटी जिथे दृश्यकलेची परंपरा रूजलेली नाही आणि जिथे अमूर्तता म्हणजे दुर्बोधता असे समीकरण झालेल्या महाराष्ट्रात ग्रेससारखा कवी होऊन गेला. त्याने पद्यच नव्हे तर गद्यातही अमूर्त प्रतिमा मांडणीचा सतत ध्यास घेतला आणि त्याला मोठा वाचक व चाहता वर्ग मिळाला हे नवलच !

ग्रेस यांच्या कवितेतील सलग व एकच विश्वामुळे पुढे - पुढे या कवितेची एक शैलीच तयार झाली. काही ठिकाणी कविता स्वतःचेच अनुकरण करू लागली. नव्या माध्यमक्रांतीच्या गदारोळात आणि नव्या आशयाच्या लोंढ्यात ती जुनी वाटू लागली.

हेन्री मार्थीज म्हणत असे, माझी चित्र म्हणजे कॉन्फीचेअर आर्ट, म्हणजेच आरामखुर्चीत बसून बघायची चित्रं. भोवतालच्या वास्तवाला सतत प्रतिसाद देणं हे पत्रकारितेचं काम आहे, कवितेचं नाही ! पण पिकासोसारख्या चित्रकाराला गर्निकासारख्या दिग्दर्शकाला भोवतालच्या समाजातील बेकारीसारख्या प्रश्नावर बोलणारा जनअरण्य चित्रपट काढावासा वाटला. हे सारं न करता आजच्या काळातही आपल्याला हवं तसं चित्र काढणारा डेव्हीड हॉकनेसारखा चित्रकार आहे जो मार्थीससारखा वस्तूच्या रूपातील सौंदर्याचा शोध घेतो. जे कलेचे एक आणि थोडं महत्त्वाचं काम आहे.

उत्तर आधुनिकतेच्या प्रवाहाबरोबर चित्रकला पार बदलून गेली आणि आज कॅनव्हासवरचे चित्र दुर्मिळ बनले. पण याचे कारण चित्रकलेत तंत्राला प्राधान्य मिळून महत्त्व वाढत गेले. उलट कविता टी. एस. इलियटच्या बंडखोर आणि प्रायोगिक कवितेपासून प्रवास करत आता आंतरराष्ट्रीय स्तरावर बंडखोर व अभिजात अशी दोन्ही रूपं स्वीकारून उभी आहे. एकीकडे प्रायोगिक कविता भरपूर लिहली जात असताना; डेरेक वॉल्कोटपासून मार्क स्ट्रॅन्ड आणि अरबी कवी अदोनेसपर्यंत सौंदर्याचा शोध घेणारी, निसर्ग आणि माणसाच्या मूलभूत प्रेरणांचा शोध घेणारी आणि कवितेत काव्याला महत्त्व देणारी कविता आजही लिहिली जाते. ग्रेस याच मालिकेतील कवी आहेत.

शशिकांत सावंत
शॉप नं. १४, एफ - २ - बिल्डिंग
विजया बँक लेन, सेक्टर १०,
वाशी, नवी मुंबई ४०० ७०३
भ्रमणभाष : ९८२१७८५६१८

अनुक्रमणिका

घात : एक छंदास्वाद

डॉ. शुभांगी पातुरकर

■

घात

मन कशात लागत नाही
अदमास कशाचा घ्यावा
अज्ञात झऱ्यावर रात्री
मज ऐकू येतो पावा

श्वासांचे घेउन बंधन
जे हृदय फुलांचे होई
शिशिरात कसे झाडांचे
मग वैभव निघुनी जाई

सळसळते पिंपळपान
वाऱ्यात भुताची गाणी
भिंतीवर नक्षत्रांचे
आभाळ खचविले कोणी ?

मन बहरगुणांचे लोभी
समईवर पदर कशाला ?
हे गीत तडकले जेथे
तो एकच दगड उशाला

चल जाऊ दूर कुठेही
हातात जरा दे हात
भर रस्त्यामध्ये माझा
होणार कधीतरि घात (चंद्रमाधवीचे प्रदेश पृ. १६०)

अज्ञात भय, गहिरे दुःख आणि व्याकुळ वेदना यांच्या उदास सुरांनी भरलेली ही पाच कडव्यांची कविता. कवी ग्रेस यांची सगळी प्रतिभा वैशिष्ट्ये हिच्यात सामावलेली आहेत असे तिच्या पहिल्या वाचनातच आपल्याला जाणवते. गेयता, लयबध्दता, नादव्यंजकता, लावण्यमय शब्दकळा असे काही त्यांच्या कवितेचे सहजच मनात भरणारे ठळक गुण म्हणता येतील. अर्थाची धुसरता, दुर्बोधता, संदिग्धता ही तिची वैशिष्ट्ये म्हणता येतील. लयबध्दता हे तिचे बलस्थान आहे. तिच्यात अंगभूत अशी लय आहे. सहज वाचतांनाही जाणवावी एवढी ती ठळक आहे. कधी तिची छंदोबध्दता तिला आवर्तनमयतेचा गुण बहाल करुन जाते. तर कधी मुक्तछंद तिला प्रवाही, ओघवतेपण देऊन जातो. मुक्तछंदाची आघातमय, आरोहावरोहात्मक द्रुतविलंबित अशी लय तिला मानवणारी. रुढ छंदः प्रकारांतील पृथ्वी, शिखरिणी, सुमंदारमाला,शार्दूलविक्रीडित यांच्यासारखी रचनेला अवघड

बंधन जर तिच्या प्रतिभेला सहजच मानवत असेल तर मग त्यामानाने रचनेला सुलभ असलेल्या मात्रावृत्ताबाबत बोलायलाच नको. त्यातून ती झोकात प्रकटणारच आणि अक्षरछंद तर त्याहूनही अधिक सैल रचना प्रकार. त्यातूनही ती लीलया प्रकटते. थोडक्यात त्यांची कविता छंदोबध्द असो वा मुक्तछंदीय... ती लयबध्दतेचे लेणे लेवूनच अवतरते असेच म्हणावे लागते.

श्रुतीसुभगता हे त्यांच्या कवितेचे सहज जाणवणारे आणखी एक वैशिष्ट्य. ती नादगुणी आहे. शब्दांची रुणझुणणारी नादमयता तिला लाभलेली आहे. त्यामुळे या श्रुतीसुभगतेचे गारुड आपल्यावर होते. ती शब्दनिवडच अशी करते की आपण या नादव्यंजक शब्दांच्या नादावर्तनातच अडकून राहतो. तिचे शब्दगुंजन, तिच्या लयीची आवर्तनं यांची जादू थोडीशी कमी झाल्यावर मगच आपण हळूहळू अर्थाकडे लक्ष देऊ लागतो. लयीला ओलांडून शब्दांमागील अर्थाकडे येऊ पाहतो. तर तिथेही पुन्हा शब्दभूल,सूर्यज्योती,रक्तगंधांचे दिवे, चंद्रव्याकुळ सावल्या, मेघभोर नेसू, सागरपैंजण, नक्षत्रधारा, हंसगीत अशा नानाविध सौंदर्यखणी शब्दांच्या नव्या मोहजालात मन पुन्हा नव्याने गुरफटायला लागते. इथले शब्द ओळखीचे तर वाटतात पण त्यांची जुळणी काहीशी अनोळखी वाटते. कारण ग्रेस परिचित शब्दांना एकमेकांजवळ आणून त्यातून नवेच सौंदर्ययुक्त सामासिक शब्द तयार करतात. ते भुरळ पाडतात. आणि वर अशा शब्दांची जी कौशल्यपूर्ण गुंफण सामोरी येते त्याने जीव आणखीच खुळावतो. काही तरी छान, लालित्यपूर्ण सौंदर्य समोर उलगडत गेल्यासारखे वाटते. ते नेमके काय आहे ते कळले जरी नाही तरी ते ललितमधुर आहे इतके नक्की जाणवते. खुळावणारे, लोभावणारे, नादावणारे ते शब्दजाल निग्रहाने बाजूला सारावे तेव्हा कुठे मग आपण आशयाकडे जाऊ शकतो. मग कुठे तिच्यातला अर्थ गवसणार; तिचा आशय कळणार. (अर्थात कळला तर !) आणि ते सगळे नाही कळले तरी काही बिघडत नाही. कारण रसिक तिच्या लयीच्या, नादाच्या, लावण्यमय शब्दभ्रमाच्या जाळ्यात असा काही अडकलेला असतो, त्यातच गुंगलेला असतो की अर्थ कळो न कळो... तो त्या कवितेच्या प्रेमात पडलेलाच असतो. तर प्रस्तुत कविताही त्यांच्या अशा डौलदार लयीचा, सुंदर शब्दकळेचा, श्रुतीसुभगतेचा प्रत्यय देणारी कविता आहे. चिरेबंदीपणा आणि रचनासौष्ठव ही वैशिष्ट्ये या कवितेतही आहेतच.

मनातील आशय आणि त्याच्या अभिव्यक्तीसाठी निवडलेला छंद यातील एकरुपता हा त्यांच्या प्रतिभेचा आणखी एक महत्त्वाचा विशेष, बहुतेक थोर कवीमध्ये छंदज्ञान आणि छंदभान उपजत असतेच. पु.शि. रेगे हे त्याचे एक ठळक उदाहरण. ग्रेस यांच्या बाबतीतही हेच म्हणावे लागते. त्यांच्या प्रस्तुत कवितेतही त्यांच्या या वैशिष्ट्याचा प्रत्यय येतो. काव्य हा अंतरीचा उमटलेला सहजस्फूर्त बोल आहे. आणि छंदोलय हे त्याचे अभिन्न अंग आहे. ते बाहेरुन घातलेले वस्त्रप्रावरण नव्हे वा अलंकरण नव्हे. ती आशयाची एकरुप असणारी बाब आहे.

कोणताही छंद कवी उपयोजतो ते अबोधपणे. आता कविता करायची असे म्हणून जशी कविता करता येत नाही तसेच छंदाचे असते. अमूक एका छंदात कविता करायची हे ठरवून होत नसते. कारण तशी छंदनिवड कविप्रतिभेकडून आपोपाप होत असते. ती त्याच्या अबोध मनाने केलेली निवड असते. असा विवक्षित छंद आणि त्याचा आशय जीवशास्त्रीय दृष्टीने एकरुप असतात. त्यांच्यात एकप्रकारची सेंद्रिय एकरुपता एकवटलेली असते. इतकी की तो आशय त्या शिवाय दुसऱ्या कुठल्याच छंदातून इतक्या अनुरुपतेने प्रकटू शकला नसता. एकप्रकारची अपरिहार्यता तिथे दाटलेली असते. इतकेच नव्हे तर त्या आशयाच्या यथोचित प्रकटीकरणात त्या छंदाचा सिंहाचा वाटा असतो असेही म्हणता येते. इथेही नेमके तसेच झालेले आहे.

''घात'' ही कविता सुपरिचित अशा 'उध्दव' या जातित आहे. म्हणजे हे मात्रावृत्त आहे. प्रतिचरणी १४ मात्रांची हिची रचना आहे. हिचे छंदः शास्त्रीय विश्लेषण (-/प/--) असे आहे. याचा अर्थ प्रत्येक चरणाच्या सुरवातीला दोन मात्रा, त्यानंतर एक पद्यावर्तन म्हणजे अष्टमात्रक गण आणि त्यानंतर पुन्हा चार मात्रा अशी हिची छंदःशास्त्रीय बांधणी आहे. या बांधणीच्या चार ओळींनी एक कडवे सिध्द होते आणि अशा पाच कडव्यांच्या आवृत्तीने ही कविता सिध्द झालेली आहे.

ठराविक मात्रावलींच्या पुनरावृत्तीची ही बांधणी म्हणजे लयीचा एक साचा आहे. घाट आहे. तिची चाल, म्हणणी, त्यातील लय कवीला आपल्या स्मरणातून स्फुरली. प्रतिभासामर्थ्याने त्याच्याही नकळत आंतरिक निवड झाली. ती निवड कशी सार्थ ठरली हे बघणे या कवितेचे छंदःशास्त्रीय आस्वादन करणे होय.

ग्रेसच्या कवितेचे पर्यावरण फार धुसर असते. त्यामुळे अर्थाची वाट कायमच धुक्यात हरपलेली असते. मग अर्थनिर्णयाचे काम अवघड होऊन बसते. इथेही तसेच आहे. पण प्रयत्न करायला हरकत नाही. तर एक प्रकारची भयग्रस्तता



त्याला वेढून तर आहे पण तिचे नेमके स्वरुप त्यालाही नक्की समजत नाही. त्याचे मन कशात लागत नाही. काही तरी अशुभ त्याच्या मनात सतत चुकचुकते आहे. त्याची बेचैनी त्याला घेरुन आहे. पण हे निव्वळ भौतिक भय नसावे. कदाचित ही आधिभौतिक व्याकुळताही असेल. कारण तसे नसते तर त्याला अज्ञात झऱ्यावरचा पावा असा ऐकू आला नसता. मर्ढेकरांना नव्हता का अज्ञाताचा वारा सतावत ? काही प्रतिभावंतांना हा शाप मिळत असावा. त्यांना निमूटपणे तो भोगावा लागतो. साधारणतः अशा अर्थाच्या या चारबंदिस्त ओळी. समान मात्रावलीच्या. चार ओळीचे हे एक कडवे. इथे आशय धूसर असला तरी तो प्रवाहित होण्यासाठी आलेल्या छंदाचा घाट मात्र चिरेंबदी आहे. त्यामुळे आशयाला तो बांधून ठेवतो. वाटेल तसा भरकटू देत नाही. अन्यथा आता लाभली तशी गोळीबंद बंदिशीची ऐट कवितेला लाभती ना. तिला आलेले असे ठाशीव - आखीव रुप तिला येते ना !

ग्रेसची कविता ही संवेदनासंघातांची कविता आहे. आशयसूत्र, निवेदन,कथन यापासून ती लांब आहे. संज्ञाप्रवाहातून ती आपली सामग्री गोळा करते. त्यामुळे विशिष्ट आशयसूत्र, मध्यवर्ती कल्पना असे काही ठराविक तिच्याबाबत संभवत नाही. असे असल्यामुळे इथेही पहिल्या कडव्यातील पूर्वसूत्र पुढच्या कडव्यात आलेले नाहीच. मात्र आशय तसाच नसला तरी उदास भाव तोच आहे. व्याकुळता तशीच आहे. आणि दुःखसंवेदनाही तशीच आहे. मनामनात फुललेली नाती मध्येच का कोमेजतात ? चांगली बहरलेली झाडे शिशिरात कशी काय निष्पर्ण होतात ? त्यांचे वैभव कसे काय निघून जाते ? असे प्रश्न त्याला विदिर्ण करुन टाकतात. इथेही पहिल्या कडव्याप्रमाणे हा भाव आणि त्याला मुखरित करणारी शब्दयोजना. आणि त्याला साजेसा उध्दव मात्रावृत्ताचा बंदिस्त घाट. संकुलता मग ती भावनांची असो, संवेदनांची असो वा अर्थाची.. त्याला रुढ छंदांचा बंदिस्त घाट मानवतो. इथेही संवेदनसंकुलता आहे. भाव धुसर असेल पण छंदाचा आकृतीबंध निश्चित असल्याने तो ठराविक लयीतून प्रवाही होतोच. एरवी हे धुके पांगले असते. आता त्यास काही आकार तर या मात्रावलींच्या योगाने मिळू शकला.

सळसळणारा वारा, पिंपळपान,भुते ही तर भयसंवदेना. कवीच्या ती पाचवीलाच पुजलेली. इथेही तिचा आविष्कार आहेच. मात्र ती अद्‌भूताच्या साहचर्याने आली आहे. स्वप्नात स्वप्न असावे तशी ही अवास्तव जाणीव. नेणिवेतील. म्हणूनच नक्षत्रांचे आभाळ खचल्याचे आभास होत आहेत. ते कोणी खचवले ? हा भयव्याकुळ करणारा प्रश्न त्यांना पडलाय. जवळचे सगळे जपायच्या लायकीचे म्हणून जीवापाड जपलेले. नक्षत्रासाखे मौल्यवान आणि सुंदर,देखणे. पण तेच काही तरी रम्य आता गमावल्याचे, कायमचे हरपल्याचे भय. सतत.उगीचच.

सगळे चांगले चालले तर त्याला आयुष्य कशाला म्हणायचे ? इथे विपरितता आहेच. आईची प्रतिमा त्यांच्या कवितेत वारंवार येते. ती गमावल्याचे दुःखही सतत भळभळतच वाहते. इथेही तसेच आहे. मायेचा, वात्सल्याचा. उबेचा एक पदर आजवर जीवापाड जपला होता. त्याला कशी

काय चूड लागली ? कोणी लावली ? का लावली ? आणि कंठातले ते मधुर गीत ? ते गुणगुणतांना जीव तेवढाच रमत होता. ते कसे काय हरवले ? एखादी काच दगडाने तडकावी तसे संचित कसे काय तडकले ? या व्याकुळ करणाऱ्या प्रश्नांना अर्थात उत्तरे नाहीतच.

हे सगळे आहे पण आता या सगळ्यापासून दूर जायचे आहे. कुठे ? कुठेही. तिच्या सोबतीने जायचे आहे. हातात हात घेऊन जायचे आहे. इथवर ठीक आहे. पण मध्येच पुन्हा भावाशय तडकतो. त्याची एकसंघता तडकते. पुन्हा त्यांचे दुःख उफाळून येते. आणि त्यामागची भयभावनाही. हातात हात रोमॅंटिक भावनेने धरायचा नाहीय. तर रस्त्यात कधीतरी घात होणार याची खात्री असल्याने आधारासाठी तो धरुन ठेवायचा आहे.

ग्रेसची कविता समजावून घेतांना फार त्रेधा उडते. खरे तर ती काय सांगते यापेक्षा ती कसे सांगते याकडेच रसिकाचे लक्ष वेधले जाते. आणि हेच त्यांच्या कवितेचे बलस्थान आहे. ते काही असो... अर्थनिर्णय हा तसा सापेक्ष मुद्दा आहे. आशयाची काव्यमयता हा खरा मुद्दा आहे. तर असे हे पाच कडव्यांतून प्रकटलेले शब्दशिल्प. ग्रेस यांची कविता हे एक लावण्यमय शब्दशिल्पच असते. इथे ''घात'' कवितेबाबतही त्याचा प्रत्यय येतो. मुळात कविता ही लयबध्द अक्षररचना असते. त्यामुळे ती सौंदर्ययुक्त असतेच. त्यात ग्रेस सारखा शब्दांचा जादूगार तिला जे लावण्यमय रुप बहाल करतो तेव्हा तर तिचे सौंदर्य असे काही खुलते की काही विचारायलाच नको. श्रुतीरम्य आणि नादव्यंजक अशा खऱ्या अर्थाने काव्यमय शब्दांची सुंदर गुंफण ते ज्या नजाकतीने करतात तशी नजाकत मराठी कवितेत फार विरळा. वास्तविक सगळ्यांच साहित्यिकांकडे कमी जास्त प्रमाणात अक्षरधन असतेच. पण ग्रेस त्यांच्या खजिन्यातून जे अक्षरथेंब निवडतात आणि मग या अक्षरथेंबाची जी अदभूत जुळणी साधतात त्यातून एक लावण्यमय काव्याकृती साकारते. ही अजोड जुळणी हे त्यांचे अनोखे प्रतिभासामर्थ्य. आणि प्रतिभावैशिष्टयही. सौंदर्यपूर्ण शब्दनिवडीतून साधलेली ही जणू देखणी अक्षररांगोळी. म्हणूनच त्यांच्या कवितेचे आशयसूत्र सहजासहजी गवसत नसतांनाही अशी अनोखी जुळणी आपली मोहिनी पसरते आणि रसिक त्यात अलगद् गुरफटतो. आणि म्हणूनच ते जरी मृगजळाचे बांधकाम भासत असले तरी कवितेची रचना मात्र चिरेबंदी दिसते. त्यांच्या या शब्दजोडणीला मराठी कवितेत तोड नाही. गालीब म्हणतो तसा त्यांचाही अंदाजे बया कुछ औरच आहे. इथेही झरा,पावा,फुलांचे हृदय, सळसळते पिंपळपान, नक्षत्रांचे आभाळ, बहरगुण,समई,गती, यासारखे काव्यमय शब्द उध्दव मात्रावृत्ताचे १४ मात्रांचे बंधन लीलया सांभाळत ज्या कौशल्याने गुंफले आहेत ते बघणे मौजेचे आहे.

इथे शब्द तर नादव्यंजक आहेत पण यमक, प्रासातूनही ही नादव्यंजकता अवतरते. 'घात' ही कविता यमकबध्द आहे. तिचे यमक-प्रासानुवर्तित्व आपोआप सांभाळले गेले आहे. जसे घ्यावा पावा; होई-जाई: गाणी-कोणी; कशाला-उशाला;हात-घात इत्यादी ही अंत्ययमके निव्वळ नादसाम्याच्या वा ध्वनिसाम्याच्या अनुरोधाने आलेली नाहीत तर ती त्या आशयाच्या निकडीतून आली आहेत. त्यामुळे आशयाला त्या विवक्षित कडव्यापुरती पूर्णता तर येतेच शिवाय आशयाला एक गोळीबंद रुप मिळून जाते. शिवाय त्यातून नव्या नव्या नादाकृती तयार होतात. नवी अर्थवलये निर्माण होतात. नवे लयबंधही निर्माण होतात. एकूणच कवितेला एक सुघड असा आकृतीबंध लाभतो. इथेही असेच झाले आहे.

ग्रेस यांची कविता संवेदनप्रधान कविता आहे. तिच्यात अलवार, हलत्या-मिटल्या-मिसळल्या-वितळत्या-उमलत्या अशा संवेदना आहेत. ती स्वभाव प्रकृतीने तरल तलम पोताची आहे. जाणिव-नेणीवेच्या प्रदेशात ती आलटून-पालटून संचरते. तिच्यात साहचर्य तत्त्वातून आलेली लयबध्दता आहे, पण त्या मर्ढेकरांप्रमाणे तर्कयुक्तता नाही. नेणीवेतील संज्ञाप्रवाहातून ती अवतरत असल्यामुळे ती आशयदृष्टया संदिग्ध,धूसर आणि दुर्बोध वाटते. तिच्यातील प्रदेश हा अद्भूताचा, स्वप्नांचा,चमत्कृतींचा आणि आभासांचा आहे. म्हणूनच अर्थनिर्णयनासाठी गुंतागुंतीचा आहे. असे असले तरी पु.शि. रेग्यांच्या भाषेतील ती 'केवल कविता' आहे. कथन, निवेदन हे तिच्या असण्याचे हेतूच नाहीत, तर तिचे निव्वळ 'असणे' हेच तिचे प्रयोजन आहे. तेच तिचे कार्य आहे. तेच ती करते आहे. आणि कवीच्या माघारीही ती ते करीत राहील.


''चंद्रमाधवीच्या प्रदेशा'' च्या सुरवातीला ग्रेस यांनी रवींद्रनाथ टागोरांचे एक उधृत दिले आहे... And when my voice is silent in death, my song will speak in your living heart....किती खरे आहे ते !

❙ डॉ. शुभांगी पातुरकर
११/बी २१
शासकीय अधिकारी वसाहत
हाजी अली, मुंबई. ३४
भ्रमणभाष : ९८७०३११५३४

जुलै - ऑगस्ट - सप्टेंबर २०१२

युगवाणी

॥ प्रेम विशेषांक ॥



चित्र : शुभा गोखले

तू नाचत जाशी पोरी
तवं काया हळदी गोरी
वारा उनाड;
उचलील झाड;
ही कोण लाजते नवरी?

तनुवेल बहरली मुक्ता
तंद्रीत स्तनांची सत्ता
वणव्यात रान;
आभाळगान;
स्वप्नांत हरवली शांता

क्षितिजास समजले गाणे
तव देह स्वरांचे लेणे
तळहात मंद;
तळपाय छंद;
जान्हवी घेत की वळणे...

जुलै - ऑगस्ट - सप्टेंबर २०१२

युगवाणी

।। ग्रेस विशेषांक ।।



चित्र : शुभा गोखले

पाऊस कधींचा पडतो
झाडांची हलती पानें
हलकेच जाग मज आली
दुःखाच्या मंद सुरानें.

डोळ्यांत उतरलें पाणी
पाण्यावर डोळे फिरती
रक्ताचा उडला पारा...
या नितळ उतरणीवरती.

पेटून कशी उजळेना
ही शुभ्र फुलांची ज्वाला
ताऱ्यांच्या प्रहारापाशी
पाऊस असा कोसळला.

संदिग्ध घरांच्या ओळी
आकाश ढवळतो वारा
माझ्याच किनाऱ्यावरती
लाटांचा आज पहारा.

ग्रेस

अनुक्रमणिका

हे दुःख अनावर आता परतीच्या मार्गावरती...

डॉ. मनोज तायडे

■

पाऊस कधींचा पडतो
झाडांची हलती पानें
हलकेच जाग मज आली
दुःखाच्या मंद सुरानें

ग्रेसची कविता जाणीव - नेणिवेच्या सीमारेषेवर नेहमीच वावरते. जाणिवेच्या स्तरावर तिला जाग येते आणि नेणिवेच्या प्रदेशात विस्तारत जाते. ही सीमारेषा अत्यंत धुसर असते.

या कवितेतही नेमके हेच घडताना दिसते. पावसाचे पडणे ही भौतिक घटना. पाऊस पडतो आहे, झाडांच्या पानावर पडताना त्याचा आवाज येतोय. साहजिकच पडणाऱ्या पावसामुळे पानेही हलतातच... पण पाऊस 'कधींचा' पडतो आहे... 'धी'वर अनुस्वार आल्याने तो किती काळापासून पडतो यांची जाणीव नाही. कारण निद्रा... पाऊस कोसळत नाही तर 'मंद'पणे 'पडतो'. त्यांच्या मंद सुराने हलकेच 'जाग' येते. येथपर्यंतच्या प्रक्रिया भौतिक आहेत. खिडकीशेजारी झाड असावे, खिडकी उघडी ठेऊन आपण निजावे. गाढ निद्रेत असताना जाग येते... बाहेर पाऊस पडत असल्याचे पानांच्या सळसळण्यावरून आणि पानांवर पडणाऱ्या थेंबाच्या आवाजावरून सहज लक्षात येते. हा अनुभव आपण आयुष्यात केव्हातरी घेतलेला असतो. पाऊस अनुभवणे हा ज्याचा छंद आहे, तो त्याचा असाही आस्वाद घेऊ शकतो. देहचित्त सारे एकाग्र होते. पण देहचित्त एकाग्र झाले की, माणूस 'हलकेच' नेणिवेत शिरतो... पूर्वस्मृती सुखद असल्या तर मनाला कुरवाळतात... आणि दुःखद असल्या तर ? दुःखाच्या त्या मंद सुराचा पारा हळूहळू वर चढायला लागतो. लय हळूहळू तीव्रतेकडे झुकू लागते. गतिमान होते. मानवी जीवनातील दुःखाच्या आदिमतेशी स्पर्श करू पाहते.

डोळ्यांत उतरलें पाणी
पाण्यावर डोळें फिरती
रक्ताचा उडाला पारा...
या नितळ उतरणी वरती.

जन्माची सोबत करणारे हे आदिम दुःख नेणिवेच्या पातळीवर तीव्र झाले की, डोळ्यात आसवांचा महापूर येणे साहजिकच आहे... दुःखाची तीव्रता जेवढी, आसवांचा महापूर तेवढाच वेगवान... त्यामुळे केवळ डोळ्यात पाणी नाही उतरत. तर अश्रूंवरच बुबुळे तरंगताहेत की काय ? असा प्रश्न पडतो. महापुरात सापडलेल्या ओंडक्याप्रमाणे डोळे हेलकावत जातात. दुःखाच्या लाटाच तेवढ्या गतिमानी आहेत.

हे दुःख आले कोठून? हे असे मलाच का छळते ? याचा उगम कोठे ? याचे मूळ कोणते ? हेच प्रश्न बुद्धाला पडले होते. त्याचे उत्तर बुद्धाला सापडले त्या क्षणी सिद्धार्थाचा 'बुद्ध' झाला... ग्रेसला उत्तर सापडत नाही... हे दुःख रक्तातूनच आले

असावे ! युंगचा समूहनेणिवेचा सिद्धांत हेच सांगतो की, आपल्या व्यक्तिमत्त्वात अनंत पिढ्याची नेणीव प्रवाहीत झालेली असते. त्या नेणिवेत दुःखही आलेच. हे आदिम दुःख आपल्या रक्तात केव्हा प्रवाहित झाले कळलेच नाही... साधी जाणीवही झाली नाही. आणि जेव्हाजेव्हा जाणीव झाली, त्याला पकडण्याचा प्रयत्न केला, तेंव्हा तेंव्हा चिमटीतून निसटण्याऱ्या पाऱ्याप्रमाणे ते निसटूनच गेले... त्याचा चेहराच पाहता आला नाही.... उतरणीला लागलेल्या आयुष्याच्या पार्श्वभूमीवर हे निसटणे तर आणखीनच अडचणीचे... या दुःखाला केव्हा पकडताच येणार नाही... कारण जीवनाची घसरण पुढेपुढे आणखी 'नितळ' होणार ! पाऱ्याप्रमाणे सुळकन् सुटणाऱ्या या पाऱ्याला कुठे आणि केव्हा पकडू ?

पेटून कशी उजळेना
ही शुभ्र फुलांची ज्वाला
ताऱ्यांच्या प्रहारापाशी
पाऊस असा कोसळला

हे दुःख जन्मभर तर साथ करतेच आहे... मृत्यूनंतरही छळत राहील काय ? मृत्यूसोबत सगळेच संपते म्हणतात. पण आपल्या बाबतीत हे घडणार नाही. नक्कीच नाही... देह जळून राख होईल. हाडे जळून त्याची 'फुलं' होतील, पण ती 'शुभ्र' असणार नाहीत. हाडे 'शुभ्र' असतात... पण ती जळल्यावर राखेमध्ये उरणारी 'फुलं' मात्र शुभ्र नसतात. दुःखाच्या छाया सरणासोबत पूर्ण जळतच नाहीत... सोने पेटल्यावर उजळते म्हणतात. दुःख पेटूनही उजळत नाही... राखडी रंगाची 'फुलं' मृत्यूनंतरही माणसाला वाकुल्या दाखवतात. तू संपला पण तुझ्यामागचे 'भोग' अजूनही शिल्लक आहेत हेच जणू तो राखडी रंग सांगून जातो. हे दुःख, हे भोग आपल्या वाट्याला आले केव्हा ? आपण काय मागायला गेलो होतो ? तरी हे का आले ? आता आठवले... हे आपले प्राक्तनच होते... हा दुःखाचा पाऊस त्याच क्षणी कोसळला होता, ज्या क्षणी आपल्या माऊलीचे स्त्रीबीज आणि आपल्या जन्मदात्याचे शुक्राणू एकमेकांना भेदून गेले आणि आपण या विश्वाच्या पसाऱ्यात एकदाचे स्थिर झालो... दोन तारे एकमेकांवर कोसळले की, तिसऱ्या ताऱ्याचा जन्म होतो. तो तिसरा तारा जन्म देणाऱ्या दोनही ताऱ्यांचे गुणधर्म स्वीकारतो म्हणतात... माऊलीचे स्त्रीबीज, जन्मदात्याचे शुक्राणू अशा दोन ताऱ्यांच्या मीलनप्रहारापाशीच जर दुःखाचा पाऊस कोसळला तर त्याला आपण कसा थोपवू शकणार ? तो भोगणे हेच आपले भागध्येय... दुसरे काय ? जन्म स्थीर होण्याच्या क्षणीच जर हे दुःख आपल्यामध्ये प्रवाहीत झाले असेल तर मृत्यूनंतरही ते सोबतच राहणार... ह्या दुःखाचे मूळ तर सापडले. पण याचे रंगरूप का दिसून येत नाही... त्याचा चेहरा ओळखीचा वाटतो... पण असा धूसर का आहे ! स्पष्टपणे समोर का येत नाही ? केवळ छळ करतो... संदिग्धताच संदिग्धता.

संदिग्ध घरांच्या ओळी
आकाश ढवळतो वारा
माझ्याच किनाऱ्यावरती
लाटांचा आज पहारा

पहिल्या कडव्यात मंद पडणारा पाऊस आता कोसळतो आहे. वारा उधाणला आहे... ग्रेस नेणिवेतून पुन्हा जाणिवेत शिरतो... उधाणलेल्या वाऱ्याने पावसाच्या धारा हेलकावताहेत... समोरच्या घरांच्या रांगा कधी दिसताहेत कधी अदृश्य होताहेत... पुढचे माझे घर कोणते ? पुढचा मुक्काम कोठे ? सारीच संदिग्धता... त्यातून हे वारे सारा जीवनाकाश ढवळून काढते आहे. आवरू म्हटले तरी आठवणी आवरत नाहीत... दुःखाच्या त्या स्मृती पुन्हापुन्हा मनाच्या किनाऱ्यावर धडका देताहेत... आणि जाणिवेचा किनारा ह्या लाटांचे धडकणे सोसून सावधपणे परतवतोय. किनारा लाटांवर प्रहारा ठेवतोय... दुःखाला एका मर्यादेत ठेऊन जगलेच पाहिजे, जगता आले पाहिजे. ग्रेसची ही कविता पलायनवादी नाही. दुःखापासून दूर पळून जाण्याचा प्रयत्न करीत नाही किंवा चेहरा लपवण्याचा प्रयत्न करीत नाही. ती मानवी जीवनातील आदिम दुःखाला सामोरे जाऊ इच्छिते... पण ते दुःख संदिग्ध आहे, कारण ते एका व्यक्तीचे नाही, ते अखिल मानवजातीचे आहे. प्रत्येकाचे आपापल्या परीने वेगळे असेलही... पण दुःखाला जातकूळ नसते.

ग्रेस उलट या दुःखाचे जातकूळ शोधण्याचा प्रयत्न करतो. 'ताऱ्यांच्या प्रहारापाशी' हे उत्तरही सापडते. पण यात आपला गुन्हा काय ? हा प्रश्नही कवीला पडतो. पण आपला गुन्हा नसेल तरी वाट्याला आलेले प्राक्तन सार्वजनिक करता येत नाही. पूर्वजांनी केलेल्या चुकांचे परिणाम जरी आज आपण भोगत असलो तरी ते आपण आपल्या पर्यंतच ठेवले पाहिजेत... आपल्या अस्थींची 'फुलं' झाली तरी... आणि कदाचित पुनर्जन्म असेल तर पुढील जन्मातही वाट्याला आली तरीही, ती ओठावर येता कामा नये... परतीच्या मार्गावर असणाऱ्याने तर कधी हे दुःख उगाळूच नये... सोशीकपणे पचवले पाहिजे.

हे दुःख अनावर आता परतीच्या मार्गावरती...

▌ डॉ. मनोज तायडे
'बळिवंश' अभियंता कॉलनी,
विद्युतनगर, अमरावती.
भ्रमणभाष : ९३७०१५३२७०, ९४०५३५२५३६

अनुक्रमणिका

ग्रेस यांचा 'आतला आवाज' असणाऱ्या 'संध्याकाळच्या कविता'

डॉ. सतीश बडवे

■

ग्रेस नावाचे एक झंझावती वादळ मराठी कवितेच्या क्षेत्रात आल्यानंतर भिन्न भिन्न स्तरातून त्याचे आकलन करण्याचा प्रयत्न झाला. 'संध्याकाळच्या कविता' हा पॉप्युलरच्या वतीने १९६७ ला प्रकाशित झालेला त्यांच्या पहिला काव्यसंग्रह. राज्य पुरस्कार विजेत्या या काव्यसंग्रहाने ग्रेस नावाचे हे वादळ घोंगावण्यास प्रारंभ झाला. हळूहळू हे वादळ स्थिरावत गेले. ग्रेस ज्याकाळात लिहीत होते, तो काळ मराठी साहित्याच्या क्षेत्रात बदलाची नांदी नोंदवणारा होता. लघुअनियतकालिकांची चळवळ जोर धरीत होती. साहित्यातील ग्रामीण - दलित साहित्यप्रवाह स्थिरावून लागलेले होते. भिन्न स्तरातील लेखक कवी लिहिते झालेले होते. साहित्यविश्वातले एक नवे पर्व प्रारंभित झालेले होते. मात्र तरीही ग्रेसचे लेखन पूर्णपणे वेगळे होते. या प्रतिभावंताची जातकुळी वेगळी होती. ग्रेस एका अर्थाने या पर्यावरणात राहूनही अलिप्तच होते. त्यांचे नाते स्वतःच्या आतल्या आवाजाशी होते. हाच आतला आवाज हे ग्रेस यांच्या 'संध्याकाळच्या कवितां'चे खास वैशिष्ट्य आहे. नाही म्हणायला प्रतिमांच्या भाषेचे वैपुल्य ग्रेस यांच्या कवितेने अंगभर मिरविले आणि समकालीन कवींच्या वैशिष्ट्यांमध्ये ही त्याची कविता उठबस करू लागली. पण स्वतःचे स्वतंत्रपण जपणाऱ्या या कवितेने आपला आतला आवाज. दबू दिला नाही. हा आतला आवाज अनेकांच्या मनात खोलवर रूजला. रूढार्थाने एखाद्या प्रवाहाशी त्यांनी ना नाते जोडले, ना मानसन्मानाची अपेक्षा केली. स्वतःत उगवून आलेल्या प्रामणिक भावनांशी प्रतारणा न करता त्यांची कविता अभिव्यक्त झाली.

संध्याकाळच्या कवितेत अगदी प्रारंभी सॉमरसेट मॉमचे विधान ग्रेस यांनी उद्धृत केले आहे. It is not a tragedy that man become old or die but cease to love... ग्रेस यांची कविता समजून घेताना या विधानाचे मर्म ध्यानात घ्यावे लागते. जगण्यावर निस्सीम प्रेम करणाऱ्या आणि त्या प्रेमाचे आविष्कारण करणाऱ्या कविता त्यांनी लिहिल्या. प्रेमभावनेला अवगुंठित करणाऱ्या आशा - निराशेचे, सुख - दुःखाचे, जगण्यातल्या संवदेना टिपण्याचे, भावनांचे चढउतार नोंदवण्याचे काम ग्रेस यांच्या कवितेने केले आहे. त्यासाठी आतून उमलणारा शब्दांचा उमाळा ही ग्रेस यांच्या लेखनाची खरी ताकद होती. वळचणीच्या धारांना चंद्राची झालर लावण्याची आस त्यांच्या शब्दांना होती. स्वतःचे असणे व्यक्त करताना क्षितिजासारखी गाणी म्हणत आपल्या भावना त्यांनी चितारल्या.

अनुक्रमणिका

'गाय जशी हंबरते
तसेंच व्याकूळ व्हावें
बुडतां बुडतां सांजप्रवाही
अलगद् भरूनी यावे.'

पहिल्याच कवितेतून संध्याकाळच्या व्याकुळलेल्या मनाचे गाईच्या हंबरण्याशी जोडलेले नाते ग्रेस व्यक्त करतात आणि या सांजप्रवाही त्यांचे अलगद भरून येणे, या काव्यसंग्रहाच्या पानापानातून डोकावत राहते. मावळतीच्या उन्हातली राधा, माळावरचे थेंबउणे ऊन, लिंबोणी सावल्या, मावळतीचे सरण, पातळ अंधार, भुरभुरता संधिप्रकाश, डोळ्यांतून परतलेली रंगीत सांज, सांज-रंग पांघरून जन्मलेले निळे गगन, सांजबनातून निघालेला गुरांचा कळप, सांज धनांच्या मिटलेल्या ओळी, संधिप्रकाशाच्या रेषा, उदासीन करणारा संधिप्रकाश, शेवटच्या किरणांची फुले समुद्राच्या दिशाहीन पाण्यात बुडविणारी मावळतीची वेळ, जंगली प्रदेशात उतरणारा शेवटचा संधिप्रकाश, मंदावलेला क्षितिजाचा दीप, उदास दुःखासारखी येणारी सायंकाळ, मावळता संधिप्रकाश, सजल सांध्य देऊळे, सांजलेली निळी जळें, कलंडत्या सूर्याची रंगदर्शने, घराला आलेली सांज - अशी संध्याकाळची अनंत रूपे ग्रेस यांच्या कवितेला बिलगलेली आहेत. सांजेचा हा प्रवाह त्यांच्या कातरवेळच्या मनाची अवस्था व्यक्त करणारा आहे. ग्रेस यांनी घेतलेला कितीतरी क्षणांचा हा कातर अनुभव आहे. सांध्यरंगांचे हे पदर ल्यालेली त्यांची शब्दकळा त्यांच्या अंतर्मनातल्या अनुभवांना एक वेगळे रूप बहाल करते. केवळ संध्याकाळच नाही तर दिवसांचे व रात्रीचे प्रहरही त्यातून दृग्गोचर होतात. या प्रत्येक क्षणाचे जगणे आणि तीव्रतर होत जाणाऱ्या अलवार भावनांचे टिपलेले क्षण ही कविता मूर्त करते. हा अनुभव काळीजस्पर्शी असतो. तो त्यांचीच ओळख करून देतो.

तुटलेली ओळख विणतां
　　प्राणांची फुटते वाणी,
पायांतून माझ्या फिरतो
　　अवकाश निळा अनवाणी

ग्रेस यांच्या या भावना अतिशय तरल आहेत. त्याला दुःखाची एक किनार आहे. खरे तर दुःखाची बाधा झालेला हा कवी हे सारे दुःख मावळतीच्या क्षणांबरोबर जगताना दिसतो. हे दुःख मावळतीच्या सरणावर निजून येते. गायीच्या हंबरण्यातील आर्तता या दुःखाला वेढून राहिलेली दिसते. सांज निळाईतले गायीचे करूण डोळे बघून त्याचे हृदय गहिवरून जाते. प्राक्तन ओढून गायी निजल्यावर तिचे प्राण हंबरतात याची जाणीव त्याला होते. अंधारात चंद्र बुडताना स्मरणाचा उत्सव सुरू होतो. या दुःखावर डोळे पसरून बसलेला तो आणि हृदयामागून गळणारी झाडांची पाने हा तीव्रकोमल अनुभव आपोआपच पाझरू लागतो.

नाहींच कुणी अपुलें रे
प्राणांवर नभ धरणारे
दिक्काल धुक्याच्या वेळी
हृदयाला स्पंदविणारे...

असा वैयक्तिक दुःखाचा सूरही त्यातून बाहेर पडतो. या दुःखाचे गहिरेपण 'संध्याकाळच्या कविता'मधून हलके हलके गडद होत जाते. झरणारी सांद्र करूणा, दुःखाचे अभिजात, स्पर्शमय वर्तुळ, चांदण्यांच्या सरींमधूनही अनुभवता येणारी वेदनांची फुले, क्षितिजाच्या अमूर्त बनात उत्कर्षाने पेटणारे पारिजाताचे वणवे, वैराण एकाकी आकाश, शकले होऊन रस्तोरस्ती पडलेल्या सूरांच्या कारजांच्या निसटत्या स्पर्शाने पैंजणासारखा रूणझुणता वाहणारा दुःखाचा काळोख आणि या साऱ्या दुःखाला स्वतःत मुरवून घेणारा ग्रेस नावाचा माणूस आपल्याला दिसू लागतो. मुग्ध मायाळू देहाचे मरण आपल्याआयुष्यातून उठून गेल्यानंतर 'झाडांच्या अंगव्याकूळ डोहातली वार्ता' त्याला याद देते, दीर्घ प्रतिक्षा करणाऱ्या दुःखी उर्मिलेची आणि तिच्या हंसगीतांची. ही दुःखार्त मनाची उलघाल 'संध्याकाळच्या कविता'मधील एक दीर्घ विराणी बनून जाते.

उध्वस्त फुलांच्या परागांतून यावेत
सोनेरी पावसाचे
अनोळखी संदेश...
जसे जीविताच्या व्यामोहांत समुद्र आणि
त्याचें दीर्घदुःखी पाणी
डोळ्यांच्या पाताळांत चंद्रदुःखाने पसरावें
काजळ; तशी सायंकाळ.

दुःखाचे पापुद्रे उलगडणारी ही संध्याकाळ तशी जीवघेणी कासाविशी व्यक्त करणारी आहे. शून्यपणे बसून मावळत्या संधिप्रकाशात केलेले हे चिंतन दुःखाचे अनुभवविश्व व्यापक करणारे आहे. 'दुःखात अंबरे झुलती' असे म्हणत या आभाळभर दुःखाची पखरण या संपूर्ण कवितेत मांडणारा हा कवी...

माझी एकच इच्छा आहे आतां,
तुझ्या विटलेल्या पदराच्या ओबडधोबड
धाग्यांनी एक चित्र विणावें

अनुक्रमणिका

आणि रंगीत तावदानांच्या काचांना फोडून
येणाऱ्या चिमणीच्या धक्क्याने, गर्द शाईचा
निळा सागर त्यावर कलंडून जावा...

अशी कातर इच्छा व्यक्त करताना दिसतो. दुःखाचे हे पदर ज्या शब्दबंधांतून उलगडले जातात ते शब्दबंधही ग्रेस यांची केवळ खासियतच नाही तर ते त्यांचे बलस्थान आहे. विलक्षण शब्दप्रभुत्त्व, अफाट वाचनाचे संस्कार, भिन्न भाषांचे अध्ययन आणि दीर्घचिंतनाची तरल मांडणी ही त्यांच्या कवितेतून जाणवणारी वैशिष्ट्ये आहेत.

प्रतिमांच्या भाषेत बोलणारी ही कविता काही व्यक्तिमत्त्वांना जिवंतपण बहाल करते. वैदेही, ॲनी फ्रँक, तुकाराम, इन्ग्रिड बर्गमन, गीता रॉय, ख्रिश्चन प्रिस्टस्, उर्मिला या व्यक्तिरेखांचे उल्लेख या कवितेत आढळतात. इंग्रजी संगीताच्या प्रतिमा, ग्रेस यांना 'वैदेहीची पंथविराम गुणगुण' भासते. देहूच्या बाजारात अभंग विकणाऱ्या तुकारामाप्रमाणे संगमरवरात स्वप्न लपवून ठेवण्याचा शाप आपल्याला मिळालेला आहे. असे त्यांना वाटते. मेणबत्तीच्या एकाकी प्रकाशांत तुटलेली ॲनी फ्रँकच्या डायरीतील अक्षरे त्यांना आठवतात. मावळत्या संताला इन्ग्रिड बर्गमन्ने दिलेले आलिंगन आणि तिचे आषाढातील भर्जरी मेघांसारखे असणारे ऐहिक डोळे त्यांच्या नजरेसमोरून सरकत जातात. गीता रॉयच्या आवाजातील आर्तता त्यांना छिन्न करून टाकते. ख्रिस्त व्याकूळ नाद ज्यांच्या शरीराच्या छिद्रांमधून आरपार शिरतात. ते प्रिस्टस् आणि व्याकुळ होऊन महाशून्यता स्थिरावणारी त्यांची नजर ग्रेसना आर्तपणे जाणवताना दिसते. हे सारे व्यक्तिसंदर्भ त्यांच्या कवितेला आशयघन बनवितात. उर्मिला तर ग्रेसने व्यक्त केलेले चिरतरून प्रतीक आहे. तिने देहास दिलेल्या स्पर्श इथे जिवंत होतो. कळीतून फुलणारे सुख आणि आभाळ व्यापणारा वृक्ष तिच्यामुळेच अनुभवता आले तरी आपल्या खडकाळी छायेचे अस्तित्त्वही त्यांना क्षणोक्षणी जाणवत राहते. या उर्मिलेशी असणारी त्यांची सलगी अतिशय नितळ, हलके तरंग भरलेल्या वाऱ्यासारखी आहे. हाताने स्तन गोंदून मंदिरात ती दिवा लावते तेव्हा अंधाराचेही फूल होते. उर्मिलेचे हे रूप अनोखे आणि ग्रेस यांच्या शब्दशक्तीचे निखालस प्रत्यंतर देणारे आहे. तिचे हे ऋणानुबंध शतजन्मांचे आहेत. मृत्यूविषयीचे चिंतन व्यक्त होताना ग्रेस यांच्या कवितेत भेटणारी ही उर्मिला मरणावर प्राक्तनगंधी मोती रेखणारी आहे. ग्रेस यांचे भावविव्हल भावविश्व उर्मिलेच्या रूपातून सामर्थ्याने रेखाटले जाते.

असुन तुझा मी तुझी दूरता... तुला झाकितो काल
सांग उर्मिले, कुणी बांधिले नयनीं चंद्रमहाल ?
रंग उदा की उभा उदासिन महामेळा क्षितिजांत
पायाखाली वाळवंट मग उगवत येत निमिषांत...
लाव मंदिरी दिवा परंतु सोड स्तनांची माया
मरणावांचून आज सजविली मीच आपुली काया...

ग्रेस यांचा उर्मिलेशी चालू असणारा हा संवाद काळजाला स्पर्शून जाणारा आहे. जगण्यातले असे हे कितीतरी क्षण, ती उदासीनता आणि व्याकुळपणाच्या छटा ग्रेस यांच्या लाघवी शब्दकळेतून प्रकट होत जातात.

बर्फाच्या तीन कविता ग्रेस यांनी लिहिलेल्या आहेत. बर्फाचा हा पाऊस त्यांच्या अन्य कवितांमधील निसर्गदर्शनासारखाच आहे. त्यांच्या कवितेतला निसर्ग सजण्यासाठी आलेला नसतो. तो त्यांच्या कायेतून आरपार स्त्रवणारा असतो. कधी हा बर्फाचा पाऊस प्राक्तनाचे रंग बांधतो तर कधी शिशिराची फुले बनतो. ग्रेस यांची कविता एक महायात्राच आहे. अनंतरंगी जगण्याचे पदर तिच्यातून उकलत जातात. बर्फाच्या पावसात ग्रेस स्वतःला शोधतात ते असे -

अंधाराच्या साह्याने मी जातो आहे; स्मरणांतून
उमलणाऱ्या आठवणींसारखा. बर्फाचा पाऊस
पडतो आहे, जसे माझेच दुःख सचित्र झालेले

हा बर्फाचा पाऊस म्हणजे त्यांच्या दृष्टीने नियतीच्या शब्दांतून गळणारी अर्थाची धूळ आहे, हे दुःखाचे प्रगाढ चिंतन आहे. अंधारातून पुढे येणारे वादळ आहे, शिवाय हा पाऊस अनुभवताना 'पर्वताच्या कांठाशी थांबलेली रक्तवर्ण सायंकाळ...' ते उभी करतात. ग्रेस यांनी आविष्कृत केलेली निसर्गरूपे नाना प्रकारची आहेत. जळात भिजलेले उन्हाचे वळण, धुक्यात गढलेल्या भित्र्या आणि अगतिक कौलारांच्या ओळी, जरासा तंग झालेला वारा उसवून तमांत हलके झालेले पैंजण, गूढ घावांचे किनारे, भुरभुरत्या संधिप्रकाशात भिजलेले कार्तिकांतील धुके, पांढऱ्या शुभ्र हत्तींचा रानातला कळप, चाफ्याच्या झाडापाशी अंधारात निनादणारा गांधार, नदीच्या पाण्यावर निजलेले चांदणे, ओल्या धनांतील चंद्र दिव्यांची नक्षी, गार्यींच्या करूण डोळ्यांसारखे वाऱ्याने हलणारे सुनसान रान अशी कितीतरी रूपे ग्रेस यांच्या शब्दकळेतून साकारतात. त्याला दुःखाची, व्याकुळतेची आणि आर्ततेची एक किनार असते. पण त्याचबरोबर शृंगाराची एखादी छटाही त्यात डोकावते.

अनुक्रमणिका

तुला पाहिले मी नदीच्या किनारी
तुझे केस पाठीवरी मोकळे
इथे दाट छायांतुनी रंग गळतात
या वृक्षमाळेतले सावळे

पण असे अनुभव क्वचितच या कवितेतून पुढे येतात तरीही ही निसर्गाची रूपे मनाला स्पर्शून जाणारी, कधी गहिवर आणणारी तर कधी काळीज पोखरणारी ठरतात.

ग्रेस यांची एकूण कविता विव्हल मनाची स्पंदने व्यक्त करणारी आहे. अचंबित करणारी शब्दकळा तिला लाभली आहे. प्रतिमांची भाषा मांडणारी ही शब्दकळा क्वचित धूसर वाटते. आपल्यापासून ती लांब जाते की काय असे वाटत राहते. तिच संवेदनविश्व खरे तर इतरांसारखेच, पण काहीसे गूढ आणि शब्दांच्या मितव्यय करीत व्यक्त होणारे असते. तिची मांडणी गुंगारा देते. ती आकलनाच्या पलीकडची कविता आहे. असे म्हणणारेही सापडतात. पण ग्रेस यांची कविता समजण्यासाठी तिच्यात खोल उतरावे लागते. तिचे सांध्यरंग जाणून घ्यावे लागतात. तिचे हसरे, दुखरे विभ्रम टिपावे लागतात. 'कवी शब्दांचा ईश्वर' असे म्हटले जाते. ग्रेस यांच्याबाबत ते खरेच आहे. ग्रेस यांची निर्मिती अंतःकरणाच्या तळातून वर येणारी आहे. म्हणूनच ती 'आतल्या आवाजा'ची कविता आहे. हा आतला आवाज समजणे साधेसोपे नाही. आतला आवाज सवंगतेपासून फटकून राहतो. मळलेल्या वाटा तो अंगीकारत नाही. वस्तुतः जगण्याचा शोध ही ग्रेस यांची उर्मी होती. हा शोध त्यांनी वेगळ्या पद्धतीने घेतला. चाकोरीतल्या आशयाची त्यांनी कधी फिकिर केली नाही. जन्ममरणातले अंतर या कवितेने शोधले. जन्ममरणाचा हा फेराच त्यांच्या चिंतनाचा विषय झाला. कोळून प्यायलेले दुःख त्यांच्या निर्मितीचा आधार झत्तला. ग्रेस उमजणे तसे अवघडच. पण ग्रेस उमजण्याची धडपड करायला हवी. गूढ घाव त्यांच्या कवितेतून व्यक्त होतात. विश्वनिर्मितीच्या रात्री मला श्रद्धेने छेदावे. याची नोंद ते करतात. जगण्यातल्या लाघवी क्षणांना माझ्या अहंतेचे टोक असल्याने, शब्द फुटण्याच्या अगोदरच उरातली हाक दुभंगून जाते. हेही सहजपणे सांगतात. या साऱ्यांसह ग्रेस यांची कविता उकलावी लागते.

गुंतविता मिठी
गर्द झाले श्वास,
सुजले आकाश
पाठीवरी.
अशा रंगापाशी
मातीचे चांदणे
पल्याडचे जिणे
जन्माआधी

हे तर ग्रेस यांचेच सांगणे आहे. हे सांगणे समजून उमजून घेण्यासाठी खोल खोल उतरण्याची गरज असते. दुःखाचे गाणे गाणाऱ्या या कवीचा आतला आवाज तेव्हाच कळू शकतो.

डॉ. सतीश वडवे
मराठी भाषा व वाङ्मय विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद ४३१ ००४
भ्रमणभाष : ९१५८९९७७९७



युगवाणी
● परीक्षणार्थ पुस्तके पाठविण्याचा पत्ता :
प्रा. अजय देशपांडे, वामनघाट मार्ग, हनुमान नगर, वणी ४४५ ३०४, जि. यवतमाळ.
● परीक्षणासाठी पुस्तकाच्या दोन प्रती पाठवाव्या.
● परीक्षणाकरिता आलेली पुस्तके परत पाठविली जात नाही.

ग्रेसची प्रेमकविता : पापसंकल्पनेकडून सौंदर्य शिल्पाकडे

प्रा. देवानंद सोनटक्के

■

'दिवस. दुपार - स्त्रीदेहाचे चिंतन. रात्र स्त्रीदेहाशी संमीलन. स्त्रीदेहाच्या चिंतनाचा दिवस आणि संमीलनाची रात्र यांच्या अनुभूतीचा संधिकाल म्हणजे संध्याकाळ. संध्याकाळ हे ईश्वरी युनिट...' 'माझ्या आईची प्रतिमा... जशी स्त्री या संकल्पनेची प्रतिनिधी आहे. त्याप्रमाणे ती 'स्त्री'तून निर्माण होणाऱ्या सर्व नात्यांचीही प्रतिनिधी आहे. माझी प्रेमकविता ही संपूर्णपणे असांकेतिक असण्याचे हे कारण आहे. माझी आई माझी प्रेयसी. माझी आई - माझ्या वासनांचे स्मृतिरूप जागरण. माझी आई - स्त्री देहाच्या शक्तीचे अंतिम भयाण केंद्र. माझी आई माझे क्रौर्य माझी आई - माझी करूणा. म्हणून... स्त्रीला विभित्र पातळ्यांवर समजून घेणे हाच मला पुरूषार्थ वाटतो.' - ग्रेस (डॉ. अक्षयकुमार काळे यांना दिलेल्या मुलाखतीतून)

'संध्याकाळच्या कविता' या संग्रहात ग्रेसच्या अनेक प्रेमकविता आहेत. अर्थातच त्या पारंपरिक प्रेमकवितांपेक्षा भिन्न आहेत. हे सांगायला नकोच. त्यांची कविता एकेका विषयाला वाहिलेली नाही, ती विषयांची नव्हे तर जाणिवांची कविता आहे. हा साठोत्तरी मराठी कवितेचा विशेष आहे. आरती प्रभू, चित्रे - कोलटकर यांच्या कवितेत हे आपल्याला प्रामुख्याने दिसते. पण ग्रेसच्या सर्वच कवितांचे ते वैशिष्ट्य आहे.

ग्रेस यांच्या कवितेत एकाच वेळी प्रेम व भय, आसक्ती व द्वेष अशा परस्परविरूद्ध भावनाही दिसून येतात. त्यांची अनुभूती व्यामिश्र, आणि वृत्ती, संवेदना व जाणिवांना प्राधान्य देणारी आहे. त्यामुळे त्यांच्या एकूण कवितांमधून निव्वळ प्रेमकविता म्हणून काही वेगळे काढणे शक्य नाहीच; तर त्यांच्या प्रेम जाणिवेबद्दल बोलावे लागते. मात्र ही प्रेमजाणीव टाळून त्यांच्या कवितेचा विचार करणे शक्य होणार नाही. याचे कारण संध्याकाळच्या कवितांचे ते एक महत्त्वाचे सूत्र आहे.

शिरीष पै यांनी म्हटल्याप्रमाणे, ''संध्याकाळच्या धूसर वातावरणात ग्रेसचे दुःख फिरून फिरून जन्म घेते. संध्याकाळीच ही वेदना पुनःपुन्हा जागी होते. कारण याचवेळी आत्मा एकटा होतो - तो स्वतःतून वाहणाऱ्या प्रवाहाच्या उगमापर्यंत जाऊ शकतो.'' (मलपृष्ठ : संध्याकाळच्या कविता)

पण ग्रेस यांच्यासाठी ही संध्याकाळची वेळ दुःख आणि वेदना यांना जन्म देणारी असली तरी ती आत्मिक प्रवाहाची म्हणून नव्हे, तर स्त्री आसक्तीची वेळ म्हणून महत्त्वाची आहे.

कारण जिला आपण मावळतीची सांज म्हणतो, संस्कृतीच्या दृष्टीने जी गोरज - गायी घराकडे परतताना त्यांच्या पायांची धूळ उडवणारी वेळ आहे. तिला साहित्यातही वेगवेगळ्या नावांनी संबोधले आहे. आरती प्रभू 'दिवेलागणीची' वेळ मानतात. अरविंद गोखल्यांना ती कन्फेशनची आत्मस्वीकृतीची 'कातरवेळ' वाटते. नियतिवादी जीएंच्या दृष्टीने ती 'बाधा' होणारी वेळ आहे... पण ग्रेस मात्र तिला स्त्रीदेहाच्या चिंतनाचा दिवस आणि संमीलनाची रात्र यांच्या अनुभूतीचा संधिकाल मानतात.

म्हणजे स्त्री आसक्ती आणि स्त्रीमीलन यांच्या दरम्यानची अवस्था अनुभवास देणारी ही वेळ. इथे ग्रेस दिवस संध्याकाळ - रात्र = स्त्री देहाची आसक्ती - हुरहूर - मीलन असा आदिबंध मानतात. (त्यांच्या कवितेत असे अनेक आदिबंध आहेत, ते शोधणे हा स्वतंत्र विषय ठरेल) ग्रेसांच्या कवितेत निसर्गाचे ऋतू आणि दिवसाच्या अवस्था आणि मानवी जीवनातील घटना, भावना, संवेदना यांचा आदिबंध दिसतो. म्हणून संध्याकाळची वेळ (ऋतूची अवस्था) स्त्रीची ओढ आणि हुरहूर (शारीर), विफलतेचे दुख (भावना) - असा ऋतू - शरीर - भावना आदिबंध या कवितांमध्ये आहे.

याचा अर्थ दिवसभराच्या आसक्तीनंतर रात्रीच्या मीलनाची ही असोशीच कवीसाठी वेदना व तेच दुःख ! तेच फिरून फिरून कवितेतून प्रकटत राहते. म्हणून कवीला आपण दुःखाचा महाकवी आहे असे वाटते. पण ती प्रकटते तेव्हा वेदनेचे फुलात रूपांतर करते.

ग्रेस यांच्या कवितांच्या केंद्रस्थानी हीच स्त्रीजाणीव, प्रेमजाणीव आहे हे लक्षात घ्यावे लागते. इतर जाणिवा तिच्याशी संवादी, जोडून, साहचर्याने व दुसऱ्या स्थानी आहेत. ग्रेस यांच्या कवितेच्या या केंद्राचा विचार होणे फार गरजेचे आहे. पण त्याचे स्वरूप जाणून घेण्याआधी ग्रेसचे व्यक्तिमत्त्व जाणून घेणे गरजेचे आहे.


कवी ग्रेस : व्यक्तिमत्त्वाची अनन्यता

कवितेचे विश्व आणि कवीचे भावविश्व अशी दोन वर्तुळे कवितेच्या प्रांतात असतात. विशेषतः भावकवींच्या बाबतीत हे घडत असते. ग्रेससारख्या भावकवींच्या कविताविश्वात संवेदना व भावना यांना तर; भावविश्वात त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला महत्त्व असते. व्यक्तिमत्त्व ही गोष्ट खूप गुंतागुंतीची असते. बाह्य आणि आंतरिक असे दोन पदर त्याला असतात. ग्रेस यंचे बाह्य व्यक्तिमत्त्व कलासक्त, कलासंपन्न आहे. म्हणून चित्रपट, चित्रकला, संगीत, शिल्प, नाट्य, नृत्य आदी कला, अध्यात्म, महानुभाव, संतकवी, शाक्तपंथ ते जे कृष्णमूर्ती... असे तत्त्वज्ञान हे सारे या बाह्य व्यक्तिमत्त्वाला व्यापून आहे.

पण ग्रेस यांचे आंतरिक व्यक्तिमत्त्वही तितकेच, किंबहुना याहून जास्त व्यामिश्र आहे. कारण त्यांच्या निर्मितिप्रक्रियेत त्याचा सहभाग अत्यंत मोलाचा आहे. ग्रेसच्या निर्मितीत हे व्यासंगी, कलासक्त, व्यामिश्र असे बाह्य व्यक्तिमत्त्व तर प्रकटतेच, त्यांचे आंतरिक व्यक्तिमत्त्वही प्रकटते. पण ही प्रक्रिया एवढ्यावर थांबत नाही. एक तिसरे व्यक्तिमत्त्वही त्याचवेळी कार्यरत असते, जे त्यांच्या आदिम मनाशी संबंधित असते. ही थेअरी सिग्मंड फ्राईडचा शिष्य कार्ल युंगने मांडली आहे. त्याने मन आणि अंतर्मन यांच्या जोडीला तिसरे मन म्हणजे आदिम मन मानले आहे. त्यालाच समहूमन किंवा Collective Unconsious असे म्हणतात.

मन हे जीवनानुभव आणि शिक्षणाने निर्धारित होते, अंतर्मन त्याच्या मनाने दडपून दाबून टाकलेल्या भावना - विकारांनी युक्त असते. थोडक्यात हे दोन्ही व्यक्तिगत असतात. परंतु आदिम मन हे शेकडो वर्षांच्या समूहाच्या जाणिवांनी बनते. ते व्यक्तिगत नसते. सामूहिक असते. अस्सल कलावंत अशा संपूर्ण व्यक्तिमत्त्वासह कलाकृतीत प्रकटत असतो. साहित्यात, आत्मनिष्ठ वाङ्मय प्रकारात हे घडते. भावकवीच्या बाबतीत हे विशेषत्त्वाने घडते. जे कवी स्वतःच्या निर्मितिप्रकियेपेक्षा वाचकवर्गाची जाणीव गृहीत धरून लिहितात, तेव्हा हे आदिम मन प्रकटत नाही. म्हणून मराठीतील अनेक भावकवींच्या कवितेबाबत हे घडून येत नाही. उदा. गझलकार. ग्रेस हे अव्वल दर्जाचे प्रतिभावंत, अनुभवाशी व निर्मितीशी इतके प्रामाणिक असतात की दुर्बोधतेचा दोष पत्करून ते मनाच्या सर्व अवस्थेसह कवितेत प्रकटतात. वाचकसापेक्षता बाजूला ठेवतात. अनुभवाशी इमान राखतात.

ग्रेसचे व्यक्तिमत्त्व असे तिहेरी असले तरी त्यांचे अंतर्मन आणि आदिम मनच त्यांच्या कवितेत प्राधान्याने प्रकटते. त्यामुळे समूर्त अनुभवापासून कविता सुरू झाली तरी ती अंतर्मनाच्या प्रवाहात वाहत जाते. मात्र या प्रवासात त्यांना लाभलेली दैवी देणगी म्हणजे प्रतिमांकित भाषा त्यांच्या कायम सोबत असते. त्यामुळे कार्यकारणभाव, तर्क, अंदाज यांच्या पलीकडे ती जाते. ती कोणत्याही पूर्वपरंपरेशी नाते सांगत नाही किंवा कुणाचा प्रभाव स्वीकारत नाही. ती स्वयंभू आणि स्वतंत्र आहे.



ग्रेस यांच्या प्रेमकवितेकडे वळण्याआधी या गोष्टी ध्यानात घ्याव्या लागतात.

ग्रेसची प्रेमकविता : परंपरा आणि नवता

ग्रेसची पारंपरिक पद्धतीची प्रेमकविता नाही. तिच्यातील प्रेमभावनेचे, शृंगार आणि कामभावनेचे स्वरूपही पारंपरिक नाही. याचे कारण या कवीचा स्त्रीविषय दृष्टीकोन. ते स्त्रीकडे कोणत्या दृष्टीने पाहतात ? संध्याकाळच्या कवितांमधील उर्मिलेच्या कविता पाहा :

या हातानें स्तन गोंदवून घे लाव मंदिरी दिवा
फुल होउनी अंधाराचे गळुन पडे काजवा...
लाव मंदिरी दिवा परंतु सोड स्तनांची माया
मरणावांचुन आज सजविली मीच अपुली काया...

ग्रेसच्या कवितेत असा स्त्रीरूपाचा वेध दिसतो. आपल्या वेदनांवर प्रेयसीने फुंकर मारावी अशी कवीची अपेक्षा असते. स्त्रीचे शरीर आणि तिचे अवयव यांचेही उल्लेख कवितेत येतात, पण ते स्त्री - भोगाच्या पातळीवरचे नसतात. डॉ. अक्षयकुमार काळे यांच्या मते, ''स्त्रीचा आदिम स्वरूपातील कामभाव, समर्पणशीलता, प्रेमव्याकुळता, कारूण्य आणि पिपासा अशा अनेक वैशिष्ट्यांना ग्रेसची कविता साकार करते. ही स्त्री भारतीय स्त्रीजीवनाचे प्रतीक म्हणून समोर येते'' (ग्रेसविषयी, विजय प्रकाशन, २००९, पृ.१०३) त्यामुळेच ही कविता स्त्रीचे तथाकथित 'बोल्ड' व अनिर्बंध चित्रण करत नाही. पण स्त्रीवादी कवितेसारखी स्त्री-वेदनांही तिच्यात येत नाही. उलट ती भारतीय अभिजातवादी परंपरेशी नाते सांगते. ही प्रेयसी संस्कृत परंपरेप्रमाणे अभिजात आहे.

रोमँटिक प्रेमाची कविता

ग्रेस यांनी मुलाखतीत सांगितलेली आसक्ती आणि मीलन यांच्या मधली अवस्था कुठली असते ? तर ती असते रोमान्सची ! प्रेमानुभवाची - शरीरानुभवाची ओढ : पण प्रत्यक्ष मीलनाचा अभाव. यातून हा रोमँटिसिझम निर्माण होतो. हवेहवेसे वाटणारे पण प्रत्यक्ष न मिळालेले भागधेय कवी शोधत राहतो, ते गवसते रोमँटिक प्रेमकवितेत. म्हणून ग्रेस यांच्या कवितेत प्रेयसीची वर्णन कशी येतात पहा.

तुला पाहिलें मी नदीच्या किनारीं
तुझे केस पाठीवरी मोकळे
इथें दाट छायांतुनी रंग गळतात
या वृक्षमाळेंतले सावळे ...

तुझीं पावले गे धुक्याच्या महालांत
ना वाजली ना कधीं नादलीं
निळागर्द भासे नभाचा किनारा
न माझी मला अन् तुला सावली...

जशी ओल जातां तुझ्या स्पंदनांतून
आकांत माझ्या उरीं केवढा !
तमातूनही मंद ताऱ्याप्रमाणें
दिसे की तुझ्या बिल्वराचा चुडा...

या कवितेतली प्रेयसी प्रत्यक्ष नाही. पाठीवरचे मोकळे केस आणि बिल्वरी चुडा इतकेच काय ते प्रेयसीचे दृष्यरूप. बाकी अमूर्तच म्हणजे हे रूप आहे कवीच्या मनातले. रोमँटिक... म्हणून तर तिचे चित्र धूसर आहे. प्रेयसीच्या आसक्तीपोटी, मीलनाच्या अभावामुळे, संध्याकाळच्या

अवस्थेत दाटून आलेल्या भावना - संवेदनेतून कविप्रतिभेने निर्माण केलेले कवीला भावलेले ते आभासी भावचित्र आहे. प्रेयसी आणि ऋतू व कवीच्या भावना इथे बेमालूम मिसळल्या आहेत. पहिल्या दोन ओळीत कवी प्रेयसीबद्दल तर दुसऱ्या दोन ओळीत निसर्ग व आपल्या भावना यांना प्रकट करीत जातो. त्यातून हे भावचित्र अमूर्त चित्रकलेतील (Abstract Painting) चित्रासारखे रूप धारण करते.

प्रेमाचा अभाव आणि आकांताचे देणे

ग्रेसच्या कवितेत प्रेमाच्या अभावामुळे येणारा आकांत आहे. हा अभाव प्रेयसीचा आणि आईबद्दलचा तर आहेच; पण कधी तो प्रेयसी, आई आणि ईश्वर असाही आहे. म्हणून त्यांची प्रेमकविता मराठीत अनन्य आहे. ग्रेस यांच्या या प्रेमजाणिवेला डॉ. अक्षयकुमार काळे म्हणतात त्याप्रमाणे, आयुष्यातील भयाण पोकळी, एकाकीपणा, मृत्यूचे गूढ आकर्षण, ईश्वराच्या अस्तित्वाचे आभास इत्यादी गोष्टींचे संदर्भ येऊन मिळतात. कधी ईश्वर, प्रेयसी, मृत्यू यांची गुंफण होते; तर कधी जन्म, प्रेयसी, आई यांची. डॉ. काळे यांच्या मते, ''ईश्वरी अस्तित्त्वाच्या स्पर्शाने प्रेमकवितेला कधी स्पर्शाची धार येते तर कधी मृत्यूच्या जाणिवेने तिच्या अंगावर एक काटा फुलतो'' (ग्रेसविषयी, तत्रैव, पृ. १०४)

इतकी व्यामिश्रता ग्रेस यांच्या प्रेमकवितेत आहे.

तू येशील म्हणून मी वाट पाहतों आहे
तीही अशा कातरवेळी,
उदाच्या नादलहरीसारख्या
संधिप्रकाशात..
आणि आई नसलेल्या पोरासारखे हे माझे
शहाणे डोळे हलकेच जोडून देतो
नदीच्या प्रवाहांत...

इथे मृत्यू, ईश्वर, प्रेयसी, आई यांची गुंफण आहे. कधी कधी तर कवीला आपल्या हताश आणि उदास अवस्थेत प्रेयसीचाच आधार वाटतो आणि तो तिच्या प्रेमाची याचना करू लागतो. तिच्याकडून प्रणयाची नव्हे तर जणू ईश्वरी कृपेची अपेक्षा करतो.

जसें माझ्या आयुष्यातून उठून गेलें
कुण्या मुग्ध मायाळू देहाचे मरण...
उर्मिले, माझ्यापुरते आणि ईश्वरासाठी तुझे हंसगीत.
उध्वस्त फुलांच्या परागांतून यावेत
सोनेरी पावसाचे
अनोळखी संदेश...

इथे कवीला आपण आणि ईश्वर यांच्यातला सेतू म्हणजे प्रेयसी वाटते. उध्वस्त फुलांच्या परागातून तिचे हंसगीत सोनेरी पावसाचे संदेश घेऊन यावेत अशी कवीची (रोमँटिक) अपेक्षा आहे.

कधी कधी कवी-प्रेयसीचे मीलन होतेही. पण तो 'साक्षात प्रेमानुभव' कवी देत नाही. तर कधी तरी अनुभवलेला, कवीच्या स्मरणातला प्रेमानुभव संध्याकाळच्या प्रहरी अंतर्मनातून वर येतो, तो ते सांगतात. पण तिथेही अतृप्तीच प्रकटताना दिसते. पाहा.

देहास आठवे स्पर्श
तू दिला कोणत्या प्रहरी ?
की धुके दाटले होते
या दग्ध पुरातन शहरी...

अशी प्रेमाची संदिग्धताच कवीच्या मनात आहे. ग्रेसचे प्रेमगीत कवी नारायण सुर्व्यांसारखे तृप्तीचे नाही.

कामभावना आणि पाप संकल्पना

दिलीप चित्रे किंवा अरूण कोलटकर यांच्याप्रमाणेच ग्रेसची कविता देखील अस्तित्ववादी चिंतन मांडते. पण हे दोन कवी 'प्रत्यक्ष' प्रेमानुभवाला, मीलनाला, संभोगाला कवितेत चितारतात, तसे ग्रेस करत नाही. ते 'रोमँटिक' प्रेमानुभावाला चितारतात. कोलटकरी कविता कामवासनेचा वेध घेते. ग्रेसची कविता त्यातल्या रोमान्सचा वेध घेते.

चित्रे - कोलटकरांच्या कवितेत प्रेमभावना - कामभावना आणि कामपूर्तीचा अनुभव येतो. ग्रेसच्या कवितेत कामगंड - सेक्स कॉम्प्लेक्सचा अनुभव येतो. कारण ग्रेसची कविता भारतीय परंपरेशी नाते सांगते. त्यामुळे भारतीय परंपरेतील पापभावना ग्रेस यांच्या कवितेत दिसते, ती चित्रे - कोलटकरांच्या कवितेत दिसत नाही. भारतीय परंपरेत कामपूर्तीवर धर्म आणि नीतीचे नियंत्रण आहे. या परंपरेत वैवाहिक कामपूर्ती नैतिक आणि अवैवाहिक कामपूर्ती अनैतिक मानली गेली आहे. चित्रे - कोलटकर ही परंपरेची बंधने धुडकावून प्रेमानुभवाला कामानुभव व अस्तित्वाचा एक अनुभव म्हणून पाहतात. कोलटकर तर त्यापलीकडे जाऊन प्रेमानुभवापेक्षा मानवी जन्मासाठीची एक अपरिहार्य प्रक्रिया म्हणून कामवासनेकडे पाहतात. तर ग्रेस यांना शरीरनिष्ठ कामवासना हा मानवाला मिळालेला शाप वाटतो. मानवी

देहांत वासना कुणी व अशासाठी पेरल्या असा प्रश्न त्यांना पडतो. पाहा.

शुभ्र अस्थींच्या धुक्यात
खोल दिठीतली वेणा;
निळ्या आकाश - रेषेत
जळे भगवी वासना
किंवा
शरीर विणलें कुणी अतुट फाटली वासना
तुझ्यांत भिनल्यावरी फिरून चंद्र अर्धा उरे

अरूण कोलटकर कामभावना बेधडक लिहितात. प्रत्यक्ष समागमाचे चित्रणही ते रेखाटतात. कामपूर्तीची अवस्था अत्यंत कलात्मक भाषेत कोलटकर कसे चितारतात ते पहा.

टचकन उमलते बेवारशी तृप्ती
पाण्यात झुगारलेल्या सिगारेटसारखी
पिकतात खपतात जन्मांध वांगी
तृष्णाकाठी. स्पर्शजन्य कमळे
एकामागून एक तोडत निळीफोल घोडी जाते.
नसानसात चिवचिवणारी व्हीनस नासून जाते.

इथे प्रत्यक्ष संभोगाचे कलात्म चित्रण आहे. या अनुभवाकडे कोलटकर अ-सांस्कृतिक व केवळ अस्तित्ववादी भूमिकेतून पाहतात.

ग्रेस कामानुभव एकतर रेखाटत नाही रेखाटला तर स्पर्शानुभवापलीकडे तो जात नाही. गेला तर त्यांची पापसंकल्पना मध्येच जागी होते.

या दुखाःचा कलश सावरे तुझ्या कटीची आण
की हाताने हळू स्पर्शवि मीच माझे प्राण
उभ्या घनांच्या शिखरांमध्ये तुटे जशी चांदणी
मळवट - भरल्या केसांवरचे फूल तसे साजणी...
संध्याकाळी मुका उभा मी मला सतीचा शाप
कुठें पाहतो ? अस्थींवरती सरसर चढती साप

इथे पहिल्या दोन ओळीत स्पर्शानुभव, दुसऱ्या दोन ओळीत कामानुभव आणि तिसऱ्या दोन मध्ये पापभावना स्पष्ट दिसते. आता आणखी काही ओळी पाहा.

इथलीच कमळन,
इथलीच टिंबे
पाण्यामध्ये -
फुटली बिंबे

इथलेच उःशाप
इथलेच शाप
माझ्यापाशी -
वितले पाप.

इथे प्रणय सूचकपणे कवी व्यक्त करतो. तरीही त्याच्या मनात अपराधी भाव जागा होतो. कारण कवीच्या अंतर्मनात खोल दडून असलेली पापसंकल्पना होय.

पापसंकल्पनेकडून कामगंडाकडे

भारतीय सांस्कृतिक धारणांना, त्यातील मूल्ये प्रमाणके, प्रतीके, मिथके यांना ग्रेसची कविता मान्यता देते आणि आपल्या कवितेतून हे सांस्कृतिक संचित मांडत जाते. ग्रेसचे समकालीन सुर्वे, चित्रे, कोलटकर जसे या सांस्कृतिक संचितांची चिकित्सा करतात तसे ग्रेस करत नाहीत. त्यामुळे त्यांच्या कवितेतील पापसंकल्पना पुढे जाऊन कामगंडाचे रूप धारण करते. त्यामुळे प्रणय रोमॅन्टिक राहतो व मीलनानुभव स्पर्शाच्या पातळीपर्यंतच पोचतो. त्यापुढे कवीचे मन अपराधी होते आणि पापाच्या दडपणातून हा गंड अधिक जागा होतो.

बहरांत दुःख अनवाणी
की पैलथडीची रात ?
माझाच स्पर्श सर्पाचा
अमृतमय माझे हात...


'पैलथडीची रात्र' असूनही आपल्या प्रणयाला काय नाव द्यावे ? तो अमृतमयी (पुण्यरूप) की सर्पमय (पापरूप) या द्वंद्वात कवी अडकतो. त्यामुळे कवीला फुलांची शय्याही जळणारे रान वाटू लागते.

सांज - घनाच्या मिटल्या ओळी
मिटले माझे नयन निळे
शिरीष फुलांच्या शय्येवरती
क्षितिजावरचे रान जळे

पारंपरिक प्रेमकवितेत निसर्ग प्रणयानुकुल असतो. इथे फुलांचे रान 'जळत' आहे. हे असे का होत असावे ?

कामगंडाकडून मातृगंडाकडे

ग्रेस प्रेयसीकडे स्त्री म्हणून तर पाहतातच पण तिच्यातच ते मातृरूप शोधतात. त्यामुळे आई आणि प्रेयसी वेगळी राहात नाही. हे मदर फिक्सेशन आहे. या अवस्थेला मानसशास्त्रात इडीपस कॉम्प्लेक्स असे म्हणतात. हॅम्लेट आपल्या मातृगमनी



काकांना का मारू शकत नाही. का? तर त्याला काकात आपलेच एक रूप दिसते. ज्या रूपाला मातेची सुप्त लालसा आहे. अंतर्मनाच्या - आदिममनाच्या पातळीवर.

इथे कवी प्रेयसीशी का रत होत नाही ? तर त्यालाही तिच्यात मातृरूप दिसते. त्यामुळेच त्यांच्या कवितेत पापभावना आणि कामगंड दिसतो.

माडांच्या परिघांत मी विझवल्या स्वप्नार्त चंद्रावळी
डोळ्यांची बुबुळें तुझीं उलटता झाली धरित्री निळी...
तृष्णेच्या पहिल्या फुलास गिळतो माकंद ओठांतला
कर्णाच्या घनतेंत की वितळतो संभोग कुंतीतला ?

प्रणयप्रसंगी कवीला कुंतीच्या अनैतिक समागमाचे आणि त्यातून जन्मास आलेल्या, पुढे कायम उपेक्षित राहिलेल्या कर्णाचे स्मरण होते. इथे केवळ कामगंड नाही, त्याच्या जोडीला मातृगंडही आहे. कर्ण-कुंतीच्या नात्याशी आपले मातेचे नाते कवी जोडून पाहतो. या मातृगंडातूनच ग्रेसची दुर्बोधताही जन्मास येते.

याबद्दल डॉ. जयंत परांपजे यांनी विवेचन केले आहे. ''आईविषयी वाटणारे आकर्षण, तिचा द्वेष, लैंगिक जाणिवा व्यक्त करणाऱ्या प्रतिमांशी असलेला संपर्क, पित्याविषयीची शत्रुत्वभावना हे घटक मातृविषयक गंडाकडे आंगुलीनिर्देश करतात व यातूनच दुर्बोधता निर्माण होते. या गंडाचा कवीच्या भावजीवनाशी व नीतिविषयक कल्पनांशी इतका जवळचा संबंध आहे की कवी स्वतःच्या नकळत आपल्या हेतूंना स्वप्नसदृश्य दुर्बोधतेच्या धुक्यात वितळून टाकतो'' (डॉ. जयंत परांजपे, ग्रेस आणि दुर्बोधता, ग्रेसविषयी, डॉ. अक्षयकुमार काळे यांच्या ग्रंथातून उद्धृत, पृ. ११९)

तू आठवणीतुन माझ्या
कधि रंगित वाट पसरशी,
अंधार - व्रताची समई
कधी असते माझ्यापाशी...

तूं मला कुशीला घ्यावें
अंधार हळू ढवळावा...
संन्यस्त सुखाच्या कांठी
वळिवाचा पाऊस यावा

अशी अपेक्षा त्यामुळे अपेक्षाच राहते, कवीची प्रेमाची असोशीही तशीच राहते आणि वेदना आकांत वाढतच जातो.

पुरूषत्वातून स्त्रीत्वाचा शोध

'स्त्रीला विभिन्न पातळ्यांवर समजून घेणे हाच मला पुरूषार्थ वाटतो'. असे ग्रेस यांनी म्हटलेच आहे. त्यामुळे स्त्रीच्या सर्व रूपाचा शोध तर ते घेतातच, शिवाय सर्व अंगांनी ते शोध घेतात, अगदी शरीरावयवापासून ते तिच्या मेंदी-बिंदीपर्यंत ! हा शोध इथेच थांबत नाही. आई आणि प्रेयसी यांच्याबद्दलची तीव्र असोशी त्यांना स्त्रीरूपाचा शोध स्वतःमध्येच घ्यायला लावते.

मानसशास्त्राच्या मते, मानसिक पातळीवर प्रत्येकच पुरूषात एक स्त्रीत्वाचा पैलू (ॲनिमा) असतो. आणि स्त्रीत पुरूषात्वाचा पैलू (ॲनिमस) असतो.

(जैविक पातळीवर इस्ट्रोजेन आणि इंड्रोजेन संप्रेरके

आहेतच; आपल्या भारतीय मिथक कल्पनेत अर्धनारी नटेश्वर ही संकल्पना आहेच) हा व्यक्तिमत्त्वाचा भाग असल्याने समग्र व्यक्तिमत्त्व कलेत जेव्हा प्रकटते, त्यावेळी हा पैलूही कलेत प्रकटतो. संतांच्या विराण्यातही आपल्याला हे दिसते. ज्यात, पुरूष भक्त स्त्रीरूप घेऊन परमेश्वराला प्रियकर मानतो. कवी ग्रेस यांच्या कवितेतही स्वतःच्या स्त्रीत्वाचा शोध दिसतो. त्याचे विश्लेषण डॉ. प्रमोद मुनघाटे यांनी केले आहे. (संध्याकाळच्या कविता : एक आकलन, दै. सामना, नागपूर, १२ डिसेंबर १९९९) ग्रेस यांच्या प्रेमकवितेचा हा अनन्यसाधारण विशेष आहे.

'वळत वळत पावलांत
वाट गुंतली पिशी'
किंवा
'माझ्या वक्षी
निजती पक्षी
अतुल सुखाची ही धारा
देह अनावर
निज मातीवर
हिम वर्षावत ये वारा...'

या तिन्ही कडव्यात स्त्रीचे मनोगत आहे. पुरूष कवींच्या कवितांत स्त्रीचे मनोगत येते, पण तेथे असा आपल्यातील स्त्रीचा शोध नसतो, तर ते नाट्यकाव्य असते. कवी, स्त्री पात्राच्या मुखातून बोलतो. इथे तशी बाह्य पात्रे नाहीत. ती कवीच्या अंतर्मनाच्या रंगमंचावरीलच आहेत. या कडव्यात अनुक्रमे स्त्रीचा सखीसंवाद आणि आत्मसंवाद आहे. तो कवीनेच साधला आहे. कारण ते नाट्यगीत नाही. नाट्यगीतासाठी कवी आणि पात्र यांत द्वैत असावे लागते. कवीची वृत्ती बहिर्मुख असावी लागते आणि अनुभव बाह्य असावा लागतो. या कवितांत विषयाचे अद्वैत आहे, कवी अंतर्मुख आणि अनुभव आंतरिक आहे.

उगीचच वाटत असते तुलाही आणि मलाहि,
पाय ठेवूं तेवढी भूमि घसरून पडेल...
तरीहि वाट हात जोडून उभी असते.
हवी असते वाऱ्यालाही इतक्यात अंगाई
म्हणून मांडतो मीहि, कमळांच्या पानांवर
टिंबांचा खेळ...
तुला निजविण्यासाठी सांगितलेली एक कथा.

इथे पहिल्या दोन ओळीत, तिच्या आणि त्याच्या पाय घरून पडण्याची पापभावना जागी होते. पुढच्याच दोन ओळीत हे द्वैत बाजूला पडते आणि कवी भोवतालच्या निसर्गाशी एकरूप होतो. त्याचवेळी हे भोवतालचे विश्व आपल्याकडे मातृप्रेमाची याचना करत आहे अशी जाणीव कवीला होते. त्याला आपले पोरकेपण आठवते. आपल्याप्रमाणेच वाऱ्यालाही मातृप्रमाची गरज आहे असे जाणवते. पण कवीची आणि विश्वाची माता आहेच कुठे ? पण मग कवीलाच मातृप्रेमाचा पान्हा फुटतो आणि तोच अंगाई - कथा सांगू लागतो. तोच विश्वाची माता होतो. कवीचे हे रूप खूप महत्त्वाचे आहे. ॲनिमाचा तो उत्तुंग आणि उदात्त आविष्कार आहे.

अभावग्रस्त आणि पोरक्या कवीचे माता आणि विश्वमाता यांत रूपांतर होणे, ही निर्मितिप्रक्रियेतील अत्यंत विलोभनीय आणि प्रातिभ घटना आहे. इथे कवी संतपदाजवळ जातो. विश्वाचे आर्त समजून घेतो आणि स्वतःच विश्वासाठी अंगाईगीत गाऊ लागतो. दुभंगलेल्या मानसिक अवस्थेतूनही किती सौंदर्यपूर्ण रचना होऊ शकते त्याचे हे उत्तम उदाहरण आहे.

मनोविकृतीकडे जाण्याची शक्यता असलेल्या अनुभवाला ग्रेसच्या अव्वल आणि अस्सल प्रतिभेने दिलेले हे सौंदर्यशिल्प आहे. खरेच प्रेमकवितेचे हे विलोभनीय स्वप्न ग्रेस यांनी दुर्बोधतेच्या संगमरवरातच लपवून ठेवले आहे; ते आपण आपल्या सौंदर्यदृष्टीनेच शोधायाचे आहे.

(टीप सदर लेखातील सर्व काव्यओळी 'संध्याकाळच्या कविता' काव्यसंग्रहातील आहेत.)

। प्रा. देवानंद सोनटक्के
द्वारा : श्री. आर. एन. कांबळे
०९, शाहू नगर,
मोहसीन विद्यालयाजवळ, इस्बावी,
पंढरपूर - ४१३ ३०४, जि. सोलापूर
भ्रमणभाष : ९८६०२६३१६३
anandsonu23@gmail.com

'चुडा' : वाचन आणि गायन

स्मिता नितीन लाळे

■

तुला पाहिले मी नदीच्या किनारी
तुझे केस पाठीवरी मोकळे
इथे दाट छायातुनी रंग गळतात
या वृक्षमाळेतले सावळे

तुझी पावले गे धुक्याच्या महालांत
ना कधी वाजली ना कधी नादलीं
निळा गर्द भासे नभाचा किनारा
न माझी मला अन् तुला सावली

मनावेगळी लाट व्यापे मनाला
जसा डोंगरी चंद्र हा मावळे
पुढे का उभी तू तुझे दुःख झरते
जसे संचिताचे ऋतू कोवळे

अशी ओल जाता तुझ्या स्पंदनातून
आकांत माझ्या उरी केवढा !
तमातूनही मंद ताऱ्याप्रमाणे
दिसे की तुझ्या बिलवरांचा चुडा

हे गाणं आपण एकेतो. मुखडा ऐकतो. त्या प्रणयगीतांचे, शृंगारिक स्वर. कोणी एक तरूणी मोकळे केस पाठीवर घेऊन नदीकाठी उभी. तो एक तरूण सांगतोय, ''तुला पाहिले मी नदीच्या किनारी...'' आता पुढे काय सांगणार ? प्रणयगीत, म्हणजे शृंगारिक वर्णन ? हो, हो - गाण्यातलं म्युझिक पीसेस तर तेच स्वर आळवतात. सुरेश वाडकरांचा कोवळा आवाज आणि श्रीधर फडके यांचं हळुवार संगीत आपल्याला पत्ताच लागू देत नाही, आपण आपल्याच नादात असतो. आणि अचानक - गाण्याच्या शेवटी, लक्ष देऊन ऐकताना आपण एकदम दचकतो. धुंदीतून जागे होतो. 'आकांत माझ्या उरी केवढा' अरे ! हे काय ? हा आकांत का करतोय ? नाही - नाही. हा कवी काहीतरी वेगळेच सांगतोय. हे तर प्रणयगीत नाही की शृंगारिक गीतही नाही.

मूळ कविता शोधालयाच हवी ग्रेसची. शब्द शोधायलाच हवे. त्यातलं काव्य शोधायलाच हवं. ती नक्कीच काहीतरी वेगळंच सांगत असणार. कवितासंग्रह धुंडाळले - सापडली कविता - 'चुडा' - 'संध्याकाळच्या कविता' मध्ये (पृष्ठ ३३). एक वेगळंच कडवं कुशीत घेऊन. अंतर्मनात वेगळेच भाव घेऊन.

धराया विनाशास संदर्भ माझे
जशा संगीताने दिशा पेटल्या

तुझ्या सांद्र देहात तुजला
नदीच्या कळा कोणत्या भेटल्या.

विनाश, कळा, दिशा पेटल्या हे शब्द तर दुःखदर्शक, म्हणजे सुरवातीला केस 'पाठीवरी' मोकळे ठेऊन आलेली ती तरूणी ह्या सगळ्या विनाशाला कारणीभूत आहे वाटतं? काय कारण? कुठला संदर्भ ह्या विनाशाचा? त्याला आता संगीतही नको वाटतंय. काही महिन्यांपूर्वी तर धुंद संगीत भरून राहिल्यासारखं वाटायचं, पण आता संगीताचा एक एक स्वर - एक एक आठवण ज्वाळा बनून आली आहे त्या ज्वाळांनी मी भाजून निघतोय खरा, पण तुझ्या देहात मात्र प्रेमाचा ओलावा. त्या शिवाय का तू इथे नदीवर आलीस? आपल्या प्रेमाला साक्षी असलेल्या नदीलाही त्या कळा अनावर होतात - आणि लाटा बनून येतात तुला भेटायला, तुझे सांत्वन करायला. त्या कोणत्या कळा? मलाही भेटतील? माझेही सांत्वन करतील?

अशी ही प्रेमाची ओल तुझ्या स्पंदनातून नदीच्या सांत्वनामुळे निघून जातेय, दिसतंय मला. पण हेच सत्य आहे. तुझ्या बिलवरांचा चुडा हेच अंतीम सत्य आहे. त्याचा किणकिणाट माझ्या हृदयी आकांत करतोय, पण सत्य स्वीकारायला हवे.

नाहीच आली ती त्याच्या महालात. अर्थात त्याचा महालही धुक्याचाच. तीही धुक्यासारखीच सहजच विरून गेली. निघूनच गेली आयुष्यातून. दूर कुठे तरी आणि आज अचानक सामोरी... नाही. पाठमोरी. पाठीवर केस मोकळे घेऊन. खूप आनंद झाला. भेटायला अधीर होऊन एक पाऊल पुढे टाकले. पण नाही... हळूहळू अंधार पडतोय. समोर सत्य दिसतंय. मंद ताऱ्याप्रमाणे बिलवरांचा चुडा चमकतोय, त्याला अडवतोय.

अरे ! ही लाट आहे, पण त्या भोगलेल्या सुखाची नाहीये. ही दुःखाची लाट... मनावेगळी. तीच व्यापून राहिली आहे. आपल्या दोघांच्या संचिताच्या कोवळ्या ऋतुसारखं. तुझंही दुःख झरतं आहेच माझ्याबरोबर. दुरूनही दिसतंय ते मला. पाठीमागूनही तुझी देहबोली मी ओळखतो.

कविता ग्रेसची; ती अशीच सगळ्या बाजूनी निरखायला हवी. त्यातलं अर्थनृत्य आपल्याला चकवा देतं. एका कडव्यात सांगितलेला अर्थ दुसऱ्या कडव्यात दिसत नाही. एवढेच काय, एका ओळीचा दुसऱ्या ओळीशी संबंध असेलच असे नाही. मात्र तो कवीच्या मनात निश्चीत असतो. त्याच्या अंतर्मनात तो असल्याने थांग लावणे जरा कठीण! तो एकदा लागला तर सौंदर्यानुभूती येतेच. मग त्याचा जीवनाभुव आपण जाणून घेऊ शकतो. हळुवारपणा आपल्या ठायी आणून.


प्रणयगीताचा झिरझिरीत बुरखा घेऊन आलेलं हे विफल प्रेमाचं हे गीत. नदीचा किनारा, धुक्याचा महाल, चंद्र, कोवळे ऋतु, मंद तारे, बिलवर हे काव्यात गुंफलेले शब्द सौंदर्यानुभूती देतात पण शृंगारिक भाव निर्माण करीत नाहीत. ग्रेसच्या बऱ्याचशा कवितामध्ये दुःखाचे अस्तर लावलेले वस्त्र आपल्याला बघायला मिळते. जर ते अस्तरच असेल, तर काव्याकडे बघण्याची आपली दृष्टीच आपल्याला बदलायला हवी का?

शिवाय कवी दोन वेगवेगळ्या घटकांमध्ये कल्पित साम्य निर्माण करतो. वृक्षांमधले सावळे रंग (वृक्ष आणि हिरवा रंग - नाही) संगीताने दिशा पेटतात (दीप राग आणि दीप प्रज्वलन - नाही) मंदतारा आणि बिलवरांचा चुडा. हे सर्व कल्पित साम्य फक्त ग्रेसच दाखवू शकतात.

कदाचित ह्या कव्याला संगीत देताना श्रीधर फडके यांनी अस्तर बाजला ठेऊन मुख्य वस्त्राकडेच लक्ष दिले असेल का? त्यातून मिळणाऱ्या सौंदर्याभूतीचाच विचार केला असेल का? आणि म्हणूनच ते कवितेच्या कुशीत लपलेलं एक कडवं चाल घेऊन आलं नसेल. आलं असतं तर संगीतानं पेटलेल्या दिशाच दिसल्या असत्या. विनाशच दिसला असता.

जेव्हा कवितेचं गाणं होतं तेव्हा कित्येक वेळा ते वेगळा अर्थ घेऊन येतं. अर्थाचे व्यूह त्यात दिसत नाहीत. म्हणूनच ती कविता मूळापासून वाचली तर? कदाचित आपल्याला वेगळाच प्रत्यय येऊ शकतो. मग ती कविता दोन अधिक दोन बरोबर चार न सांगता पाच किंवा तीन सांगते, आणि आश्चर्य म्हणजे आपल्याला ते पटते. आपण स्तिमित होतो.

सौ. स्मिता नितीन लाळे
डी/३०१, वसुधा,
डी.एस.के. विश्व ऑफ सिंहगड रोड,
धायरी, पुणे ४११ ०४१
भ्रमणभाष : ८८०५५६४७३९



(चित्र : शुभा गोखले)

कावळाच कावळा परंतु सभ्य भासला
वडातल्या निळ्या पिलास पंख देऊ लागला.

भयाण दाट वृक्ष हा मुळातही तसाच खोल
आत आत आणखी धरेत ठेवतोच ओल.

दिसे कधी न भेद या फुलफुलात गुंतला
नि गुंतणार तोच का कि जो तळात भंगला?

रहस्यओल ही अशी उरी भरून नादतो
असून डोमकावळा तमात शुभ्र भासतो.

जोगिणीपरी सजून पक्षिणी उदासली नि
आरपार छेदिते वडातलीही सावली...

ओळखे न आपुलेच पाखरू वडातले
तिच्या दिठीत रे जुनेच अंतरिक्ष झाकले...

सुजाण पंख पालवी भयाण थोर कावळा
नसून पिलास पिंड चोच टोचतो खुळा...

पाकळी धरून हे फुलास चालणे कसे?
देहकाजळीतही असे कसे निळे पिसे?

सांजबावरी तऱ्हा तिचे नदीत चालणे
निजेतल्या मुलीसही तरंगभार तोलणे?

तिचाच दोरपाळणा वडात अस्त पावला;
कावळा बघून आज जीव दूर चालला.

तोच प्राण वाघुळात तो तरीही टांगला;
कावळाच एकटा जगात सभ्य भासला...

॥ मुलाखत ॥

यात्रेतील आदिमातेचा शोध

■

ग्रेस यांच्या दोन मुलाखतींची चित्रफित youtube या वेबसाईटवर आहे. 'यात्रेतील आदिमातेचा शोध' ही मुलाखत चित्रकार शुभा गोखले यांनी घेतली आहे तर 'रांगोळी टिंबांची कहाणी' ही मुलाखत प्रख्यात मानसोपचार तज्ज्ञ डॉ. नंदकुमार मुलमुले यांनी घेतली आहे. या दोन्ही मुलाखतींमधून 'ग्रेस' त्यांच्या कवितेविषयी अत्यंत मनःपूर्वक बोलले आहेत. या मुलाखतींचे शब्दांकन अभ्यासकांना आणि रसिकांना फार उपयुक्त ठरू शकते. म्हणून मुलाखतकरांच्या परवानगीने व सहकार्याने यवतमाळ येथील तरूण अभ्यासक अनिल कुलकर्णी यांनी मूळ चित्रफित मिळवून त्याचे जसेच्या तसे शब्दांकन केले. ते शुभा गोखले आणि डॉ. नंदकुमार मुलमुले यांच्या परवानगीने येथे प्रकाशित करीत आहोत. शुभा गोखले, डॉ. नंदकुमार मुलमुले, अनिल कुलकर्णी आणि youtube या सर्वांचे मनःपूर्वक आभार. **- संपादक**

ग्रेस :

माझ्या गद्य पद्य या साहित्यविश्वाचे केंद्रवर्ती ठिकाण माझी आई आहे. आणि आई म्हटल्याच्यानंतर मातृत्वाची एक भव्य दिव्य संकल्पना आपल्या डोळ्यासमोर येते. आणि संकल्पना जर मुळात भव्यदिव्य होऊनच आपल्यासमोर आली, तर संकल्पनेमध्ये त्या अनुभवाचे जे भव्यत्व आणि दिव्यत्व अपेक्षित असते त्याचेच चित्रण होते.

शुभा गोखले :

मराठीत आईवरल्या प्रसिद्ध कविता आम्ही कित्येक वर्षे गुणगुणतो आहोत, पण तुमची 'आई' केवळ मराठीतच नव्हे तर किंबहुना इतर भाषांमधील 'आई'पेक्षाही संपूर्ण वेगळी वाटते. आस्वादात आम्हाला हा वेगळेपणा प्रत्येकवेळी जाणवतो, पण त्याचा उलगडा मात्र होत नाही. त्यासंबंधी तुम्ही एखादी दिशा दाखवू शकाल का ?

ग्रेस :

अगदी... अगदी स्थूलमानाने वरवर जरी आपण कुठल्याही भाषेतील आईवरच्या कविता पाहिल्यात, तर या संकल्पनेची पुनरावृत्ती झालेली असते. पण आई नावाच्या संकल्पनेचे तत्त्व जर आपण मागे मागे मागे ओढत घेऊन गेलो, त्याच्या आदिम स्तरापर्यंत त्याला सोलत आपण गेलो, तर मातेचे जे स्वरूप आपल्याला सापडते, ते मूळ बीजरूपामध्ये मादीचे अव्यंगपण आहे. नर मादी या जोड्यातील बीजभूत सृजनाची जी शक्ती आहे, 'आदि', ज्याला उगम म्हणता येईल, ती मादी आहे. मादी हे आईचे अत्यंत आदिम स्वरूप आहे. ते संस्कृतीपूर्व काळातीलच आणि म्हणून मी जे स्वतःला म्हणतो की, माझ्या भावविश्वाचा माझ्या काव्यविश्वाचा आणि माझ्या समग्र निर्मितिविश्वाचा कणा आणि त्याच्या भोवती प्रतिमा आणि प्रतिमांनी मी उभा केलेला जो परिसर आहे, त्याचे सगळे

अनुक्रमणिका

स्त्रोत मला जर शोधायचे झाले, तर ते आदिमस्तरात प्राचीनत्वात मला सापडतात. म्हणून आईच्या स्वरूपाच्या विकासाचे टप्पे जर मला दाखवायचे झाले तर तिच्या मादीपणाकडे जावे लागते. आणि त्यामुळे एकदम आईचे भव्य दिव्य मातृत्त्वाचे मंगल स्वरूप मी पकडू शकत नाही. ती माझी आई आहे हे अंतीम सत्य जरी असले तरी, त्या अंतीम सत्यावर एखाद्या हिंस्त्र श्वापदाने भक्ष्य आले म्हणून झडप घ्यावी, तशी झडप आईच्या या रूपाकडे मला घेता येत नाही. किंबहुना आईचीच संकल्पना ही मुळातच भव्य दिव्य आहे. त्याने मी दचकून आणि बिचकून जातो. याचं मूळ कारण असे की, आईचा आणि माझा जो संबंध आहे तो एकदम भव्यत्त्व, दिव्यत्व आणि मांगल्य या त्रिविध गुणांनी प्रस्थापित होत नाही. ती प्रथम मला तिच्या आदिम मादीच्या स्वरूपात दिसते आणि आदिम मादीच्या स्वरूपाचे तिचे स्तर, प्रस्तर ज्यावेळेला मी उलगडत उलगडत जातो, त्यावेळेला तिच्या बाईपणाजवळ येतो. तिच्या स्त्रीत्वाच्या जवळ येतो. तिच्या स्त्रीत्वाच्या कळा आहेत. आणि माझी आई मी वेगळी अधोरेखीत करतो. याचे कारण असे आहे की आई म्हणून जरी ज्यावेळेला ती आपल्या संकल्पनांच्याद्वारे वात्सल्याच्याद्वारे माझ्या तथाकथित व्यक्तिमत्त्वाला एका सर्पानी घालावा असा वेटोळा घालते, त्यावेळेला मला तिच्या बाईपणात... समजा आपण अशी कल्पना करू या की ती मला मांडीवर घेऊन स्तनपान करते आहे. त्यावेळेला ती नेमकी काय करते ? स्तनपान ही शारीरिक नैसर्गिक क्रिया आहे. मुलाला पाजण्याच्याकरता किंवा मला मांडीवर घेऊन स्तनपान करवण्याच्याकरिता माझ्या आईला कुठलाही मांगल्याचा पवित्रा धारण करावा लागत नाही. It is not her stand . It is the status of our physical anatomy. त्याच्याकरिता तिला वेगळी प्रार्थना करावी लागत नाही. तिला लिंगपरिवर्तन करावं लागत नाही. आपल्या मूळ लिंगभावावर तिला कोणत्याही प्रकारचे उदात्त संस्कार करावे लागत नाही. आई या माझ्या संकल्पनेची फोड करण्याकरिता मला इथपर्यंत जावं लागलं. म्हणजे माझी आई जर कडे - खांद्यावर घेत असेल, ती मला स्तनपान करवत असेल तर त्याच वेळेला ती आपल्या नाकातील डंखाची बेसर आपल्या उजव्या हातानी पडताळूनही पाहते. तिच्या एका कुठे ब्लाऊजला किंवा तिच्या पदराला एखादा काचेचा तुकडा असा चिटकवला असेल तर झटकन स्तनपान करवून घेता घेता... ती माऊली नाही. ती अस्सल मादी आणि बाई जिला आपल्या रूपाचा, आपल्या शारीरिक गर्वितेचा एक अधिकार प्राप्त झालेला आहे. त्या वात्सल्य... कारण वात्सल्यभावनेमध्ये तिला वेगळं काही करावंच लागत नाही. ती एक शारीरिक प्रक्रिया होत असते. याचे जर अत्यंत उत्कृष्ट उदाहरण द्यावयाचे झाले तर 'आई' नावाची माझी कविताही आहे. आणि ती अनेक कारणांनी गाजते आहे. मोठ्या मोठ्या गायकांच्या गळ्याच्याद्वारे मोठमोठ्या कार्यक्रमांच्याद्वारे गाजते आहे. ती फार चर्चेचा विषय झालेली आहे. आणि त्यात एक असा गोड गैरसमज झालेला आहे की माझी आई ही मरण पावलेली आहे. ती निवर्तलेली आहे आणि तिच्या नावाने मी आक्रोश करतो. पण तशी वस्तुस्थिती नाही. तात्पर्य, आपले अव्यंग मादीपण, आपले अव्यंग नारीपण, आपले अव्यंग स्त्रीत्व, सृजनशक्तीचा आविष्कार झाल्यानंतरही जी तसूभरही कमी करीत नाही, म्हणजे ज्याला म्हणता येईल, एखाद्या समिष्टांच्या चक्राच्या प्रमाणे तिचे दैहिक आणि तिचे मनस्वी अवयव... आणखी स्पष्ट बोलायचं झालं तर मुळात जर ती देहस्विनी असेल तर त्या मुलाच्या प्रारंभापाशीच ती मनस्विनी आहे. म्हणजे देहस्वीपण आणि मनस्वीपण हे तिच्यापासून, आई या संकल्पनेत जाऊन, त्यात मुखर होईपर्यंत तसूभरही ते ढळत नाही. आईचा असा उलटा प्रवास, आईची संकल्पना काय रूढ आहे हे समजावून सांगण्याकरिता मी केला. म्हणजे माझ्या आईवरच्या आत्माविष्कारामध्ये अनुभवमांडणीमध्ये तिचे मादीपण आणि बाईपण आले. काय होतं की आई या संकल्पनेवर बोलताना भव्य दिव्य आणि पावित्र्य या तीन कल्पनेचा आपण पाठलाग सोडूच शकत नाही. आणि या तीन कल्पनेचे गडद संस्काराचे परिणाम जर आपल्या पारंपरिक रसिकतेवर असतील, तर माझी आई, माझे रसिक श्रोते हे काहीतरी गैरअर्थानी समजावून घेताहेत असा मला भास होतो. एकतर आईवरची माझी कुठलीही ओळ, ती गद्यातली असू देत, ती पद्यातली असू देत, ती तिच्या मादीपणापासून आणि तिच्या... तिच्या नारीत्त्वाच्या भावनेपासून, तिच्या देहस्वीपणापासून, तिच्या मनस्वीपणापासून ती अंतराचाही फटकारा सहनच करीत नाही. आणि असे असल्यामुळे आई या संकल्पनेचा उच्चार करतानाच आपल्याला एक पूजाभाव, एक भक्ती असं काहीतरी होतं. भक्ती या भावनेची मी कदर समजतो पण माझ्या आईच्या भावनेचे भक्तीत रूपांतर कधीच झालेले नाही. तिचे मनस्वीपण, तिचे देहपण, तिचे देहस्वीपण आणि तिच्या देहकळा आणि तिच्या मनाच्या, मनाच्या सर्व कळा यांचाच एक असा आलटून पालटून ऑर्केस्ट्रा तिच्या शरीरामध्ये झंकोत होत असतो आणि त्यातूनच तिच्या आदिम वेदनेचे हुंकार पडत असतात. तिचे मी साक्षात मूल असल्याच्यामुळे, तिची मी विरासत असल्याच्यामुळे तिचे आणि माझे जे संबंध आहेत, ते केवळ पुत्र आणि या स्वरूपाचे नाहीत. मानवी जीवनातील जी अनेक प्रकारची स्त्री आणि पुरूषांमध्ये नाती आहेत, त्यामध्ये त्याची

विभागणी झालेली आहे. कधी मी विभागणीचा एक भाग मागतो तर ती पुरूष म्हणून, या ठिकाणी पुत्र म्हणून नव्हे, तर मला पुरूष म्हणून त्याची खंडणीसुद्धा मागते आहे. आणि इथे बाईचा, मादीचा उल्लेख केल्यानंतर स्त्रीपुरूषभावातील वैषयीक, दैहिक प्रेमापासून तर आत्मिक प्रेमापर्यंत सगळ्या गोष्टी आलेल्या आहेत. आणि त्यामुळे असं म्हणावसं वाटतं की तिच्या माझ्यामध्ये वात्सल्यभाव आहे पण त्या वात्सल्यभावाच्या राखेच्या ढिगाऱ्याच्या खाली स्त्री, मादी आणि नर यांच्या आदिम आकर्षणाचे तंतू आहेत. या तंतूमध्ये तिच्या आणि माझ्यातला वात्सल्यभाव कुठे डागळतो, कुठे उजळतो. कुठे पळून जातो, कुठे एखाद्या तिरिपीसारखा दिसतो. एक चमत्कार त्याठिकाणी होत असतो. म्हणजे ज्याला प्रेम म्हणतात, स्त्रीपुरूषातले प्रेम, ते याठिकाणी आहे. आणि मग अशा ठिकाणी या प्रेमाला आपण एकदम मांगल्यत्व, एकदम दिव्यत्व बहाल करणे हे ते माझ्या आईवरच्या मी काव्यातून केलेल्या अनुभवावर अन्यायकारक ठरणार आहे. त्याचं उदाहरण देतो.-

''ती गेली तेव्हा रिमझिम
पाऊस निनादत होता
मेघात मिसळली किरणे
हा सूर्य सोडवित होता''

एक चित्रं उभं राहिलेलं आहे. बहुदा मला अस वाटतं की श्रावण महिन्याचा तो काळ असावा. कारण धड पाऊसही नाही आणि धड पाऊस असता, जोराचा पाऊस असता तर सूर्याची जी तारांबळ चाललेली आहे की त्याची जी किरणं आहेत ती मेघात अडकलेली आहेत आणि तो बावळा सूर्य संध्याकाळचा आहे की दुपारचा आहे याचा अजून आपला थांग लागलेला नाही.

ती गेली तेव्हा रिमझिम
पाऊस निनादत होता
मेघात मिसळली किरणे
हा सूर्य सोडवित होता

तशि सांजहि अमुच्या दारी
येऊन थबकली होती
शब्दात अर्थ उगवावा
अर्थातुन शब्द वगळता

याठिकाणी एक पार्श्वभूमी तयार झालेली आहे. पण त्यातून एक गैरसमज, गोड गैरसमज असा निर्माण झालेला आहे की या बाळाचे, किंवा तिच्या मुलाचे आणि आईच्या विरहाचे जे जे अंतर आहे ते अंतर का आहे ? ते तात्कालिक आहे की ते आत्ताचे आहे की ते मृत्यूच्या रूपाने नेहमीच्याकरिता तो वियोग झालेला आहे ? आईपणाच्या मादीपणाचे विश्लेषण करीत असतांना एकतर माझ्या समग्र व्यक्तिमत्त्वाच्या चिंधड्या उडत आहेत. कारण मादीपणाकडे तिला घेऊन गेल्याच्या शिवाय तिच्या कोणत्याही देहजाणिवेचा आणि मानसिक जाणिवेचा शोधच मला घेता येत नाही. कारण ती सांकेतिक स्वरूपात अडकतच नाही. एक त्यानिमित्ताने मला सूफी प्रार्थना आठवते.-

''मोहब्बत मे खयालो साहिलो मंजील है नादानी
मोहब्बत मे खयालो साहिलो मंजील है नादानी
जो इन राहो मे लूट जाए वही तकदिरवाला है''

आईच्या आणि माझ्या संबंधाचे धाडसी आणि अपूर्व विवेचन करण्याच्यापूर्वी तिच्या माझ्या संदर्भातल्या आणखी मी दोन ओळी उद्धृत करू शकतो.

माझ्या कुळाप्रमाणे...

म्हणजे आईचेच कूळ. मातृसत्ताक एवढाच भाग माझ्या संदर्भात संभवतो.

माझ्या कूळाप्रमाणे मृत्यू मला दुपारी
आईस दर्पणातून बोलावतात घारी

म्हणजे दुपारी कधीतरी तिचा जन्म झाला असेल, तिला मरण आलं असेल. माझा दुपारचा जन्म आहे. पण मला तिची मरणवेळ गाठायची आहे. अशी काही आकांतमय अवस्था माझ्या अंतःकरणात झाली आहे. आईच्या मादीपणाचे विश्लेषण एक पुरूष म्हणून करीत असताना मला साधा पुरूष होऊन चालणार नाही म्हणून मी म्हटलेलं आहे की

''माझ्या कुळाप्रमाणे मृत्यू मला दुपारी
आईस दर्पणातून बोलावतात घारी''

आणि इथे माझी अवस्था काय झालेली आहे

ग्लानीत भास माझे...
ग्लानीत भास माझे झाले विदग्ध सत्य
आई तुझ्या मुलातिल हा एवढाच संत...
आई तुझ्या मुलातिल हा एवढाच संत...

स्वतःकडे संतपणाची भूमिका घेत असताना विदग्ध वास्तव मी उभे करीत नाही तर दग्ध वास्तवामध्ये आई आणि मूल यांच्या संबंधाचे सगळे संकेत देऊन गेलेले आहेत आणि आईचा मादी म्हणून स्वीकार करीत असताना जी मी पुरूष म्हणून भूमिका धारण केलेली आहे त्याकरिता मला संताचा तटस्थभाव अंगी बाणवावा लागतो. हे सत्य मी याठिकाणी अधोरेखीत करतो आहे. याच्यावर आणखी प्रकाश जर पाडावयाचा झाला तर ही कविता मी उद्धृत करतो आहे आणि त्याचे विश्लेषण मला

अनुक्रमणिका

जमेल तसे करतो आहे.

ती गेली तेव्हा रिमझिम
पाऊस निनादत होता
मेघात मिसळली किरणे
हा सूर्य सोडवित होता

तशि सांजहि अमुच्या दारी
येऊन थबकली होती
शब्दात अर्थ उगवावा
अर्थातुन शब्द वगळता
ती आई होती म्हणुनी...

ही पहिली ओळ फार काळजीपूर्वक मी मांडलेली आहे. 'ती आई नसती तर...' असा अर्थ होतो.

'ती आई होती म्हणुनी
घनव्याकुळ मीही रडलो'

हे मी मुद्दाम अधोरेखीत एवढ्यासाठी करतो की, तिचे माझे मुळातले जे संबंध आहेत, ती आदिमाया आहे आणि मी पुरूष आहे असे संबंध आहेत. आणि त्याच्या, बाईपणाच्या विकासात अंतीम टप्प्यावर आईच्या संकल्पनेत, तिचे आणि माझे नाते, त्याचे परिवर्तन ती आई आणि मी पुत्र असे झालेले आहे. म्हणून कडवे कसे आले आहे. -

ती आई होती म्हणुनी
घनव्याकुळ मीही रडलो
त्या वेळी वारा सावध
पाचोळा उडवित होता

अंगणात गमले मजला
संपले बालपण माझे
खिडकीवर धुरकट तेव्हा
कंदील एकटा होता

हे रक्त वाढतानाही
मज आता गहिवर नाही
वस्त्रात द्रौपदीच्याही
तो कृष्ण नागडा होता

यातल्या बारकाईनी आपण मधल्या दोन कडव्यांचा जर विचार केला तर माझ्यामध्ये आणि माझ्या आईच्या मध्ये तात्कालिक... तात्कालिक छोटेसे अंतर निर्माण झालेले आहे. थोडासा वियोग निर्माण झालेला आहे. ती कुठेतरी गेलेली आहे पण ती मेलेली नाही. ती मेलेली नाही, पण माझ्या रसिकांनी आणि चाहत्यांनी यामध्ये ज्या आत्माविष्काराचा प्रभाव ओढलेला आहे तो म्हणजे मरणाने माझ्या आईशी घडवून आणलेली माझी ताटातूट म्हटलेली आहे.

'अंगणात गमले मजला संपले बालपण माझे' गमले म्हणजे मला भास झालेला आहे. अजून ते संपलेलं नाही. आई कुठेतरी भुलावून पण गेलेली आहे. ती आईपणाची आणि पुत्रामध्ये असलेल्या संभ्रमाची भुलावण नाही. आईचा वात्सल्याच्या व्यतिरिक्त मादीपणाचा, बाईपणाचा जो एक देह आहे त्या बाईपणाच्या, मादीपणाच्या देहस्वी मनस्वी कळा तिला बोलावताहेत आणि त्या देहस्वी मनस्वी कळांचे बालसुलभ स्पष्टीकरण ती मला देऊ शकत नाही. म्हणून ती मला कुठेतरी एक भुलावणीची, एक संभ्रमाची, छोटीशी गोळी देते आणि आपल्या देहपणाचा, आपल्या मनस्वीपणाचा मुक्त आविष्कार करण्याकरिता निघून जाते. मला वाटते की आता येईल. ती निघून गेल्याच्यानंतर तिचा देहस्वी आणि मनस्वीपणा तिच्या मुळातळासकट उसळून येतो आणि कुठेतरी आपले बालक मागे राहिलेले आहे त्या झंकारामध्ये तो वात्सल्यभाव संपूर्णपणे निवृत्त होतो की काय अशा भ्रमात आणि भासात ती झपाटल्याप्रमाणे निघून जाते. पण माझ्या विरहाच्या तारेत माझी आईच निघून गेलेली आहे. भूलवून निघून गेलेली आहे म्हणून जणू काही ती येणार नाही या आकांताच्या भावाने माझा आत्माविष्कार झालेला आहे. रसिकांचा असा भ्रम झालेला आहे की ती निघून गेलेली आहे. ती निघून गेलेली आहे, ती पुन्हा आलेली आहे ना ! कारण मी स्वतः सावरले आहे स्वतःला.

हे रक्त वाढतांनाही
मज आता गहिवर नाही

She has come back त्या विरहातले सगळे जे काही आनुषंगाने होणारे भास आभास होते जे पूर्वीच्या, सुरूवातीच्या कडव्यामध्ये येऊन असा काही तरी देखावा निर्माण करीत होते की मरणानी माझी आणि तिची नेहमीची ताटातूट केलेली आहे, त्या ताटातुटीवरचा पडदा याठिकाणी एकदम निघून गेलेला आहे. आणि एक प्रकारचा बालसुलभ आत्मविश्वास माझ्या बाळमुठीमध्ये मी पुन्हा बांधून घेतलेला आहे की

हे रक्त वाढतानाही
मज आता गहिवर नाही
वस्त्रात द्रौपदीच्याही
तो कृष्ण नागडा होता

इथे ज्या कृष्णाने मयसभेत द्रौपदीची लज्जारक्षणाकरिता तिच्यावर वस्त्र पांघरूणांचे अंतरच्या अंतरपाट पाठवलेले आहेत तोच कृष्ण आता, जसा मी आता याठिकाणी नागडा झालो आणि द्रौपदीच्या वस्त्रात दडलो, तशी माझी आई परत आलेली

आहे आणि पुन्हा मी तिच्या वस्त्रात दडलो. ते तिला जाणवत नाही आणि पुन्हा ती नाकातील डंखाची मोरणी वारंवार तपासते आहे. ती परत आल्याच्यामुळे माझ्या निर्मितिक्षमतेचा आत्मविश्वास आता पुन्हा नव्याने दुणावला आणि तिच्या - माझ्यातले अंतर, पाण्यात टाकावा वत्तासा, त्याप्रमाणे एका क्षणात विरघळून गेले. म्हणून मी नव्या निर्मितीच्या आत्मविश्वासाने म्हणतोय.

हे रक्त वाढतानाही
मज आता गहिवर नाही
वस्त्रात द्रौपदीच्याही
तो कृष्ण नागडा होता

द्रौपदी आणि कृष्ण, एक स्त्री आणि एक पूर्ण पुरूष, एक मादी आणि एक पूर्ण पुरूष, यांच्यातील नव्या अनुबंधाचे नाते आत्ता याठिकाणी प्रस्थापित होते. जिथे मी 'एकांतकृष्ण' आणि 'कृष्णएकांता'त ते जास्त स्पष्टपणे उलगडून दाखविलेले आहे.

शुभा गोखले :

सर, तुमच्या आईचे आईपण आणि बाईपण यांनी आमच्या आकलनाला नवीन दिशा मिळाली आहे. पण तुमच्या अनेक कवितातून ती इतर अनेक स्वरूपात दिसते त्याचे काय?

ग्रेस :

प्रश्न मार्मिक आहे. म्हणजे असं की, Everything has been figured out except how to live the life त्याला आणखी, काट्यानी काटा काढावा असं जर उत्तर द्यायचं झालं तर एका सूफी प्रार्थनेची एक ओळ मला आठवते.

चरागा करके दिल बहला रहे हो क्या जहाँवालो
चरागा करके दिल बहला रहे हो क्या जहाँवालो
अंधेरा लाख रोशन हो उजाला फिर उजाला है...

निर्मितीच्या अवस्थेत आलेला हा अपारंपरिक , असांकेतिक, अनुभव, आपल्या आईमुलाविषयीच्या रूढ संकल्पनांना धक्का देणारा आहे. अशा वेळेला आपलं पांगळेपण जाणवतं.

चरागा करके दिल बहला रहे हो क्या जहाँवालो
अंधेरा लाख रोशन हो उजाला फिर उजाला है...

खऱ्या स्वयंप्रकाशानेच आपण या अनुभवाला सामोरे जाऊ शकतो.

हे रक्त वाढतानाही
मज आता गहिवर नाही
वस्त्रात द्रौपदीच्याही
तो कृष्ण नागडा होता

ही सुमित्राबाईची भाषा आहे. ही तिच्या पुत्राची भाषा आहे. जीवनभाषेतून तिने सगळे घटक घेऊनसुद्धा आपल्या नव्या असांकेतिक अनुभवाच्या परिपूर्तीसाठी त्याने आणि तिने, ही दोघांची संयुक्त सृजनभाषा निर्माण केलेली आहे. त्यामुळे या अनुभवाचे आदानप्रदानही वेगळे झाले. मी तहान असल्याच्यामुळे तिच्या भाषेतील प्रत्येक, ज्याला सिलॅबल म्हणता, शब्दाअवयव आणि त्यातून होणारे अर्थाचे सूचन हे फक्त मलाच कळलेले आहे. पण हीच कविता तिच्यातल्या खासगीपणाला विश्वात्मक करीत असतांनाही माझ्या रसिकांना न उलगडताही मिळमिळीत उत्तरांच्यापेक्षा असंख्य जिवंत शंकांचे प्रश्न उपस्थित करते. कारण हीच सुमित्राबाई नंतर कचाट्यात सापडते. माझ्या बालसुलभ उत्तरांची तिला मदत होऊ शकत नाही. मग ती माझ्या थोरल्या बहिणीला गाठते. त्याच्याकरिता थोरल्या बहिणीला ती वेगळेपणानी गाठून वेगळे महत्त्व देते. त्यामुळे इतर छोट्या भावंडांना नाराज केल्याची एक अपराधीपणाची तिला जाणीव होते. म्हणून सगळ्याच भावांच्या नावानी ती.. ती आनंदाचे पेढे वाटते.

ही माझी बाळे सुंदर
ही माझी बाळे सुंदर खुडताती मोरपिसरा

मग माझी बहीण असेल, धाकटी बहीण असेल, त्या सगळ्यांना एका.. एका सूत्रात ती ओवते. त्यांचे अजाणतेपण, जाणतेपण बाजूला ठेवून. त्याला आपण अलीकडच्या आपल्या भाषेत... आईच्या मायेचा पदर हा किती प्रदीर्घ होत जातो. ती काय म्हणते की

ही माझी बाळे सुंदर खुडताती मोरपिसारा
पदराच्या इतुक्या चिंध्या नेईन कुठे हा वारा

मग मात्र पुन्हा हळु आपल्या मतलबाचा अनुभव ही आपल्या थोरल्या कन्येकडे, माझ्या मोठ्या बहिणीच्या सुपूर्द करते. तिच्या अंतःकरणात तिच्या मेंदूत ती प्रक्षेपित करते ती जाणीव!

"मी आत्ता जाऊनि येते तोवरी राख तू पाणी
मी आत्ता जाऊनि येते तोवरी राख तू पाणी
थोरली तशी पायाळू तू माझी लेक शहाणी"

मग काम कोणतं करायच?

"गाईला टाकुनि चारा
गाईला टाकुनि चारा सर्पाला देशिल दूध
टाळूत कुणाच्या घुमती हत्येचे माझ्या वेध
गे प्रियकर माझा भोळा..."

थोरल्या मुलीला शहाणी म्हटल्याच्यानंतर एकदा तिला आपल्या आत्मविश्वाच्या तावडीत, कब्जात घेतल्याच्यानंतर ती अतिशय अशी रोमॅन्टिक भाषा वापरते.

गे प्रियकर माझा भोळा देहाचा मंथर साजण
वाटक्या फुलांचे विटके तो तसेच जुपतो चुंबन
गे प्रियकर माझा भोळा...

आता हीच आई एकदा आत्मविश्वास मिळाल्याच्यानंतर ज्या.. ज्या देहजाणिवेचे, मानसिक जाणिवेचे, स्वतंत्र बाईपणाचे जीवन जगत असते. पण त्याबरोबर आपली तिची बालके आणि त्याबरोबर तिच्या मुली आहेत. त्यातून वात्सल्याच्या सख्यत्वाचा जो आदिमलळा आहे ती तोडतच नाही ना ! तिचे... तिचे आदिम बाईपण आहे आणि तिचा विकास सृजनाच्या गतीने आईपणात होतो आहे. पण आईपणात गेल्याच्यानंतर ते बाईपण सोडते हा जो संस्कृतीने निर्माण केलेला भास आहे, इथे माझी आई इतर आईंपासून वेगळी तर होतेच, आणि ... पण ती तिचा खासगीपणा मुरवत मुरवत मुरवत जिरवत ती विश्वात्मकसुद्धा होते ना ! आणि मग आता... आता धाकट्या बहिणीपासून मी जास्त थोर झालो. थोरल्या बहिणीचं शहाणपण मला आलेलं नाही. पण थोरल्या बहिणीला आईने जो कानमंत्र दिला आहे, तो माझ्या बालबुद्धीला भावला आणि मी एकदम सृजनाच्या गतीने शहाणा झालो आणि आईला म्हणू लागलो

तुझा आला गे साजण
तुझा आला गे साजण नको
त्याच्यापुढें जाऊं

त्याच्याकडे जाण्याची परवानगी पायाळू असलेल्या माझ्या थोरल्या बहिणीकडून तिने अगोदरच घेतली. ती जाते आहे. पण कदाचित माझी सृजनाची दृष्टी जी मला माझ्या आईपासून प्राप्त झालेली आहे, तिला सत्य आणखी पारदर्शीपणानी दिसत असेल. बाई बाई म्हणून आई... बाई बाई म्हणून आई आणि मुलगी एक झाली. पण या ठिकाणी मी निर्मितिशील पुरूषाची भूमिका घेतलेली आहे. त्यामुळे मला आदिम शहाणपणाचा, सत्याचा दुसरा विलक्षण पदर दिसतो. म्हणून आईचा घात होऊ नये, आईला खरा प्रियकर मिळावा, माझ्या आईला खोटा, दगा देणारा, द्रोह करणारा... See see the this is family oriented love poetry म्हणजे आई, आई मुलाला मुलाला मुलाला आत्मविश्वासात घेते. मुलगा आईला म्हणतो की माझ्या आईला जे हवं ते परमेश्वरा मिळू दे. पण कुणीतरी प्रेमाचं नाटक करून एखादा पुरूष माझ्या आईच्या देहस्वीपणाला, मनस्वीपणाला जर थप्पड मारत असेल तर आम्ही भावंडांच्या .. आम्हा आम्हा भावंडांच्या सख्यत्त्वाचे काय होणार? म्हणून तो कंठशोषकरून, बालकंठशोष करून म्हणतो

आला गे तुझा साजण
नको त्याच्यापुढे जाऊं
त्याने...
त्याने यात्रेंत भेटल्या
कोण्या पोरीच्या देहाला
दिले आभाळाचे बाहू...

यात्रेत भेटलेल्या कुठल्या पोरीशी त्याचं असं चटकन कसं प्रेम होतं ? ज्याच्यासाठी तू सर्वस्व ओवाळायला चाललीस, आमचा साथ मागतेस, आमची भावनिक मदत मागतेस आणि तो तरी अचानक भेटलेली कुठलीतरी अशी छान मुलगी असेल तिच्याच एकदम क्षणार्धात प्रेमात पडला ?

त्याने यात्रेत भेटल्या
कोण्या पोरीच्या देहाला
दिले आभाळाचे बाहू

अगं आता कशी करशील ? त्याचे हात तुटले आहेत कारण त्या पोरीला ते समर्पित करण्यात आले.

त्याने यात्रेत भेटल्या
कोण्या पोरीच्या देहाला
दिले आभाळाचे बाहू

'आई' कंसात म्हणायच. 'आई' पण ते मात्रेत बसत नाही ना! मात्रा ही संगीताची असल्याच्यामुळे तिला सौंदर्यशास्त्राचे नियम आहेत. इथे जीवनशास्त्राचे नियम ती बाळबुद्धी, ती बाळक्रिडा ही कशी पोहोचवणार ? ही काही कृष्णाची बाळक्रीडा आहे जी गोकुळात कौतुक करते, जी द्वारकेत कौतुक करते ?

त्याला हात नाही वेडे
उभा अंधारी साजण

त्याला गिल्ट आलेला आहे ना ! म्हणून तो प्रकाशात येत नाही, की ज्या हातांचा बाहूंचा विळखा, माझ्या आईच्या कमरेला पडावयाचा होता, ते हात सहीसलामत त्याने इथे नाही आणलेत. तो मोहात पडला म्हणे. छोट्या मोहात पडला म्हणून मोठा संभ्रम मोठा सत्याचा प्रदेश पादाक्रांत त्याला करता येत नाही. एक वरदान घेऊन निघाला आणि त्या वरदानाची नीतिमत्ता, त्या वरदानाची इयत्ता त्याला सांभाळता आली नाही. म्हणून त्याला आपले हात गमवावे लागले. आई तू कुणाला आलिंगन देतेस ?

'त्याला हात नाही वेडे...'

आणि त्याची अपराधाची...

'उभा अंधारी साजण...'

आणि क्षणाच्या प्रेमाची करामत काय आहे ?

'उभा अंधारी साजण'

तिलाही गिल्ट आलं की दुसऱ्याच्या प्रियकराला आपण आलिंगन दिले.

त्याला हात नाही वेडे
उभा अंधारी साजण
तिने जीव दिला तरी
याने इथे वाहत्या पाण्याचे
इथे आणिले पैंजण...
इथे आणिले पैंजण...

माझ्या रंगभूम विवेचनाच्या तंद्रीत तुम्हाला ती एक दिशा पाहिजे ती मलाही नव्याने सापडलेली आहे, तुम्हालाही नव्याने सापडलेली आहे. आपण आता रसिक आणि मी निर्माता म्हणून आपण संयुक्तरीत्या मोहीम काढून बघूया कुठल्या कवितेतून कुठली नवी दिशा सापडते !

शुभा गोखले :

तुमच्या कवितेतमध्ये स्त्रीचा जो वेगळा आविष्कार येतो तो असा का येतो ? म्हणजे असे वाटते की तुम्ही स्त्रीची अनंत रूपे घेऊन नटता आहात. त्यामुळे तुमच्या कवितेतून स्त्रीत्त्वाचा भाव व पुरूषभाव याची विलक्षण अशी जुळणी आढळते. याविषयी तुम्ही अधिक स्पष्टीकरण द्याल का ?

ग्रेस :

आपण विचारलेला प्रश्न खरे तर इतका मार्मिक आहे की माझ्या कवितेतील रहस्यांचे उद्‌घाटन करणारा आहे. पण रहस्यांचे, अनुभवरहस्यांचे उद्‌घाटन करण्याच्या करिता विशेषतः कलेतील रहस्यमय अनुभवांच्या पेर्शीना ग्रंथींना मोकळे करण्याच्याकरिता एक वेगळीच भाषा, एक वेगळीच लिपी माणसाला हवी असते. मी त्याला 'रहस्यशरणाची दैवीलिपी' म्हणतो. माझी कविता बायकी नाही किंवा बाईवेल्हाळ नाही आहे. बाईपणाचं कन्सेशन किंवा बाईपणाची सवलत मागणारी कविता नाही आहे. आपण केवळ बाई आहोत आणि आपल्यासमोरचा विरूद्ध हा पुरूष आहे, त्यामुळे बाई आणि पुरूष एकमेकाला शह देणे, एकमेकांवर मात करणे, अशाही दिशेचे सूचन करणारी कविता नाही. बाईपणाचे सगळे विशेष तिच्यात आहेत. आणि तरीही या कवितेचा निर्माता हा पुरूष आहे. आदिमायेच्या मादीपणाच्या प्राचीनपूर्व काळाच्या अवस्थेपासून तर आजच्या आधुनिक काळातील बाईपर्यंतची सर्व विकासाची परिवर्तने, सृजनशीलतेच्या दिशेतून तपासून पाहणे हीच माझ्या पुरूष असण्याच्या पुरूषार्थाची व्याख्या आहे... आणि या अर्थानी मला याठिकाणी नवा... नवा... नवा... शब्दप्रयोग सापडतो. फेमिनाईन पोएट्री. पण तुम्हाला त्याचा सरळ सरळ अनुवाद करून स्त्रैण कविता म्हणता येणार नाही. 'स्त्रैण' याला एक अभावात्मक, म्हणजे स्त्री असण्याच्यापणाचा अपमान करणारा, त्याला काहीतरी दूषण देणारा, असा असा प्रकार तो मला मान्य नाही. I don't agree with that. But I want to say, may so called feminine poetry, it starts with a woman, it takes some steps, it declares some some some and here I starts what ? Here I get... I become scepticst I have some doubts. Along with expressing the doubts. I have some wounds, damages But all these damages quiries, inquinity even also are valuable to me. Because in the end what I feel, my poetic expression is not for mortal men nor for they so called themetical immortal women. In the end what I feel when I when I see the devine last effect of the art or the poetry. but I feel that my poetic gifts, my poems are not for mortal men so called, not for immortal themetical metaphysical women. Then they are for that सूफी thinker सूफी अवलिया, सूफी फकीर who drinkes who drinkes the poison like a nector and that too like a solitary star. सुमित्राबाई, माझी माता ज्याला मी जगन्माता म्हणून पाहतो, विश्वमूर्ती म्हणून पाहतो, तिच्या नटण्याच्या विनटण्याच्या सगळ्या कळा या फेनिनाईन बायकी आहेत. बायकी आहेत, पण पुरूषत्त्वाला चिडविणाऱ्या नाहीत अपमानीत करणाऱ्या नाहीत कलंकीत करणाऱ्या नाहीत. तिने घातलेला एक उखाणा मला आठवतो. संध्याकाळ झालेली आहे. दिवे गेलेले आहेत. आणि संध्याकाळची दिवेलागण करायची म्हणून आपल्याच कोनाड्यात असलेलं निरांजन आपल्याच सरावाच्या हातांना सापडत नाही. हे संध्याकाळचे दुःख आहे. हा आकांत आहे संध्याकाळचा. म्हणून अंधारात आंधळ्या माणसाने स्पर्शाची लिपी वापरून कोनाड्यातले निरांजन शोधावे म्हणून तिचा हात चाचपडतो आहे. चाचपडता चाचपडता निरांजनाच्या जागी विंचू आहे आणि त्याने नांगीने दंश केला. ही चित्काराने ओरडती

"कोनाड्यात विंचू आणि तिथे निरांजन
कोनाड्यात विंचू आणि तिथे निरांजन"

पण निरांजन तर उजळलेच पाहिजे

"कोनाड्यात विंचू आणि तिथे निरांजन
नांगीसाठी ज्योत झाली विधात्याचे धन"

या तिच्या कळा आहेत. ती गोंदणप्रौढा आहे. ती अंगाला बोचकून घेणारी आहे. बिब्ब्याच्या रसातून, तोंडल्याच्या रसातून काढलेले हिरवेकंचपण तिच्या केशरगौर त्वचेचे आव्हान आहे. त्याचे समायोजन जोपर्यंत होत नाही तोपर्यंत तिच्या देहस्वी

कळांच्या यज्ञाची सांगताच होत नाही आहे. ती गोंदण करते. ती गोंदणगावात जाते. तिचा बाहेरचा गोंदणगाव आहे तिचा आतलाही गोंदणगाव आहे. आणि म्हणते की, गोंदणगावावर जगातील सगळ्या दानवांनी जरी चालून आले तरी गोंदणगावातील केशरगौर कातडीचा एक चंद्रकोरीएवढा तुकडाही नष्ट होता कामा नये. म्हणून मग आपण असे म्हणूया

''देवाच्या गाण्याने दळणाला मोल चढे
देवाच्या गाण्याने दळणाला मोल चढे''

आणि हळूच म्हणायची कारण उखाणा आहे

''कोनाड्यात विंचू आणि तिथे निरांजन
नांगीसाठी ज्योत झाली विधात्याचे धन''

आणि मग काय ? मग गोंदणगावावर म्हणजे केशरगौर त्वचांच्या जगातल्या सगळ्या स्त्रीत्वाच्या कातडीवर जर दानवाचा हल्ला झाला तर काय कारायचे ? म्हणायचे की -

देवाच्या... देवाच्या गाण्याने दळणाला मोल चढे

कारण काय तुम्हाला नाही कळायचं ना! कारण ही दैवी शरणांची रहस्यलिपी आहे. या रहस्यलिपीला आत्मसात जर आपल्याला करावयाचे असेल तर त्या रहस्यलिपीचा मार्ग ज्या भुयारी मार्गातून जातो, ज्या तुम्हाला प्रकाशझोताच्या आतमध्ये तिचा मिळवला असतो. कारण बाहेर अंधार दाटलेला आहे. मग त्यातून कसं बळ मिळेल ?

''देवाच्या गाण्याने दळणाला मोल चढे''

तुम्हाला नाही समजलं पण हळू तिच म्हणायची

''देवाच्या गाण्याने दळणाला मोल चढे
कोडाच्या हाताला हिरवे भरतात चुडे''

मग हळूच म्हणायची की

ओळखीच्या वाऱ्या तुझे घर कुठे सांग ?

एकतर वारा आपल्याला दिसत नाही. तो ओळखीचा आहे. जन्मापासून, आपल्या पूर्वजांपासून तो वाहतो आहे. त्याची ओळख आहे. ती दृष्यमान करता येत नाही. आणि आत्मा, लहरी, झुळका या कितीही मूर्तीमंत आणि असल्या तरी जोपर्यंत त्याला मानवी देवाच्या... देवाच्या देहाच्या आकृतीबंधात बंद करून आपण दृष्यमान करत नाही तोपर्यंत कलेचे कार्य सुरूच होतं म्हणून ती -

''ओळखीच्या वाऱ्या तुझे घर कुठे सांग
गरूडाच्या पंखामध्ये डोंगराची रांग''

गरूड दिसतो. डोंगरांची रांग दिसते. मधून अदृश्यपणे गरूडावर डोंगरावर आक्रमण करणारा वारा दिसत नाही. कारण त्याला डोंगरावर, निळ्या रांगावर, आणि गरूडाच्या गगनफेक झेपीवर आक्रमण करायचे नसते, तर या तिघांच्या आकाराचा एक नवा सृजनशील आकृतीबंध बांधून जीवनाची एक नवीन अमरतम दिशा दाखवायची. हळूच बायकीपणाने ती म्हणते

'जाई बाई तुम्ही सांगा मनातले पाप'

आपण दचकून जाते. इश्य एवढी जाईची कळी ! आणि ती पाप काय वागणार ? कारण आपली... आपली आपली मूर्तमानतेतील पापाची कल्पना दैत्य, अक्राळविक्राळ आणि ही जाईची कळी...

'जाईबाई तुम्ही सांगा मनातले पाप'

आणि कसं उत्तर आहे ?

'कळ्यांचीही फुले होती कशी आपोआप ?'

''मोगरा फुलला मोगरा फुलला
फुले वेचतांना बहर...''

मुळात शब्द आहे बाहर -

''मोगरा फुलला मोगरा फुलला
फुले वेचतांना भार कळीयासी आला''

म्हणजे आपण कळीचं फुलामध्ये रूपांतर... अरे हीच तर गंमत आहे.

कोणत्या...
कोणत्या फुलातुन गळते कोणत्या कळीची माती
कोणत्या फुलातुन गळते कोणत्या कळीची माती

तिच्या... तिच्या व्यक्तिमत्त्वाची बांधणी मी तुम्हाला सांगतो. Pattern fo her physical and metaphysical personality.

'कोणत्या फुलातुन गळते कोणत्या कळीची माती'

उत्तर काय ?

''वाटेत झरा उचलाया दगडाची लागे छाती ...''

अगस्तीचं काम सर्कशीतलं काम आहे. मी अनेकदा म्हणालेलो आहे. एका आचमनामध्ये एखादा मनुष्य समुद्र पिऊन टाकतो याने आपण त्याच्या प्रेमात पडत नाही, भितीने दचकतो. कारण असला मनुष्य आम्हाला चालणार नाही. पण आपल्या तळपायाला जमिनीतून झऱ्याचा सुंदर गुदगुदल्या लागल्याचा नाही, आपल्याच कंकणाच्या एखादा विशिष्ट मण्याचा नाद एकाच वेळेला व्हावा आणि त्या मण्याचा नाद ऐकण्याच्यासाठी बाकीच्या माळेतील मण्यानी आपला नाद करू नये, तसा तळपायी जर झरा लागला माझ्या आईच्या सृजनशीलतेचे हे...

अनुक्रमणिका

हे... हे... हे झरे आहेत. आज ती कोसळलेली आहे. कारण... कारण

"त्याने यात्रेत भेटलेल्या कोण्या....
पोरीच्या देहाला दिले आभाळाचे बाहु"

मी बाळक्रिडा करून करून...

I want to save this great great great creative mother कारण I otherwise the dynastry I mean the travel of the dynestry will be incompleted त्यातली एक कडी निसटून गेली तर आमच्या या... या... family oriented या कुटुंबवत्सल काव्यगावातील, गोड गोंदणगावातील, सगळी आमची प्रजा किती हो ? चार माणसाची प्रजा, नष्ट होऊन आमचा बाळमुठीत मावलेला हा गोंदणगाव बेचिराख होऊन जाईल. बेचिराख होऊन जाईल आणि मग माझी आई कुठल्यातरी जुन्या झाडाला अशी कळवाळून मिळेल माझे वीर्यदाते कफल्लक झालेत. माझ्या वास्तवातले, माझ्या अतिवास्तवातले माझ्या अतींद्रिय दुनियेतले, एकही वीर्यदाता मला मिळत नाही म्हणून ती माझ्याकडे नजर टाकते. काय म्हणते ?

'देवाच्या गाण्याने दळणाला मोल चढे'

पण

'कोडाच्या हाताला हिरवे भरतात चुडे'

संपूर्णपणे कोड झालेल्याच्या-हिरवाकंच चुडा या विरोधाभासातून, या विरोधाभासाशी संगनमत करून ती विरोध जन्माला घालत नाही. ती काव्यानुभवाचा समन्वय जन्माला घालते. एक नवे समतेचे तत्त्वज्ञान जन्माला घालते आणि अशा माझ्या आईची फसवणूक मोहात अडकलेल्या एक प्रियकराने करावी. How to console her ? The first step is that how to console my mother, my physical mother. Then how to console my creative mother who is sitting by same shadow of my soul. कारण आत्म्याला हाडं नसतात. आत्म्याची फक्त छाया पडू शकते. त्या छायेत बसून ती विचारती कसं... मग मी तिची... तिची संभावना कशी करणार ? हे गोंदणगाव मी कसे वाचवणार ? त्यात फिरणारी रंगधून, तिच्या कळा, प्रत्येक अवकळा ज्यांची अगदी हमखासपणे शपथेवर...

मज आवडती गाईंचे डोळे व्याकुळ
घनगंभीर जलधीचेही असणार कुठेतरी मूळ

बाळा हे घनगंभीर जलधीचे मूळ कुठेतरी आहे रे ! ते मला कुठेतरी झुलुकीसारखे आता ऐकव ! आणि ढळलेली माझ्या देहाची दैहिक प्रतिष्ठा, आत्म्याची प्रतिष्ठा एकदा आणून माझे लुळेपांगळे चांदणे, माझे लुळे पांगळे चालणे हे पुन्हा झणझणून काढ. म्हणून मी म्हणतो-

चाफ्याच्या झाडापाशी
चाफ्याच्या झाडापाशी अंधार जसा गांधार निनादत येतो
चाफ्याच्या झाडापाशी अंधार जसा गांधार निनादत येतो
माहेर निळे कोणाचे
माहेर निळे कोणाचे चोळीत दुधाचा थेंब जसा तळमळतो

माझ्या आईचं माहेरही गेलं अन् सासरही गेलं

मर्ढेकर म्हणाले आहेत -

ऐशा टापूत चौफेर नाही सासरं माहेरं
कैचे गोत्र वा प्रवर अनामिका ?

इकडेही नाही तिकडेही नाही she has falled between deep and devil आणि आणि आणि... आणि कोसळायचे नाही आणि उसळायचेही नाही. मर्ढेकर म्हणालेच आहेत ना...

ऐशा टापूत चौफेर नाही सासरं माहेरं
कैसे गोत्र वा प्रवर अनामिका ?

बाईपणाचे आंतरिक वैभव गमावून पडल्याच्या नंतर बाईला माहेरच्या शिवाय सद्‌गती नाही. म्हणून बाईपणाच्या पुनःर्स्थापनेसाठी मर्ढेकरांनी फोडलेला हा आकांत आहे. माझी आई तिच्या प्रियकराच्या दगवणीतून सुटण्यासाठी, सुटका मिळविण्याच्यासाठी माझ्याकडे रडवेल्या नजरेने पाहते आहे. म्हणून मी तिला म्हणतो की -

माहेर निळे कोणाचे चोळीत दुधाचा थेंब जसा तळमळतो
माहेर तुला नसतांना...

कारण एका प्रियकराने दगलबाजी केली. दुसऱ्यानेही दगलबाजी केली आणि तुटलेले हात घेऊन तो समोर आला आणि त्या दोषाच्या पोटी, संमोहात मिळालेल्या क्षणाच्या प्रेयसीने नदीत जीव दिला तरी तिच्या पैंजणाची गुणगुण घेऊन तो आलेला आहे. हा धोका नाही. हा अभाव नाही. हा भाव नाही. एक धोका असता, भाव असता, अभाव असता, द्रोह असता तर एका गोष्टीचा त्याग करून दुसऱ्या भावात्मक गोष्टीला सामोरी जाता आले असते. इथे ती मधली अवस्था आहे ती मधली अवस्था...

ये ये बिजली राख कर जायेगी तेरे प्यार की दुनिया
न फिर तु जी सकेगा और न तुझको मौत आयेगी

अशा अवस्थेत ती सापडलेली आहे. ती गेली तर माझ्या सृजनाची चारगावातील, चार माणसाची, गोंदणगावची परंपराच संपूर्ण बेचिराख होते. आणि हे बेचिराखपण मला परवडणारे नाही म्हणून मी कनवाळू होऊन म्हणतो की

अनुक्रमणिका

माहेर तुला नसतांना
ओटीत कसा मी तुझ्या भरावा वारा
दुःखाचा जन्म घरा ये
आभाळ सोडता घुंगुर बनतो तारा

आभाळ सोडणारे सगळेच तारे घुंगुर बनत नाही पण आईने पुन्हा जी संकल्पना फेकली की बाळा तू हा प्रयत्न करून पहा. कदाचित तुझा सोडलेला तारा हा घुंगुर बनू शकतो. या दैवी शंकेने, या दैवी प्रक्षेपणाने माझ्या मनात भयाचे एक बालवादळ सुरू झाले. आणि मग मी म्हणायला लागलो की

"चाफ्याच्या झाडापाशी
अंधार जसा गांधार निनादत येतो
माहेर निळे कोणाचे...
चोळीत दुधाचा थेंब जसा तळमळतो"

पण पुन्हा शंका आली

माहेर तुला नसतांना
ओटीत तुझ्या मी कसा भरावा वारा
दुःखाचा जन्म घरा ये
आभाळ सोडता घुंगुर बनतो तारा

शेवटी हा सगळा खेळ अगदी बटबटीत आणि स्थूलमानाने बोलावयाचे झाले तर नर मादी यांच्यातील देहजाणिवेच्या आणि मानसिकजाणिवेच्या प्रेमाचा खेळ आहे. मग याचा अन्वय आपण लावणार कसा ?

मंजीले इश्कसे गुजरना तो आसान है इकबाल
इश्क एक नाम है खुद अपनेसे गुजर जाने का
इश्क एक नाम है खुद अपनेसे गुजर जाने का...

खरेतर मला सुमित्राबाईच्या प्राक्तनाची एक ललकारी ऐकू येत होती. काही जुन्या दिवसांचे स्मरण झाल्याच्यानंतर -

ती अशीच भटकत राहे
ती अशीच भटकत राहे
चांदणे जसे वेल्हाळ
पसरले तिच्या रोखाने
आभाळच रानोमाळ...

तिचे हे रानोमाळ भटकणे आणि रानात भटकल्याने आभाळानेच तिच्या शोधासाठी पुन्हा रान होऊन जाणे या... या भयाण शोकांतिकेने माझे सगळे भयाचे झरे पुन्हा विमुक्तपणे वाहायला लागले. आणि तिच्या निर्मितिसूक्तांची वंशवेल खरेतर माझ्या तळाहातावर ठेवण्याची तिची प्रयाणवेळ आली होती. तरी सगळे चंद्रबळ सगळे चंद्रबळ गोळा करून मी तिला म्हटले की -

वैराण दिशांचा जोग
वैराण दिशांचा जोग
चांदणे नदीच्या पाण्यावर निजलेले
तव हात उडोनी जाती
तव हात उडोनी जाती
जे ओल फुटाया तूच स्तनांवर धरले...
तव हात उडोनी जाती
जे ओल फुटाया तूच स्तनांवर धरले...
तव हात उडोनी जाती

शिल्पान्त खंड स्मरणाचा
निःसंग जोडिशी क्षितिज कशाला भगवे
हे जरी मिटे प्राणाने
सान्तातुन अवघे अस्त घेऊनी उगवे...
सान्तातुन अवघे अस्त घेऊनी उगवे...

आणि तिची प्राणज्योत मालवल्याच्यानंतर कधी वैराण तर कधी बहरलेल्या या 'चंद्रमाधवीच्या प्रदेशात' मला तिच्या हाका ऐकू येतात. भिरभिर पाहतो पण पळत नाही. मी पळत नसताना मात्र सुसाटपणे ती... ती माझा पाठलाग करते आहे.

मुलाखत :
शुभा गोखले
'इच्छापूर्ती',७९, अंनत पाटील रोड (उत्तर),
दादर (पश्चिम), मुंबई ४०० ०२८
दूरभाष : ०२२ २४६९७३८, भ्रमणभाष : ०९३२४६९७३८

शब्दांकन :
अनिल कुलकर्णी
शिरे ले-आऊट, शास्त्री नगर,
यवतमाळ ४४५ ००१
भ्रमणभाष : ७५८८१८८४७३

जुलै - ऑगस्ट - सप्टेंबर २०१२

युगवाणी


।। ग्रेस विशेषांक ।।

पुरातून येती तुझे पाय ओले
किती अंतराळे मधे मोकळी
महाद्वार जेथे तुझी लाज प्याया
उभ्या कुंपणाने तिथे बाभळी

जिथे पोचती ना कधी शब्द माझे
असे नृत्यगारातले चांदणे
दरीच्या तळाशी जसा सूर जावा
तसा देह घासून छंदावणे

विराटात भक्ती तमाचा दिलासा
गळे मृत्यु दुःखातुनी सारखा
तुझा नृत्यगांधार वेचावयाला
रडे मंद धारेत की पारवा...


दूरात माझी ढळे कृष्ण छाया
जसा कर्ण कुंतीत सामावला
तुझ्या तीक्ष्ण हातांत माझी अहंता
तिघे अंत प्रारंभ गे कोठला?



चित्र : शुभा गोखले

अनुक्रमणिका

जुलै - ऑगस्ट - सप्टेंबर २०१२
युगवाणी
।। ग्रेस विशेषांक ।।



चित्र : शुभा गोखले

त्या दाट लांब केसांचा
वाऱ्यावर उडतो साज
दुःखांत अंबरें झुलती
कीं अंग झाकते लाज....

तरि हळू हळू येते ही
संध्येची चाहुल देवा
लांबती उदासिन क्षितिजें
पाण्यांत थांबल्या नावा....

देहास आठवे स्पर्श
तूं दिला कोणत्या प्रहरीं
कीं धुकें दाटलें होतें
या दग्ध पुरातन शहरीं....

सुख असें कळींतुन फुलतें
व्यापतो वृक्ष आभाळ
छायाच कशा दिसती मग
आपुल्यापरी खडकाळ

आटलें सरोवर जेथें
का मोर लागतो नाचूं?
तू सोड ऊर्मिले आतां
डोळ्यांत बाधिला राघू....

अनुक्रमणिका

॥ मुलाखत ॥

रांगोळी टिंबांची कहाणी

डॉ. नंदकुमार मुलमुले :

प्रख्यात पाश्च्यात्य कवी, जर्मन कवी रील्केने सॉलीट्यूडचा म्हणजे एकांतवासाचा क्रिएटिव्हीटीशी म्हणजे निर्मितीशी एक संबंध अधोरेखित केलेला आहे. तर मला असं विचारायचं आहे की तुमच्या निर्मितीसाठी या एकांतवासाचा किंवा एकांताचा कितपत उपयोग होतो? जो तुम्ही तुमच्यावर त्या निर्मितीसाठी लादून घेतलेला आहे का ?

ग्रेस :

डॉक्टर, आपण मला जो आत्ता प्रश्न विचारलेला आहे, तो तळागाळाचा जो सूर माझ्या दृष्टीने तळामूळाचा प्रश्न आहे. माझ्या कवितेची त्वचा ज्यावेळी मी उसवण्याचा प्रयत्न करतो आणि आतली अतींद्रिय सभा जी आहे तिला निरखून पाहण्याचा ज्यावेळेला मी प्रयत्न करतो, त्यावेळेला एकांत एकाकीपणा आणि एकटेपणा ही त्रिवेणी मला दिसू लागते. पण एवढे बोलून काही या कवितेची बेसरबिंदी आपल्याला नाकातून काढता येणार नाही किंवा नाकातील डंखाच्या मोरणीपासून ते माझ्या हाडाच्या छातीवर रूळणाऱ्या चिमुकल्या रूद्राक्षाच्या माळेपर्यंतचाही प्रवास मला करता येणार नाही. त्याचे कारण स्पष्ट आहे. की निर्मितीच्या अवस्थेत असतानाची माझी अवस्था आणि मला असा क्षणभर भास होतो की मी निर्मितीच्या अवस्थेतून पूरेपूर बाहेर आलेलो आहे आणि आता मी निर्मितीकडे, स्वतःच्या निर्मितीकडे तटस्थपणे पाहतो आहे. पण हा भासच असतो. माझ्या दृष्टीने एक अधोरेखीत करण्यासारखी गोष्ट याठिकाणी मला जाणवते आहे की माझी निर्मितीतील अवस्था आणि नंतर स्वतःच्याच निर्मितीचा आस्वाद घेताना होणारी अवस्था, ही एकाच अवस्थेची दोन टोके आहेत. त्यामुळे मला... खरी गंमत तर कशी आहे की मी माझ्या कवितेचे मूल्यमापन करण्यासाठी बसलो नाही. That is none of my bussiness. Here I have come not to display but to release myself for my own sake. त्यावेळी मला असं वाटते की माझ्या दोन कविता आहेत. एका कवितेचे शीर्षक... खरेतर माझं पुस्तक तथाकथित कवितांचे असो की ते कसलंही असो, त्याची सुरूवात मुखपृष्ठापासूनच होत असते. त्याच्या चित्रापासून होत असते. त्याच्या प्रत्येक पेपरबांधणीपासून, त्याच्या अक्षरापासून, त्याच्या मांडणीपासून, कवितेच्या लयाचा परीसर आपोआप साकारत असतो. याचा गैरसमज आपण करू नये की मी माझ्या कवितेला या परिसराचे गोंदण देत असतो. नव्हे. एखाद्या सजीव गर्भालाच आपोआप अवयव फुटत जावे, त्याप्रमाणे हा परिसर आहे. तो कुठल्याही प्रकारची

अनुक्रमणिका

शृंगारबाजी किंवा आतषबाजी करण्यासाठी येतो असे नाही. म्हणून 'एकांतकृष्ण' नावाची माझी एक कविता आहे. त्या शीर्षकाकडे आपण थोडे काळजीपूर्वक पहा. एकांतकृष्ण. एकांत कृष्ण असा नाही आहे. एकच शब्द तो केलेला आहे आणि त्यावर आलेली कवितासुद्धा त्याच क्रमाने ती आलेली आहे. म्हणून मी त्याला महीरप म्हणत नाही. त्याला शृंगार म्हणत नाही. असले तर बरेवाईट ते त्या कवितेचे अखंड अवयव आहेत. Burns of the silver bells are already pointed out चांदीच्या पोळण्याच्या जखमांचा उल्लेख आहे. त्याला मी Burns म्हटलेले आहे. जळल्यामुळे झालेली चांदीची जखम. जळल्यामुळे, पोळल्यामुळे. Burns of the silver bells are already pointed out. But there is... there is... there is no flag on the island. एकांतकृष्ण... एकांतकृष्ण

''संध्याकालीन धूळ मी उडविली शब्दांध ग्लानीमुळे''

शार्दुलविक्रिडीत आहे. अगदी आपल्या छातीचा भाता आणि फुप्फुसामध्ये किती हवा आहे याचा अंदाज घेणारी लय ही शार्दुलविक्रिडीताची गंमत आहे. १२-७. १२ वर थांबायचं. ७ वर थांबलं. यती घेऊन तर असं वाटतं की समाप्ती झाली आहे. पण नंतर दुसऱ्या ओळीच्या उगवतीचे आमंत्रण आपल्या हृदयासमोर थेट येऊन उभे राहाते. म्हणजे मी या पद्धतीने कदाचित माझ्या कवितेचा आस्वाद मी घेतलाय. पण माझ्या रसिकालासुद्धा यातून जर काही मार्गदर्शनाच्या खुणा मिळत असतील तर हे ही नसे थोडके.

संध्याकालिन धूळ मी उडविली शब्दांध ग्लानीमुळे
प्राणांची अपरात्र जो उजळतो तो सावलीने गळे
भासांची अभिशापबद्ध किरणे त्यांना नसे सारणी
एकांतातूनी एक अश्व बघतो ते कावळ्याचे तळे...

एकांतकृष्ण आणि कावळ्याचे तळे म्हटल्याबरोबर आपल्या डोळ्यासमोर कुठलाही संवेदनशील रसिक असेल तर त्याला महाभारताच्या अखेरीच्या दृश्याचा सुगावा लागेल. महाभारताची अखेर म्हणजे एका परिपूर्ण पूर्णपुरूष कृष्णाच्या महानाट्याचा शेवटचा अंक नव्हे. या ठिकाणी अस्तच बेभान झालेला आहे. जणू काही अस्त बेभान झाल्याच्या नंतर अस्ताला पुन्हा उगवतीचे आमंत्रणच नाही आहे. जीवनाचा समग्र कालखंड नष्ट झालेला आहे आणि त्या नष्ट झालेल्या प्रत्येक पिंडाला एकेक कावळा शिवणार आहे. म्हणून -

'एकांतातूनि एक अश्व बघतो ते कावळ्यांचे तळे...'

धारातीर्थी पतन पावलेल्या देहांची मोजदाद करण्याची जबाबदारी एका एकट घोड्यावर सोपवण्यात आलेली आहे. कारण महाभारताची अखेर म्हणजे सगळ्या एकमेकांच्या बाहुपाशात, अंतर्पाशात गुंतलेल्या ज्या व्यामिश्र नवीन जीर्ण शीर्ण पेशी आहेत त्यांची सोडवणूक असा मला एक अर्थ याठिकाणी लागतो आहे.

मेघांचे... मेघांचे अभिराम रूप गळले उत्कंठ देहावरी

त्यावेळचा निसर्ग, त्यावेळचं आभाळ. मी नव्हतो त्यावेळेला. व्यासही त्यावेळेला नसतील पण क्रिएटिव्हीटीची एक सोय आहे. सृजनशीलतेचं राज्य हे समग्र करूणेनी भरलेलं आहे आणि तिला स्वतःचेच नियम असल्याच्यामुळे कोणत्या काळात कोण असावे आणि कोणत्या काळात कोण नसावे हा हेका याठिकाणी तुम्हाला अवरूद्ध करू शकत नाही. म्हणून म्हणायचे -

मेघांचे अभिराम रूप गळले उत्कंठ देहावरी
चांदीच्या समईत सूर भरते श्वासातली बासरी
चांदीच्या समईत सूर भरते श्वासातली बासरी
जे जे सत्य... जे जे वृत्त फुलात सत्य बघते.

जे जे वृत्त फुलात सत्य धरते ती दर्पणाची तऱ्हा;
जे जे वृत्त फुलात सत्य धरते ती दर्पणाची तऱ्हा;
संभोगातुन घार हाय! रडते अश्वत्थ- पारावरी

विनाशाचा कडेलोट झाला तरी सृजनाच्यासाठी आकाशात तडफडणारी ही घार मला त्या अखेरीस दिसते. आणि मग तो पूर्णपुरूष आपल्या मरणपारध्याला त्याचे भक्ष्य सोयीचे जावे म्हणून आपल्या करूणेचे सगळे कैफ, उन्माद, माद पणाला लावून, पायावर पाय ठेऊन, बाणाला व्याधाची, व्याधाला बाण रोवण्याची संधी देतो. ती उपस्थिती त्याला उपलब्ध करून देतो.

घोड्याला घनश्याम दूर दिसला...

ज्या घोड्याच्याद्वारे पार्थाचे त्यांनी सारथ्य केले, त्या घोड्यालाही एकटं व्हावं लागलं. महाभारताचा शेवट म्हणजे एका जीवनाच्या कालखंडाचा शेवट आहे. तो संपूर्णपणे तपासून घेतल्याच्या शिवाय नव्या येणाऱ्या जीवनाच्या सृजनाला आपण हलकीही साद देऊ शकत नाही कारण विनाशाची संपूर्ण पाहणी केल्याशिवाय विनाशाची पुनर्बांधणी करताच येत नाही. आणि एका युगाचा कालखंड हा जर विनाश असेल, तर त्याच्या पुनर्बांधणीसाठी पुन्हा एका कालखंडाची गरज आहे. हा पट मी तुम्हाला दाखविण्याचा प्रयत्न करतो. आणि याला शीर्षक आहे एकांतकृष्ण. आणि तोही काही प्रदर्शनवादी रहदारीच्या मार्गात मी दाखवत नाही. कारण मी म्हटलं आहे... Burns of the silver bells are already pointed out, But there is no flag on the island... बेटाने

आपल्या डोक्यावर पट्टी लावावी की मी बेट आहे असा तो अखेर नाही आणि जीवन तसे नाही आहे. म्हणून तो घोडा कृष्णानेच मोकळा केला की मला आता युद्ध पाहायचे नाही. युद्धाच्यानंतर एका महा... महापटाचा जो सत्यानाश झाला त्या सत्यानाशाला याठिकाणी, सत्याचा नाश नाही, माझा सर्वनाश गोड झाला ही फिरकीची आतली धुंदीची लय आहे, या शोकांतिकेच्या पटाच्या सूत्रामागे. म्हणून घोडा आणि घनश्याम विभक्त आहे.

'घोड्याला घनश्याम दूर दिसला बेभान अस्तापुढे' तरीही प्रश्न आहे - अस्तालाच भान राहिलेले नाही कारण याच्यानंतर अस्तही नाही आणि याच्यानंतर उगवती नाही 'घोड्याला घनश्याम दूर दिसला बेभान अस्तापुढे'

''अंतर्नाद मुळात गूढ असती ते भासती ते तडे''

आता पूर्णपुरूष कृष्णाला हे कोण सांगत असणार ?
पूर्णपुरूष कृष्णाची समज !

''घोड्याला घनश्याम दूर दिसला बेभान अस्तापुढे''

कारण

''अंतर्नाद मुळात गूढ असती...''

अभंग ! गूढ म्हणजे याठिकाणी मिस्ट्री नव्हे.

''अंतर्नाद मुळात गूढ असती जे भासती ते तडे
ये ये रे सुनसान भव्य पुरूषा...''

कोण करत असेल ? व्यास गेले, सगळे गेले, द्रौपदी नाही. कोणी नाही. ज्या द्रौपदीचा कृष्णाला आधार होता, फार धक्कादायक पण गोड विधान आहे माझं. पूर्णपुरूष... द्रौपदीच्या तिच्या अभंग स्त्रीत्वाचा आधार होता म्हणून मीच म्हटलं आहे ना.

'वस्त्रात द्रौपदीच्याही तो कृष्ण नागडा होता'

आणि तोच कृष्ण

घोड्याला घनःश्याम दूर दिसला बेभान अस्तापुढे
अंतर्नाद मुळात गूढ असती जे भासती ते तडे

माझ्यासारखा छोटा कवी पण सृजनशील. I am small but not less Mr Mulmule. I am small मी कृष्णाला म्हणतोय. माझ्या सृजनशीलतेच्या प्रदेशातून मी मोडलेल्या, तोडलेल्या, उंचावलेल्या ज्या काही हाका आहेत त्याची बेगमी या पूर्णपुरूषाच्या समाधानासाठी मी इथे आणिन आता हा अर्थ मला स्फुरतो आहे.

घोड्याला घनश्याम दूर दिसला बेभान अस्तापुढे
अंतर्नाद मुळात गूढ असती जे भासती ते तडे

And I am just approaching to greet him to console him. कदाचित मला जमले तर कृष्णाच्या पाठीवर मी माझ्या बाळकृष्णाचा हात फिरवल्याशिवाय राहाणार नाही.

'ये ये रे सुनसान भव्यपुरूषा...'

त्याचं स्वागत करतो आहे -

'ये ये रे सुनसान भव्यपुरूषा...'

घावरू नकोस

'माझा न तू सारथी'

मी अर्जुनाचा हट्ट घेऊन येत नाही आता. I am approaching to you my Lord Krishna as a poet of smaller wing but complete wing

ये ये रे सुनसान भव्यपुरूषा माझा न तू सारथी
माझ्याही स्मरणात आज टिचले मेल्या सतीचे चुडे...
माझ्याही स्मरणात आज टिचले मेल्या सतीचे चुडे...

आणि पहिली सती तर सुमित्राबाई आहे नंतर मग नंतर महाभारतातल्या सतींची मोजदाद केल्यानंतर कावळ्याकडे कोणत्या आणि हिच्याकडे कोणत्या याचं वर्गीकरण करता येईल.

कलावंताच्या विजनवासी एकांताची थोडीशी ओळख करून दिल्याच्यानंतर एकांतकृष्ण या प्रतिमेतून निर्मितीला पोषक होणारे जे संसूचन मिळते आहे त्याची थोडीशी मला कल्पना आलेली आहे. कदाचित या माझ्या विवेचनातून त्यांना थोडी मदत झाली तर बघावे. घोडा... पिंडप्रमादाचे कावळे... त्यांनी तुडुंब त्यांचे भरलेले तळे... आता पूर्णपुरूष युगपुरूष आणि ज्याला मी निर्मितीचे प्रतिक म्हणतो अशा कृष्णाच्या निर्वाणाची वेळ येऊन ठेपलेली आहे. निर्वाण साधे असो, राजाचे असो, भिकाऱ्याचे असो ते दुःखद असणारच. कारण ताटातूट आणि वियोग म्हणजे प्राण, आत्मा आणि कुडी यांची फारकत. मी ती मानत नाही माझ्या निर्मितीच्या क्षेत्रात. पण याठिकाणी कृष्णाच्या प्रयाणाचा मी कौल सांगण्याचा प्रयत्न करतो आहे. आणि मला असे दृश्य दिसते आहे की व्याधाला कृष्णाच्या तळपायाला बाण मारावयाचा असल्यामुळे त्याला ज्याप्रकारच्या आकृतिबंधाची गरज आहे. तो आकृतिबंध आपोआप आपला पाय दुसऱ्या पायावर घेऊन (ठेऊन) व्याधाला त्यानी उपलब्ध करून दिलेला आहे. कदाचित कृष्ण असे तर म्हणत नसेल...

माझे लबाड पाखरू
माझे लबाड पाखरू
तुझा पारधी शहाणा

माझे लबाड पाखरू
तुझा पारधी शहाणा
युद्ध लादून कृष्णाला
युद्ध लादून कृष्णाला
करी जोगियांचा राणा
करी जोगियांचा राणा

आणि या जोगियांचा राणा, सम्राट, राजा असलेला कृष्ण हा एकांतस्वरूपात आपण पाहिलेला आहे. आता याच्या अंतरंगातील कृष्णएकांताकडे आपण वळू या. ज्या लोनलीनेसमधून, ज्या एकाकीपणातून सृजनाचा हा प्रवास झाला आहे, या प्रक्रियेतील 'एकटे' होण्याची निर्मात्याची प्रक्रिया आपल्याला याठिकाणी पहायला मिळेल. म्हणून प्रारंभीच या कवितेचा एक उद्‌घोष आहे.

"Oh my destructive shepherd !
Don't increase my speed
In the compassionate trance of twilight"

तिच्या अंगणातील प्राजक्त बंदी तरी सत्यभामे ढळे तोल का?' त्यानी निवाडा करून दिला ''फुले का गळती शेजारी'' वृक्ष तू घे फुले तिला दे. फुले ती घेत नसे. म्हणजे एकीला मूळ मिळाले दुसरीला फुले. पण त्या बायका... दोन्ही याला... अखंडपणाची ही झुंज आहे. प्रारंभी आपल्याला हा सवतीमत्सर वाटतो. त्याचा प्रारंभ हा सवतीमत्सरात असला तरी प्रत्येकाला मूळ, झाड, फुले, सगळ्या शाखांचा एक एक अवयव तोडून कुठल्याही किरकिऱ्या पिंडाचे याठिकाणी सांत्वन करता येतच नाही म्हणून या कृष्णएकांताची चौकशी कशी केली ?

तिच्या अंगणातील प्राजक्त बंदी
तरी सत्यभामे ढळे तोल का?
तिच्या अंगणातील प्राजक्त बंदी
तरी सत्यभामे ढळे तोल का?
झाडाप्रमाणे असे झाड हेही
झाडाप्रमाणे असे झाड हेही
असे सागंते ती, तरी हुंदका ?
असे सांगते ती, तरी हुंदका ?

इथे बासरीच्या गडे आतड्याला
इथे बासरीच्या गडे आतड्याला
इथे बासरीच्या गडे आतड्याला
हवा चंदनी लाकडाची नवी;
इथे बासरीच्या गडे आतड्याला
हवा चंदनी लाकडाची नवी;
तुला रूक्मिणी का फुले वेचतांना
सुगंधातही भेटते वाळवी ?

तुला रूक्मिणी का फुले वेचतांना
सुगंधातही भेटते वाळवी ?

संहार आता करा यादवांचा...

सवतीची मत्सरं, भांडणं मिटवतांना एकदम टोकाची भूमिका पूर्णपुरूषानी घेतलेली आहे.

'संहार आता करा यादवांचा
जुनी राजधानी निनावी करा
संहार आता करा यादवांचा
जुनी राजधानी निनावी करा
रथाला कुणी अश्व देऊ नका अन्
शिरच्छेद माझे कसेही करा'

कृष्ण म्हणतो आहे कारण

वैराण आयुष्य झाले तरीही
वैराण आयुष्य झाले तरीही
फुलांना कधी बोल देऊ नये;
मी बांधिलेल्या ऊन्हाळी घरांच्या
गवाक्षातला चंद्र झाकू नये.

नको धाक घालू नको हाक तोलू
नको धाक घालू नको हाक तोलू
इलाख्यातली गुप्त झाली नदी;
निजेच्या भयाने जसा शुभ्र होतो
खुनाच्या कटातूनही गारदी...

तिथे कृष्णएकांत देठात प्राजक्त

फुलात नाही तिथे... कृष्ण... तरी मुळात आहे बेस... बेस

तिथे कृष्णएकांत देठात प्राजक्त
राधेस हा रंग येतो कसा ?

भांडण नाही मला पारिजात मागत नाही काही नाही. आणि तिने... जर कृष्णानी तिच्यावर काही गडबड करण्याचा प्रयत्न केला असता तर मुस्काटात एक दिली असती. गवळ्याच्या पोरा, त्या तुझ्या दोन राण्या आहेत त्यांचे गाल सुजवून ये.

तिथे कृष्णएकांत देठात प्राजक्त
राधेस हा रंग येतो कसा ?
सर्वेश्वराला कधी या मुलीने
न मागीतला रे तिचा आरसा...
न मागीतला रे तिचा आरसा...

कृष्णएकांत या स्वरूपाचा आहे. निर्मितीची प्रक्रिया संपूर्णपणे गेल्यानंतर... म्हणजे असं की निर्मिती ही संपूर्ण आकृतिबंधात एकदा पकडल्याच्यानंतर कलावंताची अवस्था ही अशी होत

असते. त्याचं शिखरस्थान हे आहे.

इथे कृष्णएकांत देठात प्राजक्त...

इथे मूळही नाही, फूलही नाही, फुलांची भांडणं संपली आहेत. कारण

वैराण आयुष्य झाले तरीही
फुलांना कधी बोल देऊ नये;
मी बांधिलेल्या ऊन्हाळी घरांच्या
गवाक्षातला चंद्र झाकू नये.
तिथे... तिथे कृष्णएकांत देठात प्राजक्त
राधेस हा रंग येतो कसा
सर्वेश्वराला कधी या मुलीने
न मागितला रे तिचा आरसा...

कवीच म्हणू शकतो राधेला मुलगी. दुसरं कोण म्हणू शकतो?

डॉ. मुलमुले :

तुमची कविता जितकी सौंदर्यलक्षी शब्दांसाठी प्रसिद्ध आहे आणि रसिकांना ती मोहवते तितकचं तिचं एक महत्त्वाचं वैशिष्ट्य म्हणजे ती वृत्तांचं बंधन घेऊन जन्माला येते. तर मला असा एक प्रश्न विचारायचा आहे की तुमच्या कवितेमध्ये craftsmanship चा भाग किती आहे? त्याच्यावर तुम्ही सुचल्यानंतर तो अनुभव शब्दात मांडायला त्याच्यावर कारागिरी करता का?

ग्रेस :

आपण प्रश्न फार नेमका आणि मार्मिक विचारला डॉक्टर. त्याचं मला याक्षणी असं उत्तर स्फुरतं की व्याकरणकार किंवा भाषापंडित यांच्यामुळे भाषेची वाढ आणि भाषेचा विकास होत नाही. म्हणजे याचा अर्थ त्यांचे त्या भाषेच्या क्षेत्रातील स्थान नगण्य आहे असे मी म्हणत नाही. भाषेतला कलावंत ज्यावेळेला आपली निर्मिती करतो, त्यावेळेला व्याकरणकारांनी, व्याकरणातल्या पंडितांनी आणि जीवन व्यवहारातील माणसांनी वापरलेली भाषाच तो वापरतो. पण ज्या स्वरूपात ती वापरून वापरून उपलब्ध झालेली असते ते उपलब्ध स्वरूप तो स्वीकारीत नाही तर आपल्या अनुभवाच्या मांडणीसाठी तो त्याच्या भाषेची काव्यनिष्ठ पुनर्घटना करीत असतो. त्यामुळे मग त्याला भाषेची अडचण जाणवत नाही. व्यवहारामध्ये एखादा शब्द कोणी वापरला असेल, जसं उदाहरण... सरण जळतं आहे. यात काहीच मजा नाही सरणही आहे आणि जळणंही आहे. आणि आपलं जेव्हा येईल तेव्हा येईल पण इतरांचं तर जळतांना आपण फार उत्साहाने पाहात असतो आणि स्मशानवैराग्याची बाळवाटी घेऊन घरी येत असतो. हे सगळ्यांनाच माहीत आहे. पण

'एका कुशीसाठी
एका कुशीसाठी एकाचे निजणे
बाकीची स्मरणे स्मशानात'

म्हटल्यानंतर व्यवहारात वापरून आपल्या मुद्रेवरच्या सगळ्या खाणाखुणा हरवून गेलेला शिक्का पुन्हा कलदार करून नव्या मुद्रेनीशी तो कवी तयार करीत असतो. कारण तो प्रतिमांची भाषा वापरतो आणि प्रतिमांचा अर्थ शोधण्याच्यासाठी त्या भाषेतील शब्दांचे अर्थ मुकर्रर करण्यासाठी आपल्याला कोणत्याही प्रकारचा शब्दकोश उपलब्ध नाही. कारण कवीनी आणि कलाकारानी जी प्रतिमासृष्टी निर्माण केलेली असते ती त्याच्या भावनुभूतीतून निर्माण झालेली असते ! आणि त्या भावानुभुतीचे संयोगमीलन तो जीवनाच्या अनुभवाशी करून देत असताना जीवनाचीच पुनर्निर्मिती करीत असतो. म्हणून जीवनात त्याची उत्तरं सापडणार नाही. ती कवीच्या भावानुभूतीत सापडतील आणि त्यामुळे भाषेची मर्यादा जाणवणार नाही. अर्थात कवीच्या प्रातिभिक उंचीवर, कवीच्या प्रातिभिक शक्तीवर हे सगळे ताल तोल अवलंबून असतात आणि आपण मला सुरूवातीला एक चांगला प्रश्न विचारला की रामायण आणि महाभारत... रामायण आणि महाभारत... विशेषतः महर्षी व्यास यांचा माझ्या तथाकथित प्रतिभेवर, माझ्या चालण्यावर, माझ्या बोलण्यावर, माझ्या अंगाअंगावर इतका काही परिणाम झालेला आहे, त्यामुळे माझ्या कवितेचे जे बाह्यस्वरूप आहे, तिच्या रचनेचा जो डौल आहे, तिची बांधणी आहे, तिचा जो घाट आहे, तो निसर्गदत्त घाट आहे. त्यामुळे त्याला सरळसरळ कोणी Craftsmanship म्हणू शकणार नाही. Craftsmanship always deals with the rank and my style are external form of my poetry, takes you directly to the range त्यामुळे त्याला craftsmanship म्हणता येणार नाही. craftsmanship म्हणण्यापेक्षा आपण त्याला कारागिरी म्हणू या. पण कारागिरी या शब्दाला सुद्धा काही फारसा चांगला अर्थ आहे असे मला वाटत नाही. तर आपण असं म्हणू या की, निर्मिती पूर्ण झाल्याच्यानंतर त्या कवितेवर काही आपण उत्तरसंस्कार करतो काय? म्हणजे असं आहे ना साधारणपणे थर्डक्लास म्हटले की वाईट वाटतं. आपण कुठे बसलात? मी तृतीय श्रेणीत बसलो असं म्हटलं की जरा जीव सुखावतो. पण असतं तेच. खरं उत्तर असं आहे, असा भास माझ्या कवितेच्या बाबतीत निर्माण होण्याचे कारण असे आहे की ज्यावेळेला ती उत्स्फूर्तपणे बाहेर येते त्यावेळेला ती आपल्या अनुभवाचा निसर्गदत्त घाट घेऊनच जन्माला येते. म्हणजे असे की, ज्या प्रकारचा, ज्या जातीचा, ज्या कुळाचा तो अनुभव असेल, ज्या कुळाचा तो श्वास असेल, ज्या इयत्तेची ती

मांडणी असेल, त्याप्रमाणे भाषेला ती तो अनुभव स्वतःचाच आकार देतो. याचे एक साधे जर उदाहरण द्यायचे झाले- मनुष्यजात, प्राणीजात, सर्व सृष्टी ही कुठेतरी नर मादी यांच्या संयोग... संयोगातून, मीलनातून, उत्पत्ती आणि लय अशी साधत जाणारी घटना आहे. हे विश्वात्मक सत्य आहे, मनुष्यजातीच्या विषयी. हे निसर्गातही आहे. आणि माणसाचे तर ते व्यवच्छेदक लक्षण आहे. अशाच अनुभवाचे हे चित्रण आहे. त्यामुळे... प्रत्येक... हातच्या कांकणाला आरसा नाही असत. सृजनाचा, मीलनाचा किंवा बीज पेरणीचा अनुभव नर आणि मादी यांच्या शारीरिक संमीलनाचा अनुभव आहे.

अंगोअंगी पाजळले
केशरांचे दिवे
अंगोअंगी पाजळले
केशरांचे दिवे
अंधारात दिसे गाव
तृष्णेकाठी नर्वे
अंगोअंगी पाजळले
केशरांचे दिवे
अंधारात दिसे गाव
तृष्णेकाठी नर्वे
देह ओंवू जाता जडे
अंबराचा मणी

कारण हे जनावराचे सृजन नाही आहे. हे मनुष्यत्त्वाकडे जाऊ पाहणाऱ्या, मनुष्यत्वाच्या दिशेने वाटचाल करू पाहणाऱ्या मानवी नरमादीचे मीलन आहे. त्यामुळे याला प्रदर्शनाची भूमिका येणार नाही. याला श्लीलतेची भूमिका येणार नाही. याला अश्लीलतेची भूमिका येणार नाही. याला मानवतेचं किंवा मानवीय मूल्यांचे कोंदण द्यावं लागतं. या अनुभवाचं जर माणूस उदात्तीकरण करू शकला नाही तर, जनावराचे संमीलन आणि माणसाचे संमीलन याच्यातली सीमारेषा नष्ट होईल. कुठल्याही भाषेचा, संस्कृतीचा ज्यावेळेला विनाश होत असतो, त्यावेळी मानवी संमीलनाचे संभोग हे जनावराच्या पातळीवर आलेले असतात. ते नीतिनियमांनी नुसते उत्कट होत नाहीत. त्याचे I mean to say ethical cry within it already destroyed म्हणून मग याला कुठले तरी तारण याला कुठलातरी दिलासा द्यावा लागतो.

अंगोअंगी पाजळले
केशरांचे दिवे
अंधारात दिसे गाव
तृष्णेकाठी नर्वे
देह ओवू जाता जडे
अंबराचा मणी
अजाणाचा संग माझा
पांडुरंग धनी
अजाणाचा संग माझा
पांडुरंग धनी

नरमादीच्या शारीरिक संमीलनाचे सर्व उत्तरदायीत्व देवावर टाकल्याच्या नंतर आपणच सांगा डॉक्टर या अनुभवाची इयत्ता, गुणवत्ता आणि मूल्यभावना वाढली ना ?

डॉ. मुलमुले :

सर, तुमच्या कवितांमध्ये, सर्वच लेखनांमध्ये वारंवार संध्याकाळचे उल्लेख येतात. तर संधिकालाचं आणि तुमच्या कवितांचं इतकं जवळच नातं वाटतं आंतरिक नातं वाटतं उदाहरणार्थ -

कळ्या मेंदु पाणी हिमनग तसा शुभ्र हलला
कसा संध्याकाळी सहज मजला शब्द स्फुरला

किंवा दुसरी एक कविता आहे

संध्याकाळी हाकेमध्ये मूक उभे रे कोणी
या हाडांच्या कुशीत व्हावे आज त्वचेचे पाणी
संध्याकाळी माझ्याजवळी सर्व देऊळे जमली
तरंग पसरून रंग दिशेने क्षितिज उतरते खाली

किंवा "जेव्हा संध्याकाळच्या सावल्या झडू लागतात, काळोखाचे नादवाही प्रवाह चढू लागतात तेव्हा आपल्या मनात लांबच लांब पसरलेले निर्मनुष्य रस्तेही हळूहळू जुळू लागतात" अशा असंख्य रचनांमध्ये संध्याकाळचे हे संचित तुम्ही ओतलेले आहे. तेव्हा संधिकालाचं आणि तुमच्या निर्मितीचं हे आंतरिक एक संबंध आहे, एक महत्त्व आहे हे तुम्ही विशद करून सांगाल का ?

ग्रेस :

आपण फार मार्मिक प्रश्न विचारला. संध्याकाळचा आणि माझ्या निर्मितीचाच फक्त संबंध नाही. माझ्या देहपिंडामध्ये आणि आत्मपिंडामध्ये जी कोणती एक सीमारेषा उभी आहे ती संधिकालच्या प्रदेशाची आहे. आणि काट्याने काटा काढून जर म्हणावयाचे झाले तर या एका सूफी प्रार्थनेचा मी उल्लेख करेन.

मरिजे मोहब्बत... मरिजे मोहब्बत उन्ही का फसाना
सुनाता रहा दम निकलते निकलते
मगर जिक्र शामें (शाम ए) अलम जब भी आया
मगर जिक्र शामे अलम जब भी आया
चराँगे सहेर बुझ गया जलते जलते

अनुक्रमणिका

मला अस वाटतं डॉक्टर, की देवाकडून आणि निसर्गाकडून प्रत्येक व्यक्तीला काहीतरी दान मिळत असते आणि ते दान गोळा करून, जीवनाशी त्याचा संबंध जोडून, कधी विलग होऊन, कधी सलग होऊन माणूस आपला जीवनप्रवाह पुढे नेत असतो. मला निसर्गाकडून जे दान मिळालेले आहे, ते संध्याकाळ नाही, संधिकाल आहे. And remember that की हा जो संधिकाल आहे, हा प्रकाशाचा अभाव नाही. पुढे जर म्हणायचे झाले तर मी असं म्हणेन की an evening is also a twilight. संधिप्रकाशाचा हा प्रदेश आणि माझी काव्यप्रकाशाची आणि जीवनप्रक्रियेची क्रियाच मुळात अशी आहे की, In the ... in the morning I get up and start my working. Working means what ? माझी कर्मशैली मी पडताळून पाहात जगत असतो. आणि कर्मशैली ज्यावेळी मी पडताळून पडताळून पडताळून जगत जातो. त्याचवेळी एका नाण्याची दुसरी बाजू म्हणून माझी निर्मितिशैली त्या कर्मशैलीला कधी विन्मुख तर कधी अभिमुख होत जात असते. आणि मी विश्रांत होण्यासाठी दमतो. किंवा दमल्यानंतर विश्रांतीची मला ओढ लागते.

''मी ही विश्रामाच्या वेळी थोडे मागितले पाणी
मी ही विश्रामाच्या वेळी थोडे मागितले पाणी
गंगा साखळीचा मासा हळु वाळुवर आणी''

तुकारामबुवांनी काय म्हटले आहे

''जीवनावेगळी मासोळी तैसा तुका तळमळी''
... ...
''मी ही विश्रामाच्या वेळी थोडे मागितले पाणी''

आणि गंगा काय करते ?

''गंगा साखळीचा मासा हळु वाळूवर आणी''

म्हणजे माझी तहान विझवण्यासाठी पुन्हा तृप्ती म्हणून, माझा अनुभव, माझा काव्यानुभव मला तृप्तीची तडफड परत करतो आणि हे तडफडीचे दान मला संधिकालात मिळालेले आहे कारण My work of day is over and I feel fatigue I feel tired and depending to my dream, depending to my dream, for what... not for sagacity. In the play of the life, right from the morning till the evening, I was playing, I was playing with my toys and my toys are scattered in the dream. So I go there at the gate of an evening. I go there But I don't bow down the dream because I don't want to... I dont want to become a sage, that is not for the sake of sagacity. तपश्चर्येकरिता मी जात नाही. त्याचप्रमाणे मी कपटकारस्थानांची पुनर्बांधणी करण्याकरिताही जात नाही. त्यामुळे गुहेच्या आत शिरल्याच्यानंतर गुहेच्या दाराला कडी घालत नाही. Because I have to rearrange my scattered toys and then evening is just knocking on the open door of the door. हे संधिकालाचे आणि माझे देणे आहे. माझ्या तथाकथित गद्यलेखनात असो, माझ्या तथाकथित कवितेत असो, माझी आविष्कारप्रधानता झेलणाऱ्या बावीस, पंचवीस, तीस, बत्तीस वर्षापासूनचे कोवळे विद्यार्थी आणि कोवळ्या मेंदूवरोवर असो, माझा आविष्कार हासुद्धा माझ्या निर्मितीच्या उमाळ्यातून जन्माला आलेला एक भाग आहे. And thankful to my god that he has fixed up myself in such a profession that which is internal unit of my creativity तर संधिकालाचा माझा संबंध माझ्या निर्मितिविश्वापासून, जीवनक्रमापासून आणि परमेश्वर मला जेवढे क्षण आणखी देणार आहे तोपर्यंत अतूट राहणार आहे. त्याची नाळ मात्र मी सुमित्राबाईपासून तोडलेली नाही. त्याची नाळ माझ्या आदिमतत्त्वाशी Well Doctor, I will like to point out one very important thing about me मी प्राचीन काव्य पुरूष आहे. I am an... I am an ancient man belonging to your modern time. Shake hand with your modern time Doctor. आणि त्यामुळे एकाच वेळेला प्राचीन सभ्यता, प्राचीन आविष्कारशैली यातून मी जेव्हा जेव्हा व्यक्त होतो त्यावेळेला शृंगार म्हणून सगळे परिवेश जे असतात, माझे नेपथ्य कवितेचे जे असते, ते मात्र तुमच्या काळाचे असते. त्यामुळे तुमच्या काळातही वावरतो आणि त्या काळाला बांडगुळवजा उपरा वाटत नाही. प्राचीन काळाची तर गोष्टच सोडा डॉक्टर Because I am an ancient man belonging to the ancient times but my कर्मशैली is working in your times.

डॉ. मुलमुले :

मराठी एकूणच साहित्याचा प्रवाह जर आपण बघितला तर असं दिसतं की तुमच्या संपूर्ण रचनांच्या संदर्भामध्ये मराठीमध्ये दोन ठळक नाव दिसतात. ते म्हणजे आरती प्रभु - चि. त्र्यं. खानोलकर आणि जी. ए. कुळकर्णी. त्यांचं कथाविश्व असो किंवा आरती प्रभुंच्या रचना असो आणि तुमच्या रचना यांच्यामध्ये एक आंतरिक नाळ बांधलेली दिसते दोन्ही सगळ्या रचनांमध्ये आणि खासकरून असं म्हणतात की, जी. ए. आणि तुमच्यामध्ये अखंड तीस वर्षे एक पत्र मैत्रीचा सेतू बांधल्या गेला होता, जरी कधीही तुमची प्रत्यक्ष भेट झाली नसली तरी. या विषयी तुम्ही काही सांगाल का ?

ग्रेस :

I would like to ask you one... one question की whether Doctor you have... you have thrown a poison or a scent on my ancient two wounds ? माझ्या

निर्मितीविश्वात ज्या दोन प्राचीन अजरामर जखमा झालेल्या आहेत, त्याच्यावर आपण गुलाबपाणी शिंपडता की तेजाब ?

यह मरतबा बलंद मिला जिसको मिल गया
हर मुद्दई के वासते दारो रसन नही

हे निर्मितिविश्वातील ईश्वरपण ज्याला मिळाले त्याला मिळाले.

हर मुद्दई के वासते दारो रसन नही

याचा साधा अर्थ असा आहे की हुतात्म्याला ज्या रेशमाच्या दोराच्या पाशांनी त्याचे vocal cords आवळतात ते भाग्य एखाद्यालाच मिळते. आरती प्रभु आणि जी. ए. कुळकर्णी हे त्या वंशातले आहे. आरती प्रभुच्या मृत्यूच्या नंतर ज्या ओळी मला स्फुरल्या त्या जर मी सांगितल्या तर त्यांच्यामाझ्यातल्या अनुबंधाची वाट थोडीशी सुकर होऊ शकेल.

मला वाटते मृत्यु असतो सख्या रे

आरतीला उद्देशून म्हणतो -

मला वाटतो मृत्यु असतो सख्या रे
सतीच्या खुनासारखा पोरका
मला वाटतो मृत्यु असतो सख्या रे
सतीच्या खुनासारखा पोरका
जळाच्या भयाने दुभंगून गेली
सुन्या स्वप्नपारावरी द्वारका

कुणाला म्हणावे तुझ्या मेघमाळा
मला चिंब होऊनि रे दाखवा
कुणाला म्हणावे तुझ्या मेघमाळा
मला चिंब होऊनि रे दाखवा
जुन्या वैष्णवाने घरी आणल्या ना
मला शैव समजून या पादुका

या ओळींचे उल्लेख जी. ए. कुळकर्णींनी केलेले आहेत. पण एक गोष्ट डॉक्टर आपण लक्षात घ्या. जी. ए. आणि आरती हे माझे सहोदर आहेत. माझे सहप्रवासी आहेत. त्यांचा छायाप्रकाश माझ्यावर नाही आणि माझा छायाप्रकाश त्यांच्यावर नाही. सहप्रवासी आहेत. एवढे म्हटल्याच्यानंतर मला आणखी माझ्या ओळींनी त्या चिमुकल्या प्रश्नाचा चिमुकला अंत करायचा आहे.

घरभर सरणाचे पात्र सांडून जाई
फिरूनि फिरूनि माझा वंश निर्वंश होई
फिरूनि फिरूनि माझा वंश निर्वंश होई

डॉ. मुलमुले :

याठिकाणी मला तुमची एक कविता आठवते, 'राजपुत्र आणि डार्लिंग' या काव्यसंग्रहातली. गुलाब वाळवण्याची गोष्ट या कवितेत आहे. त्या ओळी आहेत की,

जीव गोळा करून तू उच्चारलेला शब्द
कौलराच्या फटीत अडकला;
ज्या भाषेत मी जन्माला आलो तिथेही
अनाथ वाटले मला !

तर ही भाषा तुमच्या तोंडी का की ''ज्या भाषेत मी जन्माला आलो तिथेही अनाथ वाटले मला ?''

ग्रेस :

प्रश्न छान आहे आणि नेमका आहे. इतर कुठल्याही माझ्या आतल्या इंद्रियाची मदत न घेता डॉक्टर आपण सरळ माझ्या हृदयाचीच कॉलर पकडलेली आहे. त्याबद्दल मी थोडेसे तुमचे आभार मानतो. हे जे अनाथपण आहे हे कुठल्याही प्रकारच्या न्यायाच्या आणि अन्यायाच्या भावनेतून आलेले नाही. मराठी भाषेत, माय मराठीत मी जो स्वतः एक 'चंद्रमाधवीचा प्रदेश' उभा केलेला आहे, त्या चंद्रमाधवीच्या प्रदेशातील माझ्या काव्यगत पात्रांना, काव्यनिष्ठ पात्रांना किंवा 'संध्यामग्न पुरूषाच्या लक्षणा'तील चंद्रमाधवीचे जे प्रदेश अवतरलेले आहेत, त्यातीलही कुठल्या पात्रावर व्यक्तीवर झालेला अन्याय आणि दूर करण्याच्यासाठी मी माझ्या अनाथपणाला वेठीस धरलेले नाही. तरीही तुमच्या प्रश्नाचे उत्तर अजून मिळालेले नाही. आणि ते उत्तर असे की आजही चंद्रमाधवीच्या प्रदेशातून तुमच्या मायमराठीला ज्या मी हाका मारतो आहे, त्या सुरू आहे आणि तेच त्याचे उत्तर आहे. तरीही तुम्हाला नेमके उत्तर पाहिजे का ? ते

कहातक नाम गिनवाए सभीने मिलके लुटाये.

And what's my reaction ? Because I had already told you that I am an ancient man with the decent Hedonism द्वैती असल्यामुळे भोगवाद आला आहे पण हा चंगळवाद नाही. माझा काव्यानुभव is a decent Hedonism असं म्हटलेलं आहे आणि तरीसुद्धा हा न्याय आणि अन्याय झाला असे समजलो. But Doctor dont ferget one important point while answering this question. I am not fighting, I am not fighting for share. I am fighting for a theme and which is my theme ? my theme is all the mirrors are shattered by the dashings of the grotesque images thats why feel orphan, not insecure - not insecure -- orphan. माझा वाली कोणी नाही. कोणी त्राता नाही. आरती प्रभुंवर अन्याय झाला असेल, जी. ए. कुळकर्णींवर अन्याय झाला असेल, स्पष्टच जर बोलावयाचे झाले तर एखाद्या व्यासपीठावरून आपण असे म्हणता की गेल्या शंभर वर्षात या तोडीचा तर

सोडाच जोडीचाही गद्यलेखक, जी. ए. कुळकर्णी एवढा निर्माण झाला नाही. आणि मूल्यमापनाचे सगळे वाटे, पैशाचे, दुपट्ट्यांचे, फेट्यांचे त्या माणसाकडे किंवा धारवाडच्या दिशेकडे कोणी जात नाही? हे जे अनाथपण जी. ए. कुळकर्णीला वाटलं असेल, हे जे अनाथपण त्या... त्या आरती प्रभुला वाटल असेल त्याचे प्रतिनिधित्व मी करतो. I am not fighting for right हे घडतं. त्यामुळे आपल्या अभिरूचीचे पोट तपासण्याची गरज आहे, की खरचं आपलं आरती प्रभुवर प्रेम आहे कां ? 'ये रे घना. ये रे घना' असं आपण खरंच गुणगुणतो काय? 'काजळमाया' खरोखर आपण डोळ्यातल्या काजळाप्रमाणे वापरतो की काजळमायेतून षड्रीपूंचा, महाकाव्याच्या बटा उभा करणारा जबरदस्त देखावा निर्माण करणाऱ्या या महान गद्यलेखक जी. ए. कुळकर्णीशी वाटतो ? मग त्याच्या हृदयाला सोसेल, त्याच्या निर्मितीला पूरक होईल असे सांस्कृतिक आणि वाङ्मयीन वातावरण कोण तयार करेल? जी. ए. ना धारवाड सोडावे लागले आर्थिक परिस्थितीसाठी. एका प्रचंड वृक्षाला मुळासकट उपटून तुम्ही पुण्यात रूजवले. ती रूजवण त्यांना रूचली नाही आणि त्यांनी प्राण सोडला आणि तुम्ही नाव बदनाम केले कॅन्सर रोगाचे ! तुम्हाला का नाही होत कॅन्सर ? ज्या प्रकारचा तुम्हाला कॅन्सर झालेला आहे तो प्रथम दुरूस्त करा. एखादा रसिक, एखादी रूणझुण चाळ बांधलेली बाई पुण्याच्या गाडीतून धारवाडच्या दिशेकडे निघालेली आहे आणि जी. ए. च्या त्या कडेमनी कंपाऊंड नावाच्या दरवाज्यावर म्हणते

मै देखु तो सही ये दुनिया तुम्हे कैसे सताती है
कोई दिनके लिये अपनी निगेहबानी मुझे दे दो

आणि तरीही तुमची अभिरूची आणि त्या कलावंताचे सुखदुःख यात संपूर्णपणे भ्रष्ट... भ्रष्ट आणि अनैतिक अशी संगती तुम्ही साधण्याचा प्रयत्न करता, त्याचा कैवारी कोण ? त्याचा कैवारी कोण ? बोरीस पास्तरनाक ला तुम्ही म्हणता एक तर नोबेल पारितोषिक स्वीकार नाही तर आमचा देश सोड. त्यानी काय करावं? आणि कलावंताने जर एखाद्या भाषेवर सूड उगवायचं ठरवलं... पास्तरनाकनी काय केलं ? त्यानंतर तो बोलला नाही. त्याने लेखन केले नाही. रशियन भाषेच्या विकासाला त्याने शाप दिला. कारण त्याने लिहिले नाही. त्यामुळे तरीही तो कलावंत आपल्या निर्मितीच्या आत्म्याची इयत्ता गमावत नाही. म्हणून तर तो कलावंत आहे. तुम्ही त्याच्या एकाकीपणाचं कौतुक करता. खरचं त्यांना वाटत नसेल आपण गुजरीमध्ये जावं ? आपण हाटामध्ये जावं ? आपण वेटाळामध्ये जावं ? आपण रंगीबेरंगी मुर्लीच्या केसाची वळणं पाहावित, असं नाही वाटत नसेल का ? असं पहा.... पण तुम्ही तो एकांत ती वाङ्मयीन परिस्थिती नाही. केशवसुतांनी रांगोळी घालणाऱ्या बाईच्या त्या रांगोळीच्याभोवती परकोट कशाचा केला ? स्वस्तिक आणि सुदर्शनचक्राचा. या सौंदर्याकडे जर कोणी वाकडी दृष्ट टाकेल तर हे सुदर्शन चक्र गरगरत गरगरत जाऊन त्या डोळे बांधलेल्या वाकड्या वृत्तीची अभिरूचीची मान कचकन कापून टाकेल. जी. ए., आरती प्रमु आणि जर आपली परवानगी असेल तर मी, आम्हाला असा एकही कैवारी नाही ? आम्हाला साहित्य... पण घाबरू नका. कलावंत शाप देत नसतो he never curse to any society एका दगडाने दोन पक्षी मारणे हा मारण्याचा भागच नाही आम्ही काय करणार? एका फांदीवर तीन पक्षी झुलवणार म्हणजे प्रत्येक पक्षाला असे वाटेल की या फांदीला माझा झोपळा आहे. म्हणून मी त्याला म्हटलेलं आहे की... All the mirrors have been shattered by dashings of the grotesque images. Still I have not given up the mission of polishing the sky. I have not given the mission of polishing the sky.

मुलाखत :
डॉ. नंदकुमार मुलमुले
गोवर्धन घाट रोड, नांदेड ४३१ ६०१
भ्रमणभाष : ९४२२८७३३०३

शब्दांकन :
अनिल कुलकर्णी
शिरे ले-आऊट, शास्त्री नगर,
यवतमाळ ४४५ ००१
भ्रमणभाष : ७५८८१८८४७३

:: निवेदन ::

कवी ग्रेस यांच्या कवितेविषयी व ललितबंधांविषयी गेल्या ४५ वर्षात महाराष्ट्रातील व महाराष्ट्राबाहेरील अनेक नियतकालिकांमधून बरेच साहित्य प्रकाशित झाले आहे. तथापि या संपूर्ण साहित्याची सूची करण्याचे प्रयत्न मात्र झालेले नाहीत. ग्रेस यांच्या समग्र साहित्याची सूची तयार करण्याचे काम मी हाती घेतले आहे. विविध वृत्तपत्रे व नियतकालिकांतून प्रकाशित झालेल्या लेखनाची सविस्तर माहिती छायाप्रतीसह पाठवून सहकार्य करावे ही विनंती.

: पत्ता :
अनिल कुलकर्णी
शिरे ले-आऊट, शास्त्रीनगर, यवतमाळ ४४५ ००१
भ्रमणभाष : ७५८८१८८४७३
anilkulkarni0812@gmail.com

ग्रेस : एक कविता

बलवंत जेऊरकर

ग्रेस
कुठल्याशा निळ्याशार डोहात
तू रहातोस...
म्हणून उतरतो मी ही डोहात
पण
सापडत नाहीस तळ गाठत आला तरी
अचानक गळ्याला मिठी मारतोस... घट्ट
कुठूनतरी येऊन...
बुडतोस
आणि
बुडवत रहतोस...

तरीही मी
काठालाच - नखशिखांत कोरडा !

फक्त
आत
कुठंतरी अगदी आत
पहाडांच्या मध्यभागी बंदीस्त तलावातील पाणी
डहुळतं
बस् ! इतकंच !

तलावातलं कमळ खुडून घावं
तसा
द्यावं म्हणतोय तुझ्याहाती
अंगावर उभारलेला एक एक शहारा
त्वचेसकट छिलून
तेवढीच एक साक्ष : तू भावल्याची
तुला ओळखल्याची नव्हे

तरीही
तू रोपलेली दुखरी नस
सापडत नाही,
उलट वाजत रहाते
एकतारी बनून
अहोरात्र - सांज सकाळ
अनाहत नाद !
हॉस्पिटल वार्ड ते पहाडी थिएटर.

तुझ्या कथेतील स्त्रिया कुठल्या दुःखाला पाजत असतात -
कळलं नाही !
शुभ्र खिंकाळणारे घोडे कुठल्या दुःखाला बुजत असतात -
कळलं नाही !

तू
अशा अनोळखी प्रदेशात का नेतोस
मला
जिथली पानगळ अगदी ओळखीची वाटते
जिथल्या चर्चमध्ये सदा रविवार असतो
आणि जिथल्या बेल्स गात असतात
सामूहिक करूण स्तोत्रे
पियानोच्या घनघोर, व्याकुळ
कोमल स्वरात

प्रार्थनेला झुकलेल्या मानेवर ठेवतोस
तू
हिऱ्यांच्या मुठीचा खंजर
थंड
मी तयार होतो
रक्तमधुर घावासाठी

संगमरवरी चर्च येईल अंगावर म्हणून
धावत रहातो मी
रात्रं दिवस... शेकडो मैल दूर
येऊन पोहचतो
पानगळीच्या खच साठलेल्या
उंचच उंच झाडांच्या प्रदेशात
इथून दिसतोय... चर्च
आला अंगावर तरी त्यावरचा छोटा क्रूस आदळेल
माथ्यावर

तू मातीला फुलं बनवण्याचा व्याप सुरू केल्यापासून
माझा आकांत आहे
'मला वाळवंटी रेतीतून बाहेर काढ...'

अनुक्रमणिका

तूच दयाघन - हात देतोस
पायावर पाय देऊन

कोमल अर्भक हाती यावं - टचटचावेत स्तन
पण दूध फुटू नये
डोळ्यात साचावेत आरक्त थेंब
पण ओघळ गाली सुटू नयेत
अशी अस्वस्थता

बुबुळांसमोर एक घट्ट पडदा
पाणीदार... जन्मभर
तू सांगतोस
'या पलीकडं पहा...

संध्याकाळचं शेवाळ पसरवतोस इथुन - तिथून
तू
मी काठावर पुन्हा पुन्हा पाय सैल सोडतो
पुन्हा आत
पुन्हा घात

''झाड उन्मळतं
उडते धूळ
आकाशाच्या नरड्यात
झाडाचं मूळ !''

काय दाखवतोस - कळत नाही
फक्त पहात रहातो
मेंदूच्या उत्खननात तुला सापडलेल्या आदिम प्रतिमा
वाटतं कुठं तरी स्फोट होत आहेत - हजारो, हजारो
तरी शरीर कसं शांत !
थडग्यावर वाहिलेलं दवमग्न एक तपकीरी फूल...

का तू असा छळत असतो ?
तरीही
का मी तुझ्यामागं पळत असतो ?

तू या प्रदेशाचा राजपुत्र
दरीच्या तोंडाला बसवतोस
सांगतोस उडण्याचा मंत्र
मी दोन गोष्टभ विसरतो :
एक : दरीचं तोंड
दोन : माझं पंखहीनपण

गरूडानं सोडून द्यावा
उं
चा
व
रू
न
साप

तसा मी खाली येत असतो
आत्ता पडणार -
तेवढ्यात तू पकडतोस
विचारतोस डोळ्यांनीच - 'कशी झाली सैर ?'

''एकदम ढकलून दे, असं उडायला सांगू नको
जहर दे एकदाचं, बेहोश पडायला सांगू नको''

मग तू माझा एक पापा घेतोस
पावलांखाली गवत वाळलेलं : तशी दाढी वाजते माझ्या गालाशी

तू
माझं लहानसं बोट पकडून म्हणतोस
'चल तुला शुभ्र घोड्यावर बसवतो'

मला माहीत आहे


तू दाखवणार आहेस
नालबंद घोडे आणि
शुभ्र खुरहीन घोड्यावर बसवणार आहेस

क्षितिजाकडं तोंड करून उभ्या घोड्याच्या
पाठीवर तू मला बसवतोस

मी पुन्हा तयार आहे...

बलवंत जेऊरकर
३०३, शांतादुर्गा अपार्टमेंट,
१०० फुटी रोड, सरोवर हॉटेलमागे,
विश्रामबाग, सांगली ४१६ ४१५
भ्रमणभाष : ९८५०६२२८८६

अनुक्रमणिका



(चित्र : शुभा गोखले)

सुमित्रा उठे नग्न मूर्तीतुनी
नग्न मूर्तीतले शिल्प शोधावया;
गर्भातल्या गौतमालाच गर्भात
का ओळखीची दिसावी गया ?

घनातून घ्यावी उन्हातील संध्या
जसा पारवा रंग ओवाळितो...
उरीच्या जरीला सखे जाळतांना
तुझा गाव वाटेत अंधारतो.

रेखाटतांना असे चित्र जेव्हा नि
वेळूत वाजे नवी बासरी;
रंगांध झाली तरीही दिठीला
परी बांधिते ही कळी मोगरी.

अरण्यात हाकारतांना पशुंना
कडेलोट होतो नदीचा जसा;
घेना तशी संग लंघून कवितेस
प्रतिबिंब होतो जसा आरसा

पाठीतल्या गोंदणांच्या तऱ्हांनी
स्तनांना कधी ये सुगंधी कळा;
वाऱ्यातले मंत्र रानात घेती
जशा पांघरूनी झळांच्या झळा.

दयेने तुझे दुःख सुस्नात होतेच
ती डोंगरी ओरडे सारखी ?
मैनेस साधे कळेना कसे हे
कधीची तिची मोडली पालखी...

ऋतूंचा दिलासा युगांच्या उदासित
हे विश्व आता कुठे ठेवता ?
येईल का रे तुझ्या यादवीला
कर्वीच्या कुळांची कधी सांगता ?

अनुक्रमणिका

संध्यामग्र पुरूषाचा अल्प परिचय

ग्रेस

- प्रा. माणिक सीतारामपंत गोडघाटे
- जन्म : १० मे १९३७, नागपूर
- शिक्षण : एम. ए. मराठी (१९६६)
  नागपूर विद्यापीठातून प्रथम. ना. के. बेहरे सुवर्णपदक
- धनवटे नॅशनल कॉलेज नागपूर येथे अधिव्याख्याता (१९६६ ते १९६८)
- वसंतराव नाईक समाजविज्ञान संस्था नागपूर येथे अधिव्याख्याता (१९६८ ते १९९७)
- १९९७ मध्ये अधिव्याख्याता पदावरून निवृत्त
- याशिवाय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील ललित कला विभागात व पदव्युत्तर मराठी विभागात अध्यापन.
- राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील ललित कला व मराठी विषयाचे पी. एच् डी. चे मार्गदर्शक
- १९७१ ते १९७६ या काळात - सदस्य, सल्लागार समिती (मराठी) भारतीय साहित्य अकादेमी दिल्ली.
- १९८२ ते १९८६ - सदस्य, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई.
- १९८२ ते १९८६ - सदस्य, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई.
- विधिसभा सदस्य, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.
- विदर्भ साहित्य संघाच्या 'युगवाणी' या वाङ्मयीन नियतकालिकाचे संपादक (१९७१ ते १९७४)
- रायटर्स सेन्टर मुंबई या संस्थेच्या 'संदर्भ' या नियतकालिकाचे संपादक (१९७५ ते १९७६)
- लोकमत 'दीपोत्सव'चे सल्लागार संपादक

प्रकाशित साहित्य :

कवितासंग्रह

- संध्याकाळच्या कविता (१९६७)
- राजपुत्र आणि डार्लिंग (१९७४)
- चंद्रमाधवीचे प्रदेश (१९७७)
- सांध्यपर्वातील वैष्णवी (१९९७)
- सांजभयाच्या साजणी (२००६)
- बाई! जोगिया पुरूष (२०१२)

ललितबंध

- चर्चबेल (१९७४)
- मितवा (१९८७)
- संध्यामग्न पुरूषाची लक्षणे (२०००)
- मृगजळाचे बांधकाम (२००४)
- वाऱ्याने हलते रान (२००९)
- कावळे उडाले स्वामी (२०१०)
- ओल्या वेळूची बासरी (२०१२)

अनुवाद

- चर्चबेल - गुजराती अनुवाद - डॉ. विजया मेहता
- मितवा - गुजराती अनुवाद - डॉ. विजया मेहता
- ग्रेस यांची निवडक कविता - गुजराती अनुवाद - डॉ. उमाशंकर जोशी

ध्वनिफित

- साजणवेळा : शब्दवेध, मुंबई (१९९८)
- सांध्यपर्व : डॉ. माधवी वैद्य, पुणे (१९९८)
- संध्यासूत्रांचा यात्रिक (२००४)

अनुक्रमणिका

प्रतिभासंवाद

जेष्ठ संगीतकार हृदयनाथ मंगेशकर व कवी ग्रेस यांची गीत, संगीत वक्तृत्त्वाची अपूर्व मैफल. २००८ ते २०१२ या काळात सुमारे वीस मैफलींचे आयोजन. मैत्रजीवाचे - इचलकरंजी -२००८ पहिली मैफल, ४ मार्च २०१२ यवतमाळ - शेवटची मैफल.

ग्रेस यांच्या साहित्याविषयीचे निवडक लेखन

- ग्रेस आणि दुर्बोधता - जयंत परांजपे
- ग्रेस विषयी (ग्रेस यांची प्रदीर्घ मुलाखत व त्यांच्या कवितेविषयीची समीक्षा) - डॉ. अक्षयकुमार काळे
- रचनेच्या खोल तळाशी - डॉ. नंदकुमार मुलमुले
- प्रेरणा आणि निर्मिती - डॉ. एस. एस. भोसले (संध्याकाळ : ग्रेसच्या कवितेचे गोत्र)
- पार्थिवतेचे उदयास्त - डॉ. द. भि. कुलकर्णी (चर्चबेल)
- वाङ्मयीन चर्चा आणि चिकित्सा - डॉ. बाळकृष्ण कवठेकर (ग्रेस यांची कविता)
- धुके आणि शिल्प - त्र्यं. वि. सरदेशमुख ('धुके आणि शिल्प'; 'ग्रेस पॅनोरमा')
- स्वातंत्र्योत्तर मराठी कविता : संपादक - डॉ. सुषमा करोगल
  (ग्रेस आणि आरती प्रभू : वेदनेची शिलणगाथा-डॉ.लीला गोविलकर)

पुरस्कार

- महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट वाङ्मय निर्मिती पुरस्कार : 'संध्याकाळच्या कविता', 'राजपुत्र आणि डार्लिंग', 'चर्चबेल', 'चंद्रमाधवीचे प्रदेश'.
- मारवाडी संमेलन पुरस्कार - 'मितवा'
- दमाणी पुरस्कार सोलापूर - 'संध्यामग्न पुरूषाची लक्षणे'.
- जीवनव्रती पुरस्कार - कृषी विकास प्रतिष्ठान नागपूर
- सहकार महर्षी साहित्य पुरस्कार नागपूर.
- नागभूषण पुरस्कार - नाग फाऊंडेशन नागपूर.
- प्रिय जी. ए. कुलकर्णी सन्मान.पुणे.
- विदर्भ भूषण पुरस्कार, नागपूर.
- वाग्विलासिनी पुरस्कार - दीनानाथ मंगेशकर प्रतिष्ठान,पुणे.
- प्रादेशिक भाषा राज्य पुरस्कार, बंगलोर - 'चंद्रमाधवीचे प्रदेश'
- साहित्य अकादेमी पुरस्कार - 'वाऱ्याने हलते रान'.
- गौरववृत्ती - महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई (२००५)
- समकालीन प्रकाशनाच्या पहिल्या ई-साहित्य संमेलनाचे अध्यक्ष.

मृत्यू : २६ मार्च २०१२.

संकलन :
ॲड्. वासुदेव विधाते
मु.पो.मार्की (बु.), ता. झरी-जामणी,
जि. यवतमाळ ४४५ ३०५
भ्रमणभाष : ९९२२३७४२४६

प्रतिभासंवाद

जेष्ठ संगीतकार हृदयनाथ मंगेशकर व कवी ग्रेस यांची गीत, संगीत वक्तृत्वाची अपूर्व मैफल. २००८ ते २०१२ या काळात सुमारे वीस मैफलींचे आयोजन. मैत्रजीवाचे - इचलकरंजी -२००८ पहिली मैफल, ४ मार्च २०१२ यवतमाळ - शेवटची मैफल.

ग्रेस यांच्या साहित्याविषयीचे निवडक लेखन

- ग्रेस आणि दुर्बोधता - जयंत परांजपे
- ग्रेस विषयी (ग्रेस यांची प्रदीर्घ मुलाखत व त्यांच्या कवितेविषयीची समीक्षा) - डॉ. अक्षयकुमार काळे
- रचनेच्या खोल तळाशी - डॉ. नंदकुमार मुलमुले
- प्रेरणा आणि निर्मिती - डॉ. एस. एस. भोसले.(संध्याकाळ : ग्रेसच्या कवितेचे गोत्र)
- पार्थिवतेचे उदयास्त - डॉ. द. भि. कुलकर्णी (चर्चबेल)
- वाङ्‌मयीन चर्चा आणि चिकित्सा - डॉ. बाळकृष्ण कवठेकर (ग्रेस यांची कविता)
- धुके आणि शिल्प - त्र्यं. वि. सरदेशमुख ('धुके आणि शिल्प'; 'ग्रेस पॅनोरमा')
- स्वातंत्र्योत्तर मराठी कविता : संपादक - डॉ. सुषमा करोगल
  (ग्रेस आणि आरती प्रभू : वेदनेची शिलणगाथा-डॉ.लीला गोविलकर)

पुरस्कार

- महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट वाङ्‌मय निर्मिती पुरस्कार : 'संध्याकाळच्या कविता', 'राजपुत्र आणि डार्लिंग', 'चर्चबेल', 'चंद्रमाधवीचे प्रदेश'.
- मारवाडी संमेलन पुरस्कार - 'मितवा'
- दमाणी पुरस्कार सोलापूर - 'संध्यामग्न पुरूषाची लक्षणे'.
- जीवनव्रती पुरस्कार - कृषी विकास प्रतिष्ठान नागपूर
- सहकार महर्षी साहित्य पुरस्कार नागपूर.
- नागभूषण पुरस्कार - नांग फाऊंडेशन नागपूर.
- प्रिय जी. ए. कुलकर्णी सन्मान पुणे.
- विदर्भ भूषण पुरस्कार, नागपूर.
- वाग्विलासिनी पुरस्कार - दीनानाथ मंगेशकर प्रतिष्ठान,पुणे.
- प्रादेशिक भाषा राज्य पुरस्कार, बंगलोर - 'चंद्रमाधवीचे प्रदेश'
- साहित्य अकादेमी पुरस्कार - 'वाऱ्याने हलते रान'.
- गौरववृत्ती - महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई (२००५)
- समकालीन प्रकाशनाच्या पहिल्या ई-साहित्य संमेलनाचे अध्यक्ष.


मृत्यू : २६ मार्च २०१२.

संकलन :

ॲड्. वासुदेव विधाते

मु.पो.मार्की (बु.), ता. झरी-जामणी,
जि. यवतमाळ ४४५ ३०५
भ्रमणभाष : ९९२२३७४२४६

अनुक्रमणिका



अनुक्रमणिका